**मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**आदेश क्र. मुमाआ-२००९/अपिल क्र.५१२८/०२**

**श्री. देवप्पा अनाप्पा गावडे ----अपिलार्थी**
**अ-५०१,गहलोत मॅजेस्टी,**
**प्लॉट ३ अ, सेक्टर ४६अ**
**पाम बीच मार्ग, नेरुळ, नवी मुंबई ७०६**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उपसचिव -----उत्तरवादी**
**कार्यासन -१४ सामान्य प्रशासन विभाग,**

**जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी**
**कार्यासन -१४ सामान्य प्रशासन विभाग,**

**- विवेचन**

**अपिलाचा दिनांक ३०.११.२००९**
**सुनावणी दिनांक १२.१.२०१०**
**अपिलार्थी, अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी उपस्थित.**

**अर्जदाराने उपसचिव पदावर पदोन्नतीसाठी (दि.१.९.२००९ ते ३१.८.२०१० या कालावधीसाठी) तयार करण्याच्या प्रस्तावात किंवा आस्थापना मंडळाच्या कार्यवृत्तामध्ये भटक्या जमाती (क)साठी किती जागा रिक्त ठेवल्या आहेत किती भटक्या जमाती (क)प्रवर्गातील अधिका-यांचा समावेश आहे, आस्थापना मंडळाची बैठक केव्हा झाली याबाबतची मागणी केलली माहिती प्राथमिक अवस्थेत व गोपनीय स्वरुपाची असल्यामुळे उपलब्ध करुन देता येणार नाही असे अर्जदारास कळविले होते. परंतू याने समाधान न झाल्याने अर्जदाराने सामान्य प्रशासन विभागाकडे प्रथम अपिल सादर केले होते. परंतू प्रथम अपिलाच्या सुनावणीस अर्जदार अनुपस्थित होते. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांनी दिलेला खुलासा योग्य आहे असा निर्णय दिला आहे. त्याविरुध्द अर्जदाराने आयोगाकडे व्दितीय अपील सादर केलेले आहे. अर्जदार यांनी यापूर्वी त्यांच्या दि.२४.२.२००९ व दि.८.९.२००९ च्या अर्जाव्दारे उपसचिव पदावरील पदोन्नतीच्या अनुषंगाने मागणी केलेल्या माहितीपैकी सन २००३-२००४ व सन २००७-२००८ पर्यतच्या पदोन्नती सूची नियमित करण्याची कार्यवाही झालेली असल्याने त्यांना आवश्यक माहिती उपलब्ध करुन देण्यांत आली आहे असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले.**

अपिलीय अधिकारी यांचे म्हणण्यानुसार जो वरील अर्जदाराचा मुळ अर्ज दि.८.९.२००९ रोजीचा होता व त्यावेळेला अर्जदाराने मागितलेली माहिती ही प्राथमिक स्वरुपात गोळा करण्यात आलेली होती व निर्णय प्रक्रिया सुरु होण्याच्या बेतात असल्याने ती माहिती देता आलेली नाही.

मात्र आता निर्णय प्रक्रिया पूर्ण झालेली असल्यामुळे उर्वरित माहिती त्वरीत उपलब्ध करुन देण्यांत येईल असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. सबब पुढील प्रमाणे आदेश देण्यांत येत आहेत.

## आदेश

अपील निकाली काढणेत येत आहे.

मुंबई (डॉ. सुरेश वि.जोशी)
दिनांकः १२.१.२०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

आदेश क्र. मुमाआ-२००९/अपिल क्र.५१७९/०२

श्री. राजेश हिरालाल मर्चट ----अपिलार्थी
७१४, गांधी नगर, दैनिक शिवनेर मार्ग,
वरळी,मुंबई १८

विरूध्द

प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उपजिल्हाधिकारी --उत्तरवादी
जिल्हाधिकारी कार्यालय,मुंबई शहर,
ओल्ड कस्टम हाऊस शहिद भगतसिंग मार्ग,
फोर्ट,मुंबई ४०००१

जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार
जिल्हाधिकारी कार्यालय,मुंबई शहर,
ओल्ड कस्टम हाऊस शहिद भगतसिंग मार्ग,
फोर्ट,मुंबई ४०००१

- विवेचन

अपिलाचा दिनांक २६.१०.२००९
सुनावणी दिनांक १३.१.२०१०

अपिलार्थी अनुपस्थित व अपिलीय अधिकारी. जन माहिती अधिकारी उपस्थित. अर्जदारास पुढील माहिती पाहिजे होती.

"किरन जेठालाल मकवाना हयांना No.CB/CLII/SC/२७९/८६(२३/७/८६) अन्वये दिलेल्या जाती प्रमाणपत्राच्या संदर्भात किरण जेठालाल मकवाना यांनी आपल्या कार्यालयात जी कागदपत्र सादर केली होती त्या सर्व कागदपत्राच्या छायांकित प्रती मिळाव्यात"

सदरील पेपर हे अतिशय जुने असल्यामुळे व प्रयत्न करुनही सापडले नाहीत. जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचे म्हणणे तसेच त्याबाबतची कागदपत्र सापडत नाही ही वस्तुस्थिती मान्य करावी लागेल.

अपिलीय अधिकारी यांचे म्हणण्यानुसार ओल्ड कस्टम हाऊस मधील जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये रेकॉर्ड ठेवण्यासाठी पुरेशी जागा नाही त्यामुळे कागदपत्र सुध्दा व्यवस्थित ठेवली जात नाहीत. याबाबत जिल्हाधिकारी यांनी जातीने लक्ष देऊन सर्व रेकॉर्ड व्यवस्थित राहतील एवढी निगराणीबाबतची कार्यवाही करावी. सबब पुढील आदेश देण्यांत येत आहेत.

आदेश

अपील निकाली काढणेत येत आहे.

मुंबई (डॉ. सुरेश वि.जोशी)
दिनांक: १३.१.२०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

आदेश क्र. मुमाआ-२००९/अपिल क्र.५१८१/०२
आदेश क्र. मुमाआ-२००९/अपिल क्र.५१८२/०२

श्री. डॉ.के.एस.पिल्लई ----अपिलार्थी
बी-१/१ नारायण पुजारी नगर
अे.जी.ख्रान रोड,वरळी,मुंबई १८

विरूध्द

प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी आरोग्य अधिकारी --उत्तरवादी
बृहन्मुंबई महानगर पालिका कार्यालय,
सार्वजनिक आरोग्य विभाग,
एफ/दक्षिण विभाग कार्यालय,
३ रा मजला डॉ.आंबेडकर रोड, परेल, मुंबई १२

जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी आरोग्य अधिकारी
बृहन्मुंबई महानगर पालिका कार्यालय,
सार्वजनिक आरोग्य विभाग,
एफ/दक्षिण विभाग कार्यालय,
३ रा मजला डॉ.आंबेडकर रोड, परेल, मुंबई १२

- विवेचन

अपिलाचा दिनांक २८.१०.२००९
सुनावणी दिनांक १३.१.२०१०
अपिलार्थी उपस्थित व जन माहिती अधिकारी उपस्थित.

अर्ज दाराच्या एका अर्जावर सही नसल्यामुळे व दुस-या अर्जाच्या बाबतीत जन हित नसल्यामुळे अर्जदारास माहिती देण्यांत आलेली नाही. अर्जदाराचे दोन्ही अर्ज पाहिले असता, दोन्ही अर्जाच्या मजकुरातील माहितीमध्ये जन हित निश्चितपणे सामावलेले दिसते त्यामुळे. मात्र २० वर्ष डीपीडीसी फंडाची माहिती देणे हे विस्तुत काम आहे अपिलार्थी सकट सर्व संबंधीतांशी चर्चा करुन असे ठरविण्यांत आले की, डीपीडीसी स्किमबाबत २००८-२००९ या वर्षाबाबतची संपूर्ण माहिती देण्यांत यावी व २००९-२०१० या वर्षाचे अद्ययावत स्टेटमेंट देण्यांत यावे व कार्यकारी अभियंता यांना असे सांगितले की, ड्रग रिसर्च हे महापालिकेच्या प्रत्येक मेडिकल कॉलेजच्या हॉस्पीटलमध्ये होत असतात तेव्हा त्या त्या मेडिकल कॉलेजच्या जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्जदाराचा अर्ज पाठवून त्याबाबतची माहिती अर्जदारास १५ दिवसांचे आत देण्यांत यावी. सबब पुढीलप्रमाणे आदेश देण्यांत येत आहेत.

आदेश

अपील अंशतः मान्य करण्यांत  येत आहे. संबंधितांनी वरील प्रमाणे कार्यवाही करावी.

**मुंबई** **(डॉ. सुरेश वि.जोशी)**
**दिनांकः १३.१.२०१०** **राज्य  मुख्य माहिती आयुक्त**

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

आदेश क्र. मुमाआ-२००९/अपिल क्र.५२००/०२

श्री. अब्दुल रहिम बुखारी ----अपिलार्थी
५७/अ,रुकसाना पॅलेस,
४ था मजला, मोहम्मद अली रोड
मुंबई ४००००३

विरूध्द

प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक आयुक्त मनपा --उत्तरवादी
बृहन्मुंबई मनपा (दुकाने व आस्थापना)
जी/साईथ वॉर्ड ४ था मजला मनपा इमारत,
धनमील नाका नाम.जोशी मार्ग,मुंबई १३

जन माहिती अधिकारी तथा
बृहन्मुंबई मनपा (दुकाने व आस्थापना)
जी/साईथ वॉर्ड ४ था मजला मनपा इमारत,
धनमील नाका नाम.जोशी मार्ग,मुंबई १३

- विवेचन

अपिलाचा दिनांक ३०.१०.२००९
सुनावणी दिनांक १५.१.२०१०
अपिलार्थी अनुपस्थित व जन माहिती अधिकारी उपस्थित.

दोन्ही बाजुचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून आले की, अर्जदारास त्यांना हवी असलेली माहिती देण्यांत आलेली आहे. या उपरही त्यांना आणखी माहिती हवी असल्यास नस्तीचे निरिक्षण करुन त्यांना हव्या असलेल्या कागदपत्राच्या प्रती शुल्क भरुन प्राप्त करुन घ्याव्यात.

आदेश

अपील निकाली काढणेत येत आहे.

मुंबई (डॉ. सुरेश वि.जोशी)
दिनांकः १५.१.२०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त

**मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**आदेश क्र. मुमाआ-२००९/अपिल क्र.५२९८/०२**

**श्री. रामेश्वर पुनमचंद नाईक ----अपिलार्थी**
**व्दारा आमदार गिरीश महाजन,**
**रुम नं.६०१, आमदार निवास,**
**आकाशवाणी, चर्चगेट मुंबई ३२**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा --उत्तरवादी**
**सर ज.जी.समूह रुग्णालये, भ्रायखळा,मुंबई**

**जन माहिती अधिकारी तथा प्रशासकिय अधिकारी**
**सर ज.जी.समूह रुग्णालये, भ्रायखळा,मुंबई**

**- विवेचन**

**अपिलाचा दिनांक ५.१०.२००९**
**सुनावणी दिनांक १५.१.२०१०**
**अपिलार्थी व अपिलीय अधिकारी उपस्थित**

**अर्जदाराने त्यांच्या दि.१४.१.२०१० रोजीच्या पत्रानुसार माहिती समाधानकारक दिलेली असल्यामुळे त्यांचे अपिलीय रद्द कण्यात यावे अशी विनंती केलेली आहे.**

आदेश

अपील निकाली काढणेत येत आहे.

**मुंबई (डॉ. सुरेश वि.जोशी)**
**दिनांकः १५.१.२०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**सुधारित आदेश क्र. मुमाआ-२००९/अपिल क्र.५२०९/०२**

**श्री. विजयकुमार शंकरराव होटकर ----अपिलार्थी**
**१-बी ३४०५ संदिप को.ऑ.सोसायटी**
**देवरत्न नगर, सायन चुनाभटटी,**
**मुंबई.**

विरूध्द

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा संचालक,** --उत्तरवाद
राज्य कामगार विमा योजना, एम.जी.एम.हॉस्पीटल,
३ रा मजला डॉ.एस.एस.राव मार्ग, परेल मुंबई १२

**जन माहिती अधिकारी तथा प्रशासकिय अधिकारी**
राज्य कामगार विमा योजना, एम.जी.एम.हॉस्पीटल,
**३ रामजला डॉ.एस.एस.राव मार्ग, परेल मुंबई १२**

- विवेचन

**अपिलाचा दिनांक ५.१०.२००९**
**सुनावणी दिनांक १५.१.२०१०**
**अपिलार्थी अनुपस्थित व अपिलीय अधिकारी उपस्थित**

**अर्जदारास उपकरण फार्मा आणि इतर कंपनीकडून आयुर्वेदिक औषधांविषयी माहिती पाहिजे होती. यातील ११ मुद्यांपैकी फक्त दोन मुद्यांची माहिती देण्यांत आलेली असून ९ मुद्यांची माहिती देण्यांत आलेली नाही. सदरील मुद्यांच्या बाबतीतील सर्व कागदपत्रे ही सार्वजनिक आरोग्य विभागाला पाठविण्यांत आलेली आहे असे सांगण्यांत आलेले आहे व असे आदेश देण्यांत येत आहेत की, जन माहिती अधिकारी यांनी स्वत: सार्वजनिक आरोग्य विभागाकडे जाऊन संबंधित कागदपत्र प्राप्त करुन घेऊन त्यातील माहिती अर्जदारास देऊन परत सदर नस्ती संबंधित विभागास परत पाठविण्यांत यावी. सदरील कार्यवाही २० दिवसांत पूर्ण करावी. सबब पुढीलप्रमाणे आदेश देण्यांत येत आहे.**

आदेश

अपील मान्य करण्यांत येत आहे.

**मुंबई** **(डॉ. सुरेश वि.जोशी)**
**दिनांक: १५.१.२०१०** राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

आदेश क्र. मुमाआ-२००९/अपिल क्र.१२९२/०२

श्री. विनोदसिंह मानसिंह राजपूत ----अपिलार्थी
मु.पो.नगरदेवळा ता.पाचोरा,
जिल्हा जळगांव

विरूध्द

प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अबधकारी (ग्रा.प.) --उत्तरवादी
पंचायत समिती, पाचोरा, जिल्हा जळगांव

जन माहिती अधिकारी तथा
ग्राम विकास अधिकारी,
ग्राम पंचायत नगरदेवळा, ता.पाचोरा
जिल्हा जळगांव

**- विवेचन**

अपिलार्थी श्री. विनोदसिंह मानसिंह राजपूत यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३)अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.५.३.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत अल्पबचत भवन,जिल्हाधिकारी कार्यालय परिसर जळगांव येथे दि.२७.११.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यांत आली. सुनावणीकरिता अपिलाथी अनुपस्थित होत व जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

अपिलार्थीनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.१५.७.२००८ रोजी अर्ज ग्रामसभेचे ठराव, मासिक मिटींगचे ठराव, रोजगार हमीयोजनेबाबत, स्वजलधारा योजनेबाबत, हरियाली योजना, घरकुलांच्या यादया इत्यादिबाबत एकूण १० मुद्यांची माहिती अर्जातील मुद्दा क्रमांक ६ अन्वये अपिलार्थी यांनी ते दारिद्रयरेषेखालील असल्याचे नमूद केले होते व या तहसिलदार,पाचोरा यांचेकडील आदेश क्रमांक दारे/एस.आर./नगरदेवळ / ०१/०७/०६ दि.३१.१.२००७ ची छयांकित प्रत (विना साक्षांकित)जोडली होती. त्यामुळे अर्जदार खरोखरच दारिद्रय रेषेखालील आहे का याची जन माहिती अधिकारी यांनी चाचपणी केली असता त्यांच्या कार्यालयातील दारिद्रय रेषेखाली असलेल्या व्यक्तींच्या यादीत अपिलार्थी यांचे नाव नसल्याने अपिलाथीने माहिती अर्जान्वये मागितलेली माहिती तयार असून एकूण रु.६१६८/- इतके शुल्क भरुन माहिती घेऊन जावी असे जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि..२८.७.२००८ च्या पत्रान्वये अपिलार्थीस कळविले. अपिलार्थी यांनी त्यानंतर दि.२९.७.२००८ रोजी दाखले केलेल्या पत्रान्वये मागणी केल्यानुसार जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्याच दिवशी कार्यालयास आले असता संपूर्ण कागदपत्रांच्या एकूण ३०८४ प्रती होत असून प्रतिपृष्ठ रु.२/- याप्रमाणे एकूण रुपये ६१६८/- फी भरणा करावी लागेल असे सुचित केले. तरी देखील अपिलार्थी यांनी दि.२१.८.२००८ रोजी प्रथम अपिलीय प्राधिकारी यांच्याकडे प्रथम

**अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी दि.२६.८.२००८ रोजी अपिलार्थीस फी आकारणीचे विवरण द्यावे असे सुचित केल्यो जन माहिती अधिकारी यांनी दि.२७.८.२००८ रोजी फी आकारणीबाबत माहिती निहाय विवरणपत्र तयार करुन प्रथम अपिलीय प्राधिकारी यांना सादर केले. त्यांची प्रत दि.७.९.२००९ रोजी अपिलार्थी यांना समक्ष दिलेली आहे.**

**दरम्यान अपिलार्थी यांनी प्रथम अपिलीय प्राधिकारी यांजकडे कलम १९(१) अन्वये दि.२१.८.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले होते. त्यावर मागितलेली माहिती फी भरुन घेऊन जावी असे अपिलार्थी यांना उद्देशून दि.९.१०.२००८ रोजी आदेश पारित केले. त्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी देखील प्रतः दि.१.१२.२००८ रोजी अपिलार्थीस पत्र लिहून आवश्यक ती फी भरुन माहिती घेऊन जाणेबाबत कळविले. अपिलार्थी यांनी आवश्यक ती फी न भरल्यामुळे अद्याप त्यांना माहिती देता आली नाही. हा जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तीवाद मान्य करण्यांत येत आहे. अपिलार्थी यांनी प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचे आदेश मिळाल्यापासून एकूण ९० दिवसांत आत कलम १९(३)अन्वये व्दितीय अपील करणे आवश्यक असते. तथापि प्रस्तुत प्रकरणी कोणतेही सबळ कारण न देता विलंबाने व्दितीय अपील सादर केले आहे. सबब पुढीलप्रमाणे आदेश देत आहे.**

आदेश

अपील अमान्य करण्यांत येत आहे.

**मुंबई** | **(डॉ. सुरेश वि.जोशी)**
**दिनांकः १८.१.२०१०** | **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

आदेश क्र. मुमाआ-२००९/अपिल क्र.५२३२/०२

श्री. प्रणालीय धयाळकर ----अपिलार्थी
२३/३९, बी.डी.डी.चाळ
एम.एम.जोशी मार्ग.
मुंबई ४०००१३

विरूध्द

प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा अधिक्षक अभियंता --उत्तरवादी
अधिक्षक अभियंता यांचे कार्यालय,
मुंबई (सा.बा.)मंडळ, २५ मर्झबान रोड, फोर्ट,मुंबई ४०००१

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अधिक्षक अभियंता
अधिक्षक अभियंता यांचे कार्यालय,
मुंबई (सा.बा.)मंडळ, २५ मर्झबान रोड, फोर्ट,मुंबई ४०००१

- विवेचन -

अपिलाचा दिनांक ३.११.२००९
सुनावणीची तारीख दि.१९.१.२०१०
अपिलार्थी अनुपस्थित व जन माहिती अधिकारी उपस्थित.

अर्जदारास नवाकाळ वर्तमान पत्रात दि.७.११.२००७ रोजी जी सार्वजनिक आरोग्य विभागामध्ये रिक्त जागा भरण्यासंबंधी जी जाहिरात निघाली होती त्या संदर्भात उमेदवारांच्या बाबतीत जी माहिती विचारली होती ती वैयक्तिक स्वरुपाची असल्यामुळे व त्यात कोणतेही जन हित नसल्यामुळे तसेच ती माहिती देण्यास संबंधित तृतीय पक्षाने हरकत घेतल्यामुळे देण्यांत आलेली नव्हती म्हणून अर्जदाराने अपिल सादर केलेले आहे.

अर्जदाराचा अपिल मेमो व जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे निर्देश देण्यांत आले की, अर्जदाराना इंटरव्ह्यूला बोलविण्यांत आलेल्या स्टेजपासून नियुक्तीपर्यत उमेदवारास अंतिमत: मिळालेले गुण ज्या प्रपत्रात मिळू शकतात अशा प्रपत्राच्या फोटो कॉपी अर्जदारास १० दिवसाचे आत देण्यांत याव्यात. सबब पुढीलप्रमाणे आदेश देण्यांत येत आहे.

आदेश

अपील मान्य करण्यात येत आहे.

मुंबई (डॉ. सुरेश वि.जोशी)
दिनांक: १९.१.२०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

आदेश क्र. मुमाआ-२००९/अपिल क्र.१४१७/०२

श्री. देवमल नारायण आहेरराव ----अपिलार्थी
मु.पो.खांडबार, ता.नवापूर
जि.नंदूरबार

विरूध्द

प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) --उत्तरवादी
जिल्हा परिषद नंदूरबार

जन माहिती अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक )नंदूरबार यांचे कार्यालय
जिल्हा परिषद नंदूरबार

- विवेचन -

अपिलाचा दिनांक १३.६.२००९
सुनावणीची तारीख दि.९.१२.२००९
अपिलार्थी, अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

अपिलार्थीनी दि.१२.२.२००९ च्या अर्जान्वये ॲग्रीकल्चरल हायस्कूल व ज्युनिअर कॉल्ेज, खांडबार ता.नवापूर बाबत विविध मुद्यांवर माहिती मागितली. जन माहिती अधिकारी यांच्या दि.६.५.२००९ च्या पत्रान्वये त्यांना माहिती पुरविण्यांत आली. परंतू त्या आधी दि.१९.३.२००९ रोजी त्यांनी प्रथम अपील केले. यावर सुनावणी होऊन शुल्क भरुन त्यांना माहिती पुरवावी असे दि.२.५.२००९ रोजी आदेश देण्यात आले. तथापि त्यांना माहिती मिळाली नसल्याचे नमूद करुन त्यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

व्दितीय अपीलावरील सुनावणीचे वेळी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आयोगास सादर केले की, अपिलार्थीना माहिती पुरविण्यात आली आहे. अपिलार्थीच्या कथनानुसार त्यांना माहिती मिळाली आहे. फक्त इयत्ता ४ थीच्या विद्यार्थ्याबाबत माहिती मिळालेली नाही. याचा विचार करता असे निर्देश देण्यांत येतात की, उर्वरित माहिती सदर आदेशाच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आत अपिलार्थीना निशुल्क पुरविण्यांत यावी.

आदेश

अपील निकाली काढण्यांत येत आहे.

मुंबई (डॉ. सुरेश वि.जोशी)
दिनांकः १९.१.२०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त

**मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**आदेश क्र. मुमाआ-२००९/अपिल क्र.५२८५/०२**

**श्री. बबलू दुबे ----अपिलार्थी**
**हाजराबी चाळ, टोकेवाडी, वामन,**
**मालरवाडी, नित्यानंद नगरए**
**घाटकोपर पश्चिम, मुंबई ८६**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता --उत्तरवादी**
**बृहन्मुंबई मनपा कार्यालय,**
**एन वार्ड कार्यालय, घाटकोपर पूर्व मुंबई - ७७**

**जन माहिती अधिकारी सहायक अभियंता (परिरक्षण)**
**बृहन्मुंबई मनपा कार्यालय,**
**एन वार्ड कार्यालय, घाटकोपर पूर्व मुंबई - ७७**

**- विवेचन -**

**अपिलाचा दिनांक ११.११.२००९**
**सुनावणीची तारीख दि.३०.१.२०१०**
**अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.**

**अर्जदाराने आयोगास सुनावणीच्या वेळेला अर्जदाराने असे लेखी पत्र दिले की, अर्जदारास माहिती पुरविण्यांत आलेली आहे ती समाधानकारक आहे. तरी त्यांचा अर्ज रद्द करुन दप्तर दाखल करावा. सबब पुढीलप्रमाणे आदेश देण्यांत येत आहेत.**

आदेश

अपील निकाली काढण्यांत येत आहे.

**मुंबई (डॉ. सुरेश वि.जोशी)**
**दिनांकः ३०.१.२०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**आदेश क्र. मुमाआ-२००९/अपिल क्र.५२८६/०२**
**आदेश क्र. मुमाआ-२००९/अपिल क्र.५२८७/०२**

**श्री. मेहमुद मेहबूब शेख** **-अपिलार्थी**
**रुम. न.७ दोस्त मोहम्मद चाळख**
**घौसीया मस्जिद मागे, नित्यानंद नगर,**
**घाटकोपर पश्चिम मुंबई ८६**

विरूध्द

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता** **--उत्तरवादी**
**बृहन्मुंबई मनपा कार्यालय,**
**बी वार्ड कार्यालय, जे.जे.हॉस्पीटल समोर,**
**भायखळा, मुंबई ४०० ००८**

**जन माहिती अधिकारी सहायक अभियंता (परिरक्षण)**
**बृहन्मुंबई मनपा कार्यालय,**
**बी वार्ड कार्यालय, जे.जे.हॉस्पीटल समोर,**
**भायखळा, मुंबई ४०० ००८**

**- विवेचन -**

**अपिलाचे दिनांक ११.११.२००९**
**सुनावणीची तारीख दि.३०.१.२०१०**
**अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.**

**अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळेला त्यांनी दोन्ही अर्जाव्दारे मागितलेली माहिती त्यांना मिळालेली आहे व त्यांचे अपिल रद्द करुन दप्तर दाखल करण्यांत यावे, अशी विनंती केलेली आहे. सबब पुढीलप्रमाणे आदेश देण्यांत येत आहेत.**

आदेश

अपील निकाली काढण्यांत येत आहे.

**मुंबई** **(डॉ. सुरेश वि.जोशी)**
**दिनांक: ३०.१.२०१०** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**सुधारित आदेश क्र. मुमाआ-२००९/अपिल क्र.५०३३/०२**

**श्री. जगत कांतीलाल शाह ----अपिलार्थी**
**इ ५-५ कृपा नगर इर्ला,**
**एस.व्ही. रोड.विलेपार्ले, पश्चिम,**
**मुंबई .४०००५६**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा महाप्रबंधक --उत्तरवादी**
**उच्च न्यायालय, फोर्ट मुंबई ३२**

**जन माहिती अधिकारी**
**महाप्रबंधक याचे कार्यालय**
**उच्च न्यायालय, फोर्ट मुंबई ३२**

**- विवेचन -**

**अपिलाचा दिनांक १७.८.२००९**
**सुनावणीची तारीख दि ४.१२.२००९**
**अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.**

**अपिलार्थी श्री. जगत शहा यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे श्री.पी.एल.आमले यांच्या विरुध्द ज्युडिशिअरी मॅजिस्ट्रेट यांच्याकडे चालू असलेल्या विभागीय चौकशी बाबत माहिती विचारली होती. प्रथम अपिलीय आदेशामध्ये सदरील चौकशी अजुनही चालू असल्यामुळे ही माहिती देता येत नाही असे नमूद करण्यांत आले. सदरील चौकशीची सद्यस्थिती काय आहे, असे विचारले असता अजुनही यातील अंतिम आदेश देण्यांत आलेले नाहीत असे सांगण्यांत आले. त्यामुळे आजही चौकशीबाबतची माहिती देता येत नाही अशीच परिस्थिती आहे. चौकशीस बराच वेळ लागत आहे ही अपिलार्थीची तक्रार आहे, याची दखल चौकशी अधिकारी घेतलीच. सद्य:परिस्थितीत माहिती देता येत नाही, ही वस्तुस्थिती आहे. सबब पुढीलप्रमाणे आदेश देण्यांत येत आहेत.**

आदेश

अपील निकाली काढण्यांत येत आहे.

**मुंबई (डॉ. सुरेश वि.जोशी)**
**दिनांक: ३०.१.२०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्र. मुमाआ-२००९/अपिल क्र.१३३०/०२**

**श्री. संतोष महादु बागले** **अपिलार्थी**

**२१, उदयनगर विद्यावर्धिनी कॉलेज जवळ**

**साक्री रोड,धुळे**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हाधिकारी ,**धुळे **--उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी जिल्हाधिकारी** कार्यालय,धुळे

**- विवेचन -**

**अपिलाचा दिनांक १५.६.२००९**

**सुनावणीची तारीख दि.७.१२.२०१०**

**अपिलार्थी व अपिलीय अधिकारी,जन माहिती अधिकारी उपस्थित.**

**अपिलार्थीनी दि.२२.३.२००९ च्या अर्जाव्दारे त्यांनी दि.२०.२.२००८ रोजी दिलेल्या तक्रार अर्जावर केलेल्या कार्यवाहीच्या तपशिलाची मागणी केली. त्यांना माहिती न मिळाल्याने त्यांनी दि.२.५.२००९ रोजी प्रथम अपील केले. परंतू त्यांना माहिती मिळाली नाही. यास्तव त्यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.**

**व्दितीय अपिलावरील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी सादर केले की, अपिलार्थीनी श्री.एस.आर.पाटील,नायब तहसिलदार (तत्कालीन तलाठी) यांच्या विरुध्दच्या विभागीय चौकशी विषयी कागदपत्रे मागितली असून ती त्यांना देण्यांत येत आहेत. श्री. पाटील हे सध्या तहसील कार्यालय शिरपूर येथे नायब तहसिलदार (दुस-या ठिकाणी) संवर्गात कार्यरत असल्याने त्यांची चौकशी करण्यांत विलंब लागला असे अपिलीय अधिकारी यांनी सांगितले. जन माहिती अधिकारी माहिती देण्यास तयार असल्याने त्यांना निर्देश देण्यांत येतात की, अपिलार्थीच्या मागणीप्रमाणे त्यांना ५ दिवसांत माहिती पुरविण्यांत यावी.**

आदेश

अपील निकाली काढण्यांत येत आहे.

**मुंबई** **(डॉ. सुरेश वि.जोशी)**

**दिनांक: ३०.१.२०१०** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४४८९३/अपील क्रमांक ५०८६ अ/०२

श्री. संदेश पांडूरंग घोडके -----अपीलार्थी
९७/१, बी.डी.डी. चाळ, वरळी,
मुंबई ॽ ४०० ०१८.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक स.संस्था ----उत्तरवादी
जिल्हा उपनिबंधक स.संस्था मुंबई १ यांचे कार्यालय,
मल्होत्रा हाऊस, ६ वा मजला, फोर्ट,
मुंबई ४०० ००१.

२.जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक स.संस्था
जी/एस विभाग.
जिल्हा उपनिबंधक स.संस्था मुंबई १ यांचे कार्यालय,
मल्होत्रा हाऊस, ६ वा मजला, फोर्ट,
मुंबई ४०० ००१.

*---शुध्दीपत्रक---*

आयोगाने दि. १८ डिसेंबर, २००९ रोजीच्या आदेशातील पहिल्या ओळीतील " शिववैभव मध्यवर्ती सहकारी गृहनिर्माण संस्था बांद्रा" या ऐवजी " शिववैभव मध्यवर्ती सहकारी ग्राहक भांडार लि. वरळी " असे वाचण्यात यावे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
दिनांक ४ जानेवारी, २०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४३९२५/अपील क्रमांक ४९९१/०२
क्रमांक-मु.मा.आ/४४७६१/तक्रार क्रमांक ५०९/०२

श्री. शेखर धनश्याम पाठारे -----अपीलार्थी
८/१, गणेश निकेतन, आगाशी रोड,
दादर, मुंबई -- ४०० ०२८.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा उप जिल्हाधिकारी (करमणूकर कर) ---उत्तरवादी
जिल्हाधिकारी कार्यालय मुंबई शहर,
ओल्ड कस्टम हाऊस, शहिद भगतसिंग मार्ग,
३ रा मजला, फोर्ट , मुंबई ४०० ००१.

२. जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार तथा
करमणूक शुल्क अधिकारी
जिल्हाधिकारी कार्यालय मुंबई शहर,
ओल्ड कस्टम हाऊस, शहिद भगतसिंग मार्ग,
३ रा मजला, फोर्ट , मुंबई ४०० ००१.

---शुध्दीपत्रक---

आयोगाच्या दि. १८ नोव्हेंबर, २००९ रोजीच्या आदेशातील " जन माहिती अधिका-यांनी वर निर्देशिल्याप्रमाणे अपीलार्थी यांनी उर्वरित माहिती देण्यात यावी. " याऐवजी, "जन माहिती अधिका-यांनी वर निर्देशिल्याप्रमाणे अपीलार्थी यांना उर्वरित माहिती द्यावी "असे वाचण्यात यावे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
दिनांक ५ जानेवारी, २०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त.

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**क्रमांक-मु.मा.आ/४५०६८/तक्रार क्रमांक ६०८/०१**

**श्री. तानाजी ज्योतिबा नाईक ----तक्रारदार**
**मंगलमूर्ती को.ऑप.सो. (एस.आर.ए)**
**बी/४ बिल्डींग, १ ला मजला, रुम नं. १०४,**
**सरस्वती विद्यामंदिरासमोर, आर.बी.कदम मार्ग,**
**घाटकोपर (पश्चिम) मुंबई ४०० ०८४.**

**विरुध्द**

**१. अपिलीय अधिकारी तथा पोलीस उप आयुक्त ----उत्तरवादी**
**परिमंडळ ६, ४ था मजला, प्रशासकीय इमारत,**
**आर.सी. मार्ग , चेंबूर, मुंबई ७१.**

**२.जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त**
**पूर्व प्रादेश्कि विभाग नियंत्रण कक्ष,**
**आर.सी. मार्ग, चेंबूर, मुंबई ४०० ०७१.**

***---विवेचन----***

सदरील तक्रारीची चौकशी दि. ४ जानेवारी, २०१० रोजी करण्यात आली. त्यावेळेला तक्रारदार गैरहजर होते, श्री. विजयानंद राया कदम , पोलिस उप निरिक्षक, कांजूरमार्ग पोलीस स्टेशन तसेच श्री. अशोक मा. डुम्बरे , सहायक पोलीस आयुक्त तथा जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

आयोगाच्या दि. १६ फेब्रूवारी, २००९ रोजीच्या अपील क्र. ३७८९/०२ मध्ये झालेल्या आदेशानुसार अपीलार्थीस जी कागदरत्रे पाहिजे होती ती दप्तरी दाखल करण्याबाबत पोलीस उप आयुक्त कार्यालयाने दि. १३/७/२००७ रोजी घाटकोपर पोलीस ठाण्यास कळविले होते. या

कागदपत्रांचा शोध घ्यावा व ती कागदपत्रे सापडल्यास अपीलार्थीस देण्यात यावीत, व न सापडल्यास पोलीस उप आयुक्त यांनी संबंधित कागदपत्रे गहाळ होण्यास जबाबदार असलेल्या व्यक्तीवर विभागीय कारवाई करावी असेहि निर्देश देण्यात आले होते.

सुनावणीच्या वेळेला पोलीस उप आयुक्त परिमंडळ ७ यांनी आयोगास असे कळविले आहे की, अपीलार्थीस हवी असलेली कागदपत्रे घाटकोपर पोलीस ठाण्याच्या अभिलेखावर आढळून येत नाहीत म्हणून आयोगाच्या आधीच्या आदेशानुसार चौकशी करण्यासाठी श्रीयुत व्यंकट पाटील, पोलीस निरीक्षक, मुलुंड पोलीस ठाणे यांची नेमणूक करण्यात आलेली आहे व प्राथमिक चौकशी पूर्ण झाल्यानंतर प्राप्त प्राथमिक चौकशी अहवालाच्या अनुषंगाने संबंधित कसुरदारावर योग्य ती कारवाई करण्यासाठी १ महिन्याची मुदतवाढ देण्यात यावी अशी विनंती करण्यात आलेली आहे. सदरची विनंती मान्य करण्यात येत आहे.

*----आदेश----*

तक्रार निकाली काढण्यात येत आहे.
संबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
दिनांक ५ जानेवारी, २०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.

क्रमांक-मु.मा.आ/४५४९२/तक्रार क्रमांक ६१०/०१

श्री. निशांत सुभाष घाडगे ----तक्रारदार
३१/०२, गोकुळ, डॉ. पेडणेकर बिल्डींग,
स.म.मार्ग, तकया वाडी, कुर्ला (पश्चिम)
मुंबई.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा सहायक आयुक्त ----उत्तरवादी
बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यालय, एल विभाग कार्यालय,
स.गो.बर्वे मार्ग, कुर्ला (पश्चिम) मुंबई ७०

२.जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता (इ.व.का)
बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यालय, एल विभाग कार्यालय,
स.गो.बर्वे मार्ग, कुर्ला (पश्चिम) मुंबई ७०

***---विवेचन----***

सदर तक्रारीची सुनावणी दि. ४ जानेवारी, २०१० रोजी ठेवण्यात आली होती. त्यावेळेस तक्रारदार तसेच श्री. निवृत्ती कांबळे, कनिष्ठ अभियंता, एल विभाग हे उपस्थित होते.

तक्रारदारांना माहिती मिळाली असल्यामुळे सदरची तक्रार दप्तरदाखल करण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
दिनांक ५ जानेवारी, २०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त.

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**क्रमांक-मु.मा.आ/३४४५७/तक्रार क्रमांक ६१२/०१**

**श्री. मनोजकुमार जयवंत सामंत ----तक्रारदार**
**४/४०, तळमजला, गणेश बिल्डींग,**
**पांडुरंगवाडी रोड क्र. ०३, गोरेगांव (पूर्व)**
**मुंबई ४०० ०६३.**

**विरुध्द**

**१. अपिलीय अधिकारी तथा सहायक आयुक्त ----उत्तरवादी**
**बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यालय, पी/ दक्षिण ,**
**मिठानगर, गोरेगांव (पश्चिम) मुंबई ४०० ०६२.**

**२.जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता**
**बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यालय, पी/ दक्षिण ,**
**मिठानगर, म्युनिसि. शाळा इमारत,**
**गोरेगांव (पश्चिम) मुंबई ४०० ०६५.**

***---विवेचन----***

**अपील क्रमांक ३८४९/०२ मध्ये दि. ११ फेब्रूवारी, २००९ रोजी दिलेल्या आदेशानुसार जन माहिती अधिकारी यांनी, प्रथम अपिलीय अधिका-यांनी निर्देश देऊनहि माहिती दिलेली नसल्यामुळे त्यांच्यावर अधिनियमाच्या कलम २० अन्वये शास्तीची कारवाई का करु नये याचा खुलासा १५ दिवसाचे आंत करण्यास सांगितले होते.**

**जन माहिती अधिकारी यांनी कुठचाहि खुलासा सादर केलेला नाही व अपीलार्थीच्या दि. १८/९/२००९ च्या पत्रानुसार त्यांना अजूनहि माहिती उपलब्ध केलेली नव्हती. त्यामुळे दि. १४ डिसेंबर, २००९ रोजी जन माहिती अधिकारी यांनी आपले म्हणणे स्वत: आयोगाच्या कार्यालयात दि. ४/१/२०१० रोजी प्रत्यक्ष येऊन सांगावे असे निर्देश देण्यांत आले होते. परंतु जन माहिती**

अधिकारी उक्त दिवशी उपस्थित झालेले नाहीत. त्यामुळे अपीलार्थींना ऊशिर होऊनहि माहिती न दिल्याबद्दल जन माहिती अधिकारी यांच्यावर रु. १०,०००/- ची शास्ती लादण्यात येत आहे. ही शास्तीची रक्कम दि. १ मार्च, २०१० रोजी होणा-या पगारातून महापालिका आयुक्त, बृहन्मुंबई यांनी वसूल करुन शासनाने विहित केलेल्या लेखाशिर्षाखाली जमा करावी व तसा अनुपालन अहवाल आयोगास पाठवावा.

***---आदेश---***

तक्रार मान्य करण्यात येत आहे.

सदर आदेशाची प्रत आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनाहि देण्यात यावी. त्यांनी शास्ती वसूलीची कार्यवाही व जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती दिल्या जाईल याची कार्यवाही वरिष्ठ अधिका-यांकडून करुन घ्यावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक ५ जानेवारी, २०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४४९०६/अपील क्रमांक ५१३०/०२

श्री. विजय एच. जयस्वाल -----अपीलार्थी
३५, कांता निवास, डी. जे. रोड,
विलेपार्ले (पश्चिम) मुंबई ४०० ०५६.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी ----उत्तरवादी
मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालय,
जिल्हाधिकारी कार्यालय आवार, ४ था मजला,
रुम नं. ४०७, ठाणे, जि. ठाणे.

२.जन माहिती अधिकारी
मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालय,
जिल्हाधिकारी कार्यालय आवार, ४ था मजला,
रुम नं. ४०७, ठाणे, जि. ठाणे.

***---विवेचन---***

अपीलाचा दिनांक २९/९/२००९
सुनावणीचा दिनांक १२ जानेवारी, २०१०.
अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.
असे दिसते की, अपीलार्थींनी एकाच दिवशी प्रथम अपील व द्वितीय अपील पाठविलेले आहे.

अपीलार्थीस रिलायन्स महापे जंक्शनच्या जवळ महापे एरीयावरील रेडीरेकनरच्या स्टॅम्पडयूटीच्या असलेल्या दरांची सन १९७१ सालापासूनची माहिती पाहिजे होती.

दोन्ही पक्षाशी चर्चा करुन असे ठरविण्यात आले की, अपीलार्थी दि. १६ जानेवारी, २०१० रोजी जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात जातील व अपीलार्थींना जेवढया जास्तीत जास्त वर्षांची माहिती उपलब्ध होईल ती अपीलार्थीस देण्यात येईल.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
दिनांक १२ जानेवारी, २०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४४९०७/अपील क्रमांक ५१३४/०२

श्री. नितीन एम. सरवैया -----अपीलार्थी
५१/११९, आझाद नगर ३, विरा देसाई रोड,
अंधेरी (पश्चिम) मुंबई ४०० ०५८.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा वास्तुशास्त्रज्ञ ----उत्तरवादी
वास्तुशास्त्रज्ञ व नियोजनकार,
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,
गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व) मुंबई ५१.

२.जन माहिती अधिकारी तथा सहायक वास्तुशास्त्रज्ञ
वास्तुशास्त्रज्ञ व नियोजनकार,
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,
गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व) मुंबई ५१.

*---विवेचन---*

अपीलाचा दिनांक २८/१०/२००९
सुनावणीचा दिनांक १२ जानेवारी, २०१०.
अपीलार्थी व जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित.

अपीलार्थीस प्रथम अपीलाच्या सुनावणीच्या दोनदा तारखा देऊनहि अपीलार्थी हजर न राहिल्यामुळे त्यांचे प्रथम अपील फेटाळून लावले होते त्याविरुध्द सदरचे अपील आहे.

अपीलार्थीस आझाद नगर नं.३ येथील ८ सहकारी संस्थांना देण्यांत आलेल्या प्लॉट्सच्या क्षेत्रफळाची माहिती पाहिजे होती. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, आझाद नगर येथील एकूण ६५ प्लॉटस् आहेत त्यातील कोणत्या ८ प्लॉटस्ची माहिती अपीलार्थीस अभिप्रेत होती

हे न कळल्यामुळे त्यांना कार्यालयात बोलाविण्यात आले होते पण ते आले नाहीत म्हणून त्यांना माहिती देता आली नाही.

सुनावणीच्या वेळेला अपीलार्थींनी नकाशावर ८ प्लॉटस् दाखविले त्याप्रमाणे अपीलार्थीस हवी असणारी माहिती रजिस्टर्ड पोष्टाने ७ दिवसांत पाठविण्यात यावी.

***----आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.
संबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
दिनांक १२ जानेवारी, २०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त.

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/४४८९७/अपील क्रमांक ५१३२/०२**

**श्री. डॉ. श्रीकांत एस. प्रभू -----अपीलार्थी**
**अ-२३, उद्यानप्रभा, तेजपाल स्कीम,**
**रोड नं. २, विलेपार्ले (पूर्व) मुंबई ५७.**

**विरुध्द**

**१. अपिलीय अधिकारी तथा उपनिबंधक ----उत्तरवादी**
**सहकारी संस्था, रुम नं. ३६९, २ रा मजला,**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व) मुंबई ५१.**

**२.जन माहिती अधिकारी**
**सहकारी संस्था, रुम नं. ३६९, २ रा मजला,**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व) मुंबई ५१.**

***---विवेचन---***

**अपीलाचा दिनांक २३/१०/२००९**
**सुनावणीचा दिनांक १२ जानेवारी, २०१०.**
**अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.**

**अपीलार्थीच्या प्रथम अपीलाची सुनावणी ही दि. ११/१/२०१० रोजी आली होती पण त्यावेळेला अपीलार्थीचे दुसरे अपील राज्य माहिती आयोगाकडे चालू असल्यामुळे ते जाऊ शकले नाहीत. मात्र त्यांनी आपले प्रतिनिधी पाठविले होते.**

**अपीलार्थीच्या अपीलासंदर्भात अपिलीय अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केलेले आहे.**

**"शास्त्रीनगर द्वारका को.ऑप.हौसिंग सोसायटी लि., बिल्डींग नं७, शास्त्रीनगर, गोरेगांव (पश्चिम) मुंबई ४०० १०४ ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ९(१)**

अन्वये नोंदणी क्रमांक बी.ओ.एम/डब्ल्यू पी/ एच.एस.जी/टि.ओ./६३८४/९२-९३ नुसार नोंदणीकृत गृहनिर्माण संस्था आहे.

डॉ. श्रीकांत एस. प्रभू हे वरील संस्थेचे सभासद असून त्यांचेकडून या कार्यालयाकडे आलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८९(अे) अन्वये दि. ४/११/०६ च्या आदेशान्वये तपासणीचे आदेश निर्ममित करुन महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७८ अन्वये दि. २८/३/०७ च्या आदेशान्वये प्रशासकीय नेमणूक केली असून, संस्थेवर आजमितीस प्रशासक कार्यरत आहेत.

डॉ. श्रीकांत एस. प्रभू यांच्या तक्रारीनुसार तसेच, तपासणी अहवालानुसार महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८३ अन्वये दि. १७/१०/२००८ च्या आदेशाने श्री. पी.पी. गोसावी, निवृत्त सहनिबंधक यांची चौकशी अधिकारी म्हणून नेमणूक केली होती. डॉ. श्रीकांत एस. प्रभू यांचे दि. ३१/१२/०८ च्या तक्रारी अन्वये आणखी मुद्दे दिलेले होते. सदर मुद्दयांचा समावेश करुन कायदा कलम ८३ अन्वये चौकशीचे आदेश निर्गमित करण्यात आले होते. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८३ खाली चौकशी अहवाल या कार्यालयास दि. १६/६/०९ रोजी प्राप्त झ ााला असून सदर अहवालातील नमूद निष्कर्षानुसार कलम ८८ अन्वये श्री. के.आर. खिल्लारी, विशेष लेखा परीक्षक, वर्ग १ यांची संबंधितांवर जबाबदारी निश्चित करण्यासाठी मा. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, मुंबई यांनी दिलेल्या परवानगीनुसार चौकशी अधिकारी म्हणून नेमणूक केली. तसेच, कायदा कलम ८३ मधील काही मुद्दयांच्या अनुषंगाने चौकशी करणे कामी महाराष्ट्र सहकारी कायदा कलम ८३ च्या परिशिष्ट अ मध्ये नमूद त्रुटी संस्थेच्या निदर्शनास आणून देऊन सदर मुद्दयावर उचित कायदेशीर कारवाई करणेबाबत संस्थेस निर्देश दिलेले आहेत. डॉ. श्रीकांत एस. प्रभू यांनी मा. प्रधान सचिव, सहकार व पणन विभाग, मुंबई यांचेकडे दि. १०/१२/०८ तसेच, मा. राज्यमंत्री, सहकार यांच्याकडे दि. १६/२/२००९ तसेच, चौकशी अधिकारी व विभागीय सहनिबंधक यांचेकडे केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने कार्यवाही करुन डॉ. श्रीकांत एस.प्रभू यांना दि. १५/१२/०९ रोजी उत्तर दिलेले आहे.

डॉ. श्रीकांत एस. प्रभू हे वारंवार माहितीच्या अधिकारात या कार्यालयात अर्ज करीत असून सदर अर्जाच्या अनुषंगाने त्यांना वारंवार विहित मुदतीत उत्तरे दिलेली आहेत. तरी सुध्दा त्यांचे

समाधान न झाल्याने त्यांनी आपले कार्यालयाकडे केलेल्या अपीलाच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीसंदर्भात दि. ६/१०/०९ रोजी सविस्तर अहवाल सादर केलेला आहे.

डॉ. श्रीकांत एस.प्रभू यांनी आपले कार्यालयास दि. २३/१०/०९ अन्वये केलेल्या अपीलासंदर्भात प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था या कार्यालयाने डॉ. श्रीकांत एस.प्रभू यांना या कार्यालयात दि. १३/११/०९ , दि. २७/११/०९ व ३०/१२/०९ रोजी सुनावणी दिली होती. सुनावणी वेळी डॉ. श्रीकांत एस.प्रभू यांनी त्यांचे एकूण ११ मुद्दे दिलेले असून, सदर मुद्दयांच्या अनुषंगाने संस्थेकडून तसेच, संबंधित विकासकाकडून खुलासा मागविण्यात आला असून, डॉ.श्रीकांत एस.प्रभू यांना दि. ११/१/२०१० रोजी या कार्यालयात सुनावणी ठेवण्यात आलेली असून संबंधित तक्रारदार यांना दि. ३०/१२/०९ रोजी दिलेल्या सुनावणीअन्वये उपस्थित केलेल्या मुद्दयांनंतर त्यांनी असे नमूद केले की, सदर ११ मुद्दयांव्यतिरिक्त माझे कांहीही म्हणणे नाही.

डॉ. श्रीकांत एस. प्रभू हे वारंवार राज्य माहिती आयोग, शासन तसेच, लोक आयुक्त इ. ठिकाणी वारंवार तक्रारी करीत असून, सदर तक्रारीच्या अनुषंगाने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७८ अन्वये प्रशासक नियुक्ती कायदा कलम ८३ अन्वये चौकशी अधिका-याची नेमणूक केली असून, त्याप्रमाणे त्यांना वारंवार कळवून त्याबाबतची माहिती सुध्दा दिलेली आहे. तरी सुध्दा संबंधित तक्रारदाराचे समाधान होत नसल्याचे दिसून येते.

वरील परिस्थिती विचारात घेता डॉ. श्रीकांत एस. प्रभू यांचे अर्जासंदर्भात वेळीच कार्यवाही करुन कार्यालयाने जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी म्हणून त्यांचे अर्ज वेळीच निकाली काढलेले असल्याने आपले स्तरावरील नस्ती बंद करावी ही विनंती. "

अपीलार्थी हे सोसायटीच्या संदर्भात सातत्याने अनेक तक्रारी व माहितीच्या अधिकारात अर्ज करीत असतात असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले.

अपीलार्थी यांनी सोसायटीच्या संदर्भात माहिती अधिकार अधिनियमांतर्गत केलेल्या अर्जाच्या संदर्भात संपूर्णपणे निराकरण करण्याच्या बाबतीत या सोसायटीच्या बाबतीत कार्यालयात असलेल्या सर्व नस्त्या तयार ठेवून अपीलार्थीस त्यांचे जे मुद्दे आहेत त्या मुद्दयांच्या संदर्भात सर्व कागदपत्रे दाखविण्यात यावीत. तसेच अपीलार्थीस हवे तर सर्व नस्त्या दाखविण्यात याव्यात, जेणेकरुन त्या दिवसाअखेर असलेले सर्व सद्य:स्थिती अपीलार्थीस कळू शकेल. म्हणजे नंतर अपीलार्थीस वेगळे

अर्ज पुन्हा पुन्हा करण्याची गरज पडणार नाही.

अपीलार्थी दि. ११ जानेवारी, २०१० रोजी प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे ठेवण्यात आलेल्या सुनावणीस उपस्थित नव्हते असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. अपिलीय अधिकारी यांनी पुन्हा एकदा सुनावणी घ्यावी व त्यावेळेला सर्व कागदपत्रे अपीलार्थीस दाखवून त्यांना हवी असलेली माहिती देण्यात यावी जेणेकरुन त्यांचे संपूर्णपणे समाधान होऊ शकेल.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.
प्रथम अपिलीय अधिकारी यांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
दिनांक १२ जानेवारी, २०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त.

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/४४८९८/अपील क्रमांक ५१३३/०२**

**श्री. डॉ. श्रीकांत एस. प्रभू -----अपीलार्थी**
**अ-२३, उद्यानप्रभा, तेजपाल स्कीम,**
**रोड नं. २, विलेपार्ले (पूर्व) मुंबई ५७.**

**विरुध्द**

**१. अपिलीय अधिकारी तथा उपनिबंधक ----उत्तरवादी**
**सहकारी संस्था, रुम नं. ३६९, २ रा मजला,**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व) मुंबई ५१.**

**२.जन माहिती अधिकारी**
**सहकारी संस्था, रुम नं. ३६९, २ रा मजला,**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व) मुंबई ५१.**

***---विवेचन---***

**अपीलाचा दिनांक २३/१०/२००९**
**सुनावणीचा दिनांक १२ जानेवारी, २०१०.**
**अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.**

अपीलार्थीस त्यांनी वेळोवेळी केलेल्या तक्रारींच्या बाबतीत केलेल्या कार्यवाहीची माहिती पाहिजे होती.

दि. १२/१/२०१० रोजीच ऐकलेल्या अपील क्रमांक ५१३२/०२ मध्ये यातील कांही मुद्दयांचा परामर्श घेण्यांत आलेला आहे व त्या अपीलाच्या आदेशात नमूद केल्याप्रमाणे अपिलीय अधिकारी यांनी पुन्हा एकदा सुनावणी आयोजित करण्याचे निर्देश देण्यांत आलेले आहेत.

या अर्जात अपीलार्थीनी कांही कागदपत्रांचे निरीक्षण घ्यावयाचे आहे असेहि नमूद केलेले आहे. अपिलीय अधिकारी ज्यादिवशी सुनावणी आयोजित करतील त्यादिवशी अपीलार्थीस हव्या

असणा-या माहितीच्या सर्व नस्त्या तयार ठेवाव्यात व अपीलार्थींना दाखवून त्यांना जी कागदपत्रे हवी असतील ती सर्व त्यांना देण्यांत यावीत.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक  १२ जानेवारी, २०१०

राज्य मुख्य माहिती आयुक्त.

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/४४९१२/अपील क्रमांक ५१३७/०२**

**श्री. लक्ष्मण गोपाळ भोसले** **-----अपीलार्थी**
**११३, गौतम उद्योग भवन, पहिला माळा,**
**एल.बी.एस.मार्ग,भांडूप, मुंबई ४०० ०७८.**

**विरुध्द**

**१. अपिलीय अधिकारी तथा उप सचिव** **----उत्तरवादी**
**उद्योग उर्जा व कामगार विभाग (कामगार-५)**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**२.जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी**
**उद्योग उर्जा व कामगार विभाग (कामगार-५)**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

***---विवेचन---***

**अपीलाचा दिनांक ३०/१०/२००९**
**सुनावणीचा दिनांक १२ जानेवारी, २०१०.**
**अपीलार्थी , अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी उपस्थित.**

अपीलार्थीस पुढील माहिती पाहिजे होती.

"महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक नोकरी नियमन व कल्याण कायदा १९८१ च्या कलम २३ अंतर्गत खाजगी ठेकेदार व सुरक्षा रक्षक यांना देण्यात येणा-या सुटीसंदर्भातील आम्ही देत असलेल्या प्रपत्रानुसार माहिती देण्यात यावी. "

ही माहिती न मिळाल्यामुळे व प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी देऊन सुध्दा आदेश पारित न केल्यामुळे अपीलार्थी यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

अपीलार्थींच्या अर्जास व अपीलास लेखी प्रतिसाद न देण्याचे कारण पुढीलप्रमाणे अपिलीय अधिकारी तथा उप सचिव यांनी दर्शविले आहे.

" उपरोक्त विषयास अनुसरुन आपण दि. १९/३/२००९ रोजी केलेल्या अपीलासंदर्भात येथे असे नमूद करण्यात येते की, आपण आपल्या अपील अर्जात खाजगी सुरक्षा रक्षक एजन्सी तसेच आस्थापना यांची माहिती देण्याची विनंती शासनास करण्यात आलेली आहे. यासंदर्भात अशा खाजगी संस्था किंवा व्यापारी आस्थापना या केंद्र शा्सनाच्या माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या प्रकरण-१ कलम २ मधील (ज्ञ) प्रमाणे सार्वजनिक प्राधिकरण या संज्ञेत मोडत नाहीत. त्या खाजगी संस्था आस्थापना/कंपनी यांना माहिती अधिकार अधिनियमाच्या तरतुदी लागू होत नाहीत. तसेच या अधिनियमाच्या (त्र) संज्ञेप्रमाणे मिळविता येण्याजोगी ही माहिती नाही. सदर संस्थेविषयीचे प्रशासनिक अभिलेखे या अधिनियमाच्या तरतुदी अंतर्गत शासनास सादर करण्याचे त्यांच्यावर बंधन नाही. तसेच अशा प्रकारचे अभिलेखे शासनाकडे उपलब्ध नाहीत व ठेवले जात नाहीत. त्यामुळे ही माहिती आपणास उपलब्ध करुन देता येणार नाही व ही बाब माहिती अधिकाराच्या कक्षेत येत नाही असे आपणास दि. १२/६/२००९ च्या प्रत्यक्ष सुनावणीच्या वेळी स्पष्ट करण्यात आलेले आहे व जी बाब माहिती अधिकाराच्या कक्षेत येत नाही त्या बाबीवर माहिती अधिकारात उत्तर देणे सयुक्तिक ठरणार नाही अशा धारणा असल्यामुळे त्यासंदर्भातील लेखी उत्तर आपणास पाठविता आलेले नाही हे देखिल प्रत्यक्ष सुनावणीच्या वेळी आपणास स्पष्ट करण्यात आलेले आहे. आपण माहिती आयोगाकडे दिलेल्या माहिती आयोगाच्या दि. २९/१२/२००९ च्या प्राप्त झालेल्या आदेशानुसार ही बाब आपणास कळविण्यात येत आहे. "

वरील तर्कशास्त्र हे योग्य नाही. जी माहिती शासनाकडेच संबंधित संस्थेने दिलेली नाही ती माहिती द्यावी असे अपेक्षाच नाही. जी माहिती शासनाने द्यावी अशी अपेक्षा ठेवणे योग्य नाही. मात्र सूट देण्याचे अधिकार ज्या ज्या ठिकाणी वापरले आहेत त्यासंबंधीची माहिती शासनाकडे निश्चितच आहे. ती माहिती सुरुवातीलाच जन माहिती अधिकारी यांनी देणे आवश्यक होते. जर कांही बाबतीत अपीलार्थींकडून खुलासा आवश्यक वाटत असल्यास त्यांना बोलावून सुध्दा त्यांच्याशी चर्चा करुन माहितीच्या बाबतीत व्याप्ती ठरविता आली असती. आपली जबाबदारी पार पाडण्यात

व अपीलार्थीस माहितीच्या संदर्भात कांहीही न कळविल्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्यावरील जबाबदारी ही योग्य रितीने पार पाडलेली नाही असेच आयोगाचे मत आहे.

दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रपत्रापैकी जी माहिती मंत्रालय पातळीवर आहे ती माहिती अपीलार्थीस १५ दिवसांच्या आंत देण्यात यावी असे निर्देश देण्यांत आले. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपीलाची सुनावणी झाल्याबरोबर लगेच व कोणत्याही परिस्थितीत अपीलाच्या दिनांकापासून १ महिन्याच्या आत आपले आदेश पारित करावेत असे निर्देश देण्यात येत आहेत. मुदतीत आदेश पारित न करण्याची पुनरावृत्ती झाल्यास गंभीर दखल घेण्यात येईल.

अपीलार्थीच्या अर्जावर प्रतिसाद देण्यास जरी १०० दिवसापेक्षा जास्त विलंब लावला असला तरी जन माहिती अधिका-यांची चुकीची धारणा ही कूहेतूयोग्य नाही हे लक्षात घेता जन माहिती अधिकारी यांच्यावर त्यांनी त्यांच्या कर्तव्यात दाखविलेल्या कुचराईबद्दल अधिनियमाच्या कलम २० अन्वये फक्त रु. ५,०००/- ची शास्ती लावण्याचे आयोग ठरवित आहे. ही शास्ती सचिव, कामगार विभाग ,मंत्रालय यांनी अपीलार्थीच्या माहे मार्च २०१० रोजी होणा-या पगारातून वसूल करावी व शासनाने विहित केलेल्या लेखाशिर्षाखाली जमा करुन चलनाच्या प्रतीसह अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

***---आदेश---***

अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.
संबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.
या आदेशाची एक प्रत सचिव, कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई ३२ यांनाहि पाठविण्यात यावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक १३ जानेवारी, २०१०

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/४४५२६/अपील क्रमांक ५१३१/०२**

**श्री. अजित रामकृष्ण म्हात्रे -----अपीलार्थी**
**१, हरी प्रसाद वडवली विभाग,**
**अंबरनाथ, जि. ठाणे.**

**विरुध्द**

**१. अपिलीय अधिकारी तथा सहायक महानगर आयुक्त ----उत्तरवादी**
**मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण**
**अभियांत्रिकी विभाग, वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स,**
**वांद्रे (पूर्व) मुंबई ४०० ०५१.**

**२.जन माहिती अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य अभियंता**
**मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण**
**अभियांत्रिकी विभाग, वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स,**
**वांद्रे (पूर्व) मुंबई ४०० ०५१.**

***---विवेचन---***

**अपीलाचा दिनांक २९/२/२००९**
**सुनावणीचा दिनांक १२ जानेवारी, २०१०.**
**अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.**

**अपीलार्थीस मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत चालू असलेल्या स्कायवॉकची कामे व विशेष करुन उल्हासनगर , कल्याण-डोंबिवली ,अंबरनाथ-कुळगांव, बदलापूर याठिकाणी होणा-या स्कायवॉकच्या कामासंबंधीची माहिती पाहिजे होती.**

**सदर माहिती अपीलार्थीस देण्यात आलेली आहे. अपीलार्थीचे अपील हे थोडेसे सुचनात्मक स्वरुपाचे आहे व नगरपालिकेच्या अधिका-यांशी सल्ला मसलत करुन ही कामे होत नाही असे त्यांना वाटते. याबाबत असे प्रस्ताव नगरपालिकेकडून आल्यानंतरच ते विचारात घेतले जातात असे**

जन माहिती अधिकारी यांनी स्पष्ट केले. तसेच स्कायवॉकची अलाईनमेंट वगैरे बाबत जास्तीत जास्त पब्लिक कन्सलटेशन करण्याचा मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचा प्रयत्न असतो असेहि जन माहिती अधिकारी यांनी स्पष्ट केले. त्याचप्रमाणे अपीलार्थीनी यासंदर्भात कुठचीहि अतिरिक्त माहिती हवी असल्यास यासंबंधीचे संपूर्ण प्लान व इतर कुठचीही अतिरिक्त माहिती अपीलार्थीस दाखवून ते देण्याची तयारी जन माहिती अधिकारी यांनी दर्शविली आहे. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

---आदेश---

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक १३ जानेवारी, २०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त.

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/४४९१६/अपील क्रमांक ५१३८/०२**
**क्रमांक-मु.मा.आ/४४९१७/अपील क्रमांक ५१३९/०२**

**श्री. विनोदकुमार के. मिश्रा -----अपीलार्थी**
**नगीना चाळ, यादव नगर,**
**खेरानी रोड, साकीनाका, मुंबई ७२.**

**विरुध्द**

**१. अपिलीय अधिकारी ----उत्तरवादी**
**संचालनालय, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन,**
**मुंबई.**

**२.जन माहिती अधिकारी**
**शासकीय दंत महाविद्यालय,**
**सेंट जॉर्जेस हॉस्पीटल कंपाऊंड, मुंबई ०१**

***---विवेचन---***

**अपीलाचा दिनांक २२/१०/२००९**
**सुनावणीचा दिनांक १२ जानेवारी, २०१०.**
**अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.**

**अपीलार्थीस दोन्ही अपीलातील मुळ अर्जाद्वारा एमएचसीईटी २००७, २००८ व २००९ च्या संदर्भात माहिती पाहिजे होती व ही माहिती अपीलार्थीस देण्यात आलेली आहे. ज्या मुद्दयांवर अपीलार्थीचे समाधान झाले नाही अशा मुद्दयांवर सुनावणीच्या वेळेला म्हणणे ऐकून घेण्यांत आले.**

**कटऑफ डेटस्च्या बाबतीत माहिती प्रोस्पेक्टसमध्येच असते व कोणत्या कारणामुळे कटऑफ डेटस्मध्ये बदल झाल्यास त्याची वर्तमापत्रात जाहिरात देण्यात येते असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले.**

**ज्यावर्षी असे बदल केले असतील त्या वर्षाच्या जाहिरातीची प्रत अपीलार्थीस देण्यात यावी असे निर्देश देण्यांत आले.**

**अपीलार्थीस एम.एच.सी.ई.टी चे पेपर्स सेट करणा-या एक्स्पर्टची नांवे व त्यांची शैक्षणिक अर्हता ही माहिती पाहिजे होती व ही माहिती देण्यांत आलेली नाही हे योग्यच आहे. फक्त पेपर्स सेटींगसाठी दिलेल्या मानधनाच्या रक्कमेची माहिती मात्र अपीलार्थीस देण्यात यावी असे निर्देश देण्यांत आले.**

***---आदेश---***

**दोन्ही अपीले निकाली काढण्यात येत आहेत.**
**संबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.**

**(डॉ.सुरेश वि. जोशी),**
**दिनांक १३ जानेवारी, २०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/४४९१९/अपील क्रमांक५१८५/०२**

**श्री. किरण के. गुळगुळे -----अपीलार्थी**
**४०२, नागरी टेरेस को.ऑप.हौ.सोसायटी,**
**सुनावाला अग्यारी लेन, माहिम (पश्चिम)**
**मुंबई ४०० ०१६.**

**विरुध्द**

**१. अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता ----उत्तरवादी**
**बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यालय,**
**जी/नॉर्थ विभाग, १ ला मजला,**
**हरिश्चंद्र येवले मार्ग, दादर (पश्चिम)**
**मुंबई ४०० ०२८.**
**२.जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता (इ व का)**
**बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यालय,**
**जी/नॉर्थ विभाग, १ ला मजला,**
**हरिश्चंद्र येवले मार्ग, दादर (पश्चिम)**
**मुंबई ४०० ०२८.**

***---विवेचन---***

**अपीलाचा दिनांक २२/१०/२००९**
**सुनावणीची तारीख १३/१/२०१०**
**अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.**

**सुनावणीच्या वेळेला असे दिसून आले की, माहितीपेक्षा अपीलार्थींना पूर्तीची अपेक्षा आहे अपिलीय अधिका-यांच्या आदेशात यासंबंधी पुढील निर्देश देण्यांत आलेले आहेत.**

**" अपील अर्जाच्या सुनावणीनुसार, याबाबतचे जन माहिती अधिकारी- सहायक अभियंता (इमारती व कारखाने) , जी/उत्तर यांना कार्यकारी अभियंता (इमारत प्रस्ताव) या खात्याकडून नागरी**

टेरेसेस को.ऑप.हौ.सोसायटी या इमारतीच्या प्लॅनची छायांकित प्रत प्राप्त होताच आपल्या तक्रारीची शहानिशा करुन योग्य ती कायदेशीर कारवाई करण्याबाबतचे आदेश देण्यात आले आहेत. त्यानुसार सहायक अभियंता (इमारत व कारखाने ) यांना कळविण्यात आले असून सदर प्लॅन प्राप्त होताच सहायक अभियंता (इमारती व कारखाने )यांच्याकडून आपणांस कळविण्यात येईल. "

जन माहिती अधिका-यांनी संबंधित कार्यकारी अभियंता (इमारत प्रस्ताव) यांना प्लॅनची छायांकित प्रत पाठविण्यास पत्र लिहिले आहे असे सांगितले व ते पत्र दाखविले. सुनावणीच्या वेळेस असे निर्देश देण्यांत आले की, जन माहिती अधिका-यांनी दुरध्वनीवरुन संपर्क साधून प्रत पाठविण्यास सांगावे व ५ दिवसांत अशी प्रत न आल्यास स्वत: जाऊन प्रत घेऊन यावी व अपिलीय अधिका-यांच्या आदेशाप्रमाणे कार्यवाही करावी.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.
संबंधितानी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक १३ जानेवारी, २०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४४९२६/अपील क्रमांक५१८८/०२

सौ. विशाखा वि. इंगळे -----अपीलार्थी
बी-६, अलंकार को.ऑप.हौसिंग सो.लि.
टिळक नगर, चेंबूर (पश्चिम) मुंबई ८९.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी ----उत्तरवादी
उपशिक्षणाधिकारी परि-५ यांचे कार्यालय,
एम पश्चिम पालिका विभाग कार्यालय,
चेंबूर (पूर्व) मुंबई ७१.

२.जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी (शाळा)
उपशिक्षणाधिकारी परि-५ यांचे कार्यालय,
एम पश्चिम पालिका विभाग कार्यालय,
चेंबूर (पूर्व) मुंबई ७१.

***---विवेचन---***

अपीलाचा दिनांक २६/१०/२००९
सुनावणीची तारीख १३/१/२०१०
अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

अपीलार्थीस माहिती देण्यांत आलेली आहे. मात्र ज्या मुद्दयांवर माहिती अजूनहि समाधानकारक दिलेली नाही असे अपीलार्थींचे म्हणणे आहे ती माहिती १० दिवसांच्या आंत अपीलार्थीस देण्यात येईल असे सर्व सम्मतीने ठरविण्यात आले.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
दिनांक १३ जानेवारी, २०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त.

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/४४९३०/अपील क्रमांक ५१९०/०२**

**श्री. बाळकृष्ण बी. मांडरे -----अपीलार्थी**
**रुम नं. ६, सतीश नगर, मॅच फॅक्टरी लेन,**
**कुर्ला (पश्चिम) मुंबई ४०० ०७०.**

**विरुध्द**

**१. अपिलीय अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी ----उत्तरवादी**
**अतिरिक्त जिल्हाधिकारी (अति/निष्का) कार्यालय,**
**१ ला मजला, इंडस्ट्रीयल ॲशुरन्स इमारत,**
**चर्चगेट, मुंबई ४०० ०२०.**

**२.जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार**
**अतिरिक्त जिल्हाधिकारी(अति/निष्का) कार्यालय,**
**१ ला मजला, इंडस्ट्रीयल ॲशुरन्स इमारत,**
**चर्चगेट, मुंबई ४०० ०२०.**

***---विवेचन---***

**अपीलाचा दिनांक २८/१०/२००९**
**सुनावणीची तारीख १३/१/२०१०**
**अपीलार्थी व त्यांचे प्रतिनिधी, अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी उपस्थित.**

"मौजे कुर्ला, न.भू.क्र.१०६, १०७ व १०८ या मिळकतीवरील झोपडीधारकांचे जनकल्याण सह.गृह,संस्थेला व विकासक मेसर्स ॲकॉर्ड बिल्डर्स आणि डेव्हलपर्स यांना पारित केलेले परिशिष्ट II रद्द करण्यासाठी आपल्या दिनांक २/३/२००९ रोजीच्या अर्जावरील केलेल्या कार्यवाहीची माहिती मिळण्याबाबत आपण दिनांक १६/३/२००९ च्या अर्जान्वये विचारणा केलेली आहे. "

प्रथम अपिलीय अधिका-यांनी अपीलार्थीस हवी असणारी माहिती देण्यात यावी असे निर्देश दि. १३/८/०९ रोजीच्या आदेशाने दिलेले होते. त्यानुसार दि. १७/८/२००९ रोजीच्या पत्राने जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस त्यांच्या अर्जाच्या संदर्भात पुढीलप्रमाणे कळविले.

" सदरचा आपला अर्ज माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २ (च) खालील माहितीच्या व्याख्येत बसत नाही. जनकल्याण सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेमध्ये संमती पत्राबाबतचे बोगस आणि बनावट कागदपत्र सादर केलेबाबत संबंधिताविरुध्द पोलीस ठाणे येथे फिर्याद दाखल करुन, योग्य ती दार मागावी. तसेच महाराष्ट्र झोपडपट्टी अधिनियम १९७१ चे कलम ३३ व ३८ अन्वये सक्षम प्राधिकारी यांनी सुरु केलेल्या कार्यवाहीविरुध्द आपण सदर अधिनियमाचे कलम ३५ अन्वये प्रशासक व विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचेकडे आपणांस अपील अर्ज सादर करता येईल. "

सुनावणीच्या वेळेला प्रथम अपिलीय अधिकारी आणि जन माहिती अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन दिले.

" माहितीचा अधिकार कलम २ (च ) मध्ये दिलेल्या व्याख्येनुसार अर्जदार यांना आवश्यक ती माहिती कागदपत्रांच्या प्रती स्वरुपात पुरविणेबाबत दुमत नाही. तथापि, या प्रकरणी अर्जदार यांनी त्याचे मुळ अर्जावरील अपेक्षिलेली कारवाई (फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३४०, महाराष्ट्र झोपडपट्टी (सु.नि.व.पु) अधिनियम १९७१ चे कलम ३३, ३८) ची बाब या कार्यालयाच्या अधिकार कक्षेत येत नसल्याने अर्जदार यांना उपरोक्त कलमान्वये केलेल्या कारवाईची माहिती कळविण्याचा प्रश्न उद्‍भवत नाही. तथापि सदर बाब दिनांक १७/८/२००९ च्या पत्रान्वये कळविण्यात आली आहे.

फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३४० अन्वये कारवाई करण्याचे अधिकार हे न्यायालयाकडे असल्याचे दिसून येते. सदर कलमाची अधिकारकक्षा या कार्यालयाशी संबंधित नाही. महाराष्ट्र गलिच्छ वस्ती (सु.नि.व.पु.) कलम ३५ अन्वये सदर कायद्याखाली कोणत्याही कारवाई संबंधीचे अपिलीय अधिकार हे याच कायद्यान्वये मा. विभागीय आयुक्त यांना प्रदान करण्यात आलेले असून अर्जदार यांनी अधिनियमाचे कलम ३३, ३८ खाली निष्कासनाचे कार्यवाही विरोधात न्याय मागणीसाठी मा. विभागीय आयुक्त यांच्याकडे अपील दाखल केले आहे. सदर अपील मा. विभागीय

आयुक्त यांनी दि. १३/८/२००९ रोजी निकाली काढले आहे. तरीही अर्जदार यांनी यासंबंधीची कार्यवाही, या कार्यालयाकडे अधिकार नसताना, याच तरतुदी संबंधीची कार्यवाही अप्पर जिल्हाधिकारी यांचेकडून अपेक्षित करणे गैर आहे, त्यामुळे अर्जदार यांचा सदर मुद्दाही मान्य करता येणार नाही.

परिच्छेद ८ मधील इतर मुद्दे हे मा. माहिती आयोगाच्या कक्षेतील आहेत त्यामुळे सदर मुद्दयावर अभिप्राय देता येत नाहीत. "

अपीलार्थी यांचे म्हणणे असे की, अर्जावर काय कार्यवाही केली याची माहिती द्यावी.

वरिल विवेचनावरुन असे स्पष्ट दिसून येते की, अपीलार्थीच्या अर्जावर त्यांच्या कार्यालयाकडून कांही कार्यवाही करता येण्यासारखी नाही. अपीलार्थीना स्वतः फौजदारी प्रक्रिया संहितेखाली किंवा गलिच्छ वस्ती कायद्याखाली कारवाई करायची आहे, असे कार्यालयाचे मत दिसते. त्याप्रमाणे अपीलार्थीस कळविण्याची कार्यवाही करण्यात यावी.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक १४ जानेवारी, २०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त.

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**क्रमांक-मु.मा.आ/४४७८०/तक्रार क्रमांक ६०५/०२**

**श्री.चेतन कोठारी -----अपीलार्थी**
**५२, ओशियानिक अपार्टमेंट, डॉ.राजाबाली पटेल लेन,**
**बी. देसाई रोड, मुंबई ४०० ०२६.**

**विरुध्द**

**१. अपिलीय अधिकारी तथा पोलीस उप आयुक्त ----उत्तरवादी**
**झोन २, १ ला मजला, ट्रॅफिक इन्स्टिटयूट इमारत,**
**नागपाडा, मुंबई ४३.**

**२.जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त (समन्वय)**
**पोलीस आयुक्त कार्यालय, विस्तार इमारत-३,**
**क्रॉफर्ड मार्केट, मुंबई -- ४०० ००१.**

***---विवेचन---***

**अपील क्रमांक ४६२५/०२ मध्ये अर्जदारास २० दिवसांच्या आत माहिती द्यावी असे आदेश दि. ९ सप्टेंबर, २००९ रोजी आयोगामार्फत देण्यांत आलेले होते. ही माहिती तक्रारदारांस न मिळाल्यामुळे दि. २२/१०/२००९ रोजी तक्रार दाखल केली आहे त्याची सुनावणी दि. १४ जानेवारी, २०१० रोजी घेण्यांत आली. त्यावेळेला तक्रारदार व जन माहिती अधिकारी उपस्थित होते.**

**सुनावणीच्या वेळेला जन माहिती अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे खुलासा सादर केला.**

**" अर्जदार श्री. चेतन कोठारी यांनी दिलेल्या यादीची व पोलीस ठाण्याकडून त्यांना पुरविण्यात आलेल्या यादीची पाहणी करता असे निदर्शनास आले की, अर्जदार यांनी दिलेली नावे व त्यांचे झालेले ॲनकाऊंटर हे पोलीस ठाण्यांनी न करता गुन्हे शाखेच्या विविध युनिट अधिका-यामार्फत केले गेल्याचे आढळून आले. त्याप्रमाणे अर्जदार श्री. चेतन कोठारी यांच्या भ्रमनध्वनीवर संपर्क**

साधून त्यांच्या आक्षेपांचे योग्यते निरसन करण्याकरीता व उपलब्ध कागदपत्रांचे निरिक्षण करण्याकरीता जन माहिती अधिकारी, दक्षिण प्रादेशिक विभाग यांचे कार्यालयात बोलावून घेण्यात आले. श्री. चेतन कोठारी यांनी त्यांच्या सवडीने या कार्यालयात येवून उपलब्ध कागदपत्रांची पाहणी केली व त्यांच्या कडील उपलब्ध यादीतील नावे ही गुन्हे शाखेतील विविध युनिट अधिका-यांकडून चकमकीत ठार झालेल्या गुंडांची असल्यामुळे पोलीस ठाण्यांनी दिलेल्या अहवालात त्यांच्या नावांचा समावेश नव्हता ही बाब त्यांचे निदर्शनास आणूंन दिली त्याबाबत त्यांनी समाधान व्यक्त केले होते. "

तक्रारदारांस जरी अशा रितीने माहिती मिळाली असली तरी समन्वय शाखेने तक्रारदारांच्या अर्जाची मूळ प्रत त्याचवेळेला पोलीस ठाण्यांना जशी पाठविली तशीच गुन्हे शाखेला सुध्दा पाठविली असती तर सुरुवातीलाच गुन्हे शाखेची माहिती तक्रारदारांना मिळू शकली असती. तेव्हा अर्जाचे वाचन समन्वय शाखेने काळजीपूर्वक करुन एकूणच सर्व संबंधित अधिका-यांकडे अर्जाची प्रत जाईल याकडे कटाक्षाने लक्ष द्यावे.

***---आदेश---***

तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक १४ जानेवारी, २०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.

क्रमांक-मु.मा.आ/४३८१९/तक्रार क्रमांक ६०३/०२

श्री.चेतन कोठारी -----अपीलार्थी
५२, ओशियानिक अपार्टमेंट, डॉ.राजाबाली पटेल लेन,
बी. देसाई रोड, मुंबई ४०० ०२६.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा उप सचिव (नाजकधा-१) ----उत्तरवादी
नगर विकास विभाग, मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२.

२.जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी (नाजकधा-१)
नगर विकास विभाग, मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२.

***---विवेचन---***

अपील क्रमांक ३८८३/०२ मध्ये दि. ११ ऑगस्ट, २००९ रोजी जन माहिती अधिकारी, नगर विकास विभाग यांनी अपीलार्थीस २००५ पासून किती व्यक्तींना सदनिका वाटप झाल्या याची माहिती देण्याचे निर्देश देण्यांत आले होते. ही माहिती न मिळाल्यामुळे अर्जदारांनी दि. १३ सप्टेंबर, २००९ रोजी आयोगाकडे तक्रार दाखल केली. या तक्रारीची सुनावणी दि. १४ जानेवारी, २०१० रोजी घेण्यात आली त्यावेळेला तक्रारदार व जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

सुनावणीच्या वेळेला जन माहिती अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे खुलासा सादर केला.

" श्री.चेतन कोठारी यांनी द्वितीय अपील अर्जावरील मा. मुख्य माहिती आयुक्त यांच्याकडे दि. २/३/२००९ रोजी झालेल्या सुनावणीच्या अनुषंगाने मा. माहिती आयुक्त कार्यालयाकडून दि. ११/८/२००९ रोजी प्राप्त आदेशानुसार श्री. चेतन कोठारी यांना शासन पत्र दि. १४/९/२००९ अन्वये

कार्यासनात उपलब्ध असलेली सन २००५ पासून ते आजतागायत पर्यंत मा. मुख्यमंत्री महोदयांनी वितरीत केलेल्या आदेशांची छायाप्रत कार्यालयीन वेळेत व्यक्तिशः येऊन घेऊन जाण्याची विनंती करण्यात आली होती. परंतु श्री. चेतन कोठारी यांनी सदर माहिती पोष्टाद्वारे पाठविण्यात यावी अशी विनंती केली. यास्तव सदर माहिती दि. ९/१०/२००९ रोजीच्या पत्रान्वये विनामूल्य पाठविण्यात आली आहे. "

तक्रारदारांस माहिती मिळाली असल्यामुळे पुढील आदेश देण्यांत येत आहे.

***---आदेश---***

तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक १४ जानेवारी, २०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त.

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**क्रमांक-मु.मा.आ/४४७८९/तक्रार क्रमांक ६०४/०२**

**श्री.चेतन कोठारी -----अपीलार्थी**
**५२, ओशियानिक अपार्टमेंट, डॉ.राजाबाली पटेल लेन,**
**बी. देसाई रोड, मुंबई ४०० ०२६.**

**विरुध्द**

**१. अपिलीय अधिकारी तथा पोलीस उप आयुक्त ----उत्तरवादी**
**परिमंडळ ९, हिल रोड, बांद्रा (पश्चिम)**
**मुंबई ४०० ०५०.**

**२.जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त**
**पश्चिम नियंत्रण कक्ष, कार्टर रोड,**
**बांद्रा (पश्चिम) मुंबई ४०० ०५०.**

***---विवेचन---***

**अपील क्रमांक ३८७८/०२ मध्ये दि. ४/७/२००९ रोजीच्या आदेशात इतर झोननी माहिती दिलेली होती पण एका ज्या झोनने माहिती दिलेली नाही त्या झोनने माहिती द्यावी असे निर्देश देण्यात आले होते. सदर माहिती न मिळाल्यामुळे अपीलार्थींनी केलेल्या दि. २२/१०/२००८ रोजीच्या तक्रारीची सुनावणी दि. १४ जानेवारी, २०१० रोजी घेण्यांत आली त्यावेळेला अपीलार्थी व जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.**

**जन माहिती अधिकारी यांनी असे सागितले की, फक्त ओशिवरा पोलीस स्टेशन सोडले तर सर्व माहिती देण्यांत आलेली आहे व त्यास तक्रारदारांनी दुजोरा दिला.**

**ओशिवरा पोलीस स्टेशनने त्यांची माहिती ही दि. १५ जानेवारी, २०१० रोजी संध्याकाळपर्यंत संबंधित जन माहिती अधिका-यांना द्यावी व जन माहिती अधिका-यांनी ती माहिती शनिवार दि. १६**

जानेवारी, २०१० रोजी संध्याकाळ पर्यंत तक्रारदारांस घरपोच देण्यात यावी असे निर्देश देण्यांत आले.

**----आदेश---**

तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक १५ जानेवारी, २०१०

राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१)अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४३१५६/अपील क्र. ५१९३/०२

श्री.नंदलाल सलतन्सी मौर्या -----अपीलार्थी
महात्मा कबीर नगर, टी.एम.टी समोर,
मौर्या केला भंडार, अंधेरी सहार रोड,
विलेपार्ले (पूर्व) मुंबई .

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा पोलीस उप आयुक्त ----उत्तरवादी
परिमंडळ ९, हिल रोड, वांद्रे (पश्चिम)
मुंबई ४०० ०५०.

२.जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त
पश्चिम नियंत्रण कक्ष, प्रादेशिक विभाग,
कार्टर रोड, वांद्रे (पश्चिम) मुंबई ४०० ०५०.

---*विवेचन*---

अपीलाचा दिनांक २७/८/२००९
सुनावणीची तारीख १४ जानेवारी, २०१०
अपीलार्थी व जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित.

असे दिसते की, अपीलार्थींनी पोलीस स्टेशनला सन २००७ सालापूर्वी तक्रारअर्ज दिला होता. व त्यावर झालेल्या चौकशी व कारवाईची प्रत त्यांना पाहिजे होती.

याबाबतीत त्यांना त्यांचा अर्ज हा रेकॉर्ड प्रमाणे विलेपार्ले पोलीस ठाणेकडून दि. १०/९/२००७ रोजी चौकशी होऊन दप्तरदाखल करण्यांत आलेला आहे. मात्र त्यासंबंधी आवक नोंद व इतर कुठचीही कागदपत्रे नाहीत.

सुनावणीच्या वेळेला पोलीस सहायक आयुक्त तथा जन माहिती अधिकारी यांनी असे निवेदन केलेले आहे की,  अपीलार्थीना त्यांच्या मुळ तक्रारीचे खरोखरच परत निरसन करुन घ्यायचे असेल तर त्यांनी पूर्वीच्या तक्रार अर्जाचा संदर्भ देऊन नव्याने अर्ज केल्यास पुन्हा त्यावर कारवाई करता येऊ शकेल.

रेकॉर्डप्रमाणे अपीलार्थीस माहिती दिलेली असल्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक  १५ जानेवारी, २०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१)अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४४९३९/अपील क्र. ५२०२/०२

श्रीमती प्रणाली धयाळकर -----अपीलार्थी
२३/३९ , बी.डी.डी. चाळ,
एन.एम. जोशी मार्ग, मुंबई - ४०० ०१३.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता ----उत्तरवादी
अधीक्षक अभियंता यांचे कार्यालय,
मुंबई (सार्वजनिक बांधकाम) मंडळ,
२५ मर्झबान रोड, फोर्ट, मुंबई ४०० ००१.

२.जन माहिती अधिकारी
अधीक्षक अभियंता यांचे कार्यालय,
मुंबई (सार्वजनिक बांधकाम) मंडळ,
२५ मर्झबान रोड, फोर्ट, मुंबई ४०० ००१

***---विवेचन---***

अपीलाचा दिनांक ३/११/२००९
सुनावणीची तारीख १५ जानेवारी, २०१०
अपीलार्थी अनुपस्थित जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित.

अपीलार्थीचा अर्ज जन माहिती अधिकारी आमदार निवास उपविभाग यांच्याकडे पाठविला होता व अपीलार्थीस हवी असणारी माहिती ही विस्तृत स्वरुपाची असल्यामुळे अपीलार्थींना नस्ती बघण्याची विनंती करण्यात आली होती. मात्र अशा प्रकारे अपीलार्थींनी नस्तीचे निरीक्षण करुन त्यांना हव्या असणा-या कागदपत्रांची निवड केलेली आहे किंवा नाही हे कागदपत्रांवरुन स्पष्ट होत नाही.

**अपीलार्थी स्वतः उपस्थित नसल्यामुळे याबाबत त्यांचेकडून स्पष्टीकरण झाले नाही. तेव्हा अपीलार्थीनी प्रथम कागदपत्रांचे निरीक्षण करुन घ्यावे व त्यांना जन माहिती अधिकारी यांनी सर्व सहकार्य करावे. त्याने समाधान न झाल्यासच अपीलाचा मार्ग चोखाळावा.**

***---आदेश---***

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**
**संबंधितांनी वर निर्देशिल्याप्रमाणे कार्यवाही करावी.**

**(डॉ.सुरेश वि. जोशी),**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**दिनांक १५ जानेवारी, २०१०**

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१)अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४४९३१/अपील क्र. ५२०१/०२

श्री. रामन बी. जयभावे -----अपीलार्थी
सार्वजनिक बांधकाम ऑफिस जवळ,
शिवडी फास्ट ट्रॅक कोर्ट, झकेरीया बंदर रोड,
शिवडी, मुंबई ४०० ०१५.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा सहायक मनपा आयुक्त ----उत्तरवादी
सहायक मनपा आयुक्त यांचे कार्यालय,
एल वार्ड, एस.जी. बर्वे मार्ग, कुर्ला (पश्चिम)
मुंबई ४०० ०७०.

२.जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता (इ./का)
सहायक मनपा आयुक्त यांचे कार्यालय,
एल वार्ड, एस.जी. बर्वे मार्ग, कुर्ला (पश्चिम)
मुंबई ४०० ०७०.

***---विवेचन---***

अपीलाचा दिनांक २६/१०/२००९
सुनावणीची तारीख १५ जानेवारी, २०१०
अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

अपीलार्थीच्या म्हणण्यानुसार असि.कमिशनर, एल वार्ड यांनी दि. १३/७/२००४ रोजी जारी केलेल्या ॲनेक्चर-II मध्ये CTS No.१०९ पैकी, ११० पैकी, १११ आणि ११२ पैकी कुर्ला व्हिलेज येथील ६६६७ चौ.मी हा एरीया सेन्सस स्लम कॉलनी आहे. त्यामुळे अपीलार्थीस या क्षेत्राच्या बाबतीत झोपडपट्टी सुधार कायदा १९७१ अंतर्गत झालेले झोपडपट्टी घोषित करण्याबाबतच्या नोटीफिकेशन वगैरेची प्रत पाहिजे आहे ती अजूनहि त्यांना मिळालेली नाही. तेव्हा इतर कार्यालयात

अर्ज पाठविण्याऐवजी जन माहिती अधिकारी यांनी स्वतः या नोटीफिकेशनची असलेली वस्तुस्थिती ही अपीलार्थीस १५ दिवसांच्या आत कळवावी.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक १५ जानेवारी, २०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१)अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४४९४०/अपील क्र. ५२०४/०२

श्री. रमेश श्रीराम खानविलकर -----अपीलार्थी
२/ शांताबाई निवास, शिवाजी नगर,
टेंबीपाडा रोड, भांडूप (पश्चिम) मुंबई ७८.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा पोलीस उप आयुक्त ----उत्तरवादी
परिमंडळ ६, मुंबई ७१.

२.जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त
पूर्व प्रादेशिक विभाग नियंत्रण कक्ष, चेंबूर,
मुंबई ७१.

***---विवेचन---***

अपीलाचा दिनांक १९/९/२००९
आयोगास प्राप्त झाल्याचा दिनांक ३ नोव्हेंबर, २००९
सुनावणीची तारीख १५ जानेवारी, २०१०
अपीलार्थी अनुपस्थित, जन माहिती अधिकारी उपस्थित.

अपीलार्थीस हवी असलेली माहिती ही दि. ९/१०/२००९ रोजी अपीलार्थींनी स्वीकारलेली आहे. अपीलार्थी स्वतः उपस्थित नसल्यामुळे त्यांचे म्हणणे समजून घेता आले नाही.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक १५ जानेवारी, २०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१)अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४४९४१/अपील क्र. ५२०३/०२

श्री. शेख सय्यद अली मोहमद रझा -----अपीलार्थी
रझा को.ऑप.हौ.सोसायटी लि.
अ विंग, ८ वा मजला, रुम नं. ८०७,
आर.ए.किडवई मार्ग, बिलाल मजिदच्या पुढे
शिवडी (पश्चिम) मुंबई १५.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा सहायक मनपा आयुक्त ----उत्तरवादी
बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यालय,
एफ/साऊथ वार्ड , बी.ए. आंबेडकर रोड,
जगन्नाथ भातणकर मार्ग, परेल, मुंबई १२.

२.जन माहिती अधिकारी तथा वसाहत अधिकारी
बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यालय,
एफ/साऊथ वार्ड , बी.ए. आंबेडकर रोड,
जगन्नाथ भातणकर मार्ग, परेल, मुंबई १२.

***---विवेचन---***

अपीलाचा दिनांक ३/११/२००९
सुनावणीची तारीख १५ जानेवारी, २०१०
अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

अपीलार्थींना हवी असणारी माहिती अत्यंत जारीने शोध घेऊनहि सापडलेली नाही असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. मात्र अपीलार्थींकडे जे पुरावे आहेत त्या पुराव्यानिशी त्यांनी पुन्हा सहायक आयुक्त यांच्याकडे अर्ज केल्यास सक्षम प्राधिकारी कागदपत्रांची तपासणी करुन योग्य तो निर्णय घेऊ शकतील. त्याप्रमाणे अपीलार्थींनी असा अर्ज करण्याचे मान्य केले.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
दिनांक १५ जानेवारी, २०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१)अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४४९४२/अपील क्र. ५२१०/०२

श्री. रेजिनॉल्ड पिंटो -----अपीलार्थी
१६१/४४७४, पंतनगर,
घाटकोपर (पूर्व ) मुंबई ४०० ०७५.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा प्राचार्य ----उत्तरवादी
डोमिनिक सायवो विद्यालय , पंतनगर,
घाटकोपर (पूर्व) मुंबई ७५.

२.जन माहिती अधिकारी
डोमिनिक सायवो विद्यालय , पंतनगर,
घाटकोपर (पूर्व) मुंबई ७५.

*---विवेचन---*

अपीलाचा दिनांक २/११/२००९
सुनावणीची तारीख १६ जानेवारी, २०१०
अपीलार्थी व शाळेचे मुख्य लिपीक उपस्थित.

खाजगी शाळांच्या बाबतीत प्रिन्सिपल किंवा संस्थेचे सचिव हे प्रथम अपिलीय नसून शासकीय शिक्षण विभागाचे संबंधित शिक्षण निरीक्षक/ शिक्षण अधिकारी हे प्रथम अपिलीय अधिकारी आहेत.

तेव्हा अपीलार्थी यांनी त्यांचे प्रथम अपील हे संबंधित शिक्षण निरीक्षक या प्रथम अपिलीय अधिका-यांकडे सादर करावे व त्यांच्या निर्णयानंतर आवश्यक वाटल्यास आयोगाकडे द्वितीय अपीलात यावे.

*---आदेश---*

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
दिनांक १६ जानेवारी, २०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त.

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/अपील क्रमांक १३०९/०२**

**श्री. विलास यशवंतराव पारखे -----अपीलार्थी**
**आशा निवास, गल्ली नं.२,**
**मोगलाई, धुळे.**

**विरुध्द**

**१. अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता -----उत्तरवादी**
**लघुसिंचन विभाग, जिल्हा परिषद धुळे.**

**२.जन माहिती अधिकारी उप अभियंता**
**लघुसिंचन विभाग, जिल्हा परिषद धुळे.**

***---विवेचन---***

**अपीलाचा दिनांक २/४/२००९**
**सुनावणीची तारीख ७/१२/२००९**
**अपीलार्थी , जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित.**

**अपीलार्थींनी दि. ५/२/२००९ च्या अर्जाद्वारे लघुसिंचन विभाग, पंचायत समिती धुळे येथील अभियंता श्री. काळे यांच्यासंबंधी खालील माहिती मागितली.**

**१. धारण केलेले पद**

**२. वेतनश्रेणी**

**३. सध्याची वेतनश्रेणी**

**४. नोकरीत रुजू होताना घोषित केलेली मालमत्ता**

**५. सध्या घोषित केलेली मालमत्ता**

**६. नोकरीच्या काळात मालमत्ता खरेदी करतांना शासनाची परवानगी घेतली असल्यास त्याचा तपशील.**

७.	नोकरीच्या काळात खरेदी-विक्री केलेल्या मालमत्तेचा तपशील

८.	त्यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या कामांची शासकीय पातळीवर चौकशी सुरु आहे काय१ असल्यास त्याची माहिती.

उपरोक्त माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दि. २६/२/२००९ रोजी अपीलार्थीस माहिती पुरविली. परंतु यावर समाधान न झाल्याने त्यांनी दि. ७/३/२००९ रोजी प्रथम अपील केले. यावर दि. २४/३/२००९ रोजी सुनावणी झाली. सुनावणीच्या वेळी त्यांना ७ दिवसांत माहिती द्यावी असे निर्देश देण्यात आले.

मिळालेली माहिती समाधानकारक नसल्याचे कारण नमूद करुन अपीलार्थी यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. द्वितीय अपीलावरील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांनी आयोगास सादर केले की, कार्यालयाकडे उपलब्ध असलेली माहिती अपीलार्थींना देण्यात आली आहे. मालमत्ते विषयीची माहिती कार्यालयाकडे उपलब्ध नसल्याने दिलेली नाही. माहितीच्या अधिकारानुसार कार्यालयाकडे उपलब्ध असलेली माहिती आहे त्या स्वरुपात उपलब्ध करुन देण्याची तरतुद आहे. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती अपीलार्थींना पुरविली असल्याने सदर प्रकरणात खालील प्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहेत.

***---आदेश---***

अपील खारिज करण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक १६ जानेवारी, २०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१)अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४४९३३/अपील क्र. ५२११/०२

श्री. जयवंत काशिनाथ पाटील -----अपीलार्थी
मु.पो. केळवा ( पूळ नाका)
ता. पालघर, जिल्हा ठाणे -- ४०१ ४०१

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा सहसंचालक ----उत्तरवादी
उच्च व तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई विभाग,
एलफिन्स्टन तंत्र विद्यालय आवार ३,
महापालिका मार्ग, मुंबई ४०० ००१.

२.जन माहिती अधिकारी
उच्च व तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई विभाग,
एलफिन्स्टन तंत्र विद्यालय आवार ३,
महापालिका मार्ग, मुंबई ४०० ००१.

***---विवेचन---***

अपीलाचा दिनांक ४/११/२००९
सुनावणीची तारीख १६ जानेवारी, २०१०
अपीलार्थी अनुपस्थित, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित.

अपीलार्थीच्या अपीलाच्या संदर्भात अपिलीय अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे स्पष्टीकरण दिले आहे.

"अपीलार्थी श्री. जे.के. पाटील यांनी दि. १५/९/२००९ रोजी केलेल्या प्रथम अपीलावर या कार्यालयाच्या दि. २९/९/२००९ च्या पत्रान्वये दि. ८/१०/२००९ रोजी सुनावणीकरीता उपस्थित राहण्याबाबत सूचित करण्यात आले होते. परंतु अपीलार्थीनी दि. ५/११/२००९ च्या पत्रान्वये सुनावणीचे सदर पत्र उशीरा मिळाल्याने सुनावणीस उपस्थित राहता न आल्याने अपीलार्थीनी दि. ५/११/२००९ च्या पत्रान्वये पुन्हा सुनावणी घेण्याबाबत पत्र दिले. परंतु त्यादरम्यान द्वितीय

अपीलाचा कालावधी (प्राप्त दि. १/११/२००९ पासून) सुरु झाल्याने प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी घ्यावी किंवा कसे याबाबत संदिग्धता निर्माण झाल्याने पुढील सुनावणी घेण्यात आली नाही.

तद्नंतर दि. ८/१२/२००९ रोजी श्री. जे.के. पाटील यांनी मा. सहसचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय यांचेकडे प्रत्यक्ष तक्रार केल्यानंतर दि. ८/१२/२००९ व दि. ११/१२/२००९ च्या टिपणीद्वारे सदर बाबत मा.सहसचिव यांना अहवाल सादर करण्यात आला व त्याअनुषंगाने संबंधित महाविद्यालयाकडून दि. १४/१२/२००९ च्या पत्राद्वारे माहिती मागविण्यात आली. दिनांक १२/९/२०१० रोजी महाविद्यालयाकडून माहिती प्राप्त झाली. सदर माहितीची पडताळणी सुरु असून याबाबतच्या पुढील कार्यवाहीचा निर्णय प्राधान्याने घेण्यात येणार आहे. तसेच सदर निर्णयाबाबत अपीलार्थी श्री. जे.के. पाटील यांना अवगत करण्यात येईल. "

अपीलार्थींचे अपील व वरील स्पष्टीकरण याचा विचार करता पुढील आदेश देण्यात येत आहे.

जन माहिती अधिक्‍ारी यांच्या कार्यालयात आज जी माहिती उपलब्ध आहे ती अपीलार्थीस आदेश मिळाल्यापासून ५ दिवसाच्या आत देण्यात यावी.

उर्वरित माहिती ज्या संबंधात महाविद्यालयाकडून आलेल्या माहितीची पडताळणी करुन निर्णय घेण्यात येत आहे ती कारवाई होण्यास साधारणतः १ महिन्याचा कालावधी लागेल असे अपिलीय अधिकारी तथा सहसहंचालक यांनी सांगितले. वरील माहिती ही कारवाई पूर्ण करुन १ महिन्यात अपीलार्थीस देण्यात यावी असेहि निर्देश देण्यात आले.

सहसंचालकांनी त्यांच्या कार्यालयातील माहितीच्या अधिकाराचा अर्ज मिळणे, ते सत्वर जन माहिती अधिकारी यांनी पाहणे या बाबतीतली प्रणाली सुनिश्चित करुन घ्यावी असेहि निर्देश देण्यांत आले.

*----आदेश----*

अपील मान्य करण्यात येत आहे.
संबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक १६ जानेवारी, २०१०

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१)अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/४४९९३/अपील क्र. ५२१४/०२**

**श्री. गुलाम मोहम्मद अब्दुल अजीज बनानी -----अपीलार्थी**
**रुम नं. ८११/२१, कलेक्टर चाळ, यु.पी. रेस्टॉटरंट,**
**चिरागनगर, घाटकोपर (पश्चिम) मुंबई ८६.**

**विरुध्द**

**१. अपिलीय अधिकारी तथा मुख्य अधिकारी ----उत्तरवादी**
**मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ,**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व) मुंबई ५१.**

**२.जन माहिती अधिकारी तथा उपमुख्य अभियंता**
**मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ,**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व) मुंबई ५१.**

***---विवेचन---***

**अपीलाचा दिनांक ७/११/२००९**
**सुनावणीची तारीख १६ जानेवारी, २०१०**
**अपीलार्थी, जन माहिती अधिकारी व सहायक जनमाहिती अधिकारी उपस्थित.**

**प्रथम अपिलीय अधिका-यांच्या आदेशात अपीलार्थीनी जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयातील अभिलेखाचे निरीक्षण करावे व त्यांना जी कागदपत्रे पाहिजे असतील ती शुल्क भरुन त्यांना देण्यात यावीत असे निर्देश दिलेले होते.**

**सुनावणीच्या वेळेला अशा प्रकारची अभिलेखाची तपासणी अपीलार्थीनी घेतली का १ असे विचारले असता अजूनपर्यंत घेतली नाही असे उत्तर अपीलार्थीनी दिले. तेव्हा दोन्ही पक्षाशी चर्चा करुन दि. २७ जानेवारी, २०१० रोजी अपीलार्थीनी अभिलेखाची तपासणी करुन त्यांना जी**

कागदपत्रे पाहिजे असतील ती कागदपत्रे दर्शवावीत व त्याच्या प्रती अपीलार्थीस शुल्क भरुन देण्यात याव्यात.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येते आहे.
संबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक १६ जानेवारी, २०१०

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/अपील क्रमांक १४३१/०२**

**श्री. अे. ओ. पाटील -----अपीलार्थी**
**शनिमंदिर गल्ली, मु. शिंदखेडा (धुळे)**
**ता. शिंदखेडा, जिल्हा धुळे.**

**विरुध्द**

**१. अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी -----उत्तरवादी**
**पंचायत समिती धुळे, जि. धुळे.**

**२.जन माहिती अधिकारी**
**गटविकास अधिकारी पंचायत मिती कार्यालय,**
**धुळे, जि. धुळे.**

***---विवेचन---***

अपीलार्थी श्री.अे.ओ. पाटील यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ८/०८/२००९ रोजी द्वितीय अपील सादर केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नवीन प्रशासकीय इमारत, जिल्हाधिकारी कार्यालय सभागृह, धुळे, जि.धुळे येथे दि. ८/१२/२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली.

अपीलार्थीनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. ६/५/२००९ रोजी अर्ज केलर त्याचा तपशील पुढील प्रमाणे -

अपीलार्थी स्वतः दि. १/११/१९९४ रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाल्यानंतर रजा रोखीकरण रक्कम मिळण्याबाबत केलेल्या लेखी विनंत्या तसेच प्रत्यक्षांत संबंधित कार्यालयातील अधिकारी यांना समक्ष भेटून त्याचप्रमाणे त्याची पूर्तता करण्यासाठी केलेल्या पत्रव्यवहाराची व अंतिम निर्णयाच्या सहीशिक्क्याच्या नकला प्रती मिळण्याबाबतची माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपीलार्थीस त्यांनी मागितलेल्या माहितीस कोणतेही आदेश/पत्र पारित केले नाही त्यामुळे अपीलार्थींनी अधिनियमाच्या कलम १९(१) अन्वये प्रथम अपील दि. २७/६/२००८ रोजी दाखल केले. परंतु त्यावरहि प्रथम अपिलीय अधिका-यांनी कोणतेही आदेश पारित केले नाहीत. त्यामुळे अपीलार्थींनी व्यथित होऊन आयोगाकडे कलम १९(३)अन्वये द्वितीय अपील दाखल केले.

द्वितीय अपीलाच्या सुनावणीच्या वेळी अपीलार्थी, तत्कालीन व कार्यरत असलेले जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यापैकी कोणीही हजर नव्हते.

अपीलार्थी श्री. अे.ओ. पाटील हे शासकीय सेवेतून दि. १/११/१९९४ रोजी सेवानिवृत्त झाले त्यावेळेपासून अपीलार्थीस रजा रोखीकरणाची रक्कम अद्यापपावेतो मिळालेली नाही. कदाचित त्यांचे विरुध्द क्रिमिनल केस चालू असल्याने तसे झाले असू शकेल. पण अपीलार्थींना कोर्टाने निर्दोष सोडल्याची प्रत अपीलार्थींनी जोडलेली आहे.

जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी याबाबतीत कोणतीच कार्यवाही केलेली दिसत नाही. त्यांनीही या महत्वाच्या बाबीकडे दुर्लक्ष केले आहे. याबद्दल अधिनियमाच्या कलम २० अन्वये त्यांचेवर शास्ती कां लादण्यात येऊ नये याबद्दलचा खुलासा आयोगाच्या मुंबई कार्यालयात १० दिवसात सादर करावा. तसेच १० दिवसांत अपीलार्थीस माहिती द्यावी.

***---आदेश---***

अपील मान्य करण्यात येत आहे.
संबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक १९ जानेवारी, २०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/अपील क्रमांक १४२७/०२

श्री.शालीग्राम भटू ठाकूर ----अपीलार्थी
१६, प्रभावशाली टेलिफोन कॉलनी,
विमानतळ रोड, देवपूर, धुळे, ता.जि. धुळे.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा विभागीय सहनिबंधक -----उत्तरवादी
सहकारी संस्था, नाशिक विभाग, गडकरी चौक,
नाशिक.

२.जन माहिती अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक
सहकारी संस्था धुळे, जुने कलेक्टर ऑफिस कंपाऊंड,
धुळे.

***---विवेचन---***

अपीलाचा दिनांक १०/९/२००९
सुनावणीचा दिनांक ८/१२/२००९
अपीलार्थी अनुपस्थित, जन माहिती अधिकारी उपस्थित.

अपीलार्थी श्री.शालीग्राम भटू ठाकूर यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १०/०९/२००९ रोजी द्वितीय अपील सादर केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नवीन प्रशासकीय इमारत, जिल्हाधिकारी कार्यालय सभागृह, धुळे, जि.धुळे येथे दि. ८/१२/२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. अपीलार्थींनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. ५/५/२००९ रोजी अर्ज खालील मुद्दयावर माहिती मागितली होती.

१. श्री.समर्थ सहकारी पतपेढी मर्या. धुळे या पतपेढीत ठेव ठेवलेल्या तारखेप्रमाणे रक्कम देय होत असेल त्या तारखेच्या प्रमाणे क्रोनो लॉजिकल , १ जानेवारी २००७ ते आजपर्यंतची

माहिती.

२. कर्जदाराच्या कर्जापोटी मिळत गेलेले कर्ज हप्तेची यादी

३. कर्जदाराच्या कर्जामध्ये ठेवीदाराच्या ठेवी जमा करण्यांत आलेल्या तारखेपर्यंतची यादी इत्यादी बाबींची माहिती मागितलेली होती.

जन माहिती अधिकारी यांनी दि. २८/५/२००९ च्या पत्राद्वारे अपीलार्थीनी मागितलेली माहिती ही त्यांच्या अखत्यारितील विभागाशी संबंधित नसल्याने त्यांचा अर्ज श्री.स्वामी समर्थ सहकारी पतसंस्था धुळे यांचेकडे हस्तांतरित करण्यात आला असून सदरहू माहिती पतसंस्थेकडून समक्ष प्राप्त करुन घ्यावी असे सांगितले. माहिती प्राप्त न झाल्याने याविरोधात अपीलार्थीनी कलम १९(१) खाली प्रथम अपील दाखल केले परंतु जन माहिती अधिका-यांची कृती योग्य असल्याने प्रथम अपीलीय अधिकारी यांनी त्यावर कोणतेही आदेश पारित केले नाही.

श्री.समर्थ सहकारी पतपेढी मर्या. धुळे यांचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी अपीलार्थीस पाठविलेल्या त्यांच्या दि. १७/४/२००९ च्या पत्रानुसार सविस्तर विवेचन केले आहे.

अपीलार्थीनी आयोगाकडे माहिती अधिकारांत द्वितीय अपील दाखल केले असले तरी पतसंस्था हया माहिती अधिकार कायद्याच्या कक्षेत "जन प्राधिकरणे" म्हणून येत नसल्याने जन माहिती अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, धुळे यांनी अपीलार्थीच्या प्रथम अर्जावर केलेली कृती योग्य आहे. त्याबाबत अपीलार्थीनी पतसंस्थेकडेच जाऊन महाराष्ट्र सहकार अधिनियम १९६० अंतर्गत त्यांच्या मागणीची तड लावावी.

*----आदेश ---*

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक १९ जानेवारी, २०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१)अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४५०००/अपील क्र. ५२३४/०२
क्रमांक-मु.मा.आ/४५००१/अपील क्र. ५२३५/०२

अध्यक्ष / सचिव -----अपीलार्थी
गव्हर्नमेंट हॉस्पीटल सप्लायर्स असोसिएशन,
६२/२७३२-३३, गांधी नगर, वांद्रे (पूर्व)
मुंबई ४०० ०५१.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा सहायक संचालक (खरेदी) ----उत्तरवादी
वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय,
४ था मजला, शासकीय दंत महाविद्यालय इमारत,
सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार, मुंबई ४०० ००१.

२.जन माहिती अधिकारी
वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय,
४ था मजला, शासकीय दंत महाविद्यालय इमारत,
सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार, मुंबई ४०० ००१.

***---विवेचन---***

अपीलांचा दिनांक २/११/२००९
सुनावणीची तारीख २० जानेवारी, २०१०
अपीलार्थी (अध्यक्ष), जन माहिती अधिकारी उपस्थित.

अपीलार्थींना त्यांच्या दोन अर्जानुसार पुढील माहिती पाहिजे होती.

१. आपल्या विभागाकडून Safety I.V.Cannula, Scalp Vein Set.Cotton व Cap.Iron Folic Acid(Mfg by Hindustan Labs I V.VS Pharma) या बाबीसाठी

बहाल करण्यात आलेल्या निविदा निश्चित करतांना संबंधित कंपन्यांनी सादर केलेली सर्व कागदपत्रे. तसेच निविदा मान्यता समितीच्या बैठकीचे इतिवृत्त.

२. जानेवारी २००८ ते आजपावेतो निविदा मान्यता समिती (T.A.C.)च्या झालेल्या बैठकीची विषयसूची (Agenda) व इतिवृत्त (Minutes) च्या प्रमाणित प्रती.

**तसेच अपील क्र. ५२३५/०२ मधील**

१. औषधी निविदा प्रक्रियेत सहभागी होण्यासाठी ज्या ज्या उत्पादकांनी आजपर्यंत नोंदणी केलेली आहे त्यांची नांवे, संपूर्ण पत्ता व त्यांना देण्यात आलेली नोंदणी प्रमाणपत्रे (विभाग निहाय)

२. नोंदणीकृत कंपन्यांनी नोंदणी करतांना सादर केलेली उलाढाल दर्शविणारी सर्व कागदपत्रे.

वरील माहिती तृतिय पक्षांनी हरकत घेतल्यामुळे दिलेली नाही असे सांगण्यांत आले. ज्या मुद्दयांशी तृतिय पक्षाशी संबंध येतो व ज्यामुळे त्यांच्या कमर्शियल काम्पिटिटीव्हनेसवर परिणाम होऊ शकतो अशी माहिती जर त्यांची हरकत असेल तर दिली नाही तरी चालेल हे समजू शकण्यासारखे आहे. मात्र अपीलार्थीनी मागितलेल्या कांही माहितीशी तृतिय पक्षाचा संबंध येत नाही उदा. औषधी निवीदा प्रक्रियेत सहभागी होण्यासाठी ज्या उत्पादकांची नोंदणी झालेली आहे त्यांची नांवे व पत्ते व त्यांना देण्यांत आलेली नोंदणी प्रमाणपत्रे नोंदणीकृत कंपन्यांची उलाढाल दर्शविणारी सर्व कागदपत्रे यापैकी उलाढाल दर्शविणारी सर्व कागदपत्रे ही जरी कमर्शियल काम्पिटिटीव्हनेस संबंधी असणारी कागदपत्रे मानली व दिली नाही तर ते चालू शकेल. मात्र नोंदणीच्या बाबतीतली माहिती ही जनहिताच्या दृष्टीने सर्वांना उपलब्ध असणे हे आवश्यक आहे. तेव्हा ही माहिती अपीलार्थींना देण्यांत यावी.

तसेच विवक्षित औषधांसाठी कंपन्यांनी सादर केलेली कागदपत्रे ही दिली नाही तरी चालेल. मात्र निविदा समितीच्या बैठकीचे इतिवृत्त, घेतलेले निर्णय ही माहिती द्यावी लागेल. विहित पध्दती अमलात आणून घेतलेले निर्णय निश्चित करीत असतांना सर्व आदेशांचे पालन झालेले आहे असे इतिवृत्त प्रसृत होण्यानेच जनतेला कळू शकेल व तसे करण्यातच जनहित आहे. तेव्हा निविदा मान्यता समितीच्या बैठकीचे इतिवृत्त अपीलार्थींना देण्यास कुठच्याहि प्रकारे हरकत नाही.

***---आदेश---***

**दोन्ही अपीले अंशतः मान्य करण्यात येत आहेत.**

**अपीलार्थींना हव्या असणा-या माहितीपैकी वर निर्देशिलेली माहिती १५ दिवसांच्या आत देण्यांत यावी.**

**(डॉ.सुरेश वि. जोशी),**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**दिनांक २० जानेवारी, २०१०**

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१)अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४५१३०/अपील क्र. ५२४०/०२

श्री. डॉ. के.एस.पिल्लई -----अपीलार्थी
बी-१/१, नारायण पुजारी नगर,
अे.जी.खान रोड, वरळी, मुंबई ४०० ०१८.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी आरोग्य अधिकारी ----उत्तरवादी
सार्वजनिक आरोग्य विभाग, एफ/साऊथ वार्ड,
डॉ. आंबेडकर रोड, परेल, मुंबई ४०० ०१२.

२.जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी आरोग्य अधिकारी
सार्वजनिक आरोग्य विभाग, एफ/साऊथ वार्ड,
डॉ. आंबेडकर रोड, परेल, मुंबई ४०० ०१२.

***---विवेचन---***

अपीलांचा दिनांक ७/११/२००९
सुनावणीची तारीख २० जानेवारी, २०१०
अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

सुनावणीच्या वेळेला असे दिसून आले की, अपीलार्थींना डॉक्टर्सच्या डिग्रीज, युनिव्हर्सिटीज आणि सध्याचे पद याविषयी माहिती पाहिजे होती.

माहिती देण्यात आलेली आहे. फक्त संबंधितांनी आक्षेप घेतला असल्यामुळे डिग्रीच्या सर्टिफिकेटच्या प्रती मात्र देण्यांत आलेल्या नाहीत. इतरांच्या डिग्री सर्टिफिकेटच्या प्रती अपीलार्थीस दिल्याने कुठच्याहि प्रकारचे जनहित साध्य होईल असे दिसत नाही.

अपीलार्थींचे म्हणणे की, अशी सर्टिफिकेटस् बरेच डॉक्टर्स आपल्या रुममध्ये लावत असतात. हेहि कांही त्रयस्थांची माहिती अपीलार्थीस मिळण्यास सबळ कारण नाही. त्यामुळे पुढील आदेश देण्यांत येत आहे.

***---आदेश---***

अपील अमान्य करण्यात येत आहे.

प्रथम अपिलीय अधिका-यांचा निर्णय कायम करण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक २० जानेवारी, २०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१)अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४५१३२/अपील क्र. ५२४१/०२

भिक्खु डी. नंदबोधी -----अपीलार्थी
धम्मदेसना बुध्द विहार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर
उद्यानाजवळ, चेंबूर, मुंबई ४०० ०७१.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा पोलीस उप आयुक्त ----उत्तरवादी
परिमंडळ ६, चेंबूर, मुंबई ७१.

२.जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त
पूर्व प्रादेशिक विभाग, चेंबूर,
मुंबई ४०० ०७१.

*---विवेचन---*

अपीलांचा दिनांक ७/११/२००९
सुनावणीची तारीख २० जानेवारी, २०१०
अपीलार्थी अनुपस्थित जन माहिती अधिकारी उपस्थित.

प्रथम अपिलीय अधिका-यांच्या दि. १७/८/२००९ रोजीच्या निर्देशाप्रमाणे अपीलार्थीस दि. १९/८/२००९ रोजी माहिती देण्यांत आलेली आहे.

अपीलार्थी हे दिलेली माहिती खोटी आहे असे त्यांच्या अपीलात म्हणतात. पण त्यासंबंधी त्यांना शहानिशा करायची असेल तर ते प्रत्यक्ष रेकॉर्ड पाहू शकतात.

अपीलार्थी स्वतः गैरहजर असल्यामुळे त्यांचे म्हणणे समजून घेता आले नाही.

*----आदेश---*

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
दिनांक २० जानेवारी, २०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१)अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४५१३७/अपील क्र. ५२४२/०२

श्री. प्रशांत जयमल्हार बिडवाई -----अपीलार्थी
श्री. रामदर्शन अपार्टमेंट, २ रा मजला,
शनि नगर, बदलापूर (पश्चिम)
ता. अंबरनाथ, जिल्हा ठाणे.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा पोलीस उप आयुक्त ----उत्तरवादी
परिमंडळ ९, वांद्रे (पश्चिम), मुंबई ५०.

२.जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त
पश्चिम नियंत्रण कक्ष, कार्टर रोड, वांद्रे (पश्चिम)
मुंबई ४०० ०५०.

*---विवेचन---*

अपीलांचा दिनांक ६/११/२००९
सुनावणीची तारीख २० जानेवारी, २०१०
अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

अपीलार्थींच्या अर्जात पुढील माहिती पाहिजे होती.

अपीलार्थी यांनी त्यांच्या मुळ अर्जामध्ये खेरवाडी पोलीस ठाणे, मुंबई येथे नोंदविलेल्या दखलपात्र गुन्हा नोंद क्र. १६३/२००६ च्या संदर्भात ड्रायव्हरचे नांव, पत्ता, कोर्ट केस नं., पुढील तारीख तसेच कुठले कलम लावले आहे. ड्रायव्हरचे लायसन्स, गाडीचे पेपर, ॲक्सीडेंट रिपोर्ट फॉर्म, एफ.आय.आर. चार्जशिट व ड्रायव्हरची जबानी हयाची सर्टिफाईड कॉपीची मागणी केलेली होती.

सदरील गुन्हयाचे कागदपत्र न्यायालयात जमा करण्यात आलेले आहे. खटला न्यायप्रविष्ट असल्यामुळे खटल्यातील कागदपत्रांच्या प्रती दिल्यास गुन्हयावर परिणाम होण्याची शक्यता

असल्याने माहिती नाकारण्यात आलेली आहे.  प्रथम अपीलात सदर निर्णय कायम करण्यात आला आहे.

अपीलार्थी हे त्रयस्थ व्यक्ती आहेत व सदरील गुन्हयाशी त्यांचा कांहीही संबंध नाही.  असे असतांना अपीलार्थीस माहिती दिल्याने जनहित कसे साध्य होईल असे विचारले असतां त्यांनी असे सांगितले की,  ते ओरिएन्टल इन्शुरन्स कंपनीसाठी काम करतात व त्याना क्लेम सेटेलमेंटसाठी वेगवेगळया विभागाकडून कागदपत्र मिळवून देण्यात त्यांना मेहनताना मिळतो.  अशा केसमध्ये ॲक्सीडेंट क्लेम ट्रिब्यूनल हे इन्शुरन्स कंपनीला निर्देश देतात व त्यानुसार सदरील माहिती ही गोळा करणे आवश्यक असते.

अशी जर परिस्थिती असेल तर सदरील माहिती अपीलार्थी करवी  इन्शुरन्स कंपनीला मिळण्याने निश्चितच जनहित साध्य होईल.  तेव्हा अपीलार्थीनी,  ॲक्सीडेंट क्लेम ट्रिब्युनल यांनी इन्शुरन्स कंपनीला  दिलेल्या निर्देशाची फोटोप्रत द्यावी व अपीलार्थीस हवी असणारी माहिती संबंधित जन माहिती अधिका-यांनी द्यावी असे निर्देश देण्यांत येत आहेत.

***---आदेश---***

अपील मान्य करण्यात येत आहे.

संबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक  २० जानेवारी, २०१०  राज्य मुख्य माहिती आयुक्त.

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/अपील क्रमांक १४५८/०२**

**श्री. भटु फुला सोनवणे -----अपीलार्थी**
**रा. सुभाष नगर, ग.नं. १४, पाटकिनार,**
**जुने धुळे, धुळे.**

**विरुध्द**

**१. अपिलीय अधिकारी तथा सहायक आयुक्त -----उत्तरवादी**
**धुळे महानगरपालिका, धुळे.**

**२.जन माहिती अधिकारी तथा प्रमुख लिपीक**
**धुळे महानगरपालिका, धुळे.**

***---विवेचन---***

**अपीलाचा दिनांक १३/३/२००९**
**सुनावणीची तारीख ८/१२/२००९**
**अपीलार्थी , जन माहिती अधिकारी उपस्थित व अपिलीय अधिकारी अनुपस्थित.**

**अपिलीय अधिका-यांच्या दि. ७/५/२००९ रोजीच्या निर्णयात अपीलकारांच्या सूचनेनुसार कांही आदेश काढण्याचे निर्देश जन माहिती अधिकारी यांना दिले होते. हे आदेश काढलेत किंवा नाही हे स्पष्ट होत नाही. तेव्हा अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिका-यांना दिलेल्या निर्देशाची १५ दिवसांत अमलबजावणी करुन घेऊन अपीलार्थीस त्याच्या प्रती देण्यात याव्यात.**

***---आदेश---***

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

**संबंधितानी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.**

**(डॉ.सुरेश वि. जोशी),**
**दिनांक २० जानेवारी, २०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/अपील क्रमांक १४५७/०२

श्री. देवमन नारायण आहेरराव -----अपीलार्थी
मु.पो. खांडबार, ता. नवापूर, जि.नंदूरबार.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा तहसिलदार -----उत्तरवादी
नवापूर जि. नंदूरबार.

२.जन माहिती अधिकारी
तहसिलदार नवापूर यांचे कार्यालय,
ता. नवापूर, जि. नंदूरबार.

---*विवेचन*---

अपीलाचा दिनांक ६/४/२००९
सुनावणीची तारीख ८/१२/२००९
अपीलार्थी , जन माहिती अधिकारी उपस्थित व अपिलीय अधिकारी अनुपस्थित.

अपीलार्थीनी दि. ७/१/२००९ च्या अर्जान्वये सन २००७-०८ मधील खालील माहिती मागितली.

१. माहिती अधिकार २००५ च्या कलम ४ नुसार माहिती उपलब्ध आहे किंवा नाही.
२. आपल्या कार्यक्षेत्रात कोणकोणते कर वसूल करु शक्तात व नागरिकास कोणकोणते परवाने मिळू शकतात.
३. नवापूर तालुक्याची लोकसंख्या किती व याती किती कुटुंबे दारिद्रय रेषेखालील आहेत.
४. रेशन दुकानांची संख्या
५. खांडबारा गावात किती स्वस्त धान्य दुकाने व रॉकेल विक्रेते परवाने आहेत.
६. रेशन दुकानांना दिलेल्या धान्याचा तपशील.

७. धान्य दुकानदारांनी नियमानुसार लावावयाच्या फलकांचा तपशील.

८. कार्यालयात खातेनिहाय चौकशी, गैरवर्तन किंवा शिस्तभंग कारवाई झालेले किती कर्मचारी आहेत.

याव्यतिरिक्त मतदार कार्ड, मतदारांचे फोटो काढण्यावर झालेला खर्च, जमिन धारक इत्यादि मुद्दयांवर माहिती मागितली.

उपरोक्त अर्जाला दि. ५/२/२००९ रोजी खालील उत्तर देण्यात आले.

"आपण मागितलेली माहिती प्रश्नार्थक स्वरुपाची व मोघम आहे. आपणास अभिलेख पाहिजे असल्यास त्याचा स्पष्ट उल्लेख करावा. या कार्यालयात ते उपलब्ध असल्यास मागणीअंती सत्वर उपलब्ध करुन देण्यात येईल. सबब आपला अर्ज निकाली काढण्यात येत आहे. "

या उत्तराने समाधान न झाल्याने अपीलार्थी यांनी दि. १६/२/२००९ रोजी प्रथम अपील केले. यावर सुनावणी घेऊन दि. १३/३/२००९ रोजी खालील आदेश देण्यात आला.

"जेवढी माहिती कार्यालयाकडे उपलब्ध आहे तेवढी माहिती अपीलार्थीस विनाशुल्क १५ दिवसांच्या आत उपलब्ध करुन द्यावी. "

या निर्णयाने समाधान न झाल्याने त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील केले. द्वितीय अपीलावरील सुनावणीचे वेळी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सादर केले की, अपीलार्थींना वेळेवर माहिती देण्यात आलेली आहे. याउप्पर त्यांना कांही अधिक माहिती हवी असेल तर ती ७ दिवसांच्या आत पुरविण्यात यावी.

मुद्दा क्र. ६ ची माहिती मिळाली नाही असे अपीलार्थींचे म्हणणे आहे. ती माहिती त्यांना १० दिवसांत देण्यात यावी.

*---आदेश---*

अपील निकाली काढण्यात येत आहे.
संबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक २० जानेवारी, २०१०

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१)अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/अपील क्र. १४०९/०२**

**श्री.अरुण पंढरीनाथ सोनार -----अपीलार्थी**
**प्लॉट नं. ४०, नेहरु नगर, नंदुरबार.**

**विरुध्द**

**१. अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी ----उत्तरवादी**
**नंदुरबार नगर परिषद, नंदुरबार, जि. नंदुरबार.**

**२.जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी**
**नंदुरबार नगर परिषद, नंदुरबार, जि. नंदुरबार.**

***---विवेचन---***

**अपीलाचा दिनांक २६/५/२००९**
**सुनावणीची तारीख ८/१२/२००९**
**अपीलार्थी , जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित.**

अपीलार्थींनी दि. १३/१/२००९ च्या अर्जान्वये नगरपरिषदेतील ज्या कर्मचा-यांनी बँकेकडून कर्ज घेतले आहे त्या कर्मचा-यांच्या वेतनातून कपातीद्वारे केलेल्या परतफेडीची मागणी केली. सदरची माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी दि. १७/३/२००९ रोजी प्रथम अपील केले. प्रथम अपील अर्ज दि. ३०/४/२००९ च्या आदेशान्वये निकाली काढण्यात आला. यानुसार नगरपरिषदेने निश्चित केलेल्या दरानुसार फी आकारुन आवश्यक कागदपत्रांच्या नकला देण्यात आल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. या आदेशाने समाधान न झाल्याने त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

द्वितीय अपीलावरील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आयोगास सादर केलेल्या लेखी निवेदनानुसार नगरपरिषदेकडे उपलब्ध असलेली माहिती अपीलार्थींना देण्यात आलेली आहे. जी माहिती इतरत्र उपलब्ध आहे ती माहिती जन माहिती

अधिकारी संबंधितांकडून प्राप्त करुन घेऊन देण्यास तयार आहेत. याचा विचार करुन आयोगाचे असे निदेश आहेत की, ती त्यांनी अपीलार्थीना १५ दिवसांत उपलब्ध करुन द्यावी.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक २१ जानेवारी, २०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१)अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/अपील क्र. १४००/०२

श्री.गणेश मगन पाटील -----अपीलार्थी
रा. शिरुर दिगर, ता. शहादा,
जिल्हा नंदुरबार.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्य) ----उत्तरवादी
महात्मा फुले व सरदार वल्लभभाई पटेल
विद्या प्रसारक मंडळ, शिरुर दिगर,
ता. शहादा, जि. नंदुरबार.

२.जन माहिती अधिकारी तथा चेअरमन
महात्मा फुले व सरदार वल्लभभाई पटेल
विद्या प्रसारक मंडळ, शिरुर दिगर,
ता. शहादा, जि. नंदुरबार.

*---विवेचन---*

अपीलाचा दिनांक १७/२/२००९
सुनावणीची तारीख ८/१२/२००९
अपीलार्थी अनुपस्थित, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित.

अपीलार्थींनी दि. २२/१०/२००८ च्या अर्जान्वये शाळेने केलेल्या बांधकामाविषयीच्या तपशीलाची मागणी केली. या अर्जाच्या अनुषंगाने त्यांना कळविण्यात आले की, माहिती प्रित्यर्थ उपलब्ध करुन द्यावयाच्या कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रतीचा खर्च रु. १०००/- इतका असून तो आपण संस्थेच्या बँक खात्यात जमा करावा व त्याची चलनाची प्रत दाखवून माहिती घ्यावी.

उपरोक्त उत्तराने समाधान न झाल्याने त्यांनी दि. १२/१/२००९ रोजी प्रथम अपील केले. प्रथम अपीलावर कार्यवाही न झाल्याने त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. द्वितीय

अपीलावरील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आयोगास सादर केले की, अपीलार्थीना माहिती देण्यात आली आहे. अपीलार्थी उपस्थित नसल्याने त्यांचे याबाबतीत काय म्हणणे आहे हे आयोगास जाणून घेता आले नाही. अपीलार्थीना माहिती दिलेली असल्याने खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक २१ जानेवारी, २०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१)अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/अपील क्र. १४१२/०२

श्री.देवमन नारायण आहेरराव -----अपीलार्थी
मु.पो. खांडबारा, ता. नवापूर,
जिल्हा नंदूरबार.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी ----उत्तरवादी
पंचायत समिती नवापूर, जि. नंदुरबार.

२.जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी
ग्रामपंचायत खांडबारा, ता. नवापरू,
जिल्हा नंदुरबार.

*---विवेचन---*

अपीलाचा दिनांक ११/५/२००९
सुनावणीची तारीख ८/१२/२००९
अपीलार्थी , जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित.

अपीलार्थीनी दि. ९/२/२००९ च्या अर्जान्वये दि. ९/३/२००९ ते ९/४/२००९ या कालावधीची ग्रामपंचायत खांडबारा कडील माहिती मागितली. (पत्रासोबत जोडलेल्या माहितीच्या विवरणपत्राची प्रत द्वितीय अपीलासोबत जोडलेली नसल्याने माहितीचे निश्चित स्वरुप आयोगाला समजू शकले नाही.) अपीलार्थीनी मागितलेली माहिती त्यांना रु. ८०/- शुल्क आकारुन दि. २४/३/२००९ च्या पत्रान्वये पुरविण्यात आली. तथापि त्याआधी म्हणजेच दि. २३/३/२००९ रोजी प्रथम अपील केले. प्रथम अपीलावर सुनावणी झाली नाही. म्हणून त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. यात त्यांनी खालील कारण नमूद केले.

" माहिती ३० दिवसात न मिळाल्याने शुल्कापोटी भरलेले रु. ८०/- परत करणे आवश्यक होते परंतु ते परत दिलेले नाहीत "

द्वितीय अपीलावरील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर सादर केले की, अपीलार्थींना त्यांच्या मागणीनुसार कागदपत्रे पुरविण्यात आली आहेत. यावर अपीलार्थींचे असे म्हणणे होते की, त्यांना माहिती उशीरा मिळाली असल्याने त्यांनी माहितीच्या शुल्कासाठी भरलेली रक्कम रु. ८०/- परत मिळावी.

दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून आयोगाचे असे मत झाले आहे की, अपीलार्थीचा अर्ज ९/२/२००९ चा होता म्हणजे ११ मार्च २००९ पर्यंत माहिती देणे आवश्यक होते. यात अपीलार्थीस ५/३/२००९ ला शुल्क भरण्याचे पत्र पाठविण्यात आले व त्यांनी ६/३/२००९ रोजी शुल्क भरले. हा एक दिवसाचा कालावधी ज्या दिवसापर्यंत माहिती द्यायची त्यांत मिळविला तरी १२ मार्च पर्यंत माहिती देणे आवश्यक होते. मात्र प्रत्यक्षात माहिती दि. २३/३/२००९ रोजी देण्यांत आली. म्हणजे विहित मुदत टळून गेल्यानंतर माहिती देण्यांत आली आहे. त्यामुळे अपीलार्थी शुल्क परत मिळण्यास पात्र आहेत. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

***---आदेश---***

अपील मान्य करण्यात येत आहे.

अपीलार्थीस घेतलेले शुल्क परत करण्यात यावे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक २१ जानेवारी, २०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१)अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४६१६८/अपील क्र. ५२४४/०२

श्री.हाजी एम.डी. शेख ------अपीलार्थी
६, सहयाद्री शॉपींग सेंटर,
जूना एम्प्लॉयमेंट चौक, सोलापूर -- ४१३ ००१.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा संचालक ----उत्तरवादी
माहिती व जनसंपर्क कार्यालय,
तळमजला, मंत्रालय, मुंबई ३२.

२.जन माहिती अधिकारी
माहिती व जनसंपर्क कार्यालय,
तळमजला, मंत्रालय, मुंबई ३२.

*---विवेचन---*

अपीलाचा दिनांक ३०/१२/२००९
सुनावणीची तारीख २१/१/२०१०
अपीलार्थी , जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित.

श्री.एम.डी.शेख यांनी त्यांच्या दि. २२/०७/२००९ च्या पत्रानुसार माहिती व जनसंपर्क राज्यमंत्री यांना दि. १९/३/२००९ रोजी दिलेल्या पत्रावर तत्कालीन मंत्रीमहोदयांनी दिलेले आदेश, त्यावर सादर केलेली टिप्पणी, त्यावरचे आदेश तसेच १ मे २००१ चा शासन निर्णय तसेच संपादक किंवा दै.बंधुप्रेम यांनी कोणत्या कोर्टात कोणती याचिका दाखल केली या सर्व कागदपत्राच्या झेरॉक्स प्रती प्रमाणित करुन देण्याबाबत श्री.शेख यांनी कळविले होते. ही माहिती श्री.शेख यांना व्यक्तिशः हवी होती.

श्री.शेख यांच्या उपरोक्त पत्राबाबत त्यांना अधिपरीक्षक, पुस्तके व प्रकाशने कार्यालयाचे पत्र क्रमांक अपपुप्र/मा.अ./२०/२००९ दिनांक २०/८/२००९ च्या पत्रानुसार मा.राज्यमंत्री (मा.व ज.)

यांनी मान्य केलेल्या टिपणीची प्रत, दै.बंधुप्रेम वृत्तपत्राबाबत न्यायालयीन याचिका दाखल झाली असल्यामुळे देणे शक्य होत नाही असे पत्राद्वारे कळविले आहे.

१. दिनांक १ मे २००१ च्या शासन निर्णयाची प्रत त्यांना पत्रानुसार उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

२. श्री.शेख यांच्या दिनांक २०/३/२००९ रोजीच्या अर्जासंबंधी केलेल्या कार्यवाहीबाबत त्यांना या कार्यालयाने दि. ३/७/२००९ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे.

तसेच सुनावणीच्या वेळेला जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, "अध्यक्ष, अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषद यांनी उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल केलेली याचिका (क्र.१७२५/२००७) दै. बंधुप्रेमचे संपादक श्री. एम.डी.शेख असल्याचे याचिकेतील जोडपत्रावरुन (यादीवर पुन्हा घेण्याबाबतचा अर्ज) दिसून येते.

याचाच अर्ज संपादक बंधुप्रेम यांच्यावतीने अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषद यांनी न्यायालयात याचिका दाखल केल्याचे स्पष्ट होते. असे श्री. एम.डी.शेख यांना दि. २० ऑगस्ट २००९ रोजीच्या पत्राद्वारे कळविण्यात आले आहे. "

दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर मंत्रिमहोदयांनी दिलेल्या आदेशानुसार जर काही टिपणी सादर करण्यात आली असेल व टिपणीवर कांही आदेश/निर्णय झाला असेल तर त्याची प्रत ही अपीलार्थीस देण्यात यावी. केवळ न्यायालयात याचिका दाखल झालेली असल्यामुळे टिपणीची प्रत देता येत नाही हे म्हणणे सयुक्तिक वाटत नाही. टिपणी अर्जदारास मिळाल्यामुळे न्यायालयासमोर असलेल्या याचिकेबाबतीत न्यायदानाच्या प्रक्रियेत का बाध यावा याचे कुठेहि विवेचन नाही व आयोगासहि तसे वाटत नाही. त्यामुळे टिपणी व आदेशाची प्रत अपीलार्थीस देण्यात यावी असे निर्देश देण्यात येत आहेत.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.
संबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक २१ जानेवारी, २०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१)अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४६१६७/अपील क्र. ५२४३/०२

श्रीमती बिस्मील्ला खाजा बाशा बिराजदार -----अपीलार्थी
नंदी नगर, विजापूर रोड,
सोलापूर.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा संचालक ----उत्तरवादी
माहिती व जनसंपर्क कार्यालय,
तळमजला, मंत्रालय, मुंबई ३२.

२.जन माहिती अधिकारी
माहिती व जनसंपर्क कार्यालय,
तळमजला, मंत्रालय, मुंबई ३२.

*---विवेचन---*

अपीलाचा दिनांक ३०/१२/२००९
सुनावणीची तारीख २१/१/२०१०
अपीलार्थी यांचे प्रतिनिधी व जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित.

सुनावणीच्या वेळेला दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यांत आले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे खुलासा सादर केला आहे.

" श्रीमती बिराजदार यांनी त्यांच्या दि. २२/७/२००९ च्या पत्रानुसार शासनमान्य जाहिरात यादीवर वर्तमानपत्राचे नाव घेण्यासाठी राज्यातील किती लोकांनी अर्ज केले, केव्हा केले. त्यातील तारखेसह तसेच आपण यादीवर घेण्यासाठी बैठक केव्हा बोलावली त्या तारखा, १ मे २००१ मधील तरतुदीप्रमाणे वर्षातुन बैठका किती वेळा घ्यावयाच्या आहेत. कोणत्या बैठकीत कोणते निर्णय घ्यावयाचे आहेत पैकी किती लोकांचे अर्ज मंजूर झाले, मंजूर केलेले अर्ज कोणत्या तारखेस आलेले होते, त्याची पडताळणी कोणी व केव्हा केली. अर्जासह दाखल केलेले सर्व कागदपत्रे तसेच आजतागायत काढलेले सर्व शासन निर्णय, पैकी किती लोकांना व कोणास श्रेणीवाढ, दरवाढ केली व नव्याने किती वर्तमानपत्रे यादीवर घेतले तसेच ०३/०८/२००४ , १६/८/२००४, २४/०८/२००४,

०३/०१/२००५,०८/०५/२००८ तसेच बहुजन महाराष्ट्र व कृषकोन्नती यांच्यासाठी काढलेले व दिनांक २४/०३/२००६, ०२/०२/२००६ रोजीसह सर्व शासन निर्णय या सर्वांच्या प्रमाणित केलेल्या झेरॉक्स प्रती तात्काळ मिळावेत अशी मागणी केली होती. ही माहिती श्रीमती. बिराजदार यांना व्यक्तिशः हवी होती.

या अनुषंगाने सादर करण्यात येते की, श्रीमती. बिराजदार यांच्या उपरोक्त पत्राबाबत त्यांना अधिपरीक्षक, पुस्तके व प्रकाशने कार्यालयाचे पत्र क्र. अपपुप्र/मा.अ./२१/२००९ दिनांक २०/०८/२००९ च्या पत्रानुसार त्यांनी अर्जाबरोबर जोडलेली शिधापरित्रकेची छायांकित प्रत साक्षांकित करुन सादर करणे आवश्यक आहे. तसेच मागितलेल्या कागदपत्रांपैकी कार्यालयात उपलब्ध असलेली कागदपत्रे पूर्वपरवानगीने निरीक्षण करण्यासाठी उपलब्ध करुन देण्यात येतील असे कळविण्यात आले होते. तथापि त्यांचेकडून याबाबत कोणतीही माहिती उपलब्ध झालेली नाही. त्यामुळे श्रीमती. बिराजदार यांचे म्हणणे वस्तुस्थितीला धरुन नाही.

श्रीमती. बिराजदार यांच्या प्रथम अपीलासंदर्भात श्री. शेख यांनी विचार केलेली असता दूरध्वनीवरुन सुनावणीबाबत सूचित करण्यात आले होते. मात्र श्रीमती. बिराजदार सुनावणीस उपस्थित राहिल्या नाहीत. त्यानंतर अपील आदेशार्थ प्रलंबित राहिले. "

अपीलार्थीस माहिती ही दारिद्रयरेषेखाली म्हणून पाहिजे होती. मात्र त्याबाबतचा पुरावा सब नाही असे वाटल्यावरुन अतिरिक्त माहिती मागविण्यात आली होती.

अपीलार्थींच्या दि. २२ जुलै २००९ रोजीच्या अर्जास २० ऑगस्ट २००९ रोजी पत्र पाठवून शिधापत्रिकेची छायांकित प्रत साक्षांकित करुन सादर करणे आवश्यक आहे असे कळविलेले आहे.

एक तर दारिद्रयरेषेखाली असल्याचा सबळ पुरावा जन माहिती अधिकारी यांना द्यावा किंवा शुल्क भरुन माहिती अपीलार्थींनी घ्यावी. अपीलार्थी ज्याप्रमाणे करतील त्याप्रमाणे सत्वर अपीलार्थीस माहिती देण्यात यावी.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक २१ जानेवारी, २०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१)अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४४९९७/अपील क्र. ५२३१/०२

श्री. मो. रफिक चाँदमिया शेख -----अपीलार्थी
७/६२, रमाबाई आंबेडकर नगर,
घाटकोपर (पूर्व) मुंबई ४०० ०७५.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी ----उत्तरवादी
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण (अभियांत्रिकी कक्ष)
म्हाडा इमारत, ५ वा मजला, वांद्रे (पूर्व)
मुंबई ४०० ०५१.

२.जन माहिती अधिकारी
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण (अभियांत्रिकी कक्ष)
म्हाडा इमारत, ५ वा मजला, वांद्रे (पूर्व)
मुंबई ४०० ०५१.

***---विवेचन---***

अपीलाचा दिनांक ५/११/२००९
सुनावणीची तारीख २०/१/२०१०
अपीलार्थी , जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी वेगवेगळया वेळेला उपस्थित.

अपीलार्थीच्या विनंतीनुसार त्यांचे म्हणणे ऐकून घेण्यांत आले. अपीलार्थीस मुंबई महानगरपालिका वसाहत दिंडोशी सेक्टर ए ते एम, गोरेगांव (पूर्व) येथील मनपा वसाहत येथील प्रस्तावित एस.आर.ए. योजनेअंतर्गत सादर केलेल्या प्रस्तावाबाबत कांही माहिती पाहिजे होती.

अपीलार्थीच्या अर्जाबाबत प्रथम अपिलीय अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन दिलेले आहे.

" श्री. मो.रफिक चांदमिया शेख यांनी अपीलामध्ये दाखल केलेल्या अर्जानुसार मुद्दा क्र. २,३,६,१०,११,१२ व १४ बाबतची माहिती मिळाली नसल्याचे म्हटले आहे.

वरील मुद्दे  उपजिल्हाधिकारी/ एस.आर.ए  व सहायक निबंधक/एस.आर.ए.  या माहिती अधिका-यांशी संबंधित आहे.

माहिती अधिकारी (अभियांत्रिकी विभाग)११  या पदावर  श्री. मनोज देशपांडे  यांनी १ ऑक्टोबर २००९ पासून कार्यभार स्वीकारला आहे.  तसेच मी खाली सही करणार दिपक वि. पवार/ कार्यकारी अभियंता-२, एस.आर.ए.  तथा प्रथम अपिलीय अधिकारी म्हणून  दि. १२/१/२०१० पासून कार्यभार स्वीकारला आहे.   अपीलार्थीचा अर्ज व अपील  यापूर्वीचे आहेत.

वरील न  मिळालेल्या मुद्दयांबाबतची माहिती  इतर विभागाकडून (वर उल्लेख केलेल्या) प्राप्त करुन  अपीलार्थीस  ३० दिवसाच्या आत देण्यात येईल.  "

अपिलीय अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे  अपीलार्थीस इतर विभागाकडून माहिती प्राप्त करुन घेऊन ३० दिवसांच्या आंत अपीलार्थीस पाठविण्यात यावी.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक २१ जानेवारी, २०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१)अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४४९२९/अपील क्र.५१९१/०२

श्री. कमलाकर रत्नाकर शेणॉय -----अपीलार्थी
२/१३, आदिनाथ सी.एच.एस.
इली कडुरी स्कूल समोर, माझगांव,
मुंबई ४०० ०१०.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी ----उत्तरवादी
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
गृहनिर्माण भवन, ५ वा मजला, वांद्रे (पूर्व)
मुंबई ४०० ०५१.

२.जन माहिती अधिकारी
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
गृहनिर्माण भवन, ५ वा मजला, वांद्रे (पूर्व)
मुंबई ४०० ०५१.

***---विवेचन---***

अपीलाचा दिनांक १/११/२००९
सुनावणीची तारीख १३/१/२०१०
प्रत्यक्ष सुनावणी झाल्याचा दिनांक २१/१/२०१०.
अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

दोन्ही पक्षाशी चर्चा करुन अपीलार्थीस हवी असणारी माहिती जन माहिती अधिकारी हे ७ दिवसांच्या आत देतील याबाबत सहमती झाली.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
दिनांक २२ जानेवारी, २०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१)अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४५१४०/अपील क्र.५२५२/०२

श्री. प्रकाश सी. शेठ -----अपीलार्थी
११०३, सुलसा अपार्टमेंट,
२५४, रीझ रोड, मुंबई ४०० ००६.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य अभियंता ----उत्तरवादी
(पुल ॲन्ड एम.यु.टी.पी.) मनपा स्टोअर इमारत,
१ ला मजला, डॉ. ई मोजेस रोड,
गीता टॉकीजसमोर,वरळी, मुंबई -१८.

२.जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता
(पुल) मनपा स्टोअर इमारत, १ ला मजला,
डॉ. ई मोजेस रोड, गीता टॉकीजसमोर,वरळी, मुंबई - १८.

***---विवेचन---***

अपीलाचा दिनांक २२/०९/२००९
सुनावणी झाल्याचा दिनांक २१/१/२०१०.
अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

या अपीलातील विषयावर दुस-या एका अपीलाची सुनावणी याअगोदरच बृहन्मुंबई आयुक्त यांच्याकडे झालेली आहे व पुढील सुनावणी दि. २८जानेवारी, २००९ रोजी आहे. अशा परिस्थितीत या अपीलाची सुनावणी घेण्याची आवश्यकता नाही.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
दिनांक २२ जानेवारी, २०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१)अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४५१३४/अपील क्र.५२४७/०२

श्रीमती प्रणाली धयाळकर -----अपीलार्थी
२३/३९, बी.डी.डी. चाळ,
एम.एम.जोशी मार्ग, मुंबई ४०० ०१३.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता ----उत्तरवादी
सार्वजनिक बांधकाम विभाग (सा.बां) मुंबई मंडळ,
२५, मर्झबान पात्रावाला रोड, मुंबई -- १.

२.जन माहिती अधिकारी तथा सहायक अधीक्षक अभियंता
सार्वजनिक बांधकाम विभाग (सा.बां) मुंबई मंडळ,
२५, मर्झबान पात्रावाला रोड, मुंबई -- १.

***---विवेचन---***

अपीलाचा दिनांक ६/११/२००९
सुनावणी झाल्याचा दिनांक २१/१/२०१०.
अपीलार्थींचे वकील, अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

अपीलार्थींना या अपील अर्जात जी माहिती पाहिजे होती ती माहिती अपीलार्थींना देण्यांत आली असल्याचे दिसून येते. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
दिनांक २२ जानेवारी, २०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१)अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४५१४१/अपील क्र.५२५३/०२

श्री. इंदर बहादुर शर्मा -----अपीलार्थी
१०, शर्मा चाळ, अंधेरी कुर्ला रोड,
कृष्णा नगर, मरोळ नाका, अंधेरी (पूर्व)
मुंबई ४०० ०५९.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा उप संचालक (शिक्षण) ----उत्तरवादी
उप संचालक शिक्षण, मुंबई विभाग,
जवाहर बाल भवन, चर्नी रोड, मुंबई.

२.जन माहिती अधिकारी तथा सहायक संचालक (शिक्षण)
उप संचालक शिक्षण, मुंबई विभाग,
जवाहर बाल भवन, चर्नी रोड, मुंबई.

***---विवेचन---***

अपीलाचा दिनांक ६/११/२००९
सुनावणी झाल्याचा दिनांक २१/१/२०१०.
अपीलार्थी उपस्थित, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी अनुपस्थित.

अपीलार्थींना राजस्थानी सेवा संघाचे श्री निवास बगडका कनिष्ठ महाविद्यालय येथे प्राचार्य पदी नियुक्त असलेल्या श्रीमती वनश्री बालेचा यांची शैक्षणिक योग्यते विषयी माहिती पाहिजे होती.

ही माहिती सहसंचालक, जवाहर बाल भवन यांच्या कार्यक्षेत्रात येत आहे असे अपीलार्थीस कळविण्यात आले. वास्तविक पाहता ज्या जन माहिती अधिका-यांकडे हा अर्ज आला होता त्यांनीच तो अर्ज संचालक, जवाहर बाल भवन यांच्याकडे पाठविणे आवश्यक होते. कागदपत्रावरुन तसे झाले किंवा नाही हे दिसून येत नाही.

तसेच प्रथम अपिलीय अधिका-यांनी  आदेश सुध्दा पारित केलेले नाहीत.   यास्तव अपीलार्थीस हवी असणारी माहिती ही  ७ दिवसांचे आत सहायक संचालक, जवाहर बाल भवन ,चर्नी रोड, मुंबई ४ यांनी द्यावी.

अपीलार्थीचा मुळ अर्ज हा संबंधित जन माहिती अधिका-यांनी  सहायक संचालक, जवाहर बाल भवन  यांना अजूनहि दिला नसल्यास तो हे आदेश मिळाल्यापासून २ दिवसांचे आत द्यावा व त्यानंतर ५ दिवसाच्या आत सहायक संचालक यांच्या कार्यालयातील जन माहिती अधिका-यांनी अपीलार्थीस माहिती द्यावी.

जन माहिती अधिकारी यांनी स्वत:हूनच हा अर्ज सहायक संचालक, जवाहर बाल भवन यांच्याकडे कां पाठविला नाही याचा खुलासा  १० दिवसांत  आयोगास प्रत्यक्ष कार्यालयात येऊन सादर करावा.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.
संबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१)अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४५१४५/अपील क्र.५२५४/०२

श्री. जितेंद्र रामनाथ शेणॉय -----अपीलार्थी
१९/२४२, परमहंस सोसायटी,
आर.के. नगर, एस.व्ही.रोड, खार (पश्चिम)
मुंबई ४०० ०५२.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य अभियता (इ.प्र) ----उत्तरवादी
बृहन्मुंबई महानगरपालिका, पश्चिम उपनगरे-१,
१ ला मजला, आर.के. पाटकर मार्ग,
वांद्रे (पश्चिम) मुंबई ४०० ०५०.

२.जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (इ.प्र.)
बृहन्मुंबई महानगरपालिका, पश्चिम उपनगरे-१,
१ ला मजला, आर.के. पाटकर मार्ग,
वांद्रे (पश्चिम) मुंबई ४०० ०५०.

***---विवेचन---***

अपीलाचा दिनांक ६/११/२००९
सुनावणी झाल्याचा दिनांक २१/१/२०१०.
अपीलार्थी अनुपस्थित, अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिका-यांचे प्रतिनिधी उपस्थित.

प्रथम अपिलीय अधिका-यांचे आदेश पाहिले असता नस्ती शोधण्यासाठी सकत शोध घेण्याचे आदेश दिले होते. त्याप्रमाणे जन माहिती अधिका-यांनी सर्व विभागाना नस्तीचा शोध घेण्याबाबत लिहिलेले आहे. पण नस्तीचा अजून शोधच लागलेला नाही.

जन माहिती अधिकारी यांनी संबंधित आर्कीटेक्ट यांना बोलावून घेऊन त्यांच्याकडील प्रतींवरुन तसेच महापालिकेच्या इतर विभागातील प्रतींवरुन नस्ती रि-कंन्स्ट्रक्ट करावी व तीन

आठवडयाच्या आत अपीलार्थींना जितकी जास्तीत जास्त माहिती देता येईल तितकी माहिती देण्याचा प्रयत्न करावा.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.
संबंधितानी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
दिनांक २२ जानेवारी, २०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त.

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१)अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/४५१४२/अपील क्र.५२५५/०२**

**श्री. बलजित सिंग डोग्रा** **-----अपीलार्थी**
**जय जवान स्टॉल, भेळ प्लाझा,**
**गिरगांव चौपाटी, मुंबई ४०० ००७.**

**विरुध्द**

**१. अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (विशेष)** **----उत्तरवादी**
**उपआयुक्त (विशेष) यांचे कार्यालय,**
**भाभा हॉस्पीटल इमारत, १ ला मजला,**
**रा.कृ.पाटकर मार्ग, वांद्रे (पश्चिम) मुंबई ५०**

**२.जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक अनुज्ञप्ती**
**श्री छत्रपती शिवाजी महाराज मार्केट इमारत,**
**४ था मजला, माता रमाबाई आंबेडकर मार्ग,**
**मुंबई ४०० ००१.**

***---विवेचन---***

**अपीलाचा दिनांक ६/११/२००९**
**सुनावणी झाल्याचा दिनांक २१/१/२०१०.**
**अपीलार्थी , अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी उपस्थित.**

**अपीलार्थीस रेकॉर्डला उपलब्ध असलेली माहिती देण्यांत आलेली आहे. फक्त अपीलार्थीचे जे म्हणणे आहे की, महापालिका आयुक्त यांनी MGC/A/3542 of 20/8/1987 रोजी जी ऑर्डर पास केली होती, ती नस्ती उपलब्ध होत नाही. मात्र अपीलार्थीच्या म्हणण्यानुसार त्या नस्तीमध्ये लायसन्स फी पासून सवलत देण्यात आली होती. मात्र महापालिकेच्या म्हणण्यानुसार सुरुवातीपासूनच जय जवान स्टॉलची लायसन्स फी घेणे हे आवश्यक ठरविण्यात आलेले आहे. त्यामुळे त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे.**

याबाबत महापालिकेने धोरण निश्चित व ठामपणे सांगणे हे इष्ट राहिल. माहितीच्या अधिकारात उपलब्ध माहिती देण्यात आली आहे असेच दिसून आले. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक २२ जानेवारी, २०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१)अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/अपील क्र.१३८२/०२

श्री. बाळू गंगाराम गवळी —————अपीलार्थी
जि.प. मराठी शाळा नगारे
मु.पो. निजामपूर, ता. नवापूर,
जिल्हा नंदुरबार.

व

श्री. शरद प्रल्हाद देवरे
जि.प. मराठी शाळ श्रावणी,
ता. नवापूर, जि. नंदुरबार.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा सहायक निबंधक ————उत्तरवादी
सहकारी संस्था साक्री, जि. धुळे.

२.जन माहिती अधिकारी
सहायक निबंधक सहकारी संस्था यांचे कार्यालय,
साक्री, जि.धुळे.

*---विवेचन---*

अपीलाचा दिनांक ४/२/२००९
सुनावणी झाल्याचा दिनांक ८/१२/२००९.
अपीलार्थी अनुपस्थित, अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

अपीलार्थींनी दि. २/९/२००८ च्या अर्जान्वये साक्री येथील कन्हैयालाल, रुपा, जगदीश्वर तसेच पिंपळनेर येथील अथर्व सहकारी गृहनिर्माण संस्थांची विविध मुद्दयांबाबत माहिती मागितली.

उपरोक्त माहिती अप्राप्त असल्याने त्यांनी दि. २३/१०/२००८ रोजी प्रथम अपील केले. यावर सुनावणी होऊन दि. ३/१२/२००८ रोजी आदेश पारित करण्यात आले. यानुसार जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती फी भरुन द्यायची होती. तथापि यानंतर त्यांना माहिती मिळू शकली नाही व म्हणून त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

द्वितीय अपीलावरील सुनावणीचे वेळी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आयोगास सादर केले की, अपीलार्थींनी मागितलेली माहिती संबंधित गृहनिर्माण संस्था शुल्क आकारुन देण्यास तयार आहेत. परंतु अपीलार्थींनी शुल्काचा भरणा केलेला नाही. तरी याबाबत आयोगाचे असे निदेश आहेत की, जन माहिती अधिकारी यांनी शुल्काची रक्कम निश्चित करुन अपीलार्थीस कळवावी व त्यांचा भरणा केल्यावर ५ दिवसांच्या आत त्यांना सर्व माहिती पुरवावी. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आयोगाच्या निदेशांची अमलबजावणी होईल याकडे लक्ष पुरवावे.

---*आदेश*---

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),<br>
दिनांक २२ जानेवारी, २०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/सीआर क्रमांक १४४६/०२

श्री. विजयसिंह नथेसिंह राजपूत -----अपीलार्थी
रा. सकुबा निवास, लोकनेते आमदार कै.ठाणसिंग
जिभाऊ चौक, शिंदखेडा, जि.धुळे.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा ग्रामविस्तार अधिकारी -----उत्तरवादी
पंचायत समिती शिंदखेडा, ता.शिंदखेडा,
जिल्हा धुळे.

२.जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक
ग्रामपंचायत कार्यालय शिंदखेडा,
ता. शिंदखेडा, जि. धुळे.

*---विवेचन---*

अपीलार्थी श्री. विजयसिंह राजपूत यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि ९/७/२००९ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नवीन प्रशासकीय इमारत, जिल्हाधिकारी कार्यालय सभागृह धुळे येथे दि.८/१२/२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपिलीय अधिकारी तसेच जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलार्थी उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

अपीलार्थींनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि ३०/३/२००९ रोजी अर्ज करुन खालील नमूद केलेली माहिती मागितली होती.

शिंदखेडा शहराला पाणीपुरवठयासाठी कोणकोणत्या प्रकारचा निधी प्राप्त झाला (आमदार,

खासदार व ग्राम निधी, तातडीचा पाणीपुरवठा निधी, १२ वा वित्त आयोग) पाणीपुरवठयावर झालेल्या खर्चाची माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपीलार्थीस विहित कालावधीत माहिती पुरविली नाही. यामुळे अपीलार्थीनी प्रथम अपिलीय अधिका-याकडे दि. ४/५/२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. दि. ११/५/२००९ रोजी खालील प्रमाणे आदेश पारित केले.

"अपीलार्थी यांनी अर्जाद्वारे मागितलेली माहिती ग्रामपंचायतीशी संबंधित आहे ती माहिती ग्रामपंचायतीने अर्जदार यांना देणे आवश्यक होते. परंतु सदरची माहिती तत्कालीन ग्रामविकास अधिकारी श्री. जी.के. वेताळे व श्री. ई .ए. अहिरे यांच्या ताब्यात सदरचे दप्तर असल्यामुळे व ते दप्तर त्यांनी हस्तांतर न केल्यामुळे सध्या कार्यरत असलेले जन माहिती अधिकारी यांना अर्जदार यांना ती माहिती उपलब्ध करुन देता आली नाही. यास तत्कालीन ग्रामविकास अधिकारी जबाबदार आहेत. "

सदर प्रकरणी माहिती मिळाली नसल्याने अपीलार्थीनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर प्रकरणी जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिका-यांनी अपीलार्थी यांना माहिती दिलेली नाही. सदर दोन्ही अधिका-यांची कृती निश्चितच योग्य नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत अपीलार्थीस माहिती पुरवावी. ज्या ग्रामविकास अधिका-यांनी दप्तर हस्तांतर केले नाही त्यांचेविरुध्द मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद धुळे यांनी विभागीय चौकशी करुन कठोर कारवाई करावी.

*---आदेश---*

अपील मान्य करण्यात येत आहे.

या आदेशाची प्रत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद धुळे यांनाहि पाठवावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक २५ जानेवारी, २०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/सीआर क्रमांक १४४५/०२

श्री. विजयसिंह नथेसिंह राजपूत -----अपीलार्थी
रा. सकुबा निवास, लोकनेते आमदार कै.ठाणसिंग
जिभाऊ चौक, शिंदखेडा, जि.धुळे.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी(ग्रा.पं) -----उत्तरवादी
पंचायत समिती शिंदखेडा, ता.शिंदखेडा,
जिल्हा धुळे.

२.जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक
ग्रामपंचायत कार्यालय दिवी,
ता. शिंदखेडा, जि. धुळे.

***---विवेचन---***

अपीलार्थी श्री. विजयसिंह राजपूत यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि ९/७/२००९ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नवीन प्रशासकीय इमारत, जिल्हाधिकारी कार्यालय सभागृह धुळे येथे दि.८/१२/२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित होते. अपीलार्थी उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

अपीलार्थींनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि १२/३/२००९ रोजी अर्ज करुन खालील नमूद केलेली माहिती मागितली होती.

दिवी ग्रामपंचायतीने सन १९९०-९१ ते सन १९९५-९६ व सन २००१ ते २००५-०६ तसेच २००८-०९ यावर्षी वापरण्यात आलेले नमुना क्र. ८ च्या छायांकित व साक्षांकित प्रतीची मागणी केली होती.

जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे अपीलार्थींनी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. तत्कालीन जन माहिती अधिक्ारी व विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थी यांना माहिती पुरविली नाही. यासाठी ते दोन्ही समप्रमाणात जबाबदार आहेत. अपील मान्य करण्यात येत आहे असे दि. ११/५/२००९ रोजी प्रथम अपिलीय अधिका-यांनी आदेश पारित केले. त्यानंतरहि माहिती मिळाली नसल्याने व्यथित होऊन अपीलार्थींनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक यांचेकडून दप्तर उशीराने प्राप्त झाल्याने उशिरा माहिती अपीलार्थी यांना पुरविली असल्याचे प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आयोगासमोर प्रतिपादन केले. मागणीप्रमाणे अपीलार्थी यांना माहिती पुरविली असल्याने याप्रकरणी मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक २५ जानेवारी, २०१०

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/सीआर क्रमांक १४४२/०२**
**क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/सीआर क्रमांक १४४३/०२**

**श्री. विजयसिंह नथेसिंह राजपूत -----अपीलार्थी**
**रा. सकुबा निवास, लोकनेते आमदार कै.ठाणसिंग**
**जिभाऊ चौक, शिंदखेडा, जि.धुळे.**

**विरुध्द**

**१. अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी -----उत्तरवादी**
**पंचायत समिती शिंदखेडा, ता.शिंदखेडा,**
**जिल्हा धुळे.**

**२.जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी**
**ग्रामपंचायत कार्यालय शिंदखेडा,**
**ता. शिंदखेडा, जि. धुळे.**

***---विवेचन---***

**अपीलार्थी श्री. विजयसिंह राजपूत यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि २८/७/२००९ रोजी द्वितीय अपीले दाखल केली. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नवीन प्रशासकीय इमारत, जिल्हाधिकारी कार्यालय सभागृह धुळे येथे दि.८/१२/२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपिलीय अधिकारी तसेच जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलार्थी उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.**

अपीलार्थींनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि ९/३/२००९ रोजी अर्ज करुन खालील नमूद केलेली माहिती मागितली होती.

" लोक.आ.स्व.ठाणसिंग जिभाऊ हे सरपंच व आमदार असतांना आमदार निधीतून जयप्रकाश नारायण भाजी मंडईचे बांधकाम केलेले आहे. त्या भाजी मंडईला लागून असलेली जागा भाजीमंडईसाठी राखीव ठेवलेली आहे. त्या संपूर्ण जागेचा नमुना नं.८ चा उतरा त्वरित मिळावा. "

जन माहिती अधिका-यांनी आवश्यक ती माहिती विहित कालावधीत दिली नाही. त्यामुळे अपीलार्थींनी दि. ४/५/०९ व दि. ३/६/०९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि. ४/५/०९ रोजी आदेश परित केले. यामुळे व्यथित होऊन अपीलार्थींनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

अपीलार्थीस कन्याशाळा जागेचा उतारा पुरविण्यात आला. जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या लेखी पत्रात न.नं. ८ ला भाजी मंडईची नोंद नाही. परंतू कन्या शाळेची नोंद आहे. या कन्या शाळेचा उतारा अपीलार्थी यांना देण्यात आलेला आहे. कन्या शाळेच्या जागेवरच भाजी मंडई बांधण्यात आलेली आहे. परंतु त्याची नोंद नमुना नं.८ ला नाही. ज्या जागेवर मंडई बांधण्यात आलेली आहे त्या कन्या शाळेचा उतारा अपीलार्थी यांना देण्यांत आलेला आहे असा प्रथम अपिलीय अधिका-यांनी द्वितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी लेखी अहवाल सादर करुन प्रतिपादन केले. यावरुन सदर प्रकरणी अपीलार्थीस मागणीप्रमाणे माहिती पुरविण्यात आली असल्याचे दिसते. रेकॉर्डप्रमाणे माहिती पुरविली असल्याने पुढील आदेश देण्यात येत आहे.

***----आदेश---***

दोन्ही अपीले निकाली काढण्यात येत आहेत.

(डॉ.सुरेश वि. जोशी),<br>राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक २७ जानेवारी, २०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१)अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४५१४९/अपील क्र.५२६०/०२
क्रमांक-मु.मा.आ/४५१५०/अपील क्र.५२६१/०२

श्री. महेंद्र पाल -----अपीलार्थी
संपतलाल चाळ, कृष्णा नगर,
मरोळ नाका, अंधेरी (पूर्व) मुंबई ४०० ०५९.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (विशेष) ----उत्तरवादी
सहायक आयुक्त बृहन्मुंबई मनपा यांचे कार्यालय,
के/पूर्व विभाग, आझाद रोड, गुंदवली रोड,
अंधेरी (पूर्व ) मुंबई - ४०० ०६९

२.जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता (इ/का)
सहायक आयुक्त बृहन्मुंबई मनपा यांचे कार्यालय,
के/पूर्व विभाग, आझाद रोड, गुंदवली रोड,
अंधेरी (पूर्व ) मुंबई - ४०० ०६९

*---विवेचन---*

अपीलाचा दिनांक ९/११/२००९
सुनावणी झाल्याचा दिनांक २८/१/२०१०.
अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

अपीलार्थीस दि. २ मार्च, २००९ रोजीच्या अर्जानुसार शिवप्रसाद रामराज उपाध्याय यांना दिलेल्या नोटीसेसच्या संबंधाने कांही कागदपत्रांच्या प्रमाणित प्रती पाहिजे होत्या.

अपीलार्थीस दि. ६/५/२००९ रोजी प्रमाणित प्रतींचे शुल्क कळविण्यांत आले. ते जास्त आहे असे वाटल्यावरुन केलेल्या प्रथम अपीलात अपिलीय अधिकारी यांनी अपीलार्थीस शुल्क कळविण्यास उशिर झाला असल्यामुळे विनामूल्य माहिती देण्यात यावी असे निर्देश दिले होते.

सुनावणीच्या वेळेला हे स्पष्ट करण्यात आले की, अपीलार्थीस प्रमाणित प्रती पाहिजे होत्या. पण त्याचे शुल्क जास्त होते. जर साध्या फोटोप्रती पाहिजे असतील तर त्यांना रु. २/- प्र.पृष्ठप्रमाणे दर आकारण्यात आला असता.

अपीलार्थीस शुल्क भरण्यासंबंधीचे पत्र पाठविण्यात झालेल्या उशिराबद्दल जन माहिती अधिकारी यांनी कारण सांगितले की, त्यादरम्यान लोकसभा निवडणूक निमित्ताने ते व त्यांचा स्टाफ हा व्यस्त असल्यामुळे पत्र देण्यास उशीर झाला. जन माहिती अधिका-यांनी कथन केलेली कारणमिमांसा मान्य करण्यात येत आहे. मात्र हे आदेश मिळताच ७ दिवसांचे आत अपीलार्थीस माहिती विनामूल्य देण्यात यावी असे निर्देश देण्यात येत आहे.

***---आदेश---***

दोन्ही अपीले निकाली काढण्यात येत आहेत.
संबंधितानी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक २८ जानेवारी, २०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१)अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४५१४८/अपील क्र.५२५९/०२

श्री. महेंद्र पाल -----अपीलार्थी
संपतलाल चाळ, कृष्णा नगर,
मरोळ नाका, अंधेरी (पूर्व) मुंबई ४०० ०५९.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (विशेष) ----उत्तरवादी
सहायक आयुक्त बृहन्मुंबई मनपा यांचे कार्यालय,
के/पूर्व विभाग, आझाद रोड, गुंदवली रोड,
अंधेरी (पूर्व ) मुंबई - ४०० ०६९

२.जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता (इ/का)
सहायक आयुक्त बृहन्मुंबई मनपा यांचे कार्यालय,
के/पूर्व विभाग, आझाद रोड, गुंदवली रोड,
अंधेरी (पूर्व ) मुंबई - ४०० ०६९

***---विवेचन---***

अपीलाचा दिनांक ९/११/२००९
सुनावणी झाल्याचा दिनांक २८/१/२०१०.
अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

अपीलार्थीस नोटीस क्र. ३५१/१०८९ दि. ३०/६/२००१ च्या संदर्भात १० पत्रांच्या प्रमाणित प्रती पाहिजे होत्या. सदर प्रत्येक प्रमाणित प्रतीचे शुल्क रु. २७/- इतके कळविण्यांत आले आहे. ते जास्त वाटल्यावरुन प्रथम अपील करण्यांत आले व तद्नंतर द्वितीय अपील करण्यात आले.

अपीलार्थीस प्रमाणित प्रती पाहिजे असतील तर महापालिकेच्या प्रमाणित प्रतीच्या नियमाप्रमाणे अपीलार्थीस कळविलेले शुल्क बरोबर आहे असे दिसून आले. मात्र अपीलार्थीस

साध्या प्रती पाहिजे असतील तर त्याचे शुल्क हे रु. २/- प्रती पृष्ठ राहिल. तेव्हा अपीलार्थींनी त्यांना कोणत्या प्रती पाहिजेत हे ठरवावे व त्याप्रमाणे शुल्क भरुन माहितीची मागणी करावी.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक २८ जानेवारी, २०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१)अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४५१४६/अपील क्र.५२५८/०२

सौ.विशाखा विनायक इंगळे -----अपीलार्थी
बी-६, अलंकार को.ऑप.हौ.सो. लि.
नवीन टिळक नगर, चेंबूर (पश्चिम) मुंबई ८९.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी (परि ५) ----उत्तरवादी
बृहन्मुंबई महानगरपालिका विभाग (शिक्षण)
एम/ पश्चिम विभाग, तिसरा मजला, चेंबूर (पूर्व)
मुंबई - ४०० ०७१

२.जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी (शाळा)
बृहन्मुंबई महानगरपालिका विभाग (शिक्षण)
एम/ पश्चिम विभाग, तिसरा मजला, चेंबूर (पूर्व)
मुंबई - ४०० ०७१

***---विवेचन---***

अपीलाचा दिनांक ९/११/२००९
सुनावणी झाल्याचा दिनांक २८/१/२०१०.
अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

सुनावणीच्या दिवशी अपीलार्थी यांनी, त्यांना माहिती मिळणार असल्यामुळे अपील चालवायचे नाही असे निवेदन आयोगास सादर केले. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

***----आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक २८ जानेवारी, २०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१)अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४५१४६/अपील क्र.५२४६/०२

श्री. आर.पी. यजुर्वेदी -----अपीलार्थी
३०२/अ, नव आसावरी सी.एच.एस. लि.
१८२, जे.बी. नगर, अंधेरी (पूर्व) मुंबई ५९.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा उप /सह सचिव ----उत्तरवादी
नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.

२.जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव /कक्ष अधिकारी
नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.

*---विवेचन---*

अपीलाचा दिनांक ६/११/२००९
सुनावणी झाल्याचा दिनांक २१/१/२०१०.
अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

अपीलार्थीस म्हाडा इमारतींच्या बाबतीत अनधिकृत बांधकामे, खुल्या जागेवरील अतिक्रमणे ,म्हाडा टेनामेंटसमध्ये विकास नियंत्रण नियमावलीचे उल्लंघन वगैरे बाबत माहिती पाहिजे होती.

अपीलार्थीचा अर्ज हा नगर विकास विभागास देण्यात आला होता व तो अर्ज जन माहिती अधिकारी यांनी बृहन्मुंबई महापालिका व म्हाडा यांच्याकडे पाठविला.

सुनावणीच्या वेळेस असे दिसून आले की, अपीलार्थीचा अर्ज बृहन्मुंबई महापालिका व म्हाडाच्या त्या त्या अधिका-यांकडे माहिती देण्यासाठी पाठविलेला आहे पण अपीलार्थीस माहिती मिळालेली नाही.

म्हाडाचे जन माहिती अधिकारी यांना असे निर्देश देण्यांत येतात की, अपीलार्थीस हवी असलेली माहिती ७ दिवसांचे आत देण्यांत यावी. तसेच मुदतीत माहिती न दिल्याबद्दल त्यांचेवर

अधिनियमाच्या कलम २० अन्वये शास्तीची कारवाई का करण्यांत येऊ नये याचा खुलासा आयोगास दि. २३ फेब्रूवारी, २०१० रोजी दुपारी ३-३० वाजता प्रत्यक्ष येऊन सादर करावा.

***---आदेश---***

अपील मान्य करण्यात येत आहे.

संबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

या आदेशाची प्रत मुख्य अधिकारी, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व) मुंबई ५१ यांनाहि पाठविण्यात यावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक २८ जानेवारी, २०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१)अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/४५१४६/अपील क्र.५२५६/०२**

**श्री. गणेश प्रभाकर म्हात्रे -----अपीलार्थी**
**माता पिता सदन, एक्सर कोळीवाडा,**
**एक्सर रोड, बोरीवली (पश्चिम) मुंबई १०३.**

**विरुध्द**

**१. अपिलीय अधिकारी तथा तहसिलदार ----उत्तरवादी**
**तहसिल कार्यालय बोरीवली ,**
**नाटकवाला लेन, बोरीवली (पश्चिम) मुंबई ९२.**

**२.जन माहिती अधिकारी**
**तहसिल कार्यालय बोरीवली ,**
**नाटकवाला लेन, बोरीवली (पश्चिम) मुंबई ९२.**

***---विवेचन---***

**अपीलाचा दिनांक १/११/२००९**
**सुनावणी झाल्याचा दिनांक २८/१/२०१०.**
**अपीलार्थी व जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित.**

**अपीलार्थीस तहसिलदार यांनी दि. ११/५/२००७ रोजी भास्कर वामन पाटील व इतर तसेच हरिष मोहनभाई जोशी यांना ज्या नोटीसेस काढल्या त्याबाबती झालेल्या कारवाईची संपूर्ण माहिती पाहिजे होती.**

**अपीलार्थीनी एका केसमधील झालेल्या शुल्क वसूलीची माहिती अपीलार्थीस देण्यात आली. सुनावणीच्या वेळेला जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधींनी सांगितले की, इतर केसेसच्या बाबतीत विभागीय आयुक्त कार्यालयात या संदर्भातली अपीले प्रलंबित आहेत.**

जन माहिती अधिकारी यांना असे निर्देश देण्यांत आले की, जी सद्य:स्थिती असेल त्याची माहिती अपीलार्थीस देण्यात यावी. तसेच अपीलार्थीस जर हव्या असलेल्या माहितीच्या नस्तीची पाहणी करावयाची असेल तर ती सुध्दा त्यांना करता येईल व त्याबाबत जन माहिती अधिकारी यांनी त्यांना सहकार्य करावे.

***---आदेश ---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.
संबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
दिनांक २८ जानेवारी, २०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१)अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/४५१५२/अपील क्र.५२६३/०२**

**श्री. सैदूर रहमान -----अपीलार्थी**
**१८२, धाळू स्ट्रीट, सैफी मजिद जवळ,**
**नळबाजार, मुंबई ४०० ००३.**

**विरुध्द**

**१. अपिलीय अधिकारी तथा शिक्षण निरीक्षक ----उत्तरवादी**
**शिक्षण निरीक्षक (नॉर्थ झोन)**
**एल वॉर्ड , प्रशासकीय इमारत, १५९, बी वींग,**
**२ रा मजला, चेंबुरकर मार्ग, चेंबूर (पूर्व) मुंबई ७१.**

**२.जन माहिती अधिकारी तथा शिक्षण उपनिरीक्षक**
**शिक्षण निरीक्षक (नॉर्थ झोन)**
**एल वॉर्ड , प्रशासकीय इमारत, १५९, बी वींग,**
**२ रा मजला, चेंबुरकर मार्ग, चेंबूर (पूर्व) मुंबई ७१.**

***---विवेचन---***

**अपीलाचा दिनांक १/११/२००९**
**सुनावणी झाल्याचा दिनांक २८/१/२०१०.**
**अपीलार्थी व अपिलीय अधिकारी उपस्थित.**

**अपीलार्थीच्या अपीलाच्या संदर्भात पुढीलप्रमाणे निवेदन देण्यांत आले.**

**" श्री. सैदूर रहमान यानी जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षण निरीक्षक (उत्तर विभाग) यांना दि. १८/३/२००९ अन्वये चार मुद्दयांवर माहिती मागितली होती. त्यांना शिक्षण निरीक्षक (उ) या कार्यालयाने दि. १७/४/२००९ अन्वये माहिती पुरविलेली आहे.**

**तथापि श्री. सैदूर रहमान यांनी श्रीम.अंजुम सबिहा, मुख्याध्यापिका, अंजुमन आय.इ. अल्लाना उर्दु बॉईज हायस्कूल कुर्ला यांचा नियुक्तीबाबतचा प्रस्ताव व मुख्याध्यापिकेच्या विरुध्द**

शिक्षकांनी केलेल्या तक्रारीची छायांकित प्रत न मिळाल्याबाबत अपील केलेले आहे.

उपरोक्त मागणीच्या अनुषंगाने सादर करण्यात येते की, मुख्याध्यापिकेच्या नियुक्तीबाबतच्या प्रस्तावाची प्रत देण्यात येईल.

मुख्याध्यापिकेच्या विरोधात शिक्षकांना केलेल्या तक्रारीची प्रत या कार्यालयात शोध घेऊनहि उपलब्ध झालेली नाही. सबब पुनश्च शोध घेऊन उपलब्ध झाल्यास देण्यात येईल. "

अपीलार्थीस हवी असणारी माहिती ही ७ दिवसांच्या आत देण्यात यावी असे निर्देश देण्यांत आहे.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.
संबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक २९ जानेवारी, २०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१)अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४५१५४/अपील क्र.५२६५/०२

श्री. सैदूर रहमान -----अपीलार्थी
१८२, धाळू स्ट्रीट, सैफी मजिद जवळ,
नळबाजार, मुंबई ४०० ००३.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा शिक्षण उपसंचालक ----उत्तरवादी
मुंबई विभाग, जवाहर बाल भवन,
चर्नी रोड, मुंबई -- ४०० ००४.

२.जन माहिती अधिकारी
मुंबई विभाग, जवाहर बाल भवन,
चर्नी रोड, मुंबई -- ४०० ००४.

*---विवेचन---*

अपीलाचा दिनांक १/११/२००९
सुनावणी झाल्याचा दिनांक २८/१/२०१०.
अपीलार्थी व अपिलीय अधिकारी उपस्थित.

दि. ५/५/२००९ रोजी अंजुमन इ-इस्लाम कुर्ला बॉईज हायस्कूल या शाळेच्या मुख्याध्यापिका यांच्या विरुध्द केलेल्या तक्रारीच्या बाबतीत केलेल्या कारवाईची माहिती पाहिजे होती.

अपीलार्थीस त्यांचा अर्ज शिक्षण निरीक्षक उत्तर विभाग बृहन्मुंबई यांच्याकडे चौकशी साठी पाठविण्यात आलेले आहे व चौकशी झाल्यानंतर त्यातील निर्णय अपीलार्थीस कळविण्यात येईल असे उत्तर देण्यात आले.

अपीलार्थीना माहिती दिलेली आहे व त्यांनी अधिनियमाच्या कलम १९(१) अंतर्गत केलेले अपील हे मुदत संपून गेल्यानंतर दाखल केलेले आहे व या उप्परहि त्यांना सुनावणीची आवश्यकता

वाटल्यास अपीलार्थींनी कार्यालयास कळवावे असे सांगून प्रथम अपील शिक्षण उपसंचालकांनी निकाली काढले.

सुनावणीच्या वेळेला दोन्ही पक्षांनी एकत्रीत चर्चा करुन असे सांगितले की, याबाबत अपीलार्थीस पुन्हा सुनावणी देण्यात येईल. माहितीच्या तक्रारीच्या पूर्ततेबरोबरच इतरहि प्रशासकीय बाबी सुध्दा तपासून पाहता येतील असेहि अपिलीय अधिकारी यांनी सांगितले.

वरील विवेचनावरुन असे निर्देश देण्यांत येतात की, अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाची सुनावणी ही १५ दिवसात द्यावी.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.
संबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक २९ जानेवारी, २०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१)अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४५१५४/अपील क्र.५२६५/०२

श्री. सैदूर रहमान -----अपीलार्थी
१८२, धाळू स्ट्रीट, सैफी मजिद जवळ,
नळबाजार, मुंबई ४०० ००३.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा शिक्षण उपसंचालक ----उत्तरवादी
मुंबई विभाग, जवाहर बाल भवन,
चर्नी रोड, मुंबई -- ४०० ००४.

२.जन माहिती अधिकारी
मुंबई विभाग, जवाहर बाल भवन,
चर्नी रोड, मुंबई -- ४०० ००४.

*---विवेचन---*

अपीलाचा दिनांक ११/११/२००९
सुनावणी झाल्याचा दिनांक २८/१/२०१०.
अपीलार्थी व अपिलीय अधिकारी उपस्थित.

अपीलार्थीस पुढील माहिती पाहिजे होती.

" १.श्री. शेख मोहम्मद युनूस यांची शिक्षक म्हणून केलेली नेमणूक.

२.सर्व शिक्षा अभियान अंतर्गत प्रशिक्षणासाठी र. ३८,१५०/- श्री. शेख मोहम्मद युनुस यांना दिले त्याचा हिशोब.

३.जुलै ९८ ते फेब्रूवारी या कालावधीत शिक्षण निरीक्षक यांचेकडे श्री.मोहम्मद युनुस शेख यांनी खोटे बील सादर करुन घेतले.

याबाबतीतली माहिती अपीलार्थीस देण्यात आलेली आहे व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी

पुढीलप्रमाणे आदेश पारित केले.

"      अपीलार्थी यांना पूर्वपिठीकेतील नमूद केलेल्या टिप्पणी, अभिप्राय, आदेश इ. कागदपत्रांच्या छायांकित प्रती जन माहिती अधिकारी शिक्षण निरीक्षक, उत्तर व जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ लेखा अधिकारी शिक्षण उपसंचालक कार्यालय यांनी मोफत पुरवाव्यात."

जन माहिती अधिका-यांनी असे सांगितले की, अपीलार्थीस संपूर्ण माहिती देण्यात आलेली आहे व सुनावणीच्या वेळेलाहि त्यांनी पुन्हा पुढीलप्रमाणे उद्धृत केलेले आहे.

"श्री.मा.युनुस एम.ए.सत्तार,कनिष्ठ लिपिक यांना कार्यालयाचे पत्र क्र. शिनि /३ / माध्य-एल/८५६८-६९,दि.२८.०६.२००६ चे पत्रान्वये तसेच शाळा न्यायाधिकरण,मुंबई येथे अपिल क्र.९५/९९ दाखल केलेल्या अपिलाला शाळा न्यायाधिकरणाने दि.८.०२.२००० रोजी दिलेल्या स्थगिती आदेशानुसार श्री.युनुस सत्तार यांना दि.१.२.२००० पासून शाळेत रुजू केले होते. तसेच या कार्यालयाचे आदेश क्र.शिनि/३/माध्य.के.के/५७७१-७२ दि.२९.०६.२००० अन्वये त्यांना तात्पुरती मान्यता (शाळा न्यायाधिकरणाचा अंतिम निकाल लागेपर्यंत देण्यात आली आहे. शाळा न्यायाधिकरणाचा अंतिम निकाल दि.५.०७.२००४ रोजी लागला असून सदर अंतिम निर्णयानुसार श्री.मोह.युनु,यांच्या नियुक्तीस दि.६.७.१९९८ पासून सेवासातत्यासह रु३०५०-४५९०/- या वेतन श्रेणीत श्री.झिया अहमद फझलुर रहेमान यांना वरिष्ठलिपिक पदी पदोन्नती दिल्यामुळे रिक्त झालेल्या जागी मान्यता देण्यात आली आहे.

सदर मान्यतेच्या अनुषंगाने शाळेच्या मुख्याध्यापकांनी दि.२५.०७.२००६ रोजी पुरवणी देयक सादर करुन जुलै ९८ ते फेब्रुवारी २००० रु.९४,४८०/- कार्यालयास सादर केले व कार्यालयाने सदर देयक पडताळणी करुन पारित केले.

दि.१६.०५.२००६ च्या पत्रान्वये पालक-शिक्षक संघटनेच्या सदस्याने याबाबत तक्रारीव्दारे निदर्शनास आणले की, मो.युनुस सत्तार शेख यांना कार्यालयाकडून तेसच संस्थेकडूनसुध्दा जुलै ९८ ते फेब्रुवारी २००० या कालावधीचे वेतन घेतलेले आहे. अशी तक्रार केली होती. सदर तक्रारीच्या अनुषंगाने कार्यालयाने संस्थेचे अध्यक्ष व सचिव यांना दि.२२.०१.२००८ तसेच स्मरणपत्र दि.११.०३.२००८ अन्वये मोह.युनुस यांनी आपल्याकडून सदर कालावधी किती अग्रिम रक्कम घेतली आहे याबाबत विचारणा केली. सदर पत्राच्या अनुषंगाने संस्थेने त्यांचे दि.२८.०२.२००८ चे पत्रान्वये

रु.६४,०००/- संस्थेने त्यांना अदा केले आहे. असे कळविले आहे. परंतु मोह.युनुस अब्दुल सत्तार हे सदर रक्कम रु.२०००/- प्रतिमाह याप्रमाणे संस्थेला परत करणार आहेत. असे युनुस सत्तार यांचे दि.२६.०२.२००८ चे पत्रान्वये व संस्थेच्या दि.२८.०२.२००८ चे पत्रान्वये निदर्शनास येते.

मुद्या क्र.२ :- सदर शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती अंजुम सबिहा बेग बीएबीएड यांना मुख्याध्यापकपदी रु.७५००-१२,०००/- या वेतनश्रेणीत दि.१.०८.२००७ पासून श्रीमती साबिरा इसाफ शेख बीएससी बीएड यांनी दि.०१.०६.२००७ पासून स्वेच्छासेवानिवत्ती घेतल्याने त्यांचे रिक्त जागी विहित पध्दतीचा अवलंब करुन या कार्यालयाचे पत्र क्र.शिनि/३/माध्य एल/१७८३-८४ दि.५.०४.२००८ अन्वये मान्यता देण्यात आली आहे. सदर मुख्याध्यापिकेचे नाव म.खा.शा. शाळेतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) विनियमन अधिनियम १९७७ सुधारित १९७८ कलम ३(२) खाली मा.शिक्षण उपसंचालक,मुंबई यांचे पत्र क्र.शिउसं/माध्य-६/नोटीफिकेशन/२३०५६-५७ दि.१४.११.२००८ अन्वये अधिसूचित करण्यात आला आहे. त्यानुषंगाने सदर मुख्याध्यापिकेला मा.शिक्षण निरीक्षक, उत्तर यांनी मान्यता प्रदान केली आहे. "

सुनावणीच्या वेळेला वरीलप्रमाणे विस्तृत माहिती अपीलार्थीस पुरविण्यात आलेली आहे असे दिसून आले. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

***---आदेश---***

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक २९ जानेवारी, २०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१)अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४५१६१/अपील क्र.५२६९/०२

श्री. कमलाकर रत्नाकर शेणॉय -----अपीलार्थी
२/१३, आदिनाथ सी.एच.एस.
इली कडूरी स्कूल समोर, माझगांव, मुंबई ४०० ०१०.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा उपनिबंधक ----उत्तरवादी
सहकारी संस्था, जी/एस विभाग मुंबई यांचे कार्यालय,
६ वा मजला, मल्होत्रा हाऊस, जी.पी.ओ. समोर,
फोर्ट, मुंबई ४०० ००१.

२.जन माहिती अधिकारी
सहकारी संस्था, जी/एस विभाग मुंबई यांचे कार्यालय,
६ वा मजला, मल्होत्रा हाऊस, जी.पी.ओ. समोर,
फोर्ट, मुंबई ४०० ००१.

*---विवेचन---*

अपीलाचा दिनांक ९/११/२००९
सुनावणी झाल्याचा दिनांक २८/१/२०१०.
अपीलार्थी अनुपस्थित, जन माहिती अधिकारी उपस्थित.

अपीलार्थीस दि. १७/८/२००९ रोजीच्या अर्जानुसार नेटवर्क को.ऑप.हौ.सोसाटीच्या पदाधिका-यांनी महाराष्ट्र सहकार कायदा कलम ५८ अे नुसार सादर केलेल्या बंधपत्राची प्रमाणित प्रत पाहिजे होती.

अपीलार्थींचा हा अर्ज कार्यालयास प्राप्त झाला नव्हता व ही बाब दि. ६/१०/२००९ रोजीच्या प्रथम अपीलाच्या वेळेला लक्षात आली असता दि. २०/१०/२००९ रोजीच्या पत्राने सहकार संस्थेच्या

बंधपत्राची प्रत सहकारी संस्थेने उपनिबंधकाच्या कार्यालयात पाठविण्याची आवश्यकता नाही. त्यामुळे बंधपत्राच्या प्रती या अपीलार्थीस संस्था पातळीवर प्राप्त करुन घ्याव्या लागतील. मात्र संस्थेने बंधपत्र घेतले आहे किंवा नाही याबाबतची माहिती संस्थेकडून आल्यानंतर अपीलार्थीस देण्यात येईल असे अपीलार्थीस कळविण्यात आले होते.

सुनावणीच्या वेळी अपीलार्थी उपस्थित नसल्यामुळे त्यांनी संस्थेकडून ही बंधपत्राची प्रत प्राप्त करुन घेतली किंवा नाही हे कळू शकले नाही. जन माहिती अधिका-यांनी मात्र संस्थेकडून १५ दिवसांत संस्थेकडे बंधपत्र प्राप्त झालीत किंवा नाही एवढी माहिती पुरवावी असे निर्देश देण्यात येत आहेत.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.
संबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक २९ जानेवारी, २०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१)अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४५१६०/अपील क्र.५२६८ /०२

श्री. अर्जुन केणी व इतर -----अपीलार्थी
तुर्भे मच्छिमार विविध कार्यकारी सह.सोसा.लि.
राममंदिरजवळ, ट्रॉम्बे कोळीवाडा,
मुंबई ४०० ०८८.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा आयुक्त ----उत्तरवादी
आयुक्त,मत्स्यव्यवसाय यांचे कार्यालय,
तारापोरवाला मत्स्यालय, नेताजी सुभाष रोड,
चर्नी रोड, मुंबई ४०० ००२.

२.जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता
आयुक्त,मत्स्यव्यवसाय यांचे कार्यालय,
तारापोरवाला मत्स्यालय, नेताजी सुभाष रोड,
चर्नी रोड, मुंबई ४०० ००२.

***---विवेचन---***

अपीलाचा दिनांक ९/११/२००९
सुनावणी झाल्याचा दिनांक २८/१/२०१०.
अपीलार्थी अनुपस्थित, जन माहिती अधिकारी उपस्थित.

अपीलार्थीच्या अपीलाबाबत पुढीलप्रमाणे निवेदन जन माहिती अधिकारी यांनी सादर केले.

"केंद्र शासनाच्या माहितीचा अधिकार अधिथ्नयम २००५ अन्वये श्री. अर्जुन केणी व श्री. महादेव कोळी, तुर्भे मच्छिमार विविध कार्यकारी सहकारी सोसायटी लिमिटेड, ट्रॉम्बे कोळीवाडा, हयांनी दि. ९/१/२००९ च्या अर्जाद्वारे **Minor fishing harbour, fishing harbour Landing Center** म्हणजे काय याबाबत माहिती मागितली होती.

वस्तुत: मत्स्य विभागाच्या अभिलेखामध्ये अशा प्रकारची वर्गवारी बद्दलची माहिती नाही. तरी सुध्दा याबाबतची सर्वसाधारण माहिती अर्जदारास दि. २३/१/२००९ च्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास पुरविली.

उपरोक्त माहिती दिल्यानंतर अर्जदाराने पुन्हा ३०/७/२००९ च्या पत्रान्वये मत्स्यबंदराबाबतची वर्गवारी कोणी तयार केली व त्याबाबतची माहिती देण्यात यावी, असा अर्ज सादर केला. जन माहिती अधिकारी यांनी याबाबत दि. २४/८/०९ च्या पत्रान्वये कळविले की, मत्स्यविभागामार्फत अशा प्रकारची वर्गवारी केलेली नाही. तरी सुध्दा अर्जदाराचे समाधान व्हावे या उद्देशाने मत्स्यबंदराच्या वर्गवारीबद्दल सर्वसाधारण माहिती देण्यात आली.

त्यानंतर अर्जदाराने पुन्हा दि. २८/७/०९ च्या अर्जाद्वारे (कार्यालयास प्राप्त दिनांक २/९/०९) मत्स्यबंदराची वर्गवारी बाबत जी माहिती दिली आहे, ती ज्या पुस्तकातुन दिली आहे त्याच्या प्रती देण्याबाबत अर्ज केला होता. याबाबतीत जन माहिती अधिकारी यांनी दि. १०/९/०९ च्या पत्रान्वये अर्जदारास कळविले आहे की, अर्जदाराने मुळ अर्जाद्वारे मत्स्यबदरे व जेट्टीच्या वर्गवारीबाबत माहिती मागितली होती अशा प्रकारची वर्गवारी मत्स्यव्यवसाय विभागामार्फत केलेली नाही तरी सुध्दा अर्जदारास याबाबतची सर्वसाधारण माहिती देण्याच्या सद्‌हेतूने मत्स्यबदराची सर्वसाधारण माहिती देण्यात आली आहे. माहिती अधिकार अधिनियमानुसार कार्यालयाच्या शासकीय अभिलेखामध्ये उपलब्ध असलेली माहिती देणे अभिप्रेत आहे. मत्स्य विभागाच्या अभिलेखामध्ये अशा प्रकारचे पुस्तक उपलब्ध नसल्याने त्यांची प्रत अथवा ते पहाण्यासाठी उपलब्ध करुन देणे शक्य नव्हते.

वरील गोष्टीमुळे अर्जदाराचे समाधान झाले नाही. त्यामुळे त्यांनी दि. २७/८/०९ अन्वये आयुक्त मत्स्यव्यवसाय यांचेकडे अपील दाखल केले. अर्जदाराच्या अपील अर्जानुसार अपील अधिकारी तथा आयुक्त मत्स्यव्यवसाय यांनी दि. ३०/९/०९ च्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी यांना निर्देश दिले की, अर्जदारास "मत्स्यबंदराच्या विकासासाठी तयार केलेली वर्गवारी कोणी केली " (Source of information) याबाबतची माहिती अपेक्षित आहे ती देण्यात यावी.

वरील निर्देशानुसार जन माहिती अधिकारी यांनी दि. ५/१०/०९ च्या पत्रान्वये मत्स्यबदरे/जेट्टी यांच्या वर्गवारीबद्दलची माहिती ज्या पुस्तकामध्ये उपलब्ध आहे त्या पुस्ताकचे नाव/पब्लीकेशनचे नाव

याबाबतची माहिती दिली. तसेच सदरचे पुस्तक मत्स्यव्यवसाय विभागाचे अभिलेखाचे भाग नाही हे सुध्दा कळविले आहे.

वरील सर्व विवेचनावरुन असे स्पष्ट होते की, मत्स्यबंदराच्या वर्गवारीचे निकष शासकीय अभिलेखामध्ये उपलब्ध नसतांना ते अन्य ठिकाणाहून उपलब्ध करुन दिले. "

वरील विवेचनावरुन रेकॉर्डला जरी माहिती नसली तरी अपीलार्थीस सर्वसाधारपणे इतर पुस्तकातून उपलब्ध असलेली माहिती सुध्दा देण्याचा प्रयत्न जन माहिती अधिकारी यांनी केलेला दिसून येतो. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

<u>*----आदेश---*</u>

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक २९ जानेवारी, २०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१)अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/४५१७३/अपील क्र.५२७६ /०२**

**सौ. सुमन तोरस्कर -----अपीलार्थी**
**अ- ३०२, सोळंकी अपार्टमेंट,**
**नटवर नगर रोड -१, जोगेश्वरी (पूर्व)**
**मुंबई ४०० ०६०.**

**विरुध्द**

**१. अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता ----उत्तरवादी**
**के/ इस्ट वॉर्ड , ३ रा मजला, वॉर्ड इमारत,**
**आझाद रोड, गुंदवली, अंधेरी (पूर्व) मुंबई ६९**

**२.जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता (इ/का)**
**के/ इस्ट वॉर्ड , ३ रा मजला, वॉर्ड इमारत,**
**आझाद रोड, गुंदवली, अंधेरी (पूर्व) मुंबई ६९**

***---विवेचन---***

**अपीलाचा दिनांक १०/११/२००९**
**सुनावणी झाल्याचा दिनांक २९/१/२०१०.**
**अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.**

**अपीलार्थीस त्यांच्या दि. २२/६/२००९ रोजीच्या अर्जाने दि. १८/१/२००९ रोजी श्रीमती मोहिनी सावंत व श्री. प्रमोद चाळके यांनी त्यांच्या जागेच्या नजिक केलेल्या अनधिकृत बांधकामासंबंधी केलेल्या तक्रारीवर कारवाई न करण्याची कारणे मागितली होती.**

**अशा पध्दतीची माहिती उपलब्धच नाही व स्पष्टीकरण मागणारी ही माहिती असल्यामुळे ती नाकारण्यात आली. अपिलीय अधिकारी यांनी मात्र चौकशी करुन अनधिकृत बांधकामास नोटीस देण्याचे जन माहिती अधिका-यांना निर्देश दिले होते.**

सुनावणीच्या वेळेला असे सांगण्यात आले की, सदरील बांधकामाची पाहणी करुन रिपोर्टनुसार अनधिकृत बांधकामकर्त्यावर नोटीस पाठविण्यात येईल.

या नोटीसची प्रत १५ दिवसाचे आत अपीलार्थींना देण्यांत यावी.

***---आदेश---***

अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.
संबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक ३० जानेवारी, २०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१)अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४५१६७/अपील क्र.५२८० /०२

श्री. हेमल अशोक गनात्रा -----अपीलार्थी
३५, न्यू बर्डन लेन, गांधी मार्ग,
वडगडी मस्जिद बंद, मुंबई ३.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा पोलीस उप आयुक्त ----उत्तरवादी
परिमंडळ २, सर, जे,जे मार्ग ,
नागपाडा, मुंबई.

२.जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त
दक्षिण प्रादेशिक विभाग नियंत्रण कक्ष,
पायधुनी पोलीस स्टेशन, मुंबई.

*---विवेचन---*

अपीलाचा दिनांक १२/११/२००९
सुनावणी झाल्याचा दिनांक २९/१/२०१०.
अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

अपीलार्थी श्री. हेमल अशोक गनात्रा यांनी २५/०६/२००९ रोजी माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये केलेल्या मुळ अर्जात पुढीलप्रमाणे माहिती मागितली होती.

**Copy of FIR or Reasons for not giving FIR and to recording FIR for complaint letter dated 5/10/2008 ,10/2/09 Fire Brigade report.**

सहायक पोलीस आयुक्त व माहिती अधिकारी, दक्षिण प्रादेशिक विभाग यांच्याकडील जा.क्र. ७६०/टप्रावि/माहिती/०९ दि. १६/०४/०९ अन्वये अपीलार्थीना माहिती पुरविलेली आहे. सदर माहितीने समाधान न झाल्याने श्री. हेमल अशोक गनात्रा यांनी दि. १/९/२००९ रोजी अपील सादर केले आहे.

माहिती अधिकारी यांचेकडे विचारणा केली असता त्यांनी सांगितले की, अर्जदारांनी दिलेल्या तक्रारीत त्यांच्या कार्यालयाचे नुकसान झाल्याबाबत पोलीस ठाणे अभिलेखावरच कोणतीही नोंद नाही त्यामुळे अर्जदारांनी विचारणा केलेला एफ.आय.आर पोलीस ठाणे अभिलेखावर नसल्याने विचारणा केलेली माहिती देणे शक्य नाही अशी माहिती अपीलार्थींना दिलेली आहे.

अपील सुनावणीसाठी अपीलार्थींना दि. १०/९/२००९ रोजी व १५/९/०९ रोजी बोलविण्यात आले असता अपीलार्थी गैरहजर होते. पायधुनी पोलीस ठाणे यांचे अभिलेखावर प्रथम खबरी अहवालाची नोंद केल्याबाबत नमुद नाही. तरी अपीलार्थींनी मागितलेली माहिती अभिलेखावर उपलब्ध नसल्याने सहायक पोलीस आयुक्त व माहिती अधिकारी दक्षिण प्रादेशिक विभाग मुंबई यांनी तसे अपीलार्थींना कळविलेले आहे.

अपीलार्थींनी मागितलेली माहिती ही पायधुनी पोलीस स्टेशन यांच्या अभिलेखावर प्रथम खबरी अहवालाची नोंद केल्याबद्दल नमूद नाही व माहिती अभिलेखावरच उपलब्ध नसल्यामुळे त्यांनी अपीलार्थींना तसे कळविले व प्रथम अपील निकाली काढले त्याविरुध्द हे सदरचे अपील आहे.

अभिलेखावर कुठच्याहि प्रकारची नोंद नसल्यामुळे अपीलार्थीस माहिती मिळणे दुरापास्त असले तरी तक्रार नोंदवून न घेणे ही जी नेहमीचीच जी तक्रार पोलीस स्टेशनविरुध्द असते. तशाच प्रकारची हीहि एक केस दिसते. याबाबत अपीलार्थींनी हवे तर वरिष्ठ पोलीस अधिका-यांकडे रितसर तक्रार नोंदवावी हेच श्रेयस्कर राहील.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक ३० जानेवारी, २०१०

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१)अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/४५१६८/अपील क्र.५२८१/०२**

**श्री. ईरॉल सिक्वेरा -----अपीलार्थी**
**३ अ, पृथ्वी निवास, प्रभात कॉलनी,**
**सांताक्रुज (पूर्व) मुंबई ४०० ०५५.**

**विरुध्द**

**१. अपिलीय अधिकारी ----उत्तरवादी**
**बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यालय,**
**पाणी विभाग, एच/ईस्ट वार्ड,**
**सांताक्रुज (पूर्व) मुंबई ४०० ०५५.**

**२.जन माहिती अधिकारी**
**बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यालय,**
**पाणी विभाग, एच/ईस्ट वार्ड,**
**सांताक्रुज (पूर्व) मुंबई ४०० ०५५.**

***---विवेचन---***

**अपीलाचा दिनांक १६/११/२००९**
**सुनावणी झाल्याचा दिनांक २९/१/२०१०.**
**अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.**

**अपीलार्थींना ते राहत असलेल्या पृथ्वी निवास ,प्रभात कॉलनी,सांताक्रुज (पूर्व) या इमारतीत राहणारे दुसरे रहिवासी श्री. एम.बी.अग्रवाल यांनी घेतलेली अनधिकृत वॉटर जोडणी , अनधिकृत पाण्याचा वापर याबाबत त्यांनी केलेल्या दि. २८/१/२००७ व दि. २/२/२००९ रोजीच्या पत्रातील तक्रारीवर केलेल्या कारवाईची माहिती मागितली होती. ती माहिती समाधानकारकरित्या न मिळाल्याने नाईलाजाने त्यांनी आयोगाकडे धाव घेतलेली आहे.**

जन माहिती अधिका-यांनी नुकतीच पाहणी केलेली असून संबंधित अधिका-यांकडून अहवाल प्राप्त झालेला आहे व त्या अहवालाच्या आधारावर पुढील कारवाई करण्यात येईल. तेव्हा करावयाच्या कारवाईचे स्वरुप निश्चित करुन अपीलार्थीस त्याची मुद्देनिहाय माहिती १५ दिवसाच्या आत पुरविण्यात यावी असे निर्देश देण्यात आले.

***---आदेश---***

अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.
संबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक ३० जानेवारी, २०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१)अन्वये दाखल झालेले अपील.
क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/अपील क्र.१५८१/०२

श्री. कारभारी पंडीत आहेर -----अपीलार्थी
मु.पो. निवाणे, ता. कळवण, जि. नाशिक.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा अप्पर आयुक्त ----उत्तरवादी
एकात्मिक आदिवासी विकास
आदिवासी विकास भवन, तळमजला,
गडकरी चौक, जुना आग्रा रोड, नाशिक.

२.जन माहिती अधिकारी तथा कार्यासन अधिकारी (७)
एकात्मिक आदिवासी विकास आयुक्तालय,
आदिवासी विकास भवन, तळमजला,
गडकरी चौक, जुना आग्रा रोड, नाशिक.

*---विवेचन---*

अपीलाचा दिनांक २६/५/२००९
सुनावणी झाल्याचा दिनांक २२/१२/२००९.
अपीलार्थी , जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित.

अपीलार्थीस जी माहिती पाहिजे होती ती आदिवासी विकास आयुक्तालय यांच्याकडे उपलब्ध नसून ती आदिवासी सेवा समिती नाशिक या स्वयंसेवी संस्थेकडची आहे, व या संस्थेकडून मिळवून घेऊन किंवा संस्थेने स्वतः अपीलार्थीस द्यायची आहे. आदिवासी सेवा समितीचे या बाबतीत असे म्हणणे आहे की, अपीलार्थीस पाहिजे असलेली माहिती ही अत्यंत विस्तृत स्वरुपाची आहे व सदर माहितीमध्ये एकूण ३८ शाळांच्या बाबतीत जी माहिती लागणार आहे त्याची पृष्ठे १५००० व म्हणून शुल्क रु. ३०,०००/- इतके होते. तेव्हा इतक्या विस्तृत स्वरुपातील माहिती देण्याचे काम हे

कुठच्याहि संस्थेला अवघड असेच जाणार असल्यामुळे त्याबाबतीत अपीलार्थीस विचारले असता याबाबत होणारा खर्च करण्याची त्यांची तयारी आहे असे त्यांनी सांगितले.

सुनावणीच्या वेळेस आणलेली एका शाळेची माहिती ही अपीलार्थीस विनामूल्य देण्यात यावी असे निर्देश देण्यांत आले. मात्र अपीलार्थीस खरोखरीच उर्वरित ३७ श३ाळांची संपूर्ण माहिती पाहिजे असेल तर त्यासाठी लागणारे शुल्क भरुन अपीलार्थीस त्या माहितीच्या प्रती देण्यांत याव्यात. याबाबतीत कुठच्याहि वादास कारण राहू नये म्हणून अपीलार्थीस जी कागदपत्रे देणार आहेत ते एक एक शाळा करुन त्यांना दाखविण्यात यावेत व त्यापैकी त्यांना हव्या असलेल्या कागदपत्रांची निवड करुन त्यांनी पैसे भरल्यानंतर त्यांना त्या कागदपत्रांच्या प्रती संस्थेने द्याव्यात.

याबाबतीत कांही प्रत्यक्षात अडचणी आल्या तर त्याचे निराकरण अपिलीय अधिकारी यांनी करावे. ही संपूर्ण कार्यवाही १ महिन्याच्या आत पूर्ण करण्यात यावी.

***----आदेश---***

अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.
संबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
दिनांक ३० जानेवारी, २०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.

क्रमांक-मु.मा.आ/तक्रार क्र.७००/०२

श्री.प्रमोदकुमार पुंडे -----तक्रारदार
२०१, सम्राट तपन पॅलेस, एस.टी.रोड,
नालासोपारा (पश्चिम) जि. ठाणे.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा उपसचिव ----उत्तरवादी
(स्पेशल ४ गृह) कक्ष,
गृह विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

२.जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी
(स्पेशल ४ गृह) कक्ष,
गृह विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

***---विवेचन---***

तक्रारदार श्रीयुत प्रमोदकुमार पुंडे यांच्या म्हणण्यानुसार व तक्रारीसोबत जोडलेल्या कागदपत्रांनुसार त्यांनी लॅन्डमाईन्स शोधून काढण्यासाठी एक डिव्हाईसचे जे डिझाईन तयार केले होते त्यासंबंधात प्रधान सचिव, गृह विभाग यांनी दि. १५ सप्टेंबर, २००३ रोजी एक बैठक बोलाविली होती. या बैठकीच्या संदर्भात पुढे काय झाले याची माहिती तक्रारदारांनी विचारली होती.

सदरची माहिती जनहिताच्या दृष्टीने महत्वाची असल्यामुळे त्यांना ४८ तासांत उपलब्ध करुन द्यावी अशा आशयाचा अर्ज जन माहिती अधिकारी यांचेकडे सादर केला होता. परंतु यासंबंधात कुठचीहि कागदपत्रे उपलब्ध नसल्यामुळे जन माहिती अधिकारी ४८ तासांत माहिती उपलब्ध करु शकले नाहीत, म्हणूंन तक्रारदारांनी आयोगाकडे दि. ८ जानेवारी, २०१० रोजी तक्रार सादर केलेली आहे. सदर तक्रारीची सुनावणी दि. २९ जानेवारी, २०१० रोजी घेण्यांत आली. त्यावेळेस तक्रारदार, अपिलीय अधिकारी तसेच जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

तक्रारदारांनी वर नमूद केलेल्या बैठकीसंबंधीची कुठचीहि कागदपत्रे सापडून येत नाहीत असे अपिलीय अधिकारी यांनी सांगितले.

तक्रारदारांनी असेहि सांगितले की, त्यांनी वरिष्ठ अधिका-यांच्या ब-याच वेळा भेटी घेतल्या पण त्यांच्या संशोधनाबाबतचे महत्व त्यांना पटलेले दिसले नाही.

उप सचिवांच्या म्हणण्यानुसार कदाचित याच कारणामुळे कांही कालावधीनंतर वरिल कागदपत्रे नष्ट करण्यात आली असावीत, मात्र त्याचा तपशील उपलब्ध नाही.

तक्रारदारांकडे सदर संशोधनाबद्दलचे सर्व कागदपत्र आहेत. तेव्हा त्यांनी त्यांच्या संशोधनाची उपयुक्तता नव्याने सिध्द करण्याचा प्रयत्न करणे हेच श्रेयस्कर राहिल.

***---आदेश---***

तक्रार निकाली काढण्य+ाात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक ३० जानेवारी, २०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१)अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४५१६३/अपील क्र.५२८४/०२

श्री. अनिल शांताराम जामगेकर -----अपीलार्थी
अशोक धर्मा चाळ, रुम नं. १, गणेशवाडी,
म्हातारपाडा मार्ग क्र. १,वॉलफोर्ट टॉवर इमारतीबाजूला,
आंबोली, अंधेरी (पूर्व ) मुंबई ४०० ०५८.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा पोलीस उपआयुक्त ----उत्तरवादी
परिमंडळ ९, हिल रोड, वांद्रे (पश्चिम)
मुंबई ४०० ०५०.

२.जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त
पश्चिम नियंत्रण कक्ष, वांद्रे (पश्चिम)
कार्टर रोड, मुंबई ४०० ०५०.

***---विवेचन---***

अपीलाचा दिनांक १२/११/२००९
सुनावणी झाल्याचा दिनांक ३०/१/२०१०.
अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

सुनावणीच्या वेळेला हे स्पष्ट झाले की, अपीलार्थीस F.I.R. ची मुळ प्रत देण्यांत आलेली आहे. तसेच गुन्हा हा अदखलपात्र ठरविण्यात आलेला आहे.

अपीलार्थीस हा गुन्हा दखलपात्र ठरविण्यात यावा असे वाटत असेल तर त्यांनी प्रशासकीयदृष्टया संबंधित वरिष्ठ पोलीस अधिका-यांकडे दाद मागावी. रेकॉर्डला असलेली माहिती अपीलार्थीस देण्यांत आली असल्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
दिनांक ३० जानेवारी, २०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१)अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४५१६३/अपील क्र.५२८८/०२

श्रीमती. शैला पांडुरंग सामंत -----अपीलार्थी
५०१/ अे, रेडीअम अपार्टमेंट,
श्रेयस कॉलनी, आरे रोड, गोरेगांव (पूर्व)
मुंबई ४०० ०६३.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त (शिक्षण) ----उत्तरवादी
उप आयुक्त (शिक्षण) यांचे कार्यालय
३ रा मजला, एफ/ दक्षिण विभाग कार्यालय,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोड, परेल, मुंबई १२.

२.जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक (शिक्षण)
उप आयुक्त (शिक्षण) यांचे कार्यालय
३ रा मजला, एफ/ दक्षिण विभाग कार्यालय,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोड, परेल, मुंबई १२.

***---विवेचन---***

अपीलाचा दिनांक ७/१२/२००९
सुनावणी झाल्याचा दिनांक ३०/१/२०१०.
अपीलार्थी, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित.

अपीलार्थीस त्यांचे पेन्शन व इतर देणी न मिळाल्याने अंतिमतः त्यांनी माहितीच्या अधिकाराचा वापर करुन त्यासंबंधात माहिती मागितली आहे.

सुनावणीच्या वेळेला हे स्पष्ट झाले की, अपीलार्थीच्या सेवेतील अनहर्ततेमुळे त्यांचे पेन्शन प्रकरणात उशिर लागत आहे. याबाबत महापालिका आयुक्तांनी सुध्दा केस तपासून सादर करण्याचे निर्देश दिलेले आहेत. व त्याप्रमाणे शिक्षण विभागाने प्रस्ताव तपासून व शिफारस करुन

लेखा विभागाला पाठविलेला आहे.

याबाबतीत उप आयुक्तांनी स्वतः वरिष्ठ पातळीवर या केसच्या बाबतीत निर्णय प्राप्त करुन घेण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील असे सांगितले.

अपीलार्थीस सर्व माहिती आहेच. मात्र त्यांचे समाधान पेन्शनच्या बाबतीत त्यांना जसा निर्णय पाहिजे तसा निर्णय लागण्यानेच होणार आहे. माहितीच्या अधिकारात यापेक्षा जास्त करता येणे शक्य नसल्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.
संबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
दिनांक ३० जानेवारी, २०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१)अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/४६२६५/अपील क्र.५२९०/०२**

**श्री. रविंद्र मुरलीधर कालेकर** **-----अपीलार्थी**
**अे/ १०३ , अमित दर्शन सोसायटी,**
**दादाभाई रोड नं. ३, विलेपार्ले (पश्चिम)**
**मुंबई ४०० ०५६.**

**विरुध्द**

**१. अपिलीय अधिकारी तथा नगर अभियंता** **----उत्तरवादी**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, मुख्यालय,**
**विस्तारित इमारत , ५ वा मजला, महापालिका मार्ग,**
**फोर्ट, मुंबई ४०० ००१.**

**२.जन माहिती अधिकारी**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, मुख्यालय,**
**विस्तारित इमारत , ५ वा मजला, महापालिका मार्ग,**
**फोर्ट, मुंबई ४०० ००१.**

***---विवेचन---***

**अपीलाचा दिनांक ६/१/२०१०**
**सुनावणी झाल्याचा दिनांक ३०/१/२०१०.**
**अपीलार्थी, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित.**

**सुनावणीच्या वेळेस असे दिसून आले की, अपीलार्थीनी नस्तीची पाहणी केलेली आहे. मात्र अपीलार्थीच्या मुळ अर्जामध्ये त्यांनी पहिल्या तीन आयटेम मध्ये विवक्षित तारखा लिहून त्या दिवसांच्या अहवालांची मागणी केलेली आहे.**

**तेव्हा संबंधितांशी चर्चा करुन असे ठरविण्यात आले की, अपीलार्थी हे मंगळवार दि. २ फेब्रूवारी, २०१० रोजी दुपारी ३-०० वाजता महापालिका कार्यालयात जातील व त्यांना या तिन्ही**

अहवालाच्या प्रती विनामूल्य देण्यांत याव्यात. त्याव्यतिरिक्त त्यांना पुन्हा नस्तीची पाहणी करायची असेल तर पुन्हा ते पाहणी करुन अतिरिक्त कागदपत्रांची मागणी केल्यास तेहि कागदपत्र त्यांना देण्यांत यावीत.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.
संबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक ३० जानेवारी, २०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१)अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/अपील क्र.१३८८/०२

श्री. देवमन नारायण आहेरराव -----अपीलार्थी
मु.पो. खांडबारा, ता. नवापूर,
जि. नंदुरबार.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी ----उत्तरवादी
पंचायत समिती शिंदखेडा, जि. नंदूरबार.

२.जन माहिती अधिकारी
गटविकास अधिकारी कार्यालय,
पंचायत समिती शिंदखेडा, जि. नंदूरबार.

***---विवेचन---***

अपीलाचा दिनांक ३०/९/२००९
सुनावणी झाल्याचा दिनांक ८/१२/२००९.
अपीलार्थी उपस्थित, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी अनुपस्थित.

अपीलार्थींनी दि. २/७/२००९ च्या अर्जाद्वारे श्री. एकनाथ अंबर अहिरे, ग्रामसेवक यांच्यासंबंधी माहितीची मागणी केली. त्यांच्या माहिती अर्जाला प्रतिसाद न मिळाल्याने त्यांनी दि. १२/८/२००९ रोजी प्रथम अपील केले. तथापि त्यावर सुनावणी झाली नाही व त्यांना माहिती पण मिळाली नाही. म्हणून त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

द्वितीय अपीलावरील सुनावणीच्या वेळी अपीलार्थींनी त्यांना माहिती मिळाली नसल्याचे आयोगास सांगितले. उत्तरवादी गैरहजर असल्याने त्यांचे याबाबत काय म्हणणे आहे हे आयोगास जाणून घेता आले नाही. सदर प्रकरणी आयोगाचे असे निर्देश आहेत की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती अपीलार्थींना विनाशुल्क सदर आदेशाच्या दिनांकापासून

१५ दिवसांच्या आत पुरवावी.   आयोगाचे असेहि निर्देश आहेत की,  मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नंदूरबार  यांनी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचा आयोगाकडील सुनावणीच्या वेळी अनुपस्थित राहिल्याबाबतचा खुलासा प्राप्त करुन घेवून  मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अभिप्रायासह  आयोगाकडे सादर करावा.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

आदेशाची प्रत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नंदूरबार  यांना उपरोक्त निर्देशाच्या अनुषंगाने पुढील कार्यवाहीस्तव पाठविण्यात यावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक ३० जानेवारी, २०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१)अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/अपील क्र.१५२५/०२**

**श्री. सु.वि. आव्हाड -----अपीलार्थी**
**चेअरमन, प्रतिभा सहकारी गृहनिर्माण संस्था,**
**दुसरा मजला, संचेती टॉवर, अशोक स्तंभ,**
**नाशिक - २**

**विरुध्द**

**१. अपिलीय अधिकारी तथा प्रकल्प अधिकारी ----उत्तरवादी**
**एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प,**
**नंदुरबार, जि. नंदुरबार.**

**२.जन माहिती अधिकारी मुख्याध्यापक**
**शासकीय आश्रमशाळा, भगदरी,**
**ता. अक्कलकुवा, जि. नंदुरबार.**

***---विवेचन---***

**अपीलाचा दिनांक ७/११/२००९**
**सुनावणी झाल्याचा दिनांक २१/१२/२००९.**
**अपीलार्थी, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी अनुपस्थित.**

**अपीलार्थींनी दि. २८/४/२००८ च्या अर्जान्वये त्यांच्या संस्थेच्या सदस्या श्रीमती. अरुणा पुंजरु ठाकरे यांच्या गट विमा कर्जाच्या वसुलीबाबतची माहिती मागितली होती. माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी दि. २/८/२००८ रोजी प्रथम अपील केले. तथापि त्यांना माहिती मिळाली नाही. यास्तव त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.**

**द्वितीय अपीलावरील सुनावणीसाठी अपीलार्थी व उत्तरवादी उपस्थित नव्हते. त्यामुळे सदर प्रकरणी सद्य:स्थिती नेमकी काय आहे हे आयोगास समजू शकले नाही. मात्र दि. ५/१/२००८**

रोजीच्या पत्रावरुन अपीलार्थीस उत्तर देण्यांत आले आहे असे दिसून येते.   त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक ३० जानेवारी, २०१०

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१)अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/अपील क्र.१५८५/०२**

**श्री. माधवराव पुसालाल नौलखा -----अपीलार्थी**
**मु.पो. देवघर, ता. मालेगांव,**
**जिल्हा नाशिक.**

**विरुध्द**

**१. अपिलीय अधिकारी तथा तहसिलदार ----उत्तरवादी**
**तहसिलदार कार्यालय मालेगांव,**
**जि. नाशिक.**

**२.जन माहिती अधिकारी**
**तहसिलदार कार्यालय मालेगांव,**
**जि. नाशिक.**

***---विवेचन---***

**अपीलाचा दिनांक ६/०५/२००९**
**सुनावणी झाल्याचा दिनांक २१/१२/२००९.**
**अपीलार्थी, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी अनुपस्थित.**

**अपीलार्थींनी दि. ११/१२/२००८ च्या अर्जान्वये सरला सोनु कांबळे यांच्या कास्ट सर्टिफिकेटबाबतची माहिती मागितली. माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी दि. ९/१/२००९ रोजी प्रथम अपील केले. त्यांच्या अपीलावर सुनावणी होऊन दि. ४/३/२००९ रोजी आदेश पारित करण्यात आले. आदेशानुसार त्यांनी स्वतः अभिलेखे तपासून माहिती प्राप्त करावयाची होती. या अनुषंगाने वारंवार कार्यालयाशी संपर्क साधून सुध्दा त्यांना माहिती मिळाली नाही. म्हणून त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.**

**द्वितीय अपीलावरील सुनावणीच्या वेळी अपीलार्थी व उत्तरवादी गैरहजर असल्याने सदर प्रकरणी सद्य:स्थिती आयोगास जाणून घेता आली नाही. उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन करता**

अशी माहिती अजूनहि दिली नसल्यास  अपीलार्थींना सदर आदेशाच्या दिनांकापासून ७ दिवसांच्या आंत माहिती देण्यात यावी.

*----आदेश---*

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक ३० जानेवारी, २०१०                    राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१)अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/अपील क्र.१५१४/०२

श्री.मोहमद रमजान अब्दुल गफुर -----अपीलार्थी
रा. घर नं. ४९५ अ, मोतीपुरा,
बडेपीरकी दरगाह जवळ, रविवार वॉर्ड,
मालेगांव, जिल्हा नाशिक.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी ----उत्तरवादी
महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद.

२.जन माहिती अधिकारी तथा अंतर्गत लेखा परिक्षक
महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद.

---*विवेचन*---

अपीलाचा दिनांक २९/०१/२००९
सुनावणी झाल्याचा दिनांक २१/१२/२००९.
अपीलार्थी, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी अनुपस्थित.

अपीलार्थींनी दि. २५/९/२००८ च्या अर्जान्वये बडेपीरकी दरगाह , मोतीपुरा मालेगांव या दरगाहच्या दि. १/१/९५ नंतर झालेल्या ऑडिट रिपोर्टच्या प्रतीची मागणी केली. माहिती अर्जाला उत्तर न मिळाल्याने त्यांनी दि. २६/११/२००८ रोजी प्रथम अपील केले. यानंतर देखिल त्यांना माहिती अप्राप्त असल्याने त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

द्वितीय अपीलावरील सुनावणीच्या वेळी अपीलार्थी व उत्तरवादी गैरहजर होते. त्यामुळे अपीलार्थींना ऑडिट रिपोर्टची प्रत त्यांच्या मागणीनुसार मिळाली की नाही हे

**समजू शकले नाही. तरी निर्देश देण्यात येतात की, जर ती दिली गेली नसेल तर सदर आदेशाच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आत कोणतेही शुल्क न आकारता देण्यात यावी.**

***---आदेश---***

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**
**संबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.**

**(डॉ.सुरेश वि. जोशी),**

**दिनांक ३० जानेवारी, २०१०** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८अन्वये दाखल झालेली तक्रार.

क्रमांक-मु.मा.आ/४६१७८/तक्रार क्र.६८८/०१

श्री. बाजीराव तानाप्पा ठोकळे -----तक्रारदार
डी-५, मुलुंड सहकार विश्व को.ऑप.हौ.सोसा.
१०८/१३, नाहूर रोड, मुलुंड (पश्चिम)
मुंबई ४०० ०८०.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा उपनिबंधक ----उत्तरवादी
सहकारी संस्था, टी विभाग,ए.सी.सी.कंपाऊंड,
जे.एस.डी. रोड, मुलुंड (प) मुंबई ४०० ०८०.

२.जन माहिती अधिकारी तथा अध्यक्ष
प्रशासक मंडळ, मुलुंड सहकार विश्व को.ऑप.हौ.सोसा.
नाहूर रोड, मुलुंड (पश्चिम) मुंबई ४०० ०८०.

*---विवेचन---*

दि. १८ ऑगस्ट, २००९ रोजीच्या आदेशाने प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था टी विभाग यांनी मुलुंड सहकारी विश्व को.ऑप.हौ.सो. या संस्थेकडून तक्रारदारांस माहिती देण्याबाबत कार्यवाही करावी असे निर्देश दिले होते.

दि. ३०/१२/२००९ रोजीच्या पत्राने तक्रारदारांनी त्यांना सदरील माहिती अजूनहि मिळालेली नाही अशी तक्रार केल्याने त्याची सुनावणी दि. २९/१/२०१० रोजी घेण्यात आली. त्यावेळेला प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित होते.

सुनावणीच्या वेळेला पुढीलप्रमाणे निवेदन उपनिबंधक, सहकारी संस्था टी विभाग यांनी दिलेले आहे.

"अर्जदार श्री. बी.टी.ठोकळे यांनी या कार्यालयात माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत दाखल केलेल्या अपीलाचे अनुषंगाने या कार्यालयाने दि. ०४/११/२००८रोजी संबंधित संस्थेस माहितीचा अधिकार लागू असून संस्थेला शासनाच्या समाज कल्याण खात्याकडून अर्थसहाय्य मिळालेले असलेबाबतचे आदेश पारित केले होते. तसेच तक्रारदार यांनी मागणी केलेली

माहिती त्वरित पुरविणेविषयी संस्थेस सूचना दिल्या होत्या.

तद्‌नंतर आपण दि. १८/८/२००९ रोजी पारित केलेल्या व कार्यालयास दि. ११/९/२००९ रोजी प्राप्त झालेल्या सूचनांचे अनुषंगाने या कार्यालयाने दि. १६/९/२००९ रोजीच्या पत्राचे अनुषंगाने संस्थेस तक्रारदार श्री.बी.टी.ठोकळे यांनी दि. ७/४/२००७ ते १४/७/२००८ या कालावधीतील संस्थेच्या संदर्भातील एकूण ५ मुद्दयांची मागणी केलेली माहिती त्वरित उपलब्ध करुन द्यावी अशा सूचना दिलेल्या होत्या.

तद्‌नंतर संस्थेने याबाबत दि. २२/१०/२००९ रोजी आपला लेखी खुलासा सादर केला होता. तथापि अवलोकनांती सदरहू खुलासा सयुक्तिक न वाटल्याने या कार्यालयाने पुन्हा दि. ६/१/२०१० रोजीच्या पत्रान्वये संस्थेस तक्रारदार श्री.बी.टी.ठोकळे यांना उक्त माहिती त्वरित उपलब्ध करुन देणेबाबत लेखी सूचना दिलेल्या होत्या.

परंतु संस्थेने त्याबाबत कोणतीही कार्यवाही न केल्यामुळे या कार्यालयाने दि. २९/१२/२००९ रोजी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७९(१) अन्वये आदेश पारित करुन संस्थेस संदर्भिय ५ मुद्दयांची माहिती १५ दिवसांचे मुदतीत तक्रारदार श्री.बी.टी. ठोकळे यांना उपलब्ध करुन देणेविषयी लेखी निदेश दिलेले आहेत व सदर बाबत अलाहिदा पुढील योग्य ती कार्यवाही केली जाईल. "

मध्यंतरीच्या काळात प्रशासक जाऊन नवनियुक्त बॉडी आलेली होती व माहिती देण्याची जबाबदारी प्रशासकांची होती की, नवनियुक्त बॉडीची आहे वगैरे मुद्दयांचा सुध्दा परामर्श उपनिबंधक यांनी घ्यावा. तसेच संस्था म्हणते की आता त्यांनी सर्व आर्थिक सहाय्य परतफेड केलेले आहे म्हणून त्यांना आता माहिती अधिकार कायदा लागू नाही याचीहि शहानिशा करण्यात यावी. सहकार कायद्याखाली माहिती मिळवून देण्याची व संबंधिताविरुध्द योग्यती कारवाई करण्याची प्रक्रिया सुरु झालेली दिसून येत असल्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

***----आदेश---***

तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक ३० जानेवारी, २०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१)अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/अपील क्र.१४६७/०२

श्री. रायभान शंकर अभंग -----अपीलार्थी
यु.नं. ४, प्लॉट नं. ५०, नंदनगर,
सुमती नगर जवळ, मु.पो. लासलगांव,
ता. निफाड, जि. नाशिक- ४२२ ३०६.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी ----उत्तरवादी
पंचायत समिती निफाड, जि. नाशिक.

२.जन माहिती अधिकारी तथा विस्तार अधिकारी
पंचायत समिती निफाड, जि. नाशिक.

---*विवेचन*---

अपीलाचा दिनांक १४/०८/२००८
सुनावणी झाल्याचा दिनांक २१/१२/२००९.
अपीलार्थी, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी अनुपस्थित.

अपीलार्थींनी दि. ३०/४/२००८ च्या अर्जान्वये गटविकास अधिकारी, पंचायत समिती निफाडा यांना दि. २८/३/२००८ रोजी दिलेल्या पत्रावर झालेल्या कार्यवाहीचा तपशील मागितला. परंतु त्यांना माहिती न मिळाल्याने त्यांनी दि. ५/६/२००८ रोजी प्रथम अपील केले. या अर्जावर दि. २१/७/२००८ रोजी सुनावणी आयोजित केल्याचे पत्र दि. ११/७/२००८रोजी त्यांना देण्यात आले. प्रथम अपीलावर निर्णय न झाल्याने त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील केले.

द्वितीय अपीलावरील सुनावणीच्या वेळी अपीलार्थी तसेच उत्तरवादी गैरहजर होते.

त्यामुळे अपीलार्थींना माहिती मिळाली किंवा कसे हे आयोगास समजू शकले नाही. अपीलार्थींना माहिती पुरविली नसल्यास ती त्वरित पुरविण्यात यावी. तसेच सुनावणीस उपस्थित न राहिल्याबद्दल जन माहिती अधिकारी यांचेविरुध्द कारवाई कां करु नये याचा खुलासा १० दिवसांत आयोगाच्या मुंबई कार्यालयास पाठवावा.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक ३० जानेवारी, २०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१)अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/अपील क्र.१४९१/०२

श्री. शामलाल मोतीलाल मालपाणी -----अपीलार्थी
परवानाधारक बुकस्टॉल, मनमाड बसस्थानक
मनमाड, जि. नाशिक.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा विभाग नियंत्रक ----उत्तरवादी
राज्य परिवहन महामंडळ, नाशिक.

२.जन माहिती अधिकारी तथा विभागीय वाहतूक अधिकारी
राज्य परिवहन महामंडळ, नाशिक विभाग,
नाशिक.

*---विवेचन---*

अपीलाचा दिनांक ०३/०३/२००९
सुनावणी झाल्याचा दिनांक २१/१२/२००९.
अपीलार्थी, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी अनुपस्थित.

अपीलार्थींनी त्यांच्या दि. १/९/२००८ च्या अर्जान्वये त्यांनी राज्य परिवहन महामंडळाशी केलेल्या पत्रव्यवहारावर झालेल्या कार्यवाहीचा तपशील मागितला. परंतु त्यांना उत्तर प्राप्त झाले नाही. यास्तव त्यांनी दि. २९/११/२००८ रोजी प्रथम अपील केले. अपील अर्जाच्या अनुषंगाने त्यांना कळविण्यात आले की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या माहिती अर्जाला उत्तर दिले आहे तथापि ते जर चुकीचे वाटत असेल तर त्यांनी कार्यालयात येऊन कागदपत्रांची पाहणी करावी.

उपरोक्त उत्तराने समाधान न झाल्याने त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील केले. द्वितीय अपीलावरील सुनावणीच्या वेळी अपीलार्थी व उत्तरवादी गैरहजर होते. त्यामुळे

अपीलार्थींनी कार्यालयात जाऊन कागदपत्रांची पाहणी केली किंवा कसे हे आयोगाला समजू शकले नाही. याबाबत आयोग आता असे निदेश देत आहे की, अपीलार्थींना त्यांच्या मागणीनुसार माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी त्यांना तारीख व वेळ दर्शवून कार्यालयात बोलवावे व त्यांनी मागितलेल्या माहितीशी संबंधित कागदपत्रे पाहणीसाठी उपलब्ध करुन द्यावी.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक ३० जानेवारी, २०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१)अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/अपील क्र.१३३३/०२

श्री. अशोक मंगा मुजगे -----अपीलार्थी
मु.पो. जैताणे निजामपूर,
ता. साक्री, जि. धुळे -४२४ ३०५.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा उप निबंधक ----उत्तरवादी
सहकारी संस्था, धुळे.

२.जन माहिती अधिकारी तथा सहायक निबंधक
सहकारी संस्था, साक्री, जि. धुळे.

***---विवेचन---***

अपीलाचा दिनांक १२/०६/२००९
सुनावणी झाल्याचा दिनांक ७/१२/२००९.
अपीलार्थी अनुपस्थित, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित.

अपीलार्थीनी दि. १३/१/२००९ च्या अर्जान्वये निजामपूर, ता. साक्री येथील खालील सहकारी संस्थांच्या सन २००७ च्या ऑडिट रिपोर्टच्या प्रतींची मागणी केली.

१. गोकुळदास महिला पतसंस्था
२. एकविरा महिला पतसंस्था
३. म्हसाईमाता महिला पतसंस्था
४. स्वामी विवेकानंद पतसंस्था
५. दादासाहेब बाळसेठ विस्पुते पतसंस्था
६. समर्थ पतसंस्था
७. मौलाना आझाद पतसंस्था

उपरोक्त माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी दि. १७/४/२००९ रोजी प्रथम अपील केले. तथापि त्यांना माहिती मिळाली नाही. यास्तव त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

द्वितीय अपीलावरील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी लेखी निवेदन सादर केले. त्यानुसार अपीलार्थींनी मागितलेली माहिती पतसंस्थांच्या संदर्भात असल्यामुळे अपीलार्थींनी संस्थाकडे माहितीची मागणी करावयास हवी होती. यानुसार माहिती अर्ज संबंधित संस्थाकडे पाठवावयास हवा होता. तरीही त्यांचा अर्ज जन माहिती अधिकारी यांनी स्वतःहून संस्थांना पाठविला आहे. संस्थांकडून जर माहिती मिळाली नाही तर त्यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे अर्ज करावा.

अपीलार्थी सुनावणीच्या वेळी हजर नसल्यामुळे त्यांचे म्हणणे आयोगास जाणून घेता आले नाही. याबाबत आयोगाचे असे निर्देश आहेत की, जर संबंधित संस्थांकडून अपीलार्थींना माहिती मिळाली नाही, तर ती मिळवून देण्याची जबाबदारी सहकार खात्याच्या जन माहिती अधिकारी यांची निश्चितपणे आहे. कारण ऑडिट रिपोर्टची एक प्रत सहायक निबंधकास सुध्दा पाठविण्यात येत असते. एकतर स्वतःच्या कार्यालयातील प्रत द्यावी किंवा संस्थेकडून माहिती निश्चितपणे मिळवून द्यावी . ही प्रक्रिया १० दिवसांत पूर्ण करावी.

***---आदेश---***

अपील मान्य करण्यात येत आहे.
संबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक ३० जानेवारी, २०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१)अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/अपील क्र.१३०८/०२

श्री. भगवान शंकर मराठे -----अपीलार्थी
२२, वनश्री कॉलनी, मोहाडी उपनगर,
धुळे -- ४२४ ३११.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा विभागीय वन अधिकारी (नियोजन) ----उत्तरवादी
मुख्य वन संरक्षक (प्रादेशिक) यांचे कार्यालय,
धुळे.

२.जन माहिती अधिकारी
मुख्य वन संरक्षक (प्रादेशिक) यांचे कार्यालय,
धुळे.

***---विवेचन---***

अपीलाचा दिनांक १३/०२/२००९
सुनावणी झाल्याचा दिनांक ७/१२/२००९.
अपीलार्थी , जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित.

अपीलार्थींनी दि. २/१/२००९ च्या माहिती अर्जाद्वारे श्री. व्ही.एस. चव्हाण, लेखापाल यांच्या विरुध्द सुरु असलेल्या विभागीय चौकशीशी संबंधित कागदपत्रांची मागणी केली. या अर्जाच्या उत्तरात दि. ५/१/२००९ रोजी त्यांना असे कळविण्यात आले की, विभागीय चौकशीची प्रक्रिया पूर्ण झालेली नसल्याने अधिनियमाच्या कलम ८ मधील तरतुदी विचारात घेता त्यांना माहिती देता येणार नाही. या उत्तराने समाधान न झाल्याने त्यांनी दि. १२/१/२००९ रोजी प्रथम अपील केले. यावर दि. ६/२/२००९ रोजी सुनावणी झाली व आदेश पारित करण्यात येऊन जन माहिती अधिकारी यांची भूमिका कायम करण्यात आली. यावर व्यथित होऊन त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल

केले.

द्वितीय अपीलावरील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सादर केले की, विभागीय चौकशीची प्रक्रिया पूर्ण झाली असून दि. २४/८/२००९ रोजी अपीलार्थींना माहिती पुरविण्यात आली आहे. माहिती दिलेली असल्याने खालील आदेश पारित करण्यात येत आहेत.

---*आदेश*---

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक ३० जानेवारी, २०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१)अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/अपील क्र.१३७९/०२**

**श्री. राजेश जोतसिंग गिरासे -----अपीलार्थी**
**मु.पो. वरुळ, ता. शिंदखेडा, जि. धुळे.**

**विरुध्द**

**१. अपिलीय अधिकारी तथा तहसिलदार ----उत्तरवादी**
**शिंदखेडा, जि. धुळे.**

**२.जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार**
**तहसिल कार्यालय शिंदखेडा, जि. धुळे.**

***---विवेचन---***

**अपीलाचा दिनांक २३/०७/२००९**
**सुनावणी झाल्याचा दिनांक ७/१२/२००९.**
**अपीलार्थी , जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित.**

**अपीलार्थींनी दि. १७/३/२००९ च्या माहिती अर्जान्वये खालील माहितीची मागणी केली.**

**"श्री (डॉ.) संजय चहांदे, विभागीय आयुक्त, नाशिक यांच्याकडे दि. १५/७/२००८ रोजी केलेल्या तक्रार अर्जावर केलेल्या कार्यवाहीचा तपशील. "**

**माहिती अर्जाला उत्तर प्राप्त न झाल्याने त्यांनी दि. ३/६/२००९ रोजी प्रथम अपील केले. परंतु यावर कार्यवाही झाली नाही. यास्तव त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.**

**द्वितीय अपीलावरील सुनावणीच्या वेळी प्रथम अपिलीय अधिका-यांनी त्यांचे दि. ५/१२/२००९ रोजीचे लेखी निवेदन आयोगास सादर केले. त्यावरुन असे दिसून येते की, अपीलार्थींना हवी असलेली माहिती ग्रामपंचायत स्तरावरील असून ती अपीलार्थींना पुरविण्याबाबत गट विकास अधिकारी, शिंदखेडा यांना कळविले आहे. वास्तविक पाहता अपीलार्थींनी आयुक्तांना**

दिलेल्या तक्रार अर्जावर झालेल्या कार्यवाहीचा तपशील त्यांच्या माहिती अर्जानुसार मागितला आहे. तेव्हा तक्रारीवरील कार्यवाहीचा तपशील तक्रार अर्ज ज्या कार्यालयाकडे उचित कार्यवाहीस्तव पाठविला आहे त्या कार्यालयाने माहिती देणे अपेक्षित आहे.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दि. ५/१२/२००९ च्या आदेशात ग्रामपंचायत यांनी अपीलार्थीस ७ दिवसाच्या आंत अपीलार्थीस माहिती द्यावी असे निर्देश गटविकास अधिकारी, पंचायत समिती शिंदखेडा यांनी ग्रामसेवक वरुळ/धुसरे , ता. शिंदखेडा यांना दिलेले आहेत याचा उल्लेख आलेला आहे. पण अपीलार्थीस अजूनहि माहिती मिळालेली नाही. हे आदेश मिळताच ग्रामसेवक वरुळ/ धुसरे , ता. शिंदखेडा ,जि.धुळे यांनी अपीलार्थीस अजूनहि माहिती दिली नसल्यास ती ७ दिवसांचे आत द्यावी. तसेच माहिती देण्यास विलंब लावल्याबद्दल त्यांना अधिनियमाच्या कलम २० अन्वये शास्ती कां करु नये याचा लेखी खुलासा दि. २५ फेब्रूवारी, २०१० रोजी आयोगाच्या मुंबई कार्यालयात स्वतः मजपुढे सादर करावा.

***---आदेश---***

अपील मान्य करण्यात येत आहे.

ग्रामसेवक वरुळ/धुसरे , ता.शिंदखेडा, जि. धुळे यांनी उपरनिर्दिष्ट आदेशाचे बिनचूक पालन करावे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक ३० जानेवारी, २०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१)अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/अपील क्र.१३०६/०२

क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/अपील क्र.१३१३/०२

श्री. अशोक धुडकू जाधव -----अपीलार्थी
मु. मांडळ, पो. खर्दे (बु.) ता. शिंदखेडा,
जिल्हा धुळे.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी ----उत्तरवादी
धुळे जिल्हा कोकणी आदिवासी मंडळ धुळे
संचलित प्राथमिक आदिवासी शाळा ,
धोंगडे दिगर, ता. साक्री, जि. धुळे.

२.जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक
धुळे जिल्हा कोकणी आदिवासी मंडळ धुळे
संचलित प्राथमिक आश्रम शाळा ,
धोंगडे दिगर, ता. साक्री, जि. धुळे.

***---विवेचन---***

अपीलाचा दिनांक अनुक्रमे १८/०३/२००९ व २०/४/२००९
सुनावणी झाल्याचा दिनांक ७/१२/२००९.
अपीलार्थी , जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित.

अपीलार्थीनी दि. २५/११/२००८ व १०/१/२००९ च्या अर्जान्वये शाळेच्या अतिरिक्त तुकडी संबंधात जून १९९८ ते मे २००३ च्या कालावधीतील माहितीची मागणी केली. त्यांच्या दोनही माहिती अर्जांना उत्तर न मिळाल्याने त्यांनी अनुक्रमे १०/१/२००९ व ४/३/२००९ रोजी प्रथम अपील केले. यानंतर सुध्दा त्यांना माहिती न मिळाल्याने त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपीले दाखल केली.

द्वितीय अपीलावरील सुनावणीच्या वेळी आयोगास जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सादर केले की, अपीलार्थींना १० दिवसाच्या आत माहिती पुरविण्यात येईल. याचा विचार करता जन माहिती अधिक्ारी यांना असे निर्देश देण्यात येतात की, अपीलार्थींना विनाविलंब कोणतेही शुल्क न आकारता माहिती पुरविण्यात यावी. तसेच मुदतीत माहिती न दिल्याबद्दल जन माहिती अधिकारी यांचेवर रु. १०,०००/- ची शास्ती लादण्यात येत आहे. ही शास्तीची रक्कम जन माहिती अधिकारी यांच्या १ मार्च, २०१० रोजी होणा-या पगारातून वसूल करुन शासनाने विहित केलेल्या लेखाशिर्षाखाली जमा करावी व तसा अनुपालन अहवाल आयोगास (मुंबई कार्यालय) दिनांक २० मार्च, २०१० पर्यंत पाठवावा.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

शास्ती वसूलीची जबाबदारी प्रथम अपिलीय अधिकारी यांचेवर राहिल.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक ३० जानेवारी, २०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१)अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/अपील क्र.५३९/०२

श्री. अनिल काशिनाथ वाडेकर -----अपीलार्थी
मु.पो. रनाळा, इंदिरा नगर,
ता.जि. नंदूरबार.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी ----उत्तरवादी
जिल्हा परिषद नंदूरबार.

२.जन माहिती अधिकारी
शिक्षण विभाग, जिल्हा परिषद नंदूरबार.

*---विवेचन---*

अपीलाचा दिनांक अनुक्रमे १७/११/२००८
सुनावणी झाल्याचा दिनांक ७/१२/२००९.
अपीलार्थी , जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी अनुपस्थित.

अपीलार्थीनी दि. २६/८/२००८ च्या अर्जाद्वारे खालील मुद्दयांच्या अनुषंगाने माहिती मागितली.

१. सन २००६-०७ च २००७-०८ या शैक्षणिक वर्षात नंदूरबार जिल्हयातील हंगामी वसतिगृहाच्या उच्चस्तरीय चौकशीबाबत दि. १९/३/२००८ चे निवेदन.

२. प्रोत्साहन भत्त्याच्या थकीत देयकांबाबत दि. ९ मे, २००८ रोजीचे निवेदन

३. पालक संघाबाबत दि.१५/२/२००८ रोजीचे निवेदन

४. जिल्हा परिषद शाळा, निंभेल बाबत दि. १७/७/२००८ व ७/८/२००८ रोजी दिलेले निवेदन.

उपरोक्त अर्जाला दि. २/९/२००८ रोजी मुद्देनिहाय उत्तर देण्यांत आले. परंतु या उत्तराने

समाधान न झाल्याने त्यांनी दि. ३०/९/२००८ रोजी प्रथम अपील केले. परंतु माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

द्वितीय अपीलावरील सुनावणीसाठी अपीलार्थी व उत्तरवादी गैरहजर होते. यामुळे अपीलार्थींना कोणत्या मुद्दयावर समाधान झाले नाही हे आयोगास जाणून घेता आले नाही. मात्र अपीलार्थीस ज्या चौकशीविषयी माहिती पाहिजे तशी चौकशी झालेलीच नाही असे जन माहिती अधिका-यांनी त्यांना कळविलेले आहे. त्यामुळे खालील आदेश देण्यात येत आहेत.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक ३० जानेवारी, २०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/अपील क्रमांक १२२६/०२

श्री. विजय गोविंदराव नागपुरे -----अपीलार्थी
१९, कमल कुंज, श्रीरत्न कॉलनी,
पिंप्राळा परिसर, जळगांव.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी -----उत्तरवादी
श्रमसाधना मुंबई ट्रस्ट संचलित,
अभियांत्रिकी महाविद्यालय, बांभोरी,
जि. जळगांव.

२.जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य
अभियांत्रिकी महाविद्यालय,
बांभोरी, जळगांव.

***---विवेचन---***

अपीलाचा दिनांक ३/३/२००९
सुनावणीची तारीख २७/११/२००९
अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित, अपिलीय अधिकारी अनुपस्थित.

अपीलार्थींनी दि. २/११/२००७ च्या अर्जान्वये खालील माहितीची मागणी केली.

१. दि. १/१०/२००७ रोजी आरोपपत्राविषयी मागितलेली माहिती.

२. दि. १८/८/२००७ रोजी मार्गदर्शन मिळण्याबाबत केलेल्या विनंती अर्जावर केलेली कार्यवाही व त्यासंबंधीचा दस्तऐवज

३. दि. २३/८/२००७ रोजी आवश्यक ती माहिती व दस्तऐवज खातेनिहाय चौकशी कामी उपयोगी असलेली सर्व माहिती. या अर्जाच्या उत्तरात दि. ३०/११/२००७ च्या पत्रान्वये अपीलार्थींना असे कळविण्यात आले की, मागितलेली माहिती खातेनिहाय चौकशी संबंधित असल्याने तुम्ही चौकशी अधिकारी यांचेकडे विचारणा करु शकता.

या उत्तराने समाधान न झाल्याने त्यांनी दि. ३०/१/२००८ रोजी प्रथम अपील केले. परंतु यावर सुनावणी झाली नाही. यास्तव अपीलार्थींनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

अपीलावरील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असे सादर केले की, अपीलार्थींनी मागितलेली माहिती त्यांच्या विरुध्द चालू असलेल्या विभागीय चौकशीत अपीलार्थींना देण्यात आली आहे. तसेच त्यांनी असे निवेदन केले की, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेत सार्वजनिक न्यास येत नाही व त्यांचे महाविद्यालय सार्वजनिक न्यासातर्फे चालविले जात असल्याने त्यांना माहितीचा अधिकार अधिनियम लागू होत नाही. व त्यासाठी उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाकडे पीटीशन दाखल केले आहे. उच्च न्यायालयाचा निर्णय अर्थातच सर्वांना बंधनकारक राहिल. सदर प्रकरणी अपीलार्थीस माहिती पुरविण्यात आली असल्याने खालील प्रमाणे आदेश देण्यात येतात.

***---आदेश----***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक ३० जानेवारी, २०१०. राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/अपील क्रमांक १३५७/०२

श्री. सुनिल दत्तात्रय पाटील -----अपीलार्थी
प्लॉट नं. ८५, शर्मा नगर, नवजीवन ब्लड बँकेसमोर,
ता. जि. धुळे.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा व्यवस्थापकीय संचालक -----उत्तरवादी
महिला आर्थिक विकास महामंडळ,
महाराष्ट्र गृहनिर्माण भवन, म्हाडा बिल्डींग,
कलानगर, बांद्रा (पूर्व) मुंबई ४०० ०५१.
२.जन माहिती अधिकारी तथा जिल्हा समन्वय अधिकारी
जिल्हा महिला आर्थिक विकास महामंडळ,
तुळशीराम , धुळे. जि. धुळे.

***---विवेचन---***

अपीलाचा दिनांक ३/४/२००८
सुनावणीची तारीख ८/१२/२००९
अपीलार्थी उपस्थित , जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी अनुपस्थित.

अपीलार्थीनी अर्जात नमूद केलेप्रमाणे व्यक्तिशः माहिती घेवून जावी व संस्थेच्या पातळीवरील संस्थेकडून माहिती घेवून जावी असे कळविण्यात आले होते. परंतु अपीलार्थी माहिती घेणेस आलेले नाहीत. तेव्हा अपीलार्थींनी कार्यालयात जाऊन पुन्हा माहिती पाहून माहिती घेवून जावी असे आदेश देण्यात येत आहे. संस्था पातळीवरील माहिती संस्थेकडून उपलब्ध होईल. अपीलार्थीस माहिती उपलब्धतेबाबतचे उत्तर विहित मुदतीत न दिल्याने जन माहिती अधिकारी यांना समज देण्यात येत आहे.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक ३० जानेवारी, २०१०.

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/अपील क्रमांक १५८०/०२**

**श्री. (ॲड्.) दिलावरखान पठाण -----अपीलार्थी**
**चेंबर नं. ११३, बिल्डींग नं. २,**
**जिल्हा न्यायालय परिसर, नाशिक.**

**विरुध्द**

**१. अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक (मु) -----उत्तरवादी**
**ॲन्टी करप्शन ब्युरो, पांडुरंग बुधकर मार्ग,**
**लोअर परेल, मुंबई ४०० ०१३.**

**२.जन माहिती अधिकारी तथा पोलीस उप अधीक्षक**
**ॲन्टी करप्शन ब्युरो, मधु इंडस्ट्रीयल इस्टेट,**
**१ ला मजला, पांडुरंग बुधकर मार्ग,**
**लोअर परेल, मुंबई ४०० ०१३.**

***---विवेचन---***

**अपीलाचा दिनांक ३/६/२००९**
**सुनावणीची तारीख २२/१२/२००९**
**अपीलार्थी , जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित.**

**अपीलार्थींनी दि. १०/१२/२००८ च्या अर्जान्वये खालील माहिती मागितली.**

**१. ॲड्. दिलावरखान पठाण यांनी दि. ४/१०/२००३ रोजी तत्कालीन पोलीस आयुक्त प्रकाश पवार यांच्याविरुध्द दिलेल्या तक्रारी संदर्भात माहिती.**

**२. अप्पर पोलीस आयुक्त श्री. फतेसिंह गायकवाड यांना पाठविण्यात आलेल्या आदेश क्र. ६७२६ दि. ११/८/२००६ ची छायांकित प्रत.**

**३. आदेश क्र. ६७२६/०६ च्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीचा तपशील**

**४. दि. ४/१०/२००२ रोजीच्या अर्जाबाबतच्या अहवालाबाबतची माहिती.**

**५. श्री. कुडेकर , श्री. श.ल. आपटे, डॉ. जय जाधव यांच्या चौकशी संबंधातील अहवालांची व कागदपत्रांची माहिती.**

**या अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दि. १६/१/२००९ रोजी उत्तर दिले. परंतु या उत्तराने समाधान न झाल्याने त्यांनी दि. १२/२/२००९ रोजी प्रथम अपील केले. यावर असा निर्णय देण्यात आला की, सि.बी.आय. , ॲन्टी करप्शन ब्युरो यांच्या मार्फत दि. ४/१०/२००२ रोजी कार्यालयास प्राप्त झालेल्या अर्जावर काय कार्यवाही झाली याबाबत आवश्यक माहिती अपीलार्थीस लवकरात लवकर पुरवावी. या निर्णयाने व्यथित होऊन त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील केले.**

**द्वितीय अपीलावरील सुनावणीच्या वेळी आयोगासमोर सादर करण्यात आले की, अपीलार्थींना माहिती पुरविण्यात आली आहे. अपीलार्थींच्या कथनानुसार पुरविलेली माहिती परिपूर्ण नाही. अशा परिस्थितीत अपीलार्थींनी नस्तीचे अवलोकन करावे व उर्वरित जे कोणते कागदपत्र त्यांना पाहिजे असतील त्याच्या प्रती त्यांना विनाशुल्क देण्यात याव्यात.**

***---आदेश---***

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**(डॉ.सुरेश वि. जोशी),**

**दिनांक ३० जानेवारी, २०१०.** **राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/अपील क्रमांक १५५१/०२

श्री. पां. भा. करंजकर -----अपीलार्थी
सदिच्छा , पत्रका कॉलनी, त्र्यंबक रोड,
नाशिक.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा धर्मादाय आयुक्त -----उत्तरवादी
खरवंदा पार्क, नाशिक.

२.जन माहिती अधिकारी
धर्मादाय सहआयुक्त नाशिक यांचे कार्यालय, नाशिक.

***---विवेचन---***

अपीलाचा दिनांक २१/७/२००९
सुनावणीची तारीख २२/१२/२००९
अपीलार्थी , जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित.

अपीलार्थींनी दि. १८/५/२००९ च्या अर्जान्वये शरणपूर डायोसेशन कौन्सिल ट्रस्ट च्या चौकशीबाबत माहिती विचारली. या अर्जाच्या उत्तरात प्राप्त माहिती अपेक्षित माहिती नाही व चुकीची आहे हे कारण नमूद करुन त्यांनी दि. १०/६/२००९ रोजी प्रथम अपील केले. प्रथम अपीलावर सुनावणी न झाल्याने त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

द्वितीय अपीलावरील सुनावणीच्या वेळी असे सादर करण्यात आले की, अपीलार्थींनी मागितलेली माहिती चौकशी संबंधी असून चौकशी पूर्ण होताच ती त्यांना पुरविण्यात येईल. सबब खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येतात.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
दिनांक ३० जानेवारी, २०१०. राज्य मुख्य माहिती आयुक्त.

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/अपील क्रमांक १३२८/०२**

**श्री. प्रकाश कौडाजी राशिनकर -----अपीलार्थी**
**शांताई रामनगर, मु.पो. पिंपळनेर,**
**ता. साक्री, जि. धुळे.**

**विरुध्द**

**१. अपिलीय अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी -----उत्तरवादी**
**जिल्हाधिकारी कार्यालय धुळे, जि. धुळे.**

**२.जन माहिती अधिकारी तथा चिटणीस (महसूल शाखा)**
**जिल्हाधिकारी कार्यालय धुळे, जि. धुळे.**

***---विवेचन---***

**अपीलाचा दिनांक १७/६/२००९**
**सुनावणीची तारीख ७/१२/२००९**
**अपीलार्थी , जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित.**

**अपीलार्थी श्री. प्रकाश कौडाजी राशिनकर यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १७/६/२००९ रोजी द्वितीय अपील सादर केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नवीन प्रशासकीय इमारत, जिल्हाधिकारी कार्यालय सभागृह धुळे येथे दि. ७/१२/२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपिलीय अधिकारी तसेच जन माहिती अधिकारी व अपीलार्थी उपस्थित होते.**

**अपीलार्थींनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि्‍ १९/३/२००९ रोजी अर्ज करुन (१)मौजे पिंपळनेर (ता.साक्री) येथील गावठाण स.नं. ६८६/अ मधील भूखाडालगतच्या नाल्याचे बाजूस केलेल्या बांधकामाचे अतिक्रमण काढणेबाबत झालेला पत्रव्यवहार व (२) उप विभागीय अधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद धुळे यांच्याकडून झालेल्या चौकशीबाबतचा अहवाल इत्यादि माहिती मागितली होती.**

जन माहिती अधिकारी यांनी दि. ३०/४/२००९ च्या अर्जाद्वारे (१) मुख्य कार्यकारी अधिकारी धुळे (२) उप विभागीय अधिकारी धुळे व विभागीय आयुक्त नाशिक यांना सादर केलेला अहवाल याच्या प्रती अपीलार्थीस देण्यात आल्या आहेत.

विहित कालावधीत व अपूर्ण, चुकीची , दिशाभूल करणारी माहिती पुरविल्यामुळे अपीलार्थीनी कलम १९(१) अन्वये प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी त्यांचे दि. ५/६/२००९ रोजी आदेश पारित करुन अपीलार्थीस हवी असलेली अधिक माहिती पुरविलेली आहे. तरीही माहिती अपूर्ण , मूळ माहिती न देणे , अनावश्यक माहिती पुरविली म्हणून अपीलार्थीनी द्वितीय अपील दाखल केले.

द्वितीय अपीलाच्या सुनावणीच्या वेळी अपीलार्थी तसेच प्रथम अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते. सुनावणीच्या वेळेस झालेल्या साधक बाधक चर्चेत असे दिसून आले की, गावठण नं.६८६/अ मधील भूखंड ३५ लगत असलेल्या बांधकामावरील अतिक्रमण हटविण्यासाठी केलेल्या तक्रारीत अपीलार्थीच्या पत्नी यांनी मा.सिव्हील जज्ज सो. सिनियर डिव्हीजन कोर्टात रे.मु.नं. ३२६/१ हा दावा दाखल केलेला आहे. त्यात जिल्हाधिकारी व तहसिलदार असे धरुन ४/५ प्रतिवादी आहेत. सदर दावा प्रलंबित असून न्यायप्रविष्ठ आहे. सदर दाव्यात ढवळाढवळ करणे योग्य होणार नाही. ती मे. कोर्टाच्या निकालावरच अवलंबून ठेवावी असे मत मा. जिल्हा सरकारी वकील धुळे यांनी कळविले आहे. अपीलार्थीस जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी विस्तृत प्रमाणांत विनामूल्य माहितीच्या प्रती पुरविलेल्या आहेत असे दिसून येते. त्या पुढीलप्रमाणे.-

अपीलार्थी यांनी दि. १७/११/२००३ च्या अर्जावर केलेल्या कार्यवाहीची माहिती मिळणेकामी दि. १९/३/२००९ रोजी माहितीच्या अधिकारात अर्ज केलेला आहे. सदर अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांनी म. मुख्य कार्यकारी अधिकारी जि.पं. धुळे व म. उपविभागीय अधिकारी धुळे भाग, धुळे यांनी सादर केलेल्या चौकशी अहवालाच्या खालील प्रमाणे प्रती अपीलार्थी यांना दि. ३०/३/२००९ रोजी पुरविल्या आहेत.

१. म.मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.धुळे यांचा दि. २२/६/२००४ चा चौकशीअहवाल.

२.  म.उपविभागीय अधिकारी धुळे भाग,धुळे यांचा दि.५/२/२००७ चा चौकशी अहवाल.

३.  म.विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांना म. जिल्हाधिकारी धुळे यांनी सादर केलेला दि. २१/८/०७ चा अहवाल.

जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थी यांना वरीलप्रमाणे दि. ३०/४/२००९ रोजी माहिती अलाहिदा पुरविली आहे.

तथापि खालील कागदपत्रांच्या नकला पुन्हा अपीलार्थी यांना विनामूल्य पुरविण्यात आल्या आहेत.

१.  विस्तार अधिकारी (ग्रा.पं.)पंचायत समिती, साक्री यांचा दि. ३१/३/२००४ चा अहवाल

२.  गट विकास अधिकारी, पंचायत समिती, साक्री यांचा दि.३१/३/२००४ चा अहवाल

३.  गट विकास अध्किारी ,पंचायत समिती साक्री यांचा दि. १५/६/२००४ चा अहवाल

४.  म.मुख्य कार्यकारी अधिकारी जि.पं.धुळे यांचा दि. २२/६/२००४ चा अहवाल

५.  म.जिल्हा सरकारी वकील, धुळे यांचे दि. १६/६/२००७ चे अभिप्राय.

वरील प्रमाणे अपीलार्थी यांना आवश्यक त्या कागदपत्रांच्या नकला मुदतीत पुरविण्यात आल्या असून, त्यांचा दि. ७/५/२००९ चा अपील अर्ज दि. ५/६/०९ अन्वये निकाली काढण्यात आला असून तसे लेखी अपीलार्थीस कळविण्यात आले आहे.

राहिला मुद्दा न्यायालयीन निवाडयाचा त्याची निर्णयप्रक्रिया सुरु असून न्यायप्रक्रियेत अडथळा येऊ नये हे सरकारी वकीलांचे म्हणणे योग्य आहे. तरी या परिस्थितीत मी खालील आदेश देत आहे.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक ३० जानेवारी, २०१०.

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/अपील क्रं. ५१३६/०२**

**श्री. भिमराव पांडुरंग पवार** **------ अपीलकर्ता**
**१४२/४८२६,नेहरु नगर, कुर्ला (पूर्व),**
**मुंबई - ४०० ०२४**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **------- उत्तरवादी**
**पोलीस महासंचालक,महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे कार्यालय,**
**कुलाबा,शहीद भगतसिंग मार्ग,मुंबई**

**जन माहिती अधिकारी, तथा**
**पोलीस महासंचालक,महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे कार्यालय,**
**कुलाबा,शहीद भगतसिंग मार्ग,मुंबई**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक : निरंक
सुनावणीचा दिनांक : १२.०१.२००९
अपिलार्थी : अनुपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपीलीय अधिकारी : अनुपस्थित

सुनावणीच्या वेळेला हे स्पष्ट झाले की अर्जदाराने याच विषयावर अपील क्रमांक ५०८३ व हे सुध्दा अपील केलेले आहे पण त्यावर दिनांक १८ डिसेंबर २००९ रोजी निर्णय दिलेला आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांक: १२.०१.२००९**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/अपील क्रं. ५१३५/०२**

**श्री. संतोष दत्तात्रय जाधव** ------ **अपीलकर्ता**
**३/१६९,आनंद इस्टेट,केरमानी इमारत,**
**सानेगुरुजी मार्ग,चिंचपोकळी,**
**मुंबई - ४०० ०११**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** ------- **उत्तरवादी**
**कार्यकारी अभियंता,सहायक मनपा आयुक्त यांचे कार्यालय,**
**जी/दक्षिण विभाग, ना.म.जोशी मार्ग, लोअर परेल,**
**मुंबई - ४०० ०१३**

**जन माहिती अधिकारी, तथा**
**सहायक अभियंता( परिरक्षण), सहायक मनपा आयुक्त यांचे कार्यालय,**
**जी/दक्षिण विभाग, ना.म.जोशी मार्ग, लोअर परेल,**
**मुंबई - ४०० ०१३**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक : २७.१०.२००९
सुनावणीचा दिनांक : १२.०१.२००९
अपिलार्थी : अनुपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित

अपीलार्थीने त्यांच्या माहितीच्या अधिकाराच्या अर्जानुसार त्यांनी ज्या कामासंबंधी माहिती मागितली होती त्याची एकत्रित पाहणी करण्यात आली व पुनर्दुरुस्तीची कामे पुर्ण केल्या नंतर पुन्हा दिनांक १०.१२.२००९ रोजी या कामाची पुन्हा एकत्रित पाहणी करण्यात आली व त्यांची झालेल्या कामामुळे व दिलेल्या माहितीमुळे समाधान झालेले आहे असे लिहून दिलेले आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांक: १२.०१.२००९**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/४४९१३/अपील क्रं. ५१८०/०२**

**श्री. आयवन पॉल डिसोझा** **------ अपीलकर्ता**
**परेरावाडी, मार्वे बिच जवळ, मार्वे रोड,**
**मालाड (प), मुंबई - ४०० ०९५**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **------- उत्तरवादी**
**सहायक कामगार आयुक्त (कोंकण विभाग),**
**अपर कामगार आयुक्त यांचे कार्यालय, कॉर्नर्स सेंटर, ताडदेव,मुंबई - ४०० ०३४**

**जन माहिती अधिकारी, तथा**
**कामगार अधिकारी (कोंकण विभाग),**
**अपर कामगार आयुक्त यांचे कार्यालय, कॉमर्स सेंटर, ताडदेव,मुंबई - ४०० ०३४**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक : ३१.१०.२००९
सुनावणीचा दिनांक : १३.०१.२००९
अपिलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : उपस्थित

अर्जदाराच्या अर्जानुसार सदरील कार्यालयातील सन २००५-०७ व ०९ या वर्षाचे स्थायी आदेश नोंदवहीच्या प्रती तसेच ३ आस्थापनाच्या स्थायी आदेशाच्या प्रती अर्जदारास पाहिजे होत्या.

अर्जदारास इतर माहिती देण्यात आलेली आहे मात्र ज्या ३ आस्थापनांच्या स्थायी आदेशांच्या प्रती पाहिजे होत्या त्या अजुन देण्यात आलेल्या नाहीत. जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे असे की या स्टँडींग ऑरडर्स् त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नसल्यामुळे देण्यात आल्या नाहीत. असे जर असेल तर हे रेकॉर्ड त्यांनी तयार करुन घ्यायला पाहिजे व त्यासाठी नमूद केलेली माहिती मॅनेजमेंट व युनीयन यांच्याकडून प्राप्त करुन घेता येईल व ती अर्जदारास द्यावी लागेल ही जबाबदारी जशी माहितीच्या अधिकाराखाली आहे तशीच ती कामगार विभागाशी संबंधी अधिकाऱ्यांवर जे इंडस्ट्रियल एम्प्लॉयमेंट स्टँडींग ऑरडर्स् सेंट्रल रुल्स्, १९४६ यातील कलम ८ नुसार आहे. तेव्हा एक महिन्याच्या आत स्वतःच्या कार्यालयातूत द्यावी किंवा स्वतःच्या कार्यालयात नसेल तर कॉपी मॅनेजमेंट व युनीयन यांच्याकडून घ्यावी व कार्यालयाचे रेकॉर्डर्स् पुर्ण करावे व त्यांच्या प्रती अर्जदारास विनाशुल्क देण्यात यावी.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

संबंधीतांनी उपरिनिर्दीष्ट कार्यवाही करावी.

( डॉ. सुरेश वि.जोशी )
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांकः १३.०१.२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ २००९/४४६९७/अपील क्रं. ५१८३/०२

श्री. अफताब अ. सिध्दीकी ------ अपीलकर्ता
४, सदानंद क्लासीक, प्लॉट नं. ५२८, ३३ वा रोड,
खार (प), मुंबई - ५२

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------- उत्तरवादी
उप सचिव नगर विकास विभाग, नवि - ११ ,
मंत्रालय,मुंबई - ४०० ०३२

**जन माहिती अधिकारी, तथा**
**कक्ष अधिकार,नगर विकास विभाग, नवि - ११ ,**
**मंत्रालय,मुंबई - ४०० ०३२**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक : २०.१०.२००९
सुनावणीचा दिनांक : १३.०१.२००९
अपिलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : उपस्थित

अर्जदाराच्या अपीलाच्या बाबतीत अपीलीय अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन दिले.

" विषयांकित प्रकरणी संदर्भाधीन पत्राच्या अनुषंगाने नम्रपणे असे सादर करु इच्छितो की, या विभागातील तत्कालीन सह सचिव श्री.के.एन.खवारे हे दिनांक २५.०६.२००९ पासून दिर्घमुदतीच्या रजेवर गेले होते. श्री.खवारे यांच्या रजेच्या काळात त्यांच्याकडे माहितीच्या अधिकाराखालील काही अपील अर्ज इ. टपाल प्रलंबित होते. श्री.खवारे रजेवर असताना माझी दिनांक ६.०८.२००९ रोजी पासून उप सचिव पदावर नगर विकास विभागात पदस्थापना करण्यात आली. नगर विकास विभागात रुजु झाल्यानंतर मी माझ्या नियंत्रणाखालील कार्यासनाच्या जन माहिती अधिकाऱ्यांची बैठक घेऊन त्यांना माहितीच्या अधिकाराखालील प्रलंबित अर्जाचा त्वरेने निपटारा करण्याबाबत सूचना दिल्या.

श्रीमती आफताब सिद्दीकी यांनी दिनांक ३.०७.२००९ च्या अर्जान्वये त्यांनी शासनास पाठविलेली विविध निवेदने/तक्रारीवरील कार्यवाहीची माहिती मागितली होती. सदर माहिती त्यांना जन माहिती अधिकारी, कार्यासन नवि/२१ यांनी त्यांच्या दिनांक २७.०७.२००९ रोजीच्या पत्रान्वये पाठविली होती. दिलेल्या माहितीने समाधान न झाल्याने श्रीमती आफताब सिद्दीकी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ अन्वये केलेल्या प्रथम अपीलास अनुसरुन दिनांक ८.०९.२००९ रोजी मी सुनावणी ठेवली होती. सदर सुनावणीस श्रीमती आफताब सिद्दीकी यांच्यावतीने श्रीमती डॅफने वॅरापेन या उपस्थित होत्या. सदर सुनावणीच्या वेळी त्यांनी जन माहिती अधिकारी, नवि/२१ यांनी पुरविलेल्या माहितीमध्ये शासनाकडून आयुक्त,बृहन्मुंबई महानगरपालिका यांना पाठविलेले दिनांक २७.०७.२००९ चे पत्र प्राप्त न झााल्याचे निदर्शनास आणून दिले. त्यामुळे सदर पत्राची प्रत त्यांना सुनावणीच्या वेळी तेथेच ताबडतोब देण्यात आली व त्याची पोच पावती घेण्यात आली. (प्रत सोबत जोडत आहे) तसेच त्यांची मूळ तक्रार बृहन्मुंबई महानगरपालिकेशी संबंधीत असल्याने त्याबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे पाठपुरावा करावा असे त्यांना सांगण्यात आले. अशा प्रकारे त्यांच्या प्रथम अपील अर्जाचा निपटारा करण्यात येत आहे असेही अपील अर्जदाराच्या प्रतिनिधी श्रीमती वॅरापेन यांचे निदर्शनास आणण्यात आले.

श्रीमती आफताब सिद्दीकी यांनी शासनाकडे विविध तक्रार अर्ज केले होते. त्या संदर्भात बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून प्राप्त झालेल्या अहवालाची प्रतदेखील त्यांना दिनांक ३१.१०.२००९ च्या पत्राव्दारे पाठविण्यात

आली आहे. श्रीमती सिद्दीकी यांनी त्यांच्या व्दितीय अपीलात नमूद केलेल्या सी.डी.मला माझ्या कार्यालयात अथवा कार्यासनात ठेवल्याचे आढळून आले नाही."

दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकल्या नंतर पुढील निर्देश देण्यात येत आहेत. अर्जदाराच्या अर्जातील अनुक्रमांक V (I) येथे उल्लेखलेले दिनांक ३१.१२.२००८ चे पत्र नगर विकास विभागाच्या अभिलेख्यात उपलब्ध नाही. मात्र हे पत्र मुख्यमंत्री कार्यालयाने ते पत्र नगर विकास विभागाकडे पाठविल्याचे पत्र अर्जदाराकडे आहे. तो नंबर घेऊन नगर विकास विभागाने ते पत्र मुख्यमंत्री कार्यालयातुन प्राप्त करुन घ्यावे व त्यावर कार्यवाही करावी. अर्जदाराचे जे अर्ज मुख्यमंत्री कार्यालयातून नगर विकास विभागाकडे प्राप्त झाले होते त्यावर महापालिका आयुक्तांकडून अहवाल मागविण्यात आला व तो अहवाल प्राप्त झाल्या नंतर त्याच्या प्रती अर्जदारास देण्यात आलेल्या आहे असे दिसून आले. अपिलीय अधिकाऱ्यांनी जे काही मौखिक आदेश दिले असतील ते आदेश लेखी काढणे आवश्यक आहे याची नोंद अपीलीय अधिकारी यांनी घ्यावी.

**आदेश**

**अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.**
**संबंधीतांनी उपरिनिर्दीष्ट कार्यवाही करावी.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः १३.०१.२००९**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/४४९१८/अपील क्रं. ५१८४/०२**

**श्री. कौस्तुभ दत्तात्रय गोखले** **------ अपीलकर्ता**
**सिध्दीविनायक प्रसाद, डॉ.शामा प्रसाद मुखर्जी रोड,**
**डोंबीवली (पूर्व), ता.कल्याण,**
**जि. ठाणे - ४०० २०१**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **------- उत्तरवादी**
**उप सचिव नगर विकास विभाग, नवि - १२ ,**
**मंत्रालय,मुंबई - ४०० ०३२**

**जन माहिती अधिकारी, तथा**
**कक्ष अधिकार,नगर विकास विभाग, नवि - १२ ,**

## - वि वे च न -

अपीलाचा दिनांक : २१.१०.२००९
सुनावणीचा दिनांक : १३.०१.२००९
अपिलार्थी : अनुपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित
नगर विकास विभाग अधिकारी : उपस्थित

अर्जदाराच्या अपीलाबाबत जन माहिती अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन दिले.

श्री. कौस्तुभ दत्तात्रय गोखले यांनी दिनांक २३.०७.२००९ रोजीच्या अर्जान्वये कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या हद्दीतील प्रभाग क्रं.१ व २ या प्रभागात आरक्षित जागेवर किती अधिकृत/अनधिकृत बांधकामे झालेली आहेत व त्याबाबतचा तपशील, त्याची आरक्षण निहाय माहिती, अनधिकृतता निश्चित करणेबाबत डयु प्रोसेस ऑफ ऑ, प्रभाग क्रं.१ व २ मधील लोकसंख्येची घनता,क्रिटीकल आरक्षण व नॉन क्रिटीकल आरक्षणे या बाबतची माहिती, विकास आराखडयाबाबतचे निकष, तत्कालीन कल्याण व डोबिवली नगरपरिषदांच्या विकास योजनेतील आरक्षणांची माहिती,नव्याने आरक्षणे प्रस्तावित करण्यात आलेल्या जागेवरील आरक्षणाबाबतची माहिती इत्यादि ७ मुद्यांवर माहिती मागितली होती.

०२. श्री.गोखले यांच्या माहितीच्या अधिकारातील उक्त अर्जाच्या अनुषंगाने माहिती अधिकारी (नवि-१२) यांनी दिनांक ३.०८.२००९ च्या पत्रान्वये अर्जदारास खालीलप्रमाणे मुद्येनिहाय कळविले आहे-

मुद्दा क्रमांक १,२,३,६,७ - सदर मुद्दे कल्याण - डोबिंवली महानगरपालिकेशी संबंधीत असल्यामुळे आपला अर्ज कल्याण - डोबिंवली महानगरपालिकेकडे अग्रेषित करण्यात येत आहे.

मुद्दा क्रमांक ४ - कल्याण - डोबिंवली महानगरपालिका हद्दीतील क्रिटीकल आरक्षणे निश्चित करण्याबाबत शासनाने आयुक्त, कल्याण - डोबिंवली महानगरपालिका यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठीत केली होती. सदर समितीने शासनास सादर केलेल्या अहवालानुसार क्रिटीकल व नॉन क्रिटीकल आरक्षण असे विभाजन करण्यात आले आहे. सदर अहवालाची प्रत आपणास आवश्यक असल्यास त्यासाठी रु.२४/- अधिक नोंदणीकृत डाकचे शुल्क रु.२५/- असे एकुण रु ४९/- धनाकर्षाव्दारे,मनीऑर्डरव्दारे पाठविल्यास किंवा विभागाच्या रोख शाखेत जमा केल्यास सदर अहवालाची प्रत आपणास उपलब्ध करुन देण्यात येईल.

मुद्दा क्रमांक ५ - सदर मुद्दा उपसंचालक,नगर रचना,विशेष घटक,विकास योजना कल्याण - डोंबिवली यांचेशी संबंधीत असल्यामुळे आपला अर्ज त्या कार्यालयाकडे अग्रेषित करण्यात येत आहे.

०३. माहिती अधिकारी म्हणून उपलब्ध कागदपत्राच्या आधारे जन माहिती अधिकारी यांनी लेखी खुलासा खालीलप्रमाणे सादर केला.

अर्जदार श्री.गोखले यांनी त्यांच्या दिनांक २३.०७.२००९ च्या अर्जामध्ये उपस्थित केलेले मुद्दे व त्या संदर्भात माहिती अधिकारी यांनी दिनांक ३.०८.२००९ च्या पत्रान्वये दिलेले उत्तर विचारात घेता माहिती अधिकारी यांनी कल्याण - डोंबिवली महानगरपालिका प्रारुप विकास आराखडा प्रभाग क्र.१ व २ बाबतची संपुर्ण सद्यःस्थिती दर्शक माहिती अर्जदारास उपलब्ध करुन दिलेली आहे व जी माहिती शासन स्तरावर उपलब्ध नाही,अशी माहिती कल्याण - डोंबिवली महानगरपालिका व उप संचालक नगर रचना, विशेष घटक यांचे कार्यालयाकडून अर्जदारास उपलब्ध करुन देण्याबाबत कळविले आहे.

मुद्दा क्रमांक ४ - बाबत अपीलकर्त्यानी रु.४९/- इतकी रक्कम विभागच्या रोख शाखेत जमा केल्यानंतर त्यांना दिनांक ४.०९.२००९ च्या पत्रान्वये संबंधीत अहवालाची प्रत पाठविण्यात आली आहे. तसेच मुद्दा क्रमांक ५ बाबतची माहिती उप संचालक नगर रचना, विशेष घटक विकास योजना कल्याण यांनी अर्जदारास उपलब्ध करुन दिलेली आहे. तसेच दिनांक १४.१०.२००९ च्या अपील आदेशामध्ये प्रथम अपीलीय अधिकारी यांनी कल्याण - डोंबिवली महानगरपालिकेस त्यांच्याकडे उपलब्ध असलेली उक्त मुद्यांची माहिती उपलब्ध करुन द्यावी तसेच सदरची माहिती महानगरपालिकेच्या विविध विभागाशी संबंधीत असल्यामुळे त्याचे समन्वयन आयुक्त कल्याण - डोंबिवली महानगरपालिका यांनी करावे असे कळविले आहे.

अर्जदार श्री.गोखले यांचा दिनांक २३.०७.२००९ रोजी अर्ज या विभागास दिनांक २८.०७.२००८ रोजी प्राप्त झाला असून विभागाने दिनांक ३.०८.२००९ च्या पत्रान्वये अर्जदारास विहित मुदतीत उत्तर दिलेले आहे त्यामुळे याप्रकरणी कोणताही विलंब झालेला नाही. ही वस्तुस्थिती विचारात घेता अर्जदाराने सादर केले अपील फेटाळणे योग्य होईल असे मत आहे."

क्रिटीकल व नॉन क्रिटीकल आरक्षणे याबाबत असे वर्गीकरण कल्याण - डोंबिवली महानगरपालिके संबंधीच्या अहवालात केलेला आहे व त्या संबंधीचे विश्लेषण हे अहवालामध्ये आहे ज्याची प्रत अर्जदाराकडे आहे. कायद्यात तशी विवक्षीतपणे तरतुद नाही. असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले.

अर्जदाराच्या अर्जातील मुद्दा क्रमांक १,२,३,६ व ७ हे मुद्दे कल्याण डोंबिवली महानगरपालिकेशी संबंधीत असल्यामुळे अर्जदाराचा अर्ज कल्याण डोंबिवली महानगरपालिकेकडे पाठविण्यात आला होता पण अर्जदारास माहिती मिळाली नाही असे त्यांचे म्हणणे आहे. सुनावणीच्या वेळेला महानगरपालिकेचे प्रतिनीधी उपस्थित नव्हते. अर्जदाराने त्याच्या अपीलामध्ये या अधिकाऱ्यांचा उल्लेख केला होता त्यामुळे त्यांनाही नोटीस काढणे आवश्यक होते. मात्र तसे इ ालेले दिसून येत नाही.

अर्जदाराचे अपील स्वयंस्पष्ट असल्याने महापालिकेच्या जन माहिती अधिकाऱ्यांनी अर्जदारास अजुन पर्यंत माहिती दिली नसल्यास ती ७ दिवसांच्या आत द्यावी. तसेच शासनाकडून अर्ज प्राप्त झाल्या नंतर विहित मुदतीत

अर्जदारास माहिती का दिली नाही याचा खुलासा त्यांनी आयोगास हे आदेश मिळाल्यापासून १० दिवसांच्या आत सादर करावा.

**आदेश**

**अपील अंशतःमान्य करण्यात येत आहे.**
**संबंधीतांनी उपरिनिर्दीष्ट कार्यवाही करावी.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः १३.०१.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/४४९२०/अपील क्रं. ५१८६/०२**

**श्री. राजू धनराज साळवे** **------ अपीलकर्ता**
**हिरानंदानी इमारत नं. ११,**
**रुम नं. ३०८, मानखुर्द, मुंबई**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **------- उत्तरवादी**
**प्रमुख (पुनर्वसन व पुनर्वसाहत), एमएमआरडीए, वांद्रे (पूर्व), मुंबई - ५१**

**जन माहिती अधिकारी, तथा**
**एमएमआरडीए, वांद्रे (पूर्व), मुंबई - ५१**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक : २७.१०.२००९
सुनावणीचा दिनांक : १३.०१.२००९
अपिलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित

प्रथम अपीलीय आदेशानुसार अर्जदारास आय.डी.क्रमांक - ७२७,७१९,७१४ व ७५३ बाबत माहिती पाहिजे होती व ती जन माहिती अधिकारी यांनी द्यावी असे निर्देशही देण्यात आले होते. त्याप्रमाणे माहिती देण्यात आली. अर्जदाराचे म्हणणे आय.डी.क्रमांक ७५३ बद्दल माहिती देण्यात आलेली नाही पण या क्रमांकाचा आय.डी. अस्तित्वातच

नाही. असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. अर्जदाराच्या म्हणण्यानुसार त्यांना जी माहिती देण्यात आली त्याप्रमाणे जागेवर परिस्थिती नाही याबाबत अर्जदाराने तक्रार केल्यास त्याची शहानिशा करुन घेता येईल असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांक: १३.०१.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/४४९२७/अपील क्रं. ५१८७/०२**

**श्री. मिर्झा अबुलहसन अबुल कुद्दुस मिर्झा ------ अपीलकर्ता**
**बी-४०८, सागर अपार्टमेंट,फादर पिटर परेरा रोड,**
**सोनापुर लेन,एल.बी.एस.मार्ग, कुर्ला (प),**
**मुंबई ४०० ०७०**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------- उत्तरवादी**
**पोलीस उप आयुक्त, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-३, मुंबई**

**जन माहिती अधिकारी, तथा**
**सहायक पोलीस आयुक्त, मध्य प्रादेशिक नियंत्रण कक्ष**
**बावळा कंपाऊंड डॉ.बी.ए.रोड, भायखळा (पूर्व),**
**मुंबई - २७**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक : २६.१०.२००९
सुनावणीचा दिनांक : १३.०१.२००९
अपिलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित

दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकल्या नंतर असे दिसून आले की प्रथम अपीलीय अधिकाऱ्यांच्या आदेशानंतर जन माहिती अधिकारी यांनी वरिष्ठ पोलीस निरीक्षक, विनोबा भावे पोलीस ठाणे यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती अपिलार्थी यांना दिलेली आहे. त्या माहितीने समाधान न झालने केलेल्या प्रथम अपीलाचे आदेश उशीरा मिळाले असे अपिलार्थीचे

म्हणणे आहे. प्रथम अपीलाशी डिस्पॅच संबंधात असलेल्या कर्मचारी यांच्या घरी मृत्यु झाल्यामुळे प्रथम अपीलाचे आदेश पाठविण्यात दिरंगाई झाली मात्र त्यात कुठचाही कुहेतू नव्हता, असे अपिलीय अधिकारी यांचेकडून स्पष्ट करण्यात आले. तसेच व्दितीय अपीलाच्या अनुषंगाने पुढीलप्रमाणे अतिरिक्त माहिती अर्जदारास सुनावणीच्या वेळी देण्यात आलेली आहे.

" वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.व्ही.बी.नगर पोलीस ठाणेयांचेकडून व्दितीय अपिलाच्या अनुषंगाने प्राप्त झ ाालेल्या माहितीमध्ये अपीलार्थी श्री.मिर्झा अबुल हसन यांचा तक्रार अर्ज हा मा. पोलीस उव-आयुक्त,परिमंडळ-५, यांनी दिनांक ५.०२.२००८ रोजी Filed (दप्तरी दाखल) असा शेरा मारल्याची साक्षांकित प्रत ( संपुर्ण पृष्ठे क्रमांक १ ते ३२ ) अन्वये देण्यात येत आहे. तसेच अपीलार्थी यांचे अर्जातील मुद्दा क्रमांक ए(II) च्या अनुषंगाने श्री.सुनिल कंक यांचा लेखी जबाब नोंदविल्याची साक्षांकित प्रत सुध्दा अपीलार्थीस पुरविण्यात येत आहे." ही माहिती सुनावणीच्या वेळी अपिलार्थीस देण्यात आली.

त्यामुळे अर्जदार मागत असलेली रेकॉर्डला असलेली माहिती ही देण्यात आलेली आहे त्यामुळे पुढीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः १३.०१.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**मुमाआ २००९/४४५५५/तक्रार क्रमांक ६७६/०२**

**श्री. डेसमंड ए.डिसोझा,** **------ तक्रारकर्ता**
**४, वैकुंठ अपार्टमेंट्स, ३१-ए,माउंट मेरी रोड,**
**वांद्रे (प), मुंबई - ४०० ०५०**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी** **------- उत्तरवादी**
**धर्मादाय आयुक्त यांचे कार्यालय, वरळी, मुंबई १८**

**जन माहिती अधिकारी, तथा**
**धर्मादाय आयुक्त यांचे कार्यालय, वरळी, मुंबई १८**

**- वि वे च न -**

अर्जदाराच्या तारीख नसलेल्या व आयोगाच्या कार्यालयाला २० ऑक्टोबर २००९ रोजी दाखल झालेले अपील वजा तक्रारीची सुनावणी दिनांक १४.०१.२०१० रोजी घेण्यात आली, त्यावेळेला तक्रारकर्ते व जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अर्जदाराला सेंट जॉन बापटीश चर्च, ठाणे यांच्या जमिनीच्या विक्री व्यवहाराबाबतची माहिती पाहिजे होती त्याबाबतीत अर्जदाराच्या दिनांक १६.०४.२००९ रोजीच्या पत्रा प्रमाणे अर्जदाराने नस्तीचे निरिक्षण करुन हवी असलेली माहिती प्रमाणित प्रतीच्या स्वरुपात प्राप्त करुन घेतलेली आहे असे दिसून आले. त्या नंतर १४.०७.२००९ रोजी सुध्दा अर्जदाराने नंतर मागितलेली माहिती प्रत्यक्ष विनामुल्य देण्यात आलेली आहे. अर्जदाराने सांगितले की त्यांनी १२ जुन २००९ रोजी स्ट्रस्टच्या संदर्भात धर्मादाय आयुक्त यांच्या कार्यालयाकडे तक्रार केली होती. त्या संदर्भात त्यांना अजुन काहीही कळविण्यात आलेले नाही.

जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की या तक्रार अर्जाच्या प्रती सहायक धर्मादाय आयुक्त, ठाणे यांना २१ जुलै २००९ रोजी पाठविण्यात येऊन अर्जावर आवश्यक कार्यवाही करुन अर्जदार व यांना लेखी कळविण्यात आलेले आहे. या पत्राची प्रत श्रीयुत डिसुजा यांना दिलेली आहे. अर्थात अर्जदाराचे समाधान या तक्रारीची चौकशी होऊन निर्णय मिळाल्यानेच होणार आहे. याबाबतीत संबंधीत कार्यालयाकडून चौकशी पुर्ण करुन अहवाल प्राप्त झाल्यावर त्यासंबंधीची माहिती देण्यात येईल असेही जन माहिती अधिकारी यांनी सांगितले त्यादृष्टीने पाठपुरावा जन माहिती अधिकारी करतील.

**आदेश**

**तक्रार निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः १४.०१.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेल्या तक्रारी.**

**मुमाआ २००९/४६१३८/तक्रार क्रमांक ६८१/०१**
**मुमाआ २००९/४६१३७/तक्रार क्रमांक ६८२/०१**

**श्री. चेतन कोठारी** ------ **तक्रारकर्ता**
**५२,ओशियानी अपार्टमेंट,**
**डॉ.राजाबाली पटेल लेन,बी.देसाई रोड,**
**मुंबई २६**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी** ------- **उत्तरवादी**
**कार्यकारी अभियंता, (मेंटेनन्स),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, कार्यालय,**
**एच/पूर्व विभाग, १३७,टी.पी.एस.५,रोड नं.२,**
**प्रभात कॉलनी, सांताक्रुझ (पूर्व), मुंबई ५५**

**जन माहिती अधिकारी, तथा**
**कार्यकारी अभियंता, (मेंटेनन्स),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, कार्यालय,**
**एच/पूर्व विभाग, १३७,टी.पी.एस.५,रोड नं.२,**
**प्रभात कॉलनी, सांताक्रुझ (पूर्व), मुंबई ५५**

## - वि वे च न -

अपील क्रमांक ५०४४ ते ५०४९, ५०५४, ५०५६ अपीलांचे ३.१२.२००९ रोजी आदेश देतांना अर्जदारास अनधिकृत धार्मिक स्थळांच्या बाबतीत जी माहिती पाहिजे होती ती तयार स्वरुपात उपलब्ध असेल तर ती सात दिवसांच्या आत व माहिती संकलित करुन द्यावयाची असेल तर दहा दिवसांच्या आत पाठविण्यात यावी असे निर्देश दिले होते.

वरील माहिती न मिळाल्यामुळे अर्जदाराने दिनांक २९.१२.२००९ रोजी तक्रार दाखल केली. या तक्रारीची सुनावणी दिनांक १४.०१.२०१० रोजी घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी असे दिसून आले की अर्जदारास हवी असलेली माहिती १०,११ व १६ डिसेंबर २००९ रोजी जन माहिती अधिकारी यांनी पोष्टाने पाठविलेली आहे. एच (पूर्व) भाग व एस विभाग याची माहिती अर्जदारास मिळाली असे सांगितले. एल विभागाची माहिती ही मिळाली नाही मात्र दिनांक १६.१२.२००९ रोजी स्पिड पोष्टाने माहिती पाठविल्याचा पोष्टाचा दाखला हा त्या जन माहिती अधिकारी यांच्याकडे आहे.

त्या माहितीची प्रत वेगळयाने अर्जदारास देण्याचे निर्देश देण्यात आले. अर्जदारास माहिती मिळाली असल्यामुळे तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

**आदेश**

**तक्रार निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः १४.०१.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**मुमाआ २००९/४१६७८/तक्रार क्रमांक ६८५/०२**

**श्री. विनायक चिंतामणी पाटील ------ तक्रारकर्ता**
**सी/२०४,विकास नगर, जिजामाता मार्ग,**
**पंपहाऊस, अंधेरी (पूर्व)**
**मुंबई**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **------- उत्तरवादी**
**शिक्षण निरीक्षक,बृहन्मुंबई ग्रँटरोड, (पूर्व),मुंबई ४०० ००७**
**जन माहिती अधिकारी, तथा**
**इंडियन एज्युकेशन सोसायटी, राजा शिवाजी विद्यासंकुल,हिंदु कॉलनी, दादर, मुंबई ४०० ०१४**

**- वि वे च न -**

अपील क्रमांक २४६६ मध्ये दिलेल्या आदेशाचे पालन झाले नाही म्हणुन तक्रारकर्ते श्रीयुत विनायक पाटील यांनी आयोगाकडे दिनांक २७.०५.२००९ रोजी तक्रार केली. सुनावणीच्या वेळेला जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की आगोयाच्या आदेशानुसार संस्थेच्या ९ शाळांमधील प्राथमिक/माध्यमिक विभागातील शिक्षणाच्या सेवा जेष्ठता यादीच्या छायांकित प्रती घेऊन जावयास अर्जदारास कळविण्यात आले होते. मात्र अर्जदाने शुल्कही भरलेले नाही व प्रती घेण्यासही ते संस्थेकडे आलेले नाही. सुनावणीच्या वेळेला संस्थेच्या प्रतिनिधींनी सांगितले की अनुदानीत संस्थेच्या सेवा जेष्ठता यादी तयार आहे व विना अनुदानीत सेवा जेष्ठता यादीसाठी काही कालावधी लागेल. हा कालावधी किती लागू शकेल हे शिक्षण विभागाच्या शिक्षण निरीक्षक विभाग निश्चित करावे त्यानुसार या सेवा जेष्ठता यादी अर्जदारास देण्यात यावी. कारण ही माहिती शिक्षण विभागा कायद्यानुसार ॲक्सेस करु शकतात. जी माहिती तयार आहे ती माहिती सोमवार दिनांक १८ जानेवारी २०१० रोजी दुपारी ३ वाजता अर्जदारास देण्यात यावी असे ही ठरविण्यात आले.

**आदेश**

**तक्रार निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः १४.०१.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/४४९२८/अपील क्रं. ५१९४/०२**

**श्री.दिनकर कमलाकर पाटील** **---------अपीलकर्ता**
**टी/६, चाळ खोली क्र.८ अ/१, सायन हॉस्पीटल कंपाउंड,**
**भाऊ दाजी रोड, सायन मुंबई २२**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **--------- उत्तरवादी**
**शिक्षण निरीक्षक, शिक्षण निरीक्षक,बृहन्मुंबई दक्षिण विभाग,**
**टोपीवाला लेन, म्युनि सेकंडरी स्कुल इमारत, ग्रँट रोड, मुंबई ४०० ००७**

**जन माहिती अधिकारी**
**शिक्षण निरीक्षक,बृहन्मुंबई दक्षिण विभाग,**
**टोपीवाला लेन, म्युनि सेकंडरी स्कुल इमारत, ग्रँट रोड, मुंबई ४०० ००७**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक : ०३.११.२००९
सूनावणीचा दिनांक : १४.०१.२००९
अपिलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपीलय अधिकारी : उपस्थित

अर्जदार श्रीयुत दिनकर कमलाकर पाटील यांनी लिटील ॲनेपल्स एज्युकेशन ट्रस्टच्या माध्यमाने चालविण्यात येणाऱ्या शास्ती गल्ली व सुलोचना शक्ती मार्ग येथील शाळेत होणाऱ्या लग्न समारंभासाठी महापालिकेची परवानगी घेतली असल्यास त्याची प्रत देण्यात यावी अशी विनंती केली. त्याला प्रतिसाद न मिळाल्यामुळे अंतिमतः त्यांनी आयोगाकडे धाव घेतलेली आहे. सुनावणीच्या वेळेला अशी माहिती अर्जदारास १० दिवसांच्या आत देण्यात यावी असे निर्देश देण्यात आले.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः १४.०१.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/४४९२५/अपील क्रं. ५१९५/०२**

**श्री.प्रकाश गोविंद नवाथे** **---------अपीलकर्ता**
**२०४/राजबाग दलुचंद को.ऑ.हौ.सोसायटी,**
**२७१,ससर भालचंद्र मार्ग, माटुंगा, मुंबई - १९**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **--------- उत्तरवादी**
**उप प्रमुख अभियंता, बृहन्मुंबई महानगरपालिका, ई विभाग,**
**भायखळा, मुंबई - ४०० ००८**

**जन माहिती अधिकारी**
**कार्यकारी अभियंता, बृहन्मुंबई महानगरपालिका, ई विभाग,**
**भायखळा, मुंबई - ४०० ००८**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक : २७.०१.२००९
सूनावणीचा दिनांक : १४.०१.२००९
अपिलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित

अर्जदारास रिडेव्हलपमेंट प्रॉपर्टी दलुचंद निवास, राजबागसाठी विज पुरवठा मिळण्यासाठी महापालिकेने दिलेल्या नाहरकत प्रमाणपत्राची प्रत याची माहिती पाहिजे होती. मात्र अर्जदारास सदर नाहरकत प्रमाणपत्र हे इमारतीच्या धारणीत उपलब्ध नाही असे अर्जदारास कळविण्यात आले. अर्जदाराला पुढील दोन पैकी एक जी गोष्ट खरी आहे त्या स्वरुपात माहिती पाहिजे आहे.

१. सदर ना हरकत प्रमाणपत्र दिलेलेच नाही म्हणून इमारतीच्या धारणीमध्ये उपलब्ध नाही. २) सदर ना हरकत प्रमाणपत्र दिलेले होते परंतु आज इमारतीच्या धारणीतून नाहीसे/गहाळ झाले आहे,म्हणून इमारतीच्या धारणीत उपलब्ध नाही.

जन माहिती अधिकारी यांच्या म्हणण्यानुसार नाहरकत पमाणपत्राऐवजी आक्युपेशन सर्टिफीकीट दिले असेल तर आक्युपेशन सर्टिफीकीट बेसीसवर सुध्दा विज पुरवठा करता येऊ शकतो अर्थात अर्जदारास ही माहिती नको आहे. त्यांना शक्य तोवर ज्या पध्दतीने माहिती पाहिजे तशा पध्दतीने देण्याचा प्रयत्न करावा तसे शक्यच नसेल तर तशा निष्कर्षापर्यंत पोहचता येत नसेल तर स्पष्टपणे नमुद करुन अर्जदारास उत्तर द्यावे.

**आदेश**
**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांक: १४.०१.२०१०**

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ २००९/४४९२२/अपील क्रं. ५१९६/०२

श्री.रामलाल शामलाल पाल ---------अपीलकर्ता
आर-३१,मारी अम्मा नगर डा.ऐबी मार्ग,
वरळी, मुंबई

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा --------- उत्तरवादी
सहायक अभियंता मनपा आयुक्त,
सहायक अभियंता मनपा आयुक्त यांचे कार्यालय,
जी/साउथ वार्ड कार्यालय ना.म.जोशी मार्ग,
मुंबई १३

जन माहिती अधिकारी

**सहायक अभियंता, सहायक अभियंता मनपा आयुक्त यांचे कार्यालय,**
**जी/साउथ वार्ड कार्यालय ना.म.जोशी मार्ग,**
**मुंबई १३**

## - वि वे च न -

सहायक आयुक्त जी/दक्षिण यांच्या दिनांक १८.०८.२००९ रोजीच्या आदेशा विरुध्द सदरील अपील आहे. अर्जदारास नेहरु सेंटर ते ई-मोजेस रस्ता या प्रस्तावित रस्त्याच्या रुंदीकरणात विस्थापित होणाऱ्या झ ोपडपट्टी धारकांची सुची, प्लॅन वगैरे बाबत माहिती पाहिजे होती. अर्जदाराचा हा अर्ज वसाहत अधिकारी जी/दक्षिण विभाग यांनी उप मुख्य अभियंता (विकास नियोजन) यांच्याकडे पाठविला व त्या कार्यालयातील संबंधीत नस्तीची पाहणी अर्जदार यांनी करुन आवश्यक ती कागदपत्रे घेतलेली आहेत.

अर्जदाराच्या अर्जात १८० झोपडपट्ट्या धारकांची सुची असा एक उल्लेख आहे, त्याचा खुलासा करतांना वसाहत अधिकारी यांनी सांगितलेकी २००४ साली सहायक आयुक्त यांनी जी टीपणी तयार केली होती त्या टिपणीमध्ये या रस्त्याच्या कामात अंदाजे १८० झोपडया विस्थापि होतील असे लिहीलेले आहे याचा अर्थ अर्जदार ज्या प्रमाणे घेतात की त्या ठिकाणी १८० च झोपडया होत्या व १८० चीच सुची मिळावयास पाहिजे. असा होऊ शकत नाही. "अंदाजे "हा शब्द प्रयोग असल्याने प्रत्यक्ष तपासणी अंती त्यात बदल होऊ शकतो.

संबंधीत नस्ती अर्जदाराने पाहिलेली आहे व वसाहत अधिकारी यांचा खुलासा पटण्यासारखा वाटतो त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः १४.०१.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/४४९२१/अपील क्रं. ५१९९/०२**

**श्री.प्रविण शामराव माने ---------अपीलकर्ता**
**२०२/३, हंसा भवन दोलतनगर,रोड नं. १०,**
**बोरीवली (पूर्व), मुंबई ६६**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा --------- उत्तरवादी**
**उपप्रमुख अभियंता, उप मुख्य अभियंता इमारत प्रस्ताव (प.उ) -२,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,सी विंग, संस्कृती कॉम्प्लेक्स,**
**९० फुट डी.पी.रोड,सेंट लॉरेन्स शाळेजवळ कांदिवली (पूर्व), मुंबई -१०१**

**जन माहिती अधिकारी**
**कार्यकारी अभियंता, (इ/प्रस्ताव),**
**उप मुख्य अभियंता इमारत प्रस्ताव (प.उ)-२,बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**सी विंग, संस्कृती कॉम्प्लेक्स,९० फुट डी.पी.रोड,सेंट लॉरेन्स शाळेजवळ,**
**कांदिवली (पूर्व), मुंबई -१०१**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक : २७.१०.२००९
सूनावणीचा दिनांक : १५.०१.२००९
अपिलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपीलीय अधिकारी : उपस्थित

अपीलीय अधिकाऱ्यांच्या आदेशानुसार दिनांक ११.११.२००९ रोजी अर्जदारस धारणी दाखविण्यात आली असे सांगितले. या धारणीची पाहणी सुनावणीच्या वेळी करण्यात आली व अर्जदारास आजच दुपारी त्यातील मुळ व

सुधारित प्लॅनची प्रत हया विनामुल्य देण्याचे निर्देश देण्यात आले. तसेच अर्जदारास पुन्हा नस्ती पाहवयाची असल्यास तीही त्यांना दाखविण्यात यावी असेही निर्देश देण्यात आले.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः १५.०१.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/४४९३८/अपील क्रं. ५२०५/०२**

**श्री.सुरेंद्र मारुती मोहिते** **-------अपीलकर्ता**
**२५२, डॉ.ऑबेडकर चौक,**
**कुर्ला (प), मुंबई - ४०० ०७०**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा** **-------- उत्तरवादी**
**कार्यकारी अभियंता (परिरक्षण), बृ.मुं.मनपा एल वॉर्ड,कुर्ला (प),**
**मुंबई - ४०० ०७०**

**जन माहिती अधिकारी**
**सहायक अभियंता (पाणी खाते), बृ.मुं.मनपा एल वॉर्ड,कुर्ला (प),**
**मुंबई - ४०० ०७०**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक : ०३.११.२००९
सूनावणीचा दिनांक : १५.०१.२००९
अपिलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित

सुनावणीच्या वेळेला हे स्पष्ट झाले की, अपीलीय अधिकाऱ्यांच्या आदेशाप्रमाणे अर्जदारास नळाची जोडणी देण्यात आलेली आहे. त्यामुळे आता त्यांना इतर माहितीत स्वारस्य नाही.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः १५.०१.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/४४९२२/अपील क्रं. ५१९६/०२**

**श्री.रामलाल शामलाल पाल** ---------अपीलकर्ता
**आर-३१,मारी अम्मा नगर डा.ऐबी मार्ग,**
**वरळी, मुंबई**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** --------- उत्तरवादी
**सहायक अभियंता मनपा आयुक्त,**
**सहायक अभियंता मनपा आयुक्त यांचे कार्यालय,**
**जी/साउथ वार्ड कार्यालय ना.म.जोशी मार्ग,**
**मुंबई १३**

**जन माहिती अधिकारी**
**सहायक अभियंता, सहायक अभियंता मनपा आयुक्त यांचे कार्यालय,**
**जी/साउथ वार्ड कार्यालय ना.म.जोशी मार्ग,**
**मुंबई १३**

**- वि वे च न -**

सहायक आयुक्त जी/दक्षिण यांच्या दिनांक १८.०८.२००९ रोजीच्या आदेशा विरुध्द सदरील अपील आहे. अर्जदारास नेहरु सेंटर ते ई-मोजेस रस्ता या प्रस्तावित रस्त्याच्या रुंदीकरणात विस्थापित होणाऱ्या झ ाोपडपट्टी धारकांची सुची, प्लॅन वगैरे बाबत माहिती पाहिजे होती. अर्जदाराचा हा अर्ज वसाहत अधिकारी जी/दक्षिण

विभाग यांनी उप मुख्य अभियंता (विकास नियोजन) यांच्याकडे पाठविला व त्या कार्यालयातील संबंधीत नस्तीची पाहणी अर्जदार यांनी करुन आवश्यक ती कागदपत्रे घेतलेली आहेत.

अर्जदाराच्या अर्जात १८० झोपडपट्टया धारकांची सुची असा एक उल्लेख आहे त्याचा खुलासा करतांना वसाहत अधिकारी यांनी सांगितलेकी २००४ साली सहायक आयुक्त यांनी जी टीपणी तयार केली होती त्या टिपणीमध्ये या रस्त्याच्या कामात अंदाजे १८० झोपडया विस्थापि होतील असे लिहीलेले आहे याचा अर्थ अर्जदार त्या ठिकाणी १८० च झोपडया होत्या व १८० चीच सुची मिळावयास पाहिजे. "अंदाजे "हा शब्द प्रयोग असल्याने प्रत्यक्ष तपासणी अंती त्यात बदल होऊ शकतो.

संबंधीत नस्ती अर्जदाराने पाहिलेली आहे व वसाहत अधिकारी यांचा खुलासा पटण्यासारखा वाटतो त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांक: १४.०१.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/जळगांव/अपील क्रं. १२०२/०२**

**श्री.मोयोद्दीन आमानोद्‌दीन** **---------अपीलकर्ता**
**कसाली मोहल्ला, मुल्ला टेक,**
**मु.पो.ता.अमळनेर,**
**जि.जळगाव**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा** **--------- उत्तरवादी**
**अधिक्षक,भूमी अभिलेख,जळगांव**

**तालुका निरीक्षक तथा जन माहिती अधिकारी**
**भूमी अभिलेख, एरंडोल ता.एरंडोल,जि.जळगांव**

**- वि वे च न -**

श्री.मोयोद्दीन आमानोद्‌दीन रा.अमळनेर यानी दिनांक ३०.०८.२००७ रोजी जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक, भुमी अभिलेख, एरंडोल जि.जळगांव यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार माहितीची मागणी केली. जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २५.०९.२००७ रोजी अर्जदारास माहिती पुरविली आहे. त्या माहितीने समाधान झाले नाही म्हणून माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) अनुसार अधीक्षक, भुमी अभिलेख, जळगांव यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनी दिनांक ७.११.२००७ रोजी आदेश पारित केले.

प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचे आदेशाने समाधान झाले नाही म्हणून अपिलार्थीने दिनांक ११.०२.२००८ अन्वये व्दितीय अपील दाखल केले. सदर व्दितीय अपीलाची सुनावणी दिनांक २६.११.२००९ रोजी विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत अल्पबचत भवन, जिल्हाधिकारी कार्यालय जळगाव येथे सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सदर सुनावणीस अपीलार्थी गैरजहर होते. माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय प्राधिकारी उपस्थित होते.

अपीलार्थीने दाखल केलेल्या व्दितीय अपीलासोबत कागदपत्रे पाहता असे दिसून येते की अपीलार्थीच्या अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी माहिती पुरविलेली आहे तसेच त्या प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनी देखील आदेश पारित केलेले आहेत.

**आदेश**

**अपीलार्थीस माहिती दिली असल्याने**
**अपील अमान्य करण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः १६.०१.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**मुमाआ २००९/४४४२९/तक्रार क्रमांक ६९२/०२**

**श्री. प्रा.वैभव एकनाथ नरवडे** **------ तक्रारकर्ता**
**अ/३०१,शिप्रेरणा को-ऑप.हौसिंग सोसायटी,**
**वीर सावरकर नगर, साकीनाका लिंक रोड,**
**साकीनाका,मुंबई - ४०० ०७२**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी,** **------- उत्तरवादी**
**मा.प्रबंधक, मुंबई विद्यापीठ, मुंबई**

**- वि वे च न -**

श्रीयुत वैभव नरवडे यांनी आयोगाकडे दिनांक ८ आक्टोबर २००९ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम १८ (३) अन्वये तक्रार केली आहे. त्यात अनेक मुद्दे आहेत. या तक्रारीतील दोन मुद्दयांची दखल घेण्यात येत आहे. इतर तक्रारीची दखल त्या त्या केसेसमध्ये घेण्यात आली किंवा घेण्यात येत आहे.

यासंबंधात सुनावणी दिनांक १२.०१.२०१० रोजी घेण्यात आली. त्या वेळेला अर्जदार यांना मदत करण्यासाठी श्रीयुत नानगीया व विद्यापीठाचे प्रतिनिधी उपस्थित होते. अर्जदार हे स्वतः मुंबई विद्यापीठाचे अधीसभा सभासद आहेत व विद्यापीठाच्या सभेत त्यांनी मुंबई विद्यापीठात व विद्यापीठाच्या अंतर्गत असणाऱ्या सर्व महाविद्यालयात माहितीच्या अधिकाराचे फलक लागावेत म्हणुन विद्यापीठाला जे आयोगाने आदेश दिले होते त्या आदेशाच्या बाबतीत त्यांनी मांडलेल्या प्रस्तावावर जे उत्तर देण्यात आले त्यानुसार बऱ्याच महाविद्यालयात अजुनही जन माहिती अधिकारी प्रथम अपिलीय अधिकारी यांचे फलक लागलेले नाहीत तसेच कलम ४ खालील माहिती ही काही कॉलेजेसना दिलेली नाही. अशी अधिसभेत सादर करण्यात आलेली कॉलेजेसची यादी सुध्दा श्रीयुत नरवडे यांनी आयोगास सादर केलेली आहे.

माहितीचा अधिकार अधिनियम राज्यात लागू होऊन ४ वर्षाहून जास्त कालावधी लोटलेला आहे पण काही जन प्राधिकरणे - कॉलेजनी अजुन पर्यंत त्यांची जबाबदारी पार पाडलेली नाही ही अतिशय गंभीर गोष्ट आहे. आयोग याची गंभीरतेने दखल घेत आहे व प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांना असे निर्देश देत आहे की त्यांनी सहसंचालक उच्च शिक्षण कार्यालयातील वरिष्ठ अधिकारी व मुंबई विद्यापीठाचे वरिष्ठ अधिकारी यांची एक टीम तयार करुन त्यांनी ज्या कॉलेजमध्ये अंमलबजावणी झालेली नाही असा अहवाल आलेला आहे त्या कॉलेजेसना स्वतः भेट घ्यावी व आपल्या उपस्थित असे फलक लाऊन घ्यावेत तसेच कलम ४ मध्ये दिलेल्या माहितीचीही त्यांच्या उपयुक्ततेच्या व परीपुर्णतेच्या दृष्टिने तपासणी करावी. जर कलम ४ ची माहिती त्या महाविद्यालयाने तयार केली नसेल तर ती आपल्या उपस्थित करुन घ्यावी. ज्या ज्या महाविद्यालयाने अशा रितीने माहितीच्या अधिकाराच्या प्रती त्यांचे उत्तरदायीत्व पुर्ण करण्यास कुचराई केलेली आहे त्याच्या संबंधात अधिकाऱ्यांवर चौकशी होऊन त्यांना शासन होणे हेही आवश्यक आहे

त्यादृटिने प्रधान सचिव यांनी प्रशासनिक चौकशी करावी व संबंधीत दोषी अधिकाऱ्यांविरुध्द कारवाई करावी असे निर्देश आयोग देत आहे.

**आदेश**

**तक्रार निकाली काढण्यात येत आहे.**

**या आदेशाची प्रत ( व कॉलेजची तक्रारदारांनी सादर केलेली यादी) प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग यांनी योग्य त्या कार्यवाहीसाठी व आयोगास १५ एप्रिल २०१० पुर्वी अहवाल देण्यासाठी पाठविण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः १६.०१.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/अपील क्रं. १४३७/०२**

**श्री. नरेंद्र बारकु चाधरी ------ अपीलकर्ता**
**दैनिक राजरंग टाईम्स,बाफना मार्केट, तळमजला,**
**महाराणा प्रताप चौक, मनपा समोर,**
**धुळे**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा ------- उत्तरवादी**
**कार्यकारी अभियंता, जि.प.बांधकाम विभाग, नाशिक**

**जन माहिती अधिकारी, तथा**
**जि.प.बांधकाम उप विभाग, पं.स.निफाड, जि.नाशिक**

**- विवेचन -**

अपीलाचा दिनांक : ०४.०८.२००९
सुनावणीचा दिनांक : ०८.१२.२००९
अपिलार्थी : अनुपस्थित
जन माहिती अधिकारी : अनुपस्थित
प्रथम अपीलीय अधिकारी : अनुपस्थित

अपीलार्थीनी दिनांक २३.०४.२००९ च्या अर्जान्वये सन २००८-०९ या कालावधीची खालील माहिती मागितली.

१) उप विभागांतर्गत करण्यात आलेल्या कामांची नावे.

२) योजनेचे नाव.

३) अंदाजपत्रकीय तरतूद.

४) मंजूर रक्कम.

५) प्रत्यक्ष खर्च.

६) कामाची सद्यस्थिती.

७) कामावर देखरेचा करणाऱ्या अधिकाऱ्यांचे नाव.

८) काम करण्याऱ्या एजन्सीचे नाव व पत्ता.

उपरोक्त माहितीसाठी शुल्क रु.४५/- भरण्याबाबत त्यांना दिनांक २९.०४.२००९ रोजीच्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी यांनी कळविले. त्यानंतर त्यांना माहिती पुरविण्यात आली. पुरविलेली माहिती अपुर्ण असल्याचे त्यांनी दिन.१२.०५.२००९ रोजी जन माहिती अधिकारी यांना पत्राने कळविले. परंतु पुर्ण माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी दि.१६.०६.२००९ रोजीच्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी यांनी असे कळविले की त्यांच्या मागणीनुसार माहितीच्या शुल्का पोटी रु.१२५/- चा भरणा करावा व माहिती घेऊन जावी. तथापि त्यांनी रक्कम भरली नाही.

माहिती न मिळाल्याने त्यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. व्दितीय अपीलावरील सुनावणीच्या वेळी अपीलार्थी व उत्तरवादी गैरहजर होते. त्यामुळे वस्तुस्थिती आयोगाला जाणून घेता आली नाही. सदर प्रकरणी खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहेत.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**

राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांकः १६.०१.२०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ २००९/४४९९१/अपील क्रं. ५२१२/०२

श्री. विमल किशोर कचोलिया ------ अपीलकर्ता
६२, उषा बिल्डींग,१६१ एच-४,एस.व्ही.रोड,
विलेपार्ले (प),मुंबई ५६

विरुध्द

प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा ------- उत्तरवादी
जिल्हा उप निबंधक सहकारी संस्था, जिल्हा उप निबंधक,
सहकारी संस्था (उ), म्हाडा इमारत,तळमजला, रुम नं. ६९, वांद्रे (पूर्व), मुंबई ५१

जन माहिती अधिकारी, तथा
उप निबंधक सहकारी संस्था, जिल्हा उप निबंधक,
सहकारी संस्था (उ), म्हाडा इमारत,तळमजला, रुम नं. ६९, वांद्रे (पूर्व), मुंबई ५१

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक : ०५.११.२००९
सुनावणीचा दिनांक : १६.०१.२०१०
अपिलार्थी यांचे प्रतिनीधी : उपस्थित
जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनीधी : उपस्थित

अपिलास अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे खुलासा सादर केला.

" श्री.विमल कचोलिया यांनी या कार्यालयाकडे दिनांक १०.०८.२००९ (प्राप्त दिनांक ११.०८.२००९) रोजी माहितीचा अधिकार २००५ अंतर्गत दिलेल्या अर्जाचे अनुषंगाने या कार्यालयाने त्यांना दि.१०.०९.२००९ रोजी उत्तर दिलेले आहे. सदर उत्तराची प्रत सुलभ संदर्भासाठी या पत्रासोबत जोडुन सादर करण्यांत येत आहे. या कार्यालयाने दिनांक १९.०९.२००९ च्या पत्रान्वये मुद्दा क्र.३ व ४ साठी अर्जदार यांना या कार्यालयात कार्यालयीन वेळेत उपस्थित राहून उपलब्ध असलेली माहिती/कागदपत्रे प्राप्त करुन घेणे बाबत कळविलेले होते. त्यानुसार श्री.विमल कचोलिया हे दि.८.१०.२००९ रोजी उपस्थित राहून त्यांनी कार्यालयात उपलब्ध असलेली नोंदणीच्या अ धारीकेची पहाणी करुन त्यामधील ५१ पानांच्या झेरॉक्स प्रती प्राप्त करुन घेतलेल्या आहेत. दरम्यानच्या कालावधीत अर्जदार यांनी मा.जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था (३) मुंबई यांचेकडे अपील दाखल केले होते. मा.जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था (३) मुंबई यांनी सदरची सुनावणी घेऊन सदर अर्जाबाबत दि.१२.१०.२००९ रोजी आदेश पारित केले असुन सदर आदेशामध्ये त्यांनी मुद्दा क्र.ई बाबत अर्जदारांना सन २००० पासुन कोण समिती सदस्य आहेत याबाबत माहि हवी आहे. सदरची माहिती संस्था स्तरावरील असल्याने संस्थेने बंधपत्रे ठेवली असल्यास उपनिबंधक सहकारी संस्था के/प विभाग मुंबई यांनी सदरची माहिती अर्जदाराना द्यावी. मुद्दा क्र.फ बाबतची माहिती ही सन १९९० पासुनची काही संस्थेने उपनिबंधक सहकारी संस्था के/पश्चिम विभाग मुंबई यांचे कार्यालयास कागदपत्रे सादर केली असल्यास ती, कागदपत्रे अर्जदार यांना पुर्व सुचना देऊन कार्यालयात बोलवुन १५ दिवसांत अर्जदाराना उपलब्ध करुन द्यावीत. असे नमुद करुन अर्जदार यांचे अपील अंशतः मान्य केलेले आहे.

संस्थेने या कार्यालयास सन १९९० पासुन कागदपत्रे सादर केलेली नाहीत. मा. प्रथम अपीलिय अधिकारी यांनी दिलेल्या आदेशाप्रमाणे व्यवस्थापक समितीने सादर केलेले बंधपत्रे बंधपत्राची प्रत छायांकित प्रती या कार्यालयास सादर केल्याचे उपलब्ध असलेल्या नोंदवहया वरुन दिसुन येत नाही. याबाबत या कार्यालयाने दिनांक ६.११.२००९ च्या पत्रान्वये अहवाल प्रथम अपिलिय अधिकारी यांना सादर केलेला आहे. मा.कार्यासन अधिकारी महाराष्ट्र शासन यांचे कडील परिपत्रक क्र.केमाअ-२००८/प्र.क्र.९३/०८ सहा(मा अ), दिनांक ६.०९.२००८ च्या परिपत्रकामध्ये असे नमुदकेले आहे की, या अधिनिमयांतर्गत माहिती पुरवितांना सार्वजनिक प्राधिकरणाकडे कलम २ (च) मध्ये व्याख्यातील व उपलब्ध असलेली माहिती पुरविणे अभिप्रेत असुन जेथे वेगळयाने माहितीचे संकलन, संशोधन,पृथ्थकरण अरणे आवश्यक आहे अशा स्वरुपातील माहिती पुरविणे अभिप्रेत नाही. तथापि मा.प्रथम अपिलिय अधिकारी यांनी दिलेली आदेशाप्रमाणे या कार्यालयाने दिनांक २६.१०.२००९ च्या पत्रान्वये संस्थेकडून बंधपत्राच्या प्रती सादर करण्याच्या सुचना देण्यांत आलेल्या होत्या . तथापि अद्यापही सदर बंधपत्राच्या प्रती उपलब्ध झालेल्या नाहीत. तदनंतर या कार्यालयाने दिनांक ६.०१.२०१० च्या पत्रान्वये संस्थेकडून अद्यापही उत्तर प्राप्त झालेले नाही या वरुन आपण बंधप्रे स्विकारलेली नाहीत असे अनुमान निघते तरी या बाबत संस्थेवर पुढील कारवाई का करण्यांत येऊ नये याबाबतचा खुलासा संस्थेकडून मागविण्यांत आले

आहे. सदरचा खुलासा प्राप्त झाल्यानंतर आवश्यकते नुसार महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ मधील तरतुदीप्रमाणे पुढील कारवाई करण्यांत येईल. असे कळविलेले आहे.

श्री. विमल कचोलिया यांनी दाखल केलेल्या माहितीच्या अधिकारातील अर्जाच्या अनुषंगाने त्यांना कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती उपलब्ध करुन दिलेली असुन त्यांनी आपणाकडे सादर केलेली अपिल फेटाळण्यांत यावे हि नम्र विनंती."

दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकल्या नंतर चालू असलेली कार्यवाही पुर्ण करण्यास किती दिवस लागतील असे विचारले असता अंदाजे १५ दिवस असे उत्तर देण्यात आले. तेव्हा अर्जदारास २० दिवसांच्या आत उर्वरित माहिती देण्यात यावी असे निर्देश देण्यात आले.

**आदेश**

**अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.**
**जिल्हा उप निबंधक यांनी उपरिनिर्दीष्ट आदेशाची अंमलबजावणी करावी.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः १६.०१.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले तक्रार.**

**मुमाआ २००९/जळगांव/सी.आर अपील क्रं. १४३०/०२**

**श्री.राजेंद्र भिमराव सामुद्रे ---------अपीलकर्ता**
**डॉ.ऑबेडकर चौक, साक्री, ता.साक्रीश**
**जि.धुळे**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी --------- उत्तरवादी**
**विद्याविकास मंडळ साक्रीयसि.गो.पाटील कला,**
**विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, साक्री, ता.साक्री,जि.धुळे**

**जन माहिती अधिकारी**
**विद्याविकास मंडळ साक्रीयसि.गो.पाटील कला,**
**विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, साक्री, ता.साक्री,जि.धुळे**

**- वि वे च न -**

अपीलकार श्री.राजेंद्र भिमराव सामुद्रे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १७.०३.२००९ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नवीन प्रशाकीय इमारत, जिल्हाधिकारी कार्यालय, सभागृह, धुळे,जि.धुळे येथे दि. ०८.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी तसेच जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

अपीलार्थीनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे २५.११.२००९ रोजी अर्ज करुन खालील नमूद माहिती मागितली आहे.

१) आपल्या संस्थेने चालविलेल्या एकूण वरिष्ठ महाविद्यालयांची संख्या.

२) वर्ग २ व वर्ग ३ अधिकारी कर्मचाऱ्यांच्या त्रियुक्त्या बिंदु नामावरीलप्रमाणे केल्या आहेत का.

३) पदे भरतांना शासनाचे नाहरकत प्रमाणपत्र.

४) रोस्टर रजिस्टरची छायांकित प्रत.

५) पदे भरतांना मागासवर्गीयांचा विचार केला किंवा नाही याची विचारणा.

६) शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा सेवा जेष्ठता सुचीची माहिती देणे.

जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ६.१२.२००८ च्या पत्राव्दारे अपिलार्थीस यांच्या अखत्यारित/कार्यालयांस उपलब्ध असलेली माहिती दिली. अपिलार्थीचे सदर माहितीने समाधान न झाल्याने त्यांनी नियम २००५ च्या कलम १९ (१) नुसार दिनांक ५.०१.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलिय प्राधिकारी यांनी दिनांक २३.०१.२००९ च्या पत्राव्दारे काही मुद्यांवर माहिती दिली. परंतु तरीही अपिलार्थीस पुर्णतः माहिती न मिळाल्याने त्यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

व्दितीय अपीलाच्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थीस व उत्तरवादी असे सर्वजण उपस्थित होते. अपिलार्थी जरी गैरहजर असले तरी त्यांना काही मुद्यांवर माहिती मिळाली नाही असे दिसून येते परंतु प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचे म्हणण्यानुसार उपलब्ध असलेली माहिती देण्यास आलेली आहे व जी माहिती देण्यात आलेली नाही तरी संस्थेकडून प्राप्त झाल्यावर त्याची पुर्तता करण्यांत येईल.

जन माहिती अधिकारी यांनी सदर माहिती लवकरांत लवकर संकलीत करुन अपिलार्थीस २० दिवसांत विनामुल्य द्यावी व त्याची प्रत या आयोगास अवगत करावी.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः १८.०१.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/अपील क्रं. १३९९/०२**

**श्री. अरुण दत्तात्रय चव्हाण** **------ अपीलकर्ता**
**मध्यम प्रकल्प विभाग क्र.२,**
**प्रशासकीय इमारत, नंदुरबार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा** **------- उत्तरवादी**
**मुख अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर),पुणे**

**जन माहिती अधिकारी, तथा**
**अधिक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, नाशिक**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक : ३१.०७.२००९

सुनावणीचा दिनांक : ०८.१२.२००९

अपिलार्थी : उपस्थित

जन माहिती अधिकारी : उपस्थित

प्रथम अपीलीय अधिकारी : उपस्थित

अपीलार्थीनी त्यांच्या दिनांक ०६.११.२००८ च्या अर्जान्वये खालील माहिती मागितली.

१) सन २००२-०३ मध्ये अपिलार्थीची बदली उप विभाग सुटगणा येथे करण्यात आली त्या बदली आदेशाच्या कार्यालयीन टिप्पणीची प्रत.

२) कार्यालयाच्या दि.१६.१०.२००४ च्या पत्राच्या अनुषंगाने अपिलार्थीनी सादर केलेल्या निवेदनावर झ ाालेल्या कार्यवाहीचा तपशील.

३) अपिलार्थीच्या दिनांक २१.०१.२००८ च्या पत्रावरील कार्यवाहीचा तपशील.

४) कालबध्द पदोन्नतीनंतर मिळणाऱ्या वेतनाच्या फरकाच्या रकमेची अदायगी व झाल्याबाबतची कारणे.

५) गावतळे निगेलच्या कामाविषयीच्या कागदपत्रांच्या प्रती.

६) श्री.डी.एस.कुवर व श्री.पी.आर.शिरसाट यांच्या निलंबनाबाबतच्या कार्यवाहीची सद्यस्थिती.

७) श्री.नंदुनाना कोरडे यांच्या वेतनाची ५० टक्के रक्कम न्यायालयाच्या आदेशानुसार न्यायालयात भरण्यात आली होती ती रक्कम त्यांना परत करण्यात आली आहे काय ?

" माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांना दि.२८.११.२००८ च्या पत्रान्वये कळविण्यात आले की आपणास नेमकी कोणती माहिती पाहिजे याचा बोध होत नाही. यास्तव आपण स्वत: या कार्यालयात येऊन संबंधित कागदपत्रे पाहावित व निश्चित कोणती माहिती आवश्यक आहे त्याची शुल्क भरुन माहिती घेऊन जावी."

या उत्तराने समाधान न झाल्याने त्यांनी दिनांक ११.०२.२००९ रोजी प्रथम अपील केले. परंतु यावर निकाल दिला गेला नाही यास्तव त्यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

यावरील सुनावणीचे वेळी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलिय अधिकारी यांनी सादर केले की अपिलार्थींनी कार्यालयात येऊन कागदपत्रे बघण्यास सांगण्यात आले होते. परंतु यास त्यांनी प्रतिसाद दिला नाही. याबाबत आयोगाचे असे निर्देश आहेत की अपिलार्थींना पुन्हा एकदा निश्चित दिवस व वेळ कळवून कार्यालयात बोलवावे व त्यांना बघण्यासाठी त्यांनी विचारलेल्या माहितीशी संबंधित सर्व नस्त्या व कागदपत्रे उपलब्ध करुन द्यावीत. अपिलार्थींनी त्यांना आवश्यक वाटणाऱ्या कागदपत्रांच्या प्रती जन माहिती अधिकारी यांना मागाव्या व त्या जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थींना विनाशुल्क उपलब्ध करुन द्याव्या.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांक: १९.०१.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/अपील क्रं. १४२६/०२**

**श्री. प्रकाश मानाजी चव्हाण** ------ **अपीलकर्ता**

**३३,प्रियदर्शनी नगर,**
**धुळे**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा** ------- **उत्तरवादी**
**कार्यालय अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग,जि.प.नंदुरबार**

**जन माहिती अधिकारी, तथा**
**कार्यालय अधिक्षक,बांधकाम विभाग,जि.प.नंदुरबार**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक : २९.०८.२००९

सुनावणीचा दिनांक : ०८.१२.२००९

अपिलार्थी : उपस्थित

जन माहिती अधिकारी : उपस्थित

प्रथम अपीलीय अधिकारी : उपस्थित

अपीलार्थीनी दिनांक १३.०४.२००९ च्या अर्जान्वये खालील माहिती मागितली.

१) उप अभियंता श्री.बी.जे.भोई यांना महाराष्ट्र माहिती अधिकारान्वये करण्यात आलेला दंड रु.५८३३/- व उप मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.एस.डी.वळवी यांना केलेला दंड रु.२९१७/- याबाबत वसुलीच्या सद्यस्थितीची माहिती.

२) जि.प.बांधकाम,उप विभाग धडगांव येथील उप अभियंता श्री.एस.डी.देवरे यांना केलेल्या रु.२०,०००/- च्या दंडाच्या वसुलीचा तपशील.

३) धडगांव उप विभागातील रस्त्यांच्या निकृष्ट बांधकामा विषयी केलेल्या चौकशी अहवालाच्या प्रती. "

उपरोक्त माहिती अर्जाच्या अनुषंगाने माहिती न मिळाल्याने त्यांनी दि.०६.०६.२००९ रोजी प्रथम अपील केले. उपरोक्त अपीलावर सुनावणी होऊन त्यांना शास्तीच्या रकमेची वसुली न झाल्याचे दिनांक २६.०६.२००९ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. तसेच उपरोक्त मुद्या क्रमांक ३ ची माहिती देण्यात आल्याचे पत्रात नमुद करण्यात आले. या उत्तराने समाधान न झाल्याने त्यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

व्दितीय अपीलावरील सुनावणीचे वेळी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलिय अधिकारी यांनी आयोगासमोर असा मुद्या मांडला की संबंधितांवर शास्ती लादण्यात आली त्यावेळी केंद्रीय माहिती अधिकार अधिनियम,२००५ लागू नव्हता. आता तो लागू झाला आहे त्यानुसार प्रथम अपिलिय अधिकाऱ्याला शास्तीबाबतचे अधिकार नाहीत तेव्हा

तत्कालीन कायद्याप्रमाणे लावलेल्या शास्तीची वसुली करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. याबाबत आयोग असे स्पष्ट करतो की तत्कालिन कायद्याप्रमाणे लावलेल्या शास्तीची वसुली करण्याचे आदेश देणे विद्यमान माहिती आयोगाच्या कक्षेत येत नसेल तरी तत्कालीन कायद्याप्रमाणे लादलेल्या शास्तीची वसुली त्या कायद्यानुसार करणे क्रम प्राप्त आहेच, याची नोंद मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद यांनी घ्यावी.

**आदेश**

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

**आदेशाची प्रत मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.नंदुरबार यांनाहि कृतिसाठी पाठविण्यात यावी.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः १९.०१.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले तक्रार.**

**मुमाआ २००९/जळगांव/सी.आर अपील क्रं. १२१३/०२**

**श्री.साहेबराव डोंगर बाविस्कर** --------**अपीलकर्ता**
**रा.अरुणनगर, चोपडा, ता.चोपडा,**
**जि.जळगांव**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** --------- **उत्तरवादी**
**चेअरमन, महात्मा गांधी तालुका शिक्षण मंडळ,**
**चोपडा,ता.चोपडा, जि.जळगांव**

**जन माहिती अधिकारी तथा**
**प्राचार्य,श्रीमती शरच्चंद्रीका सुरेश पाटील,**
**ओषध निर्माण शास्त्र पदविका फार्मसी संस्था,**
**चोपडा, ता.चोपडा, जि.जळगांव**

## - वि वे च न -

अपीलकार श्री.साहेबराव डोंगर बाविस्करे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १५.०९.२००८ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नवीन प्रशाकीय इमारत, जिल्हाधिकारी कार्यालय, सभागृह, धुळे,जि.धुळे येथे दि. २६.११.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी तसेच जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपिलार्थी अनुपस्थित होते.

अपीलार्थीनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक १७.०३.२००८ रोजी अर्ज करुन संस्थेच्या कामकाजाबाबत एकूण १७ मुद्यांची माहिती मागितली होती त्यावर जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य यांनी अपिलार्थीस दिनांक १५.०४.२००८ रोजीच्या पत्रान्वये माहिती दिली. तथापि दिलेली माहिती चूकीची व दिशाभूल करणारी असल्याच्या कारणास्तव अपिलार्थी यांनी दिनांक २९.०४.२००८ रोजी कलम १९ (१) अन्वये प्रथम अपील केले ते सहसंचालक,तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय, नाशिक यांच्या कार्यालयास दिनांक २.०५.२००८ रोजी प्राप्त झाले. अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती ही संस्थेच्या कामकाजाशी निगडीत असल्याने शासन पत्र क्रमांक केआम २००७/प्र.क्र.३१/आस्था २,दिनांक ९.०२.२००७ मधील निदेशानुसार सह संचालक,तंत्र शिक्षण,विभागीय कार्यालय, नाशिक यांनी अपिलार्थीच्या दिनांक २९.०४.२००८ च्या प्रथम अपिलाची छायांकित प्रत दिनांक १४.०५.२००८ च्या पत्रासोबत जोडून प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा चेअरमन, महात्मा गांधी तालुका शिक्षण मंडळ,चोपडा, जळगांव यांजकडे योग्य त्या कार्यवाहीसाठी पाठविली व तसे अपिलार्थीस प्रतिलिपी पाठवून कळविले. त्यानंतर प्रथम अपिलिय प्राधिकारी तथा चेअरमन यांनी त्यांच्या दि. २०.०६.२००८ च्या पत्रान्वये अपिलार्थीस पुनः त्यांच्या माहिती अर्जातील १७ मुद्यांची माहिती कळविलेली असून त्याची प्रत माहितीसाठी सहसंचालक,तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय,नाशिक यांना अग्रेषित केलेली आहे.

जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपिलिय प्राधिकारी यांनी दिलेल्या माहितीने व्यथित झाल्यामुळे अपिलार्थी यांनी दिनांक १५.०९.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाच्या औरंगाबाद खंडपीठाकडे कलम १९ (३) अन्वये व्दितीय अपील केले.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित राहिल्यामुळे त्यांनी अपिलात नमूद केल्यानुसार त्यांना मिळालेली माहिती अपूरी/असत्य/खोटी/दिशाभूल करणारी कशी हे समजू शकले नाही. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा संस्थेचे

प्राचार्य यांचेकडून संस्थेच्या कारभारात गैरसमज झाला असल्याचा किंवा होत असल्याची अपिलार्थी यांची मुख्य तक्रार असल्याचे दिसते. तथापि सदर तक्रारीचे निराकरण करण्याची अधिकारता राज्य माहिती आयोगास नाही. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांक: १९.०१.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/४४९९९/अपील क्रं. ५२३३/०२**

**श्रीमती प्रणाली धायलकर** ------ **अपीलकर्ता**
**२३/३९,डीलाईल रोड, बी.डी.डी.चाळ,**
**एन.एम.जोशी मार्ग, मुंबई - १३.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा** ------- **उत्तरवादी**
**उप सचिव,सार्वजनिक बांधकाम विभाग,प्रशा-३,मंत्रालय,मुंबई -३२**

**जन माहिती अधिकारी, तथा**
**अवर सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग,मंत्रालय,मुंबई -३२**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक : ०३.१०.२००९

सुनावणीचा दिनांक : २०.०१.२०१०

अपिलार्थी : यांचे प्रतिनिधी उपस्थित

जन माहिती अधिकारी : उपस्थित

प्रथम अपीलीय अधिकारी : उपस्थित

अर्जदाराला सुरवातीलाच त्यांचा अर्ज हा सहज समजणाऱ्या सोप्या भाषेत करण्याची सुचना देण्यात आली. अर्जदाराच्या अर्जातील मुद्दा क्र. बी व सी या विषयी अर्जदाराला नेमकी कोणती माहिती पाहिजे ते कळत नाही. अर्जदाराने सोप्या भाषेत ते स्पष्ट केल्यास त्यांना माहिती देता येऊ शकेल असे दिसुन आले. अर्जदाराला विभागाच्या न्यायीक केसेसच्या बाबतीत जी माहिती पाहिजे होती त्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे खुलासा केलेला आहे.

" अपीलकार श्रीमती प्रणाली धायलकर,मुंबई यांनी दिनांक ३०.०६.२००९ रोजी केलेला अर्ज या विभागात दि.१.०७.२००९ रोजी प्राप्त झाला. सदर अर्जातील विषय विभागातील सर्व माहिती अधिकारी यांच्याशी संबंधीत असल्याने सदर अर्जाच्या प्रती विभागातील सर्व जन माहिती अधिकारी यांना त्यांच्याशी संबंधित मुद्यांबाबत कार्यवाहीसाठी दि.८.०७.२००९ च्या पत्रान्वये पाठविण्यात आल्या तसेच त्याची प्रत श्रीमती धायलकर याना देखील पाठविण्यात आली. श्रीमती धायलकर यांना दि. २७.०७.२००९ च्या पत्रान्वये उत्तर कळविण्यात आले.

त्यानंतर प्रथम अपिलिय प्राधिकारी यांच्या दि.२५.०८.२००९ रोजीच्या आदेशानुसार दि.३०.१०.२००९ रोजीच्या पत्रान्वये श्रीमती धायलकर यांना सार्वजनिक बांधकाम विभागातील (मंत्रालय खुद्द) न्यायालयीन प्रकरणाबाबतची माहिती (एकूण १८ पृष्ठे) कळविण्यात आली आहे. त्यामुळे अर्जास उत्तर देण्यास किंवा प्रथम अपिलावरील आदेशाची अंमलबजावणी करण्यास माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नुसार विहित केलेल्या मुदतीपेक्षा विलंब झालेला नाही."

त्यामुळे पुढीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांक: २०.०१.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/अपील क्रं. १४१०/०२**

**श्री. देवमन नारायण आहेरराव ------ अपीलकर्ता**
**मु.पो.खांडबारा,ता.नवापूर,जि.नंदुरबार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा ------- उत्तरवादी**
**जिल्हा आरोग्य अधिकारी, आरोग्य विभाग,जि.प.नंदुरबार**

**जन माहिती अधिकारी, तथा**
**जिल्हा आरोग्य अधिकारी यांचे कार्यालय, आरोग्य विभाग,जि.प.नंदुरबार**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक : २५.०५.२००९

सुनावणीचा दिनांक : ०८.१२.२००९

अपिलार्थी : उपस्थित

जन माहिती अधिकारी : अनुपस्थित

प्रथम अपीलीय अधिकारी : अनुपस्थित

अपीलार्थीनी दिनांक २०.०२.२००९ रोजी माहिती अधिकाराखाली अर्ज करुन जि.प.नंदुरबार अंतर्गत प्रयोग शाळा तंत्रज्ञ या संवर्गाचे पद भरण्यासाठी दि.६.०५.२००८ रोजी दिलेल्या जाहिरातीच्या अनुषंगाने माहितीची मागणी केली. मागितलेल्या माहितीचे थोडक्यात स्वरुप खालीलप्रमाणे.

१) जुन्या मेरिट लिस्टची छायांकित प्रत.

२) नवीन मेरिट लिस्टची छायांकित प्रत.

३) लेखी व तोंडी परीक्षेत मिळालेले गुण.

४) मा.उच्च न्यायालय खंडपीठ,औरंगाबाद येथे दाखल झालेल्या रिट याचिका क्र.६०६२ व ६०४१ च्या अंतिम निकालाची छायांकित प्रत.

५) प्रेरणा दत्तु लोंढे यांनी सादर केलेल्या अनुभवाच्या दाखल्यांच्या प्रती.

६) शितल पांडुरंग अंबुलकर हिने सादर केलेल्या अनुभवाच्या दाखल्याच्या प्रती.

७) प्रयोगशाळा तंत्रज्ञ पदासाठीच्या मुलाखतींसाठी २० गुणांची तरतूद दाखविणाऱ्या शासकीय परिपत्रकाची प्रत.

८) श्री.दिनेश देवमन आहेरराव यांच्या वेतनाबाबतची माहिती.

उपरोक्त माहितीची ९५ पृष्ठे त्यांना दि.१३.०३.२००९ रोजीच्या पत्रान्वये पुरविण्यात आली. परंतु श्री.दिनेश देवमन आहेरराव यांना न मिळालेल्या वेतनाबाबतची माहिती मिळाली नाही हे कारण दर्शवून त्यांनी दि.१९.०३.२००९ रोजी प्रथम अपील केले. यावर दि.१६.०४.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. परंतु त्या दिवशी अपिलार्थी गैरहजर राहिल्याने सुनावणी झाली नाही. तद्नंतर त्यांनी आयोगाकडे दि.२५.०५.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले.

व्दितीय अपीलावरील सुनावणीचे वेळी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलिय अधिकारी गैरहजर होते. वास्तविक पाहता सदर प्रकरणी वस्तुस्थिती जाणून घेण्यासाठी त्यांनी उपस्थिती आवश्यक होती. त्यांच्या गैरहजेरीची दखल आयोगाने घेतली आहे. अपिलार्थींच्या कथनानुसार त्यांना एका मुद्याबाबत माहिती मिळालेली नाही. तरी त्यांना ती त्वरीत पुरविण्यात यावी असे आयोगाचे निदेश आहेत.

जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलिय अधिकारी हे अनुपस्थित राहिल्याने त्यांना निदेश देण्यात येतात की याबाबतचा खुलासा मुख्य कार्यकारी अधिकारी,जि.प.नंदुरबार यांच्या मार्फत आयोगास सादर करावा.

## आदेश

**१) अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**२) सदर आदेशाची प्रत मुख्य कार्यकारी अधिकारी,जि.प.नंदुरबार यांना उपरोक्त निदेशाच्या अनुषंगाने देण्यात यावी.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः २०.०१.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/अपील क्रं. ५२३८/०२**

**श्री. डॉ.विवेक वि.राणे** **------ अपीलकर्ता**
**ए-३/२०३,आनंदनगर,दहिसर (पूर्व),**
**मुंबई - ४०० ०६८**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा** **------- उत्तरवादी**
**सह सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, /मा.शि/२,मंत्रालय,मुंबई - ३२**

**जन माहिती अधिकारी, तथा**
**अवर सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, /मा.शि/२,मंत्रालय,मुंबई ३ ३२**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक : ०७.०९.२००९

सुनावणीचा दिनांक : २०.०१.२०१०

अपिलार्थी : उपस्थित

जन माहिती अधिकारी : उपस्थित

प्रथम अपीलीय अधिकारी : उपस्थित

दोन्ही बाजूचे म्हणणे एकूण घेतल्या नंतर व दिनांक १७ नोव्हेंबर २००९ रोजीचे प्रथम अपिलिय अधिकारी यांचे आदेश बघता विज्ञान संस्थेत उपलब्ध असलेली कागदपत्र अर्जदारास देण्यासाठी संबंधीत माहिती त्या संस्थेकडे जन

माहिती अधिकारी यांनी पाठविलेली आहे व त्यांना विज्ञान संस्थेने माहिती दिलेली आहे. इतर माहितीच्या बाबतीत माहिती देऊन व हवी असलेल्यास अर्जदाराला संबंधीत नस्त्या पाहण्याची व त्यांनी निवड केलेली कागदपत्र देण्याची तयारीही जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलिय अधिकारी यांनी दर्शविलेली आहे. अशा परिस्थितीत अर्जदाराने नस्ती तपासणे हे इष्ट राहिल असे वाटते.

प्रसंगावषात असे दिसून आले की अर्जदार हे विज्ञान संस्थेचे माजी संचालक असून त्यांच्या विभागीय चौकशी रिटायरमेंटला दोन वर्ष होऊन पुर्ण झालेली नाही. त्यामुळे त्यांचे बरेचसे क्लेम सुध्दा देण्यात आलेले नाही. आयोगाचा असा अनुभव आहे की अशा परिस्थितीत व्यक्ती कारण अकारण माहितीच्या अधिकारात अर्ज करतात. तेव्हा चौकशी संदर्भात सक्षम प्राधिकाऱ्याचे निर्णयाच्या बाबतीतील आदेश मिळवून घेऊन कार्यवाही करणे हेच सर्व संबंधीतांच्या दृष्टीने उचित राहील.

**<u>आदेश</u>**

**सदरील अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः २०.०१.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**मुमाआ २००९/४६१६९/तक्रार क्रमांक ६९४/०२**

**श्री. एस.के.नानगीया** **------ तक्रारकर्ता**
**७०४,गोल्डन चॅरिएट,को.ऑप.हौ.सोसायटी,**
**१३३, सेक्टर ६, चारकोप कांदिवली (प)**
**मुंबई - ४०० ०६७**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **------- उत्तरवादी**
**सहायक आयुक्त (इस्टेट),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, श्री.छत्रपती शिवाजी महाराज मार्केट,**
**फलटन रोड,**
**मुंबई ०१**

**जन माहिती अधिकारी तथा**
**प्रशासकीय अधिकारी,बृहन्मुंबई महानगरपालिका (मुख्यालय)**
**महापालिका मार्ग फार्ट,मुंबई ०१**

**- वि वे च न -**

अर्जदारास त्यांच्या दिनांक १० एप्रिल २००९ रोजीच्या अर्जानुसार महापालिकेने जमिनीच्या ज्या लिझेज दिलेल्या आहेत व ज्यांची मुदत संपलेली आहे अशांच्या बाबतीत काही माहिती मागितली होती. अर्जदारास फक्त दिनांक ४.०५.२००९ रोजीच्या पत्राने ४१७६ प्लॉटस् लिझवर देण्यात आलेले आहेत एवढीच माहिती देण्यात आली व इतर माहितीच्या बाबतीत रेकॉर्ड इंस्पेक्शन घेऊन कागदपत्रांच्या प्रती देण्यात येतील असे पत्र देण्यात आले. प्रथम अपिलिय अधिकाऱ्यांनी त्यांच्या दिनांक २७.०८.२००९ रोजीच्या आदेशाने डिपार्टमेंटचे कॉम्प्युटराईजेशन अजुनही व्हायचे आहे अर्जदारास सिडी किंवा फ्लॉपीच्या स्वरुपात माहिती देता येऊ शकत नाही त्यामुळे अर्जदाराने माहिती पाहून कागदपत्रांची निवड करावी असे सुचविण्यात आले. त्यामुळे अर्जदाराने लिझ संपलेल्या प्रकरणातील रेंट शीटच्या प्रती घेऊन जाण्याची विनंती करण्यात आली.

माहितीचा अधिकार अधिनियमानुसार जरी माहिती ज्या स्वरुपात असेल त्या स्वरुपात दिली जाईल हे खरे असले तरी माहितीच्या बाबतीत उदाहणार्थ लँड लिझेस ज्यातून शासन/महापालिका यांना कोटयावधी रुपयाचा महसुल मिळतो व ज्या ठिकाणी लिझेसची मुदत संपल्या असतील त्या लिझ नुतनिकरण करुन किंवा दुसऱ्या व्यक्ती किंवा संस्थांना लिझ दिल्यास फार

मोठया प्रमाणावर महसुल मिळूशकतो अशा बाबतीत कुठचाही साधा किंवा कॉम्युटराईज गोषवारा नाही हे पटणारे नाही. योग्य तो प्राफार्मामध्ये लिझच्या बाबतीतील माहिती २१ दिवसांच्या आत कॉम्युटराईज करण्यात यावी जेणेकरुन प्रशासनास त्या माहितीचा उपयोग होऊ शकेल व ज्यांना माहिती पाहिजे त्यांना विनासायास उपलब्ध होऊ शकेल. प्रोफार्मा कसा असावा हे महापालिकेनेच ठरवावे मात्र तो जास्तीत जास्त उपयुक्त ठरु शकेल असाच असावा. महानगरपालिका यांना असे निर्देश देण्यात येतात की त्यांच्या कॉम्युटराईज कार्यक्रमात जमिनीच्या लिझची माहिती याला प्राधांन्याने स्थान देऊन सदरील माहिती योग्य त्या प्रोफार्मात कॉम्युटराईज करुन घ्यावी जेणेकरुन नुतनिकरणात नविन अटी व शर्ती ठरवितांना त्याच्या जास्तीत जास्त उपयोग होऊ शकेल, ही माहिती अर्जदारास २५ दिवसांच्या आत पुरवावी.

अर्जदाराने दोन अडीच हजार पृष्ठे घेऊन त्याचा ॲनालिसचा गोषवारा करावा अशी अपेक्षा महापालिका अधिकाऱ्यांची आहे. अर्जदाराने विचारलेली माहिती ही अत्यंतिक जन हिताची आहे कारण ती महापालिकेच्या आर्थिक हिताची आहे हे लक्षात घेता या कामास प्राधान्य देण्यात यावे.

अपिलिय अधिकारी यांनी जरी सुनावणी दिनांक १२ जुन २००९ रोजी घेतली तरी त्याचे आदेश दि.२७.०८.२००९ रोजी पारित केले. मुदतीत अपीलाची सुनावणी घेण्यास व निर्णय देण्यास उशीर लावला याकडे अर्जदाराने आयोगाचे लक्ष वेधले. अपील हे दिनांक १९.०५.२००९ रोजी सादर करण्यात आले त्याची सुनावणी जरी मुदतीत झाली असली तरी निर्णय पारित करण्यास वेळ लावला आहे. प्रथम अपिलिय अधिकाऱ्यांनी मुदतीत अपीलाचे आदेश हे पारित होतील याकडे कटाक्षाने लक्ष द्यावे असे निर्देश त्यांना देण्यात येत आहे.

**आदेश**

**तक्रार मान्य करण्यात येत आहे.**
**सर्व संबंधितांनी उपरिनिर्दीष्ट कार्यवाही करावी.**
**या आदेशाची प्रत ही महापालिका आयुक्तांनाहि देण्यात यावी.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांक: २१.०१.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**मुमाआ २००९/४५८३३/तक्रार क्रमांक ६९५/०२**

**श्री. एस.के.नानगीया** **------ तक्रारकर्ता**
**७०४,गोल्डन चॅरिएट,को.ऑप.हौ.सोसायटी,**
**१३३, सेक्टर ६, चारकोप कांदिवली (प)**
**मुंबई - ४०० ०६७**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **------- उत्तरवादी**
**निवासी जिल्हा उपजिल्हाधिकारी,**
**जिल्हाधिकारी व जिल्हा दंडाधिकारी कार्यालय मुंबई शहर,**
**ओल्ड कस्टम हाऊस,एस.बी.एस.मार्ग,**
**मुंबई ०१**

**जन माहिती अधिकारी तथा**
**अव्वल कारकून, महसूल शाखा,**
**जिल्हाधिकारी, कार्यालय, मुंबई शहर ०१**

## - विवेचन -

अर्जदाराच्या दिनांक ६.०५.२००९ रोजीच्या कलम ६ खालील अर्जान्वये शासनाने दिलेल्या ज्या जमिनीच्या लिझची मुदत संपलेली आहे त्याच्या बाबतीत काही माहिती विचारलेली होती. अर्जदारास दिनांक १९.०६.२००९ रोजीच्या पत्राने कार्यालयीन वेळेत येऊन नस्तीची पाहणी करुन हवी ती कागदपत्र दाखविल्यानंतर निवडीनुसार शासनाने विहित केलेल्या योग्य त्या फीचा भरणा केल्या नंतर माहिती देण्यात येईल असे कळविण्यात आले. मुदतीत माहितीच्या अर्जाला प्रतिसाद न मिळाल्याने अर्जदाराने दिनांक १७.०६.२००९ रोजी प्रथम अपील सादर केले. या अपिलाची सुनावणी दिनांक ३०.०६.२००९ रोजी ठेवण्यात आली होती मात्र ही सुनावणी होऊ शकली नाही व त्या नंतर विधानसभेच्या निवडणूकीच्या कामकाजामुळे पुढील सुनावणी घेतलेली नाही मात्र या दरम्यान अर्जदारास काही माहिती पाठविण्यात आली होती ती समाधान कारक नाही. दि.९.०९.२००९ रोजी पत्राव्दारे अर्जदाराने तक्रार केली होती व प्रथम अपिलावर निर्णय देण्याची त्यात मागणी केली होती त्यानुसार अर्जदाराने मागणी केलेली माहिती ही सात दिवसांच्या आत देण्यात यावी असे निर्देश देण्यात आले.

अर्जदाराने मागितलेल्या माहितीनुसार अर्जदारास माहिती दिलेली नाही. अर्जदारास फक्त ज्या लिझचा कालावधी संपलेला आहे त्यासंबंधीची माहिती पाहिजे आहे मात्र अर्जदारास एकूणच सर्व लिझची माहिती कळविण्यात आली त्यातील कोणत्या लिझ संपुष्टात आल्या आहेत हे कळण्यास कुठचाही मार्ग नाही. ज्या लिझ संपलेल्या आहेत त्याबाबत त्यांचे नुतनिकरण किंवा लिझ संपुष्टात आणण्याची कार्यवाही पुर्ण करुन दुसऱ्या संस्थांना जागा लिजवर देणे या गोष्टी वेळेत झाल्यातर महसूलात फार मोठया प्रमाणात भर पडू शकते ही गोष्ट सुर्य प्रकाशा इतकी स्वच्छ आहे.

अर्जदाराला हवी असणारी माहिती जास्तीत २१ दिवसांच्या आत अर्जदारास माहिती देण्यात यावी. अपिलिय अधिकारी यांनी सुध्दा वेळेत आदेश पारित करणे आवश्यक आहे यांची त्यांनी नोंद घ्यावी व अशा प्रकारची पुनरावृत्तीची गंभीर दाखल घेण्यात येईल असे ही निदेश त्यांना देण्यात येत आहे.

**आदेश**

**तक्रार मान्य करण्यात येत आहे.**
**सर्व संबंधितांनी उपरिनिर्दीष्ट कार्यवाही करावी.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः २१.०१.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/४५१३१/अपील क्र.५२४५/०२**

**श्री. सुरेंद्र नारायण कुलकर्णी ------ अपीलकर्ता**
**६१,बी.आय.टी.चाळ, माटुंगा,**
**मुंबई ४०० ०१९**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा ------- उत्तरवादी**
**उप आयुक्त शिक्षण, बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**३ रा मजला, एफ/दक्षिण विभाग, डॉ.बी.ए.रोड,परेळ, मुंबई १२**

**जन माहिती अधिकारी,**

**बृहन्मुंबई महानगरपालिका, मनपा शालेय इमारत,**
**१ ला मजला, लखमशी नप्पू रोड, हिंदू कॉलनी, दादर (पूर्व), मुंबई १४**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक : २८.१०.२००९
सुनावणीचा दिनांक : २१.०१.२०२०१०
अपिलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपीलीय अधिकारी : उपस्थित

सुनावणीच्या वेळी असे दिसून आले की प्रथम अपिलिय अधिकारी यांच्या दिनांक ५.०८.२००९ रोजीच्या आदेशानुसार दिनांक २०.०८.२००९ रोजी प्रशासकीय अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त करुन घेऊन अर्जदारास देण्यात आलेली आहे. त्याप्रमाणे अपिलिय अधिकारी यांनी अर्जदाराचा प्रश्न समजाऊन घेऊन इतर काही प्रश्न असतील ते सोडविण्याचा प्रयत्न करण्यात येईल असे ही सांगितले.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः २१.०१.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/४५१३५/अपील क्र.५२४८/०२**

**श्री. राणा किर्ती जमनादाल** ------ **अपीलकर्ता**
**३०३ अ, चंद्रा अपार्टमेंट, एस.व्ही.रोड,**
**बोरीवली, (प), मुंबई ४०० ०१३**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा** ------- **उत्तरवादी**
**जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था (उ),**
**(प.उ), जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (३), मुंबई,**
**गृहनिर्माण भवन कक्ष क्र.६९, तळमजला, वांद्रे (पूर्व), मुंबई ५१**

**जन माहिती अधिकारी,**
**उप निबंधक, सहकारी संस्था आर विभाग,**

**जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (३), मुंबई,**
**गृहनिर्माण भवन कक्ष क्र.६९, तळमजला, वांद्रे (पूर्व), मुंबई ५१**

**- विवेचन -**

अपीलाचा दिनांक : १६.११.२००९
सुनावणीचा दिनांक : २१.०१.२०१०
अपिलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित

प्रथम अपिलिय अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक ८.१०.२००९ रोजीच्या आदेशाने अर्जदारास माहिती द्यावी असे निर्देश दिलेले आहे व त्याप्रमाणे अर्जदाराकडे माहिती मिळालेली आहे असेच सुनावणीच्या वेळी दिसून आले.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः २१.०१.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/४५१३६/अपील क्र.५२४९/०२**

**श्री. विनोद रघुनाथ सोनकांबळे** ------ **अपीलकर्ता**
**भिजीवन चाळ कमिटी, वाल्मिक नगर, हिमालया सोसायटी,**
**घाटकोपर (प),मुंबई ८४**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा** ------- **उत्तरवादी**
**कार्यकारी अभियंता, कार्यकारी अभियंता,**
**जी/उत्तर विभाग यांचे कार्यालय, हरिश्चंद्र येलवे मार्ग, दादर (प),मुंबई २८**

**जन माहिती अधिकारी,**
**सहायक अभियंता, (धारावी प्रकल्प), कार्यकारी अभियंता,**
**जी/उत्तर विभाग यांचे कार्यालय, हरिश्चंद्र येलवे मार्ग, दादर (प),मुंबई २८**

**- विवेचन -**

अपीलाचा दिनांक : ०४.११.२००९
सुनावणीचा दिनांक : २१.०१.२०१०

अपिलार्थी : अनुपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित

प्रथम अपिलिय अधिकारी यांनी अर्जदाराने त्यांना अभिप्रेत असलेल्या विषयाच्या माहितीची कागदपत्रांच्या निष्कर्शाने नोंदवहीची पाहणी करुन त्यांना आवश्यक असलेल्या माहितीच्या छायांकित प्रती अर्जदारास देण्यात येतील असे निर्देश दिले होते. मात्र अर्जदार अजुनही माहिती पाहण्यास आलेले नाही असे सांगितले. मात्र त्यांनी आयोगाकडे अपील केलेले आहे तेव्हा जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास निश्चित तारीख व वेळ देऊन अर्जदारास माहिती पाहण्यासाठी बोलवावे व त्यांनी निवड केलेल्या कागदपत्रांच्या प्रती त्यांना देण्यात याव्यात.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः २१.०१.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/४५१३८/अपील क्र.५२५०/०२**

**श्री. बाबाजी हरी पाटील** **------ अपीलकर्ता**
**लेडी रतन कॉम्प्लेक्स, सिध्दी विनायक इमारत नं.,**
**७/४०३,दैनिक शिवनेर मार्ग,**
**वरळी,मुंबई - ४०० ०१८**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा** **------- उत्तरवादी**
**जिल्हा उप निबंधक सह.संस्था, जिल्हा उप निबंधक सहकारी संस्था,**
**जी/एस विभाग, मल्होत्रा हाऊस, ६ वा मजला, फोर्ट,**
**मुंबई ५१**

**जन माहिती अधिकारी,**
**उप निबंधक सह.संस्था, जिल्हा उप निबंधक सहकारी संस्था,**
**जी/एस विभाग, मल्होत्रा हाऊस, ६ वा मजला, फोर्ट,**
**मुंबई ५१**

## **- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक : ०६.११.२००९

सुनावणीचा दिनांक : २१.०१.२०१०

अपिलार्थी : यांचे प्रतिनिधी उपस्थित

जन माहिती अधिकारी : यांचे प्रतिनिधी उपस्थित

दोन्ही बाजुचे म्हणणे एकूण घेतल्या नंतर उप निबंधक सहकारी संस्था यांच्या तर्फे पुढील खुलासा सादर करण्यात आला

" या बाबत आपणांस सादर करण्यात येते की, श्री.बाबाजी हरी पाटील यांचा माहिती अधिकार,२००५ अन्वये अर्ज या कार्यालयास प्राप्त झाला तेव्हा साई सुरक्षा रक्षक सेवा सहकारी संस्था या संस्थेची अ धारीका या कार्यालयातील अभिलेख कक्षात सहज शोधून सापडली नसल्याने, संस्थेशी पत्रव्यवहार करुन, श्री. परशुराम काशीराम जाधव यांचेकडून संस्थेच्या नोंदणी धारीकेतील कागदपत्रे मागवून ती अर्जदार यांना उपलब्ध करुन देण्यात आली होती.

या कार्यालयाने अभिलेख कक्षातील अ धारीकांची नव्याने संस्थानिहाय मांडणी करते वेळेस सदर संस्थेची मूळ अधारीका सापडली आहे. या अ धारीकेतील स्टॅम्प पेपरवर (ज्याची कलर झेरॉक्स अर्जदारांकडे आहे) श्री.काशीराम महादेव जाधव यांचा जागा करारपत्रावर अंगठा आहे.

मात्र अर्जदारांनी संस्थेकडून संस्थेकडून मागवून दिलेल्या झेरॉक्सवर सही आहे. ही विसंगती कशी? याबाबतही संस्थेस खुलासा विचारला होता. श्री.परशुराम काशीराम जाधव यांनी दि.१०.०९.२००९ च्या पत्राने खुलासा केला आहे. त्या खुलाशाच्या आधारे प्रथम अपिलिय अधिकारी यांनी संबंधीतांचे अपील फेटाळलेले आहे. सोबत आदेशाची छायांकित प्रत जोडलेली आहे.

या खुलाशानुसार अपील अर्जाच्या अनुषंगाने सादर करण्यांत येते की, अर्जदार यांना संस्थेबाबतची अ धारीकेतील उपलब्ध माहिती देण्यांत आलेली आहे. तसेच याबाबतची संदिग्धताही सोबतच्या खुलाशामुळे दूर झालेली असल्याने, व संबंधीतांना उपलब्ध माहिती दिलेली असल्याने, सदरचा अपील अर्ज फेटाळण्यात यावा अशी या कार्यालयाची विनंती आहे. "

मुळ नस्तीतील कागदपत्रांच्या प्रती दिल्या असल्यामुळे पुढीलप्रमाणे आदेश देण्यात येतो.

## **आदेश**

**अपील अमान्य करण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः २१.०१.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/४५१३९/अपील क्र.५२५२/०२**

**श्री. शोएब खान** ------ **अपीलकर्ता**
**बी-३०२, शि अंगन सीएचएस लि.,**
**मालवणी - २, मालाड (प),**
**मुंबई - ४०० ०९५**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा** ------- **उत्तरवादी**
**हायड्रॉलिक विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका मुख्यालय,**
**कहापालिका मार्ग, मुंबई - ४०० ००१**

**जन माहिती अधिकारी**
**बृहन्मुंबई महानगरपालिका मुख्यालय,**
**कहापालिका मार्ग, मुंबई - ४०० ००१**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक : ०६.११.२००९
सुनावणीचा दिनांक : २१.०१.२०१०
अपिलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित

अर्जदाराने या अगोदरच इंस्पेक्शन घेऊन २३८ कागदपत्रांची निवड केलेली आहे. मात्र त्यांनी अजुनहि शुल्क भरलेले नाही तेव्हा अर्जदारनं दिनांक २२.०१.२०१० रोजी २.३० वाजता महापालिकेत शुल्क भरुन माहिती प्राप्त करुन

घ्यावी. शुल्क भरल्या बरोबर दोन तासाच्या आत अर्जदार यांना फोटो कॉपीज दिल्या जातील याची खबरदारी जन माहिती अधिकारी यांनी घ्यावी.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः २१.०१.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/अपील क्र.१२४०/०२**

**श्री. मोहन तोताराम सुर्यवंशी** **----- अपीलकर्ता**
**खान्देश गल्ली,तळोदा,**
**जि.नंदुरबार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा** **------- उत्तरवादी**
**मुख्याधिकारी, नगरपरिषद तळोदा**

**जन माहिती अधिकारी**
**नगरपरिषद तळोदा**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक : ०२.०६.२००९
सुनावणीचा दिनांक : ०८.१२.२००९
अपिलार्थी : अनुपस्थित
जन माहिती अधिकारी : अनुपस्थित
प्रथम अपिलिय अधिकारी : अनुपस्थित

अपिलार्थीनी दि.३०.०१.२००९ च्या अर्जाव्दारे नगरपरिषदशी संबंधीत खालील माहितीची मागणी केली.

" १. श्री.गजेन्द्र उत्तम सावरे व नारायण बन्सीलाल चौधरी यांच्या सेवा पुस्तकातील नोंदीच्या प्रती.

२. उपरोक्त कर्मचाऱ्यांनी औद्योगिक न्यायालयात दाखल केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने दिलेल्या निकालाची प्रत.

३. जिल्हाधिकारी,नंदुरबार यांच्या दि.८.०२.२००२ च्या पत्राची प्रत.

४. मुख्याधिकाऱ्यांच्यापगार कपातीच्या आदेशाची प्रत."

उपरोक्त माहिती न मिळाल्याने त्यांनी दि.७.०३.२००९ रोजी प्रथम अपील केले. यावर सुनावणी होऊन दि.१६.०४.२००९ रोजी आदेश पारित करण्यात आले. यावर समाधान न झाल्याने त्यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

व्दितीय अपीलावरील सुनावणीच्यावेळी अपिलार्थी व उत्तरवादी गैरहजर असल्या कारणाने सदर प्रकरणी आयोगास वस्तुस्थिती जाणून घेता आली नाही. आयोगाचे असे निर्देश आहेत की अपिलार्थींनी मागणी केल्यानुसार अभिलेख्यांच्या प्रती त्यांना कोणतेही शुल्क न आकारता पुरविण्यात याव्या.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः २२.०१.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/अपील क्र.१४०२/०२**

**श्री. देवमन नारायण आहेरराव ----- अपीलकर्ता**
**रा.खांडबारा,ता.नवापूर,**
**जि.नंदुरबार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा ------- उत्तरवादी**
**गट विकास अधिकारी, पंचायत समिती शिंदखेडा,**
**जि.धुळे**

**जन माहिती अधिकारी**
**पंचायत समिती शिंदखेडा,**
**जि.धुळे**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक : ०७.०८.२००९

सुनावणीचा दिनांक : ०८.१२.२००९

अपिलार्थी : उपस्थित

जन माहिती अधिकारी : उपस्थित

प्रथम अपिलिय अधिकारी : उपस्थित

अपिलार्थीनी दि.१५.०५.२००९ च्या अजान्वये श्री.एकनाथ अंबर अहिरे, ग्रामसेवक तावखेडा यांच्याशी संबंधित खालील माहिती मागितली.

" १. नियुक्तीचा तपशील. २. त्यांनी केलेल्या विकास कामांची यादी. ३. त्यांच्या विरुध्द असलेल्या भ्रष्टाचाराच्या तक्रारींचा तपशील. ४. त्यांच्यावर झालेल्या प्रशासकीय कार्यवाहीचा तपशील. ५. त्यांच्यावर कितीवेळा पोलीस कार्यवाही झाली व ते किंती काळ पोलीस कस्टडीत होते याबाबतच्या पत्रव्यवहाराच्या प्रती. इत्यादि."

उपरोक्त अर्जाला उत्तर प्राप्त न झाल्याने त्यांनी दि.२२.०६.२००९ रोजी प्रथम अपील केले.प्रथम अपिलावर सुनावणी झाली नाही या कारणास्तव त्यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

व्दितीय अपीलावरील सुनावणीच्या वेळी आयोगास सादर करण्यात आले की अपिलार्थींना दि.१८.०६.२००९ रोजी माहिती देण्यात आलेली आहे. याचा विचार करता खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः २२.०१.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/अपील क्र.१२९९/०२**

**श्री. मनोजकुमार रमेश शिंपी** **------ अपीलकर्ता**
**प्लॉट नं.८,परिमल कॉलनी, जुन्या पोस्टाल कॉलनी जवळ,**

**एम. जे कॉलेज मागे,**
**जळगांव - ४२५ ००२**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा** **------- उत्तरवादी**
**उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, आर.टी.ओ.ऑफीस,डी.एस.पी.बंगल्यासमोर,**
**जळगांव - ४२५ ००२**

**जन माहिती अधिकारी**
**सहा.प्रादेशिक परिवहन अधिकारी,**
**उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, आर.टी.ओ.ऑफीस,डी.एस.पी.बंगल्यासमोर,**
**जळगांव - ४२५ ००२**

## - वि वे च न -

अपीलकार श्री. मनोजकुमार रमेश शिंपी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २४.०३.२००९ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नवीन प्रशाकीय इमारत, जिल्हाधिकारी कार्यालय, सभागृह, धुळे,जि.धुळे येथे दि. २७.११.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी रजेवर असल्याने ते अनुपस्थित होते. जन माहिती अधिकारी म्हणून श्री. तुकाराम बंधु पाटील उपस्थित होते. अपिलार्थी उपस्थित होते.

अपीलार्थीनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक ०६.१२.२००८ रोजी अर्ज करुन २००३ साली एमएच १९ एए ६७८६ हया गाडीचे रजिस्ट्रशन केलेल्या फॉर्म नंबर २० व त्याला जोडलेल्या सर्व कागदपत्रांच्या सांक्षाकित प्रतींची माहिती मागितली होती.

कार्यालयीन रेकॉर्ड रु तपासले असता अपिलार्थीस हवी असणारी माहिती मिळून येत नाही, तसेच सदर फॉर्म नं.२० चे शोधण्याचे काम सुरु असून तो मिळताच त्याबाबत कळविण्यात येईल असे जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक १७.१२.२००८ च्या पत्रान्वये अपिलार्थीस कळविले. सदर उत्तराने व्यथित होऊन अपिलार्थी यांनी उक्त अधिनियमाच्या कलम १९ (१) अन्वये दि.१५.०१.२००९ रोजी प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनी कोणतेही आदेश विहित कालावधीत पारित न केल्यामुळे अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोगाच्या औरंगाबाद खंडपीठाकडे प्रस्तुत व्दितीय अपील केलेले आहे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी सादर केलेला खुलासा तसेच अपिलार्थी यांनी केलेल्या व्दितीय अपीलातील मुद्दे यांचा साकल्याने विचार करण्यात आला असता असे दिसून येते की अपिलार्थी हे त्यांच्या भावाची (श्री.रमेश शिंपी) मोटारसायकल पासिंगसाठी आली असतांना चालू सिरीज मधील एमएच १९/एए-६७८६ हा मागितलेला नंबर न मिळाल्याने गेल्या ६ वर्षांपासून एकाच विषयाबाबत पत्रव्यवहार करत आहेत. त्यासंदर्भात अपिलार्थी

यांनी माहितीच्या अधिकारात देखील माहिती मागितली असता उपलब्ध असलेली माहिती वेळोवेळी पुरविण्यात आल्याचे दिसते. असे असले तरी अपिलार्थी यांनी त्यांच्या दि.६.१२.२००८ च्या अर्जान्वये मागितलेल्या माहितीचा पुन्हा कसून शोध घेण्यात यावा व त्यानंतरही अभिलेख सापडला नाही तर तो अभिलेख कधीपर्यंत जतन ठेवणे आवश्यक होते, त्याची विल्हेवाट लावण्यात आली असल्यास त्याची तारीख इत्यादि तपशील अपिलार्थीस हे आदेश मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत कळविण्यात यावा. अभिलेख सापडल्यास अपिलार्थीस विनामुल्य माहिती पुरविण्यात यावी. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः २२.०१.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/अपील क्र.१३९८/०२**

**श्री. चंद्रकांत मखन बडगुजर** **------ अपीलकर्ता**
**३४-अ,वृंदावन कॉलनी, नकवा रोड,**
**नंदुरबार - ४२५ ४१२**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा** **------- उत्तरवादी**
**विभागीय व्यवस्थापक, वन प्रकल्प विभाग, नंदुरबार,**
**तळोदा रोड, नंदुरबार ४२५ ४१२**

**जन माहिती अधिकारी**
**सहायक व्यवस्थापक, वन प्रकल्प विभाग, तळोदा**
**नंदुरबार ४२५ ४१२**

## - वि वे च न -

अपीलाचा दिनांक : १९.०९.२००९
सुनावणीचा दिनांक : ०८.१२.२००९
अपिलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलिय अधिकारी : उपस्थित

अपीलकार श्री. चंद्रकांत मखन बडगुजर यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १९.१२.२००९ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नवीन प्रशाकीय इमारत, जिल्हाधिकारी कार्यालय, सभागृह, धुळे,जि.धुळे येथे दि. ०८.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी रजेवर असल्याने ते अनुपस्थित होते. जन माहिती अधिकारी म्हणून श्री. तुकाराम बंधु पाटील उपस्थित होते. अपिलार्थी उपस्थित होते.

अपीलार्थीनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक ५.०५.२००९ रोजी अर्ज खालील नमुद माहितीची विचारणा केली होती.

अर्जदार श्री.बडगुजर यांच्या कोणत्या चुकीमुळे (अपराध/दोष) एप्रिल २००८ पासून अनुज्ञेय असलेली वार्षिक वेतनवाढ रोखून धरण्यांत आली याबाबतची माहिती विचारण्यात आली होती.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ३०.०५.२००९ च्या पत्राव्दारे मागितलेली माहिती विहित मुदतीत देण्यांत आली आहे.

अपिलार्थीचे जन माहिती अधिकाऱ्याने आवश्यक हवी असलेली माहिती न पुरविल्यामुळे त्यांनी दिनांक ६.०६.२००९ रोजी कलम १९ (१) खाली प्रथम अपिल दाखल केले. त्याबाबत प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी अपिलार्थीस योग्य ती माहिती पुरविण्यात आल्याची खात्री करण्यात आली. अपिलार्थीना झालेली शिक्षा ही विभागीय चौकशी अंतर्गत झाली असल्यामुळे त्याबाबतची माहिती विभागीय चौकशी नियमावली व एफ.डी.सी.एम लि.चे सारग्रंथातील विभागीय चौकशी कामी नमुद केलेल्या नियमास अनुसरुन वेगळया अर्जाव्दारे मागविण्यांत यावी व अपिलार्थीस संबंधीत नस्तीचे अवलोकन करता येईल असे आदेश पारित करण्यात आले.

व्दितीय अपीलाच्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय प्राधिकारी उपस्थित होते. त्यावेळी झालेल्या चर्चेत जन माहिती अधिकारी यांनी कार्यालयात उपलब्ध असणारी सर्व माहिती विहित मुदतीत उपलब्ध करुन दिली आहे. तसेच अपिलार्थी श्री.बडगुजर यांनी कार्यालयीन अभिलेखाची तपासणी दिनांक २७.१०.२००९ रोजी केली असल्याचे दिसून येते या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः २२.०१.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/अपील क्रं. १४३५/०२**

**श्री. प्रल्हाद बाळा गुरव** ------ **अपीलकर्ता**
**५, नेहरु हौसिंग सोसायटी,**
**आयटीआय जवळ, देवपूर,**
**धुळे ४२४ ००५**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** ------- **उत्तरवादी**
**सहायक आयुक्त, धुळे महानगरपालिका, धुळे**

**जन माहिती अधिकारी, तथा**
**नगररचनाकार धुळे महानगरपालिका,धुळे**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक : २७.०७.२००९
सुनावणीचा दिनांक : ०८.१२.२००९
अपिलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलिय अधिकारी : अनुपस्थित

अपीलकार श्री. प्रल्हाद बाळा गुरव यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २७.०७.२००९ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर

विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नवीन प्रशासकीय इमारत, जिल्हाधिकारी कार्यालय,सभागृह धुळे, जि.धुळे परिसर जळगांव येथे दि. २७.११.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी, अनपस्थित तर जन माहिती अधिकारी व अपिलार्थी उपस्थित होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.१९.०६.२००९ रोजी अर्ज करुन, विचारणा केलेल्या माहितीचा तपशील.

" १. प्लॉट नं.६६ बांधकाम परवानगी अट क्र. १ ते २७ अटी व शर्तीचा भंग झाल्याने बांधकाम प्रमाणपत्र रद्द का केले नाही.२. भूखंडाचे प्लॉटचे खाली ४ पाईपलाईनसाठी जिल्हाधिकारी धुळे यांची परवानगी. ३. बांधकाम इमारत तपासणी केलेल्या अहवालावर स्वाक्षरी केलेल्या अधिकारी/बिल्डींग इंस्पेक्टर/निरीक्षक/लिपीक यांची नावानिशी यादी इत्यादि मुद्दयावर माहिती मागितली."

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस मागणी केलेल्या केलेल्या सर्व मुद्दयांची दिनांक २२.०७.२००९ च्या पत्राव्दारे सविस्तर माहिती दिली आहे.

अपिलार्थीचे सदर माहितीने समाधान न झाल्याने त्यांनी कलम १९ (१) खाली प्रथम अपील दाखल केले यास अनुसरुन प्रथम अपिलार्थीनं मुद्दा क्रमांक ५ बाबतची माहिती दिनांक ५.०९.२००९ पर्यंत देण्याचे आदेश पारित करण्यांत आले.

अपिलार्थीने तरीही आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी हजर होते. तर प्रथम अपीलीय प्राधिकारी अनुपस्थित होते त्यावेळी संबंधितांचे तोंडी जबाब कार्यालयांत उपलब्ध असलेल्या कागदपत्राच्या साकल्याने विचार करण्यांत आला माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये कार्यालयांत उपलब्ध असणारी माहिती अपिलार्थीस विहित मुदतीत उपलब्ध करुन द्यावयाची असते. जन माहिती अधिकारी यांनी याबाबतची वस्तुस्थिती अर्जदारास विहित मुदतीत कळविली तसेच प्रथम अपिलिय प्राधिकारी यांच्या आदेशाप्रमाणे दि.२.०९.२००९ रोजी माहिती पुर्णतः दिली असल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः २५.०१.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/अपील क्रं. १४३४/०२**

**श्री. भटु फुला सोनवणे,** **------ अपीलकर्ता**
**सुभाष नगर, ग.नं. १४, जुने धुळे,जि.धुळे**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **------- उत्तरवादी**
**सहायक आयुक्त, महापालिका धुळे, जि.धुळे**

**जन माहिती अधिकारी, तथा**
**नगररचनाकार, महापालिका कार्यालय, धुळे जि.धुळे**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक : १३.०८.२००९
सुनावणीचा दिनांक : ०८.१२.२००९
अपिलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलिय अधिकारी : अनुपस्थित

अपीलकार श्री. भटु फुला सोनवणे, यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १३.०८.२००९ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नवीन प्रशासकीय इमारत, जिल्हाधिकारी कार्यालय,सभागृह धुळे, जि.धुळे परिसर जळगांव येथे दि. ०८.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी जन माहिती अधिकारी व अपिलार्थी उपस्थित होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.१३.०२.२००९ रोजी अर्ज करुन, विचारणा केलेल्या माहितीचा तपशील.

" १. धुळे नगरपालिकेच्या कार्यालयातील व धुळे महानगरपालिकेच्या कार्यालयातील धुळे महानगरपालिकेसह वित्तीय जागा धारकांना दिलेल्या हस्तांतरीत विकास हक्क व परवाने आणि प्राधिकारपत्राची माहिती मिळणेबाबत. २. जन माहिती अधिकाऱ्याने त्यांच्या दिनांक ७.०३.२००९ पत्राव्दारे अपिलार्थीस नमूद मुद्यांवर अपेक्षित असलेल्या माहितीच्या नस्त्या प्रत्यक्ष कार्यालयांत येऊन कार्यालयीन अभिलेख तपासून प्राप्त करुन घ्यावा असे कळविले होते. परंतु प्रत्यक्षात

अपिलार्थीस अपुर्ण माहिती मिळाल्यामुळे अर्जदाराने कलम १९ (१) अन्वये प्रथम अपील दाखल केले. ३. प्रथम अपिलिय प्राधिकारी यांनी दिनांक ७.०५.२००९ अपिलावर सुनावणी घेतली त्यावेळी अपिलार्थीस न मिळालेली माहिती विनामुल्य देण्याचे आदेश पारित करण्यांत आले. त्याचप्रमाणे दिनांक १८.०५.२००९ च्या पत्राव्दारे अर्जदारास माहिती पुरविण्यांत आली. ४. अर्जदार श्री.भ.फु.सोनवणे यांनी माहिती अपुर्ण व दिशाभुल करणारी माहिती म्हणून व्दितीय अपील दाखल केले. ५. व्दितीय अपीलावरील सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते परंतु प्रथम अपिलीय प्राधिकारी अनुपस्थित होते. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये कार्यालयांत उपलब्ध असणारी माहिती विहित मुदतीत उपलब्ध करुन द्यवयाची असते. माहिती उपलब्ध नसेल तरी ती स्वतःची जबाबदारी ओळखून ती माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी अर्जदारास विश्वासात घेऊन ती प्रामाणिकपणे देण्याचे प्रयत्न करणे आवश्यक आहे. सुनावणीच्या वेळी अर्जदारास आणखी माहिती हवी असल्यास ती २/३ दिवसांत पुरविण्यांत येईल असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी यांनी केले, अपिलार्थींनी त्यास सहमती दर्शविली.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः २५.०१.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये दाखल झालेले अपील.**

**श्री. मधुकर विठ्ठल झोलेकर,** ------ **अपीलकर्ता**
**ब.न. ७२७, नेम.देवपूर,पोलीस स्टेशन**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** ------- **उत्तरवादी**
**पोलीस अधिक्षक, पोलीस अधिक्षक कार्यालय, धुळे,जि.धुळे**

**जन माहिती अधिकारी, तथा**
**उप पोलीस अधिक्षक, पोलीस मुख्यालय, धुळे , जि.धुळे**

## - वि वे च न -

अपीलकार श्री. मधुकर विठ्ठल झोलेकर, यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २९.०६.२००९ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नवीन प्रशासकीय इमारत, जिल्हाधिकारी कार्यालय,सभागृह धुळे, जि.धुळे परिसर जळगांव येथे दि. ०८.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी तसेच जन माहिती अधिकारी व अपिलार्थी उपस्थित होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.१२.०१.२००९ रोजी अर्ज करुन, पोलीस अधिक्षक, धुळे कार्यालयाकडून दिनांक १५.१०.१९८० ते दि.१.०४.२००८ पावेतोच्या देय व देण्यात आलेल्या वेतनवाढीची माहिती मागितली होती. जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ३०.१२.२००८ च्या पत्रान्वये अपीलकारास देय व देण्यात आलेली वेतनाबाबतीची माहिती दिली. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने दिनांक २.०३.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलिय अधिकारी यांनी सुनावणी आयोजित केली. आदेश पारित केले नाहीत. यामुळे व्यथित होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

अपीलार्थी यांना देण्यात आलेल्या वेतनाची माहिती दिली आहे. अपीलार्थी निलंबित झाले नसते तर त्यांना किती वेतन मिळाले असते याबाबतची अपीलार्थी यांना माहिती हवी आहे. सदरची माहिती कार्यालयात उपलब्ध नाही असे उत्तरवादीने सुनावणीच्या वेळी आयोगासमोर प्रतिपादन केले. अपीलार्थी दिनांक २३.०९.१९८३ ते ५.१०.१९८५ व २४.०९.८९ ते २७ पावेतो निलंबित होते. अपिलार्थी यांचा निलंबन कालावधी जसाच्या तसा धरण्यात आला आहे. सदर कालावधी वगळून पुढील वेतनवाढी देण्यात आल्या आहेत. अपीलार्थी यांचा निलंबन कालावधी हा कर्तव्यकाल धरला गेला असता,तर देय असलेल्या वेतनाची माहिती (काल्पनीक वेतन वाढीची माहिती) उपलब्ध नसल्याने अपीलार्थी यांना

पुरविता आली नाही. याबाबत अपिलार्थीला कळविले आहे. अपीलार्थी यांना मागणीप्रमाणे व उपलब्ध असलेली माहिती पूर्वीच पुरविण्यात आली असल्याने उत्तरवादीने लेखी अहवाल आयोगास सादर करुन प्रतिपादन केले. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः २७.०१.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/जळगांव/सी.आर अपील क्रं. १३८९/०२**

**श्री.देवमन नारायण आहेरराव** ---------अपीलकर्ता
**मु.पो.खांडवारा,ता.नवापूर,**
**जि. नंदुरबार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** --------- उत्तरवादी
**गट विकास अधिकारी, पंचायत समिती शिंदखेडा,जि.प.नंदुरबार**

**जन माहिती अधिकारी**
**गट विकास अधिकारी, पंचायत समिती शिंदखेडा,जि.प.नंदुरबार**

## - वि वे च न -

अपीलाचा दिनांक : ३०.०९.२००९
सूनावणीचा दिनांक : ८.१२.२००९
अपिलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी : अनुपस्थित
प्रथम अपीलय अधिकारी : अनुपस्थित

अपीलार्थी यांनी दि.२.०७.२००९ च्या अर्जान्वये ग्रामसेवक श्री.एकनाथ अंबर अहिरे यांच्या संबंधात विविध मुद्यांवर माहिती मागितली. तथापि त्यांच्या अर्जाला उत्तर प्राप्त न झाल्याने त्यांनी दि.१२.०८.२००९ रोजी प्रथम अपील केले. प्रथम अपीलावर सुनावणी झाली नाही तसेच त्यांना माहितीपण प्राप्त झाली नाही यास्तव त्यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

व्दितीय अपीलावरील सुनावणीच्यावेळी उत्तरवादी अनुपस्थित होते. अपीलार्थीच्या कथनानुसार त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती मिळालेली नाही. वास्तविक पाहता जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणीसाठी आयोगाच्या समक्ष उपस्थित राहणे हे त्यांचे कर्त्यव्य होते. त्यात त्यांनी कसूर केली आहे. सदर प्रकरणी आयोगाचे असे निदेश आहेत की जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थींनी मागणी केल्याप्रमाणे त्यांना त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती सदर आदेशाच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आत विनाशुल्क पुवावी. मुख्य कार्यकारी अधिकारी,जि.प.नंदुरबार यांना असे निदेश देण्यात येतात की त्यांनी जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या अनुपस्थितीबाबत खुलासा प्राप्त करुन त्यांच्या अभिप्रायासह आयोगाकडे एक महिन्याच्या आत सादर करावा.

## आदेश

**१) अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**२) आदेशाची एक प्रत मुख्य कार्यकारी अधिकारी,जि.प.नंदुरबार यांना उपरोक्त निदेशाच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यासाठी देण्यात यावी.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**

दिनांकः २८.०१.२०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ २००९/४५१४४/अपील क्रं. ५२५७/०२

श्रीमती विशाखा विनाय इंगळे ---------अपीलकर्ता
बी-६,अलंकार को.ऑप.हौ.सांसायटी,
नवीन टिळक नगर, चेंबुर (प)
मुंबई -८९

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा --------- उत्तरवादी
उप आयुक्त (शिक्षण), बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यालय,
३ रा मजला, एफ/दक्षिण विभाग, डॉ.आंबेडकर मार्ग,
परेल,मुंबई १२

जन माहिती अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी, बृहन्मुंबई महानगरपालिका शिक्षण खाते,

**लखमजी नप्पू रांड, हिंदु कॉलनी, दादर (पूर्व),**
**मुंबई - १४**

## - विवेचन -

अपीलाचा दिनांक : ०९.११.२००९

सूनावणीचा दिनांक : २८.०१.२०१०

अपिलार्थी : उपस्थित

जन माहिती अधिकारी : उपस्थित

अर्जदारास इ.स.२००९-१० सालच्या बदलीस पात्र शिक्षक कर्मचारी यांची माहिती पाहिजे होती. प्रथम अपिलिय अधिकारी यांनी वरील माहिती देण्याचे निर्देश दिलेले होते त्याप्रमाणे माहिती दाखविण्यात आली पण ती घेण्यास त्यांनी नकार दिला असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. सर्व बदलीचे आदेश देऊ केले होते. त्या बरोबरच अर्जदारास संबंधीची जी नोटींग साईड असेल त्या नोटींग साईडची प्रत देण्याचे सुध्दा निर्देश देण्यात आले. जेणे करुन अर्जदाराने जरी नोटींग साईड असे विवक्षीतपणे लिहीलेले नसेल तरी अर्जदाराचा कल लक्षात घेता नोटींग साईड व आदेश अशी दोन्ही माहिती दिल्याने त्यांची गरज भागू शकेल.

## आदेश

**अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.**
**संबंधीतांनी उपरिनिर्दीष्ट कार्यवाही करावी.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांक: २८.०१.२०१०**

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.

मुमाआ २००९/तक्रार क्रमांक ३५९/०१

श्री. मुकुंद के.पारीख, ------ तक्रारकर्ता
१०३, चाणक्यपुरी सहकारी गृहनिर्माण सोसायटी लि,
लल्लभाई पार्क, अंधेरी (पश्चिम),
मुंबई ५८

विरुध्द

१) जन माहिती अधिकारी, तथा ------- उत्तरवादी
उप निबंधक सहकारी संस्था,
के/वेस्ट,म्हाडा इमारत,
बांद्रे (पूर्व), मुंबई ५१

२) श्री.एच.के.टोमके,
तत्कालीन प्रशासक तथा सहायक सहकारी अधिकारी,
उप निबंधक सहकारी संस्था,
के/वेस्ट,म्हाडा इमारत,
बांद्रे (पूर्व), मुंबई ५१

- वि वे च न -

मा.मुख्य माहिती आयुक्त यांनी सर्वश्री श्रीकृष्ण जोशी व मुकुंद पारीख यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक १८.०४.२००७ रोजी दाखल केलेल्या एका व्दितीय अपील प्रकरणी (अपील क्रमांक २००७/१२१५/०२) दिनांक २३ जुलै २००७ रोजी आदेश पारित केले होते. त्यामध्ये चाणक्यपुरी सहकारी गृहनिर्माण सोसायटी लि.या संस्थेचे तत्कालीन प्रशासक म्हणून श्री.एच.के.टोमके,सहायक सहकारी अधिकारी यांनी दिनांक २० जुलै २००७ रोजी अर्जदारास सोसायटीच्या संदर्भातील संस्थेचे व त्यांच्या स्वतःच्या कार्यालयात असलेली माहिती दाखवावी व अर्जदारास त्यांच्या १९ मुद्यांसंबंधित ज्या कागदपत्रांच्या प्रती पाहिजे असतील त्या प्रती त्यांना देण्यात याव्यात असे आदेशीत केले होते.

उपरोक्त दिनांक २३.०७.२००७ रोजीच्या आदेशाची अंमलबजावणी झाली नसल्याबाबत तक्रारदार यांच्या वतीने मा.मुख्य माहिती आयुक्तांना उद्देशन दिनांक ३१.०३.२००९ रोजी तक्रार अर्ज केला होता.

वास्तविक श्री.मुकुंद पारीख यांनी अशाच प्रकारे त्यांच्या दिनांक १.०८.२००७ व दिनांक २८.०८.२००७ च्या पत्रान्वये राज्य माहिती आयोगाकडे यापूर्वी तक्रार दाखल केली होती. त्याची दखल घेण्यात येऊन तक्रार क्रमांक २००७/२५५/०२ प्रकरणी दिनांक १५.११.२००७ रोजी मी असे आदेश पारित केलेले आहेत की तक्रारदारास त्यांच्या गृहनिर्माण सोसायटीबाबत अधिक माहिती हवी असल्यास ती त्यांनी सोसायटीच्या नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांकडून मिळवावी. त्यामध्ये काही अडचणी आल्यास त्यांनी जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांजकडे संपर्क करावा.

प्रस्तुत तक्रार तक्रारदार यांच्यावतीने अन्य एका व्यक्तीने केली असली तरी ती तक्रारदाराने केली असे गृहीत धरण्यात येत असून मी या पूर्वी दिनांक १५.११.२००७ रोजी दिलेल्या आदेशानुसार तक्रारदाराने योग्य ती कार्यवाही करणे अपेक्षित राहील.

अशा परिस्थितीत वेगळे आदेश देणे अपेक्षित नाही.

**आदेश**

**तक्रार निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः २८.०१.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/४५१५५/अपील क्रं. ५२६६ /०२**
**मुमाआ २००९/४५१५६//अपील क्रं. ५२६७/०२**

**श्री.मेहमुद मेहबुब शेख ---------अपीलकर्ता**
**रुम नं.७,दोस्त मोहम्मद चाळ,**
**गौसीया मस्जिद मागे,**
**नित्यानंद नगर,घाटकोपर (प),**
**मुंबई - ४०० ०८६**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा --------- उत्तरवादी**
**कार्यकारी अभियंता, बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यालय,**
**आर/साउथ वार्ड, कांदिवली (प)मुंबई**

**जन माहिती अधिकारी तथा**
**सहायक अभियंता (परिरक्षण), बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यालय,**
**आर/साउथ वार्ड, कांदिवली (प)मुंबइ**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक : ११.११.२००९
सूनावणीचा दिनांक : २८.०१.२०१०
अपिलार्थी : अनुपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित

अपील आयोगाकडे दाखल केल्यानंतर लगेचच दिनांक २४.११.२००९ रोजी अर्जदाराने असे पत्र दिलेले आहे या दोन्ही अपीलांच्या बाबतीत त्यांना या दोन्ही अपीलातील माहिती मिळाली असून त्यांचे अपील दप्तरी दाखल करण्यात यावे.

**आदेश**

**दोन्ही अपीले निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांक: २८.०१.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/४५१६२/अपील क्रं. ५२७० /०२**

**श्री. दत्ताराम कृ.पेडामकर** -------- **अपीलकर्ता**
**मरिअम्मा नगर रुम नं.३३, एम-२२३,**
**नेहरु सेंटर मागे, डॉ.ए.बी.रोड, वरळी, मुंबई १८**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** --------- **उत्तरवादी**
**कार्यकारी अभियंता, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,**
**५ वा मजला, गृह निर्माण भवन,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई ५१**

**जन माहिती अधिकारी तथा**
**सहायक अभियंता झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,**
**५ वा मजला, गृह निर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई ५१**

**- वि वे च न -**

अपील प्राप्त झाल्याचा दिनांक : १२.११.२००९
सूनावणीचा दिनांक : २९.०१.२०१०
अपिलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित

अर्जदारास त्यांच्या मरीअम्मानगर सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या पुनर्विकासात त्यांनी दि.२०.०६.२००९ रोजी २६९ चौरस फुटाची सदनिका मिळण्यासंबंधीच्या दिलेल्या तक्रार अर्जावर काय कार्यवाही केलेली आहे याची माहिती पाहिजे होती.

सुनावणीच्या वेळी हे स्पष्ट झाले की यासंबंधात एसआरएने विकासकांना सुधारीत प्रस्ताव सादर करण्यास सांगितलेले आहे व ही माहिती सोसायटीकडे आहे. मात्र अर्जदाराच्या अर्जानुसार त्यांना ही माहिती (विकासकास लिहीलेले पत्र) त्वरीत देण्यात येईल असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः २९.०१.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/४५१७५/अपील क्रं. ५२७१ /०२**

**श्री.केतन मोदी,** **-------- अपीलकर्ता**
**२५/६,महावीर,३ रा मजला,**
**एस.व्ही.सोवानी मार्ग, मुंबई - ०४**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **--------- उत्तरवादी**
**उपमुख्य अभियंता, एम बी. आर आणि आर बोर्ड,**
**८९-९५,रजनी महल, ताडदेव रोड, मुंबई**

**जन माहिती अधिकारी तथा**
**उप अभियंता, डी वार्ड, एम.बी.आर,अँन्ड आर बोर्ड,**
**८९-९५, रजनी महल, ताडदेव रोड, मुंबई**

**- वि वे च न -**

अपीलप्राप्त झाल्याचा दिनांक : १०.११.२००९
सूनावणीचा दिनांक : २९.०१.२०१०
अपिलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित

अर्जदारास ते राहत असलेल्या सेस बिल्डींगच्या दुरुस्ती संबंधीची काही माहिती पाहिजे होती व त्यांनी त्या बाबतीत विस्तृत सहा पानी अर्ज दिला होता. अर्जदारास याबाबत नस्तिचे निरीक्षण करण्याची विनंती करण्यात आलेली होती व त्यांना हवी असलेली कागदपत्र देण्याची तयारीही दर्शविण्यात आलेली होती.

सुनावणीच्या वेळेला दोन्ही पक्षांनी चर्चा करुन असे ठरविण्यात आले की अर्जदार हे मंगळवार दिनांक २ फेब्रुवारी २०१० येऊन दुपारी ३ वाजता जन माहिती अधिकारी यांच्याकडे जातील व त्यांना संपुर्ण नस्ती ही समजावून सांगण्यात येईल व दाखविण्यात येईल त्यांना नस्तितील ज्या कागदपत्रांच्या प्रती पाहिजे असतील त्या त्यांना देण्यात येतील.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**

**दिनांक: २९.०१.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेली अपीले.**

**मुमाआ २००९/४५१७६/अपील क्रं. ५२७२ /०२**
**मुमाआ २००९/४५१७७/अपील क्रं. ५२७३ /०२**
**मुमाआ २००९/४५१७८/अपील क्रं. ५२७४ /०२**

**श्री.एम डी.भोसले** **-------- अपीलकर्ता**
**स्टेट बॅंक ऑफ इंडिया स्टाफ,**
**गुलमोहर सीएचएस लि. चिकुवाडी,**
**बोरीवली (प), मुंबई - ९२**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **--------- उत्तरवादी**
**जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था (३), पश्चिम उपनगरे,**
**गृह निर्माण भवन, कक्ष क्र. ६९,तळमजला,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई ५१**

**जन माहिती अधिकारी तथा**
**उप निबंधक, सहकारी संस्था, आर वार्ड,**
**गृह निर्माण भवन, कक्ष क्र. ६९,तळमजला,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई ५१**

**- वि वे च न -**

अपीलाचे दिनांक : ०९.११.२००९

सूनावणीचा दिनांक : २९.०१.२०१०

अपिलार्थी : उपस्थित

सहायक जन माहिती अधिकारी : उपस्थित

अर्जदारास या तिन्ही अर्जाव्दारे त्यांच्या सोसायटीवर प्रशासकाच्या नेमणूकी विषयी तसेच इतरही काही माहिती पाहिजे होती व प्रथम अपिलिय अधिकारी यांनी त्यांना शुल्क भरुन माहिती देण्यात यावी असेही निर्देश दिलेले होते.

अर्जदाराने अजुन शुल्क भरलेले नाही. दोन्ही पक्षांशी चर्चा करुन असे ठरविण्यात आले की जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास त्वरित माहिती शुल्क किती भरावयाचे व त्यावरील पोस्टेजची रक्कम किती होईल हे पाच

दिवसांच्या आत कळवावे. अर्जदाराने शुल्क भरल्यानंतर ती माहिती त्वरित अर्जदारास घरपोच पोचविण्याची जबाबदारी सहायक जन माहिती अधिकारी यांनी घेतली कारण सध्या तेच त्या सोसायटीवर प्रशासक आहेत.

**आदेश**

**तिन्ही अपीले निकाली काढण्यात येत आहेत.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः २९.०१.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/४५१७९/अपील क्रं. ५२७५ /०२**

**श्री.प्रदिप सिंह ठाकुर,** **-------- अपीलकर्ता**
**लालजी सिंह चाळ, खोतवाडी,**

**फिरोजशहा मेहता रोड,**
**सांताक्रझ (प), मुंबई ३५४**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** --------- **उत्तरवादी**
**सहायक मनपा आयुक्त, सहायक आयुक्त,**
**एच/पश्चिम विभाग यांचे कार्यालय, वसाहत विभाग, सेंट मर्टिन्स रस्ता,**
**वांद्रे (प), मुंबई ५०**

**जन माहिती अधिकारी तथा**
**वसाहत अधिकारी, सहायक मनपा आयुक्त, सहायक आयुक्त,**
**एच/पश्चिम विभाग यांचे कार्यालय, वसाहत विभाग, सेंट मर्टिन्स रस्ता,**
**वांद्रे (प), मुंबई ५०**

## - वि वे च न -

अपीलाचा दिनांक : १०.११.२००९
सूनावणीचा दिनांक : २९.०१.२०१०
अपिलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित

अपीलार्थीस त्यांच्या १४ सप्टेबर २००९ रोजीच्या अर्जानुसार खोतवाडी सांताक्रुझ पश्चिम नगर विकास योजना क्र.६,अंतीम भूखंड क्र.१०६ में क्रियांन्वित झोपडपट्टी पुनर्वसन योजनेच्या अंतर्गत आपल्या विभागाने निर्गती परिपत्र २ (अॅनॉक्सीस II) ची सी.डी येथील माहिती पाहिजे होती.

मात्र २००३ साली रेकॉर्ड कॉम्प्युटराईज नव्हते व त्यामुळे सी.डी.देता आली नाही. मात्र अॅनॅक्श्चर २ ची संपुर्ण प्रत अर्जदारास देण्यात आलेली आहे. त्यामुळे अर्जदाराची माहितीची गरज ही पुर्ण झालेली आहे मात्र

यादरम्यानच्या काळात रेकॉर्ड जर कॉम्प्युटराईज करण्यात आले असेलतर अर्जदारास त्यांच्या मागणी प्रमाणे सी.डी.देण्यात यावी.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

( डॉ. सुरेश वि.जोशी )
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांकः २९.०१.२०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ २००९/४५१५१/अपील क्रं. ५२६२ /०२

श्री.शांताराम भिकाजी तेली -------- अपीलकर्ता
२/१६४, साफल्य इमारत नं.२,
सखाराम बाळाजी पवार मार्ग,
करी रोड, मुंबई - ४०० ०१३

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा --------- उत्तरवादी

**सह मुख्य अधिकारी, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ,**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे (पुर्व), ५ वा मजला,**
**मुंबई - ४०० ०५१**

**जन माहिती अधिकारी तथा**
**उप समाज विकास अधिकारी, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ,**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे (पुर्व), ५ वा मजला,**
**मुंबई - ४०० ०५१**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक : ११.११.२००९
सूनावणीचा दिनांक : २८ व २९ जानेवारी, २०१०
अपिलार्थी :२८ तारेखस व जन माहिती अधिकारी २९ तारखेस उपस्थित

अर्जदारास पुढील माहिती पाहिजे होती.

" दि. ४.०८.१९७७ ला खोली नं.१६४ चे ताबाप्र देण्यात आले त्यावेळी (श्री.शांताराम भिकाजी तेली) यांच्या उत्पन्नाच्या दाखल्याची प्रत लावण्यात आली होती. तसेच त्या उत्पन्नाच्या दाखल्याचा तपशील."

अर्जदाराचा खोली वाटपाशी कुठचाही संबंध नसल्यामुळे ही कागदपत्र या नस्तीत असण्याची गरजही नसल्यामुळे त्या नस्तीत अशी कागदपत्रे नाहीत त्यामुळे त्यांना ती देता आली नाही असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. अर्जदाराने संपुर्ण नस्तीची पाहणी केलेली असल्यामुळे पुढील आदेश देण्यात येतो.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांक: २९.०१.२०१०**

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ २००९/४५१६९/अपील क्रं. ५२७७ /०२

श्री.माधव गजानन देशपांडे, -------- अपीलकर्ता,
७,कौस्तुभधाम को.ऑ.हौ.सोसायटी,
प्लॉट २३, संघानी इस्टेट, गावदेवरी रोड,
घाटकोपर (प), मुंबई- ४०० ०८६

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा --------- उत्तरवादी
म्हाडा, गृहनिर्माण भवन, ५ वा मजला, वांद्रे (पूर्व),
मुंबई- ४०० ०५१

जन माहिती अधिकारी तथा
म्हाडा, गृहनिर्माण भवन, ५ वा मजला, वांद्रे (पूर्व),
मुंबई- ४०० ०५१

- वि वे च न -

अपीलाचा दिनांक : १०.११.२००९
सूनावणीचा दिनांक : २९ जानेवारी, २०१०
अपिलार्थी :उपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित

अर्जदारास वर्सोवा खाडीची जमीन आहे ती अर्जदाराच्या म्हणण्यानुसार अनधिकृतपणे म्हाडाच्या ताब्यात गेली असल्याचे व जी जमीन ओशीवरा लँड डेव्हलपर्स यांना देण्यात आली त्या विषयी अर्जदाराने दिनांक २.०१.२००८ रोजी जी तक्रार केली होती त्या बद्दल काही माहिती पाहिजे होती.

या जमीनी संबंधाची सर्व कागदपत्रे ही म्हाडाचे अधिकारी एकत्र करुन ठेवतील व अर्जदार हे दिनांक १५ फेब्रुवारी २०१० रोजी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात जातील व या जमिनी बद्दलची सर्व कागदपत्र अर्जदार यांना दाखविण्यात येतील व त्यांना ज्या कागदपत्रांच्या प्रती पाहिजे असतील त्या त्यांना देण्यात याव्यात.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः २९.०१.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/४५१७०/अपील क्रं. ५२७८ /०२**

**श्री.माधव गजानन देशपांडे,** **-------- अपीलकर्ता,**
**७,कौस्तुभधाम को.ऑ.हौ.सोसायटी,**
**प्लॉट २३, संघानी इस्टेट, गावदेवरी रोड,**
**घाटकोपर (प), मुंबई- ४०० ०८६**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी** **--------- उत्तरवादी**
**महापालिका आयुक्त यांचे कार्यालय,**
**महापालिका मुख्यालय, महापालिका मार्ग सीएसटी समोर,**
**मुंबई - ४०० ००१**

**जन माहिती अधिकारी**
**महापालिका आयुक्त यांचे कार्यालय,**
**महापालिका मुख्यालय, महापालिका मार्ग सीएसटी समोर,**
**मुंबई - ४०० ००१**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक : १०.११.२००९

सूनावणीचा दिनांक : २९ जानेवारी, २०१०

अपिलार्थी :उपस्थित

जन माहिती अधिकारी : उपस्थित

प्रथम अपिलिय अधिकारी : उपस्थित

अर्जदाराला महापालिकेच्या सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांची पुनर्नियुक्ती किंवा कन्सलटंट म्हणून झालेल्या नियुक्त्यांबद्दल माहिती पाहिजे होती. सुनावणीच्या वेळेला हे स्पष्ट करण्यात आले की अर्जदाराला जवळपास महापालिकेच्या ३० विभागाकडून ही माहिती प्राप्त झालेली आहे. उर्वरित विभागांकडून १० दिवसांच्या आत ही माहिती अर्जदारास प्राप्त होईल अशी अपिलिय अधिकारी तथा प्राथमिक कर्मचारी अधिकारी यांनी सांगितले. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः २९.०१.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/४५१७४/अपील क्रं. ५२८२/०२**

**श्री.रामलाल शामलाल पाल** ---------अपीलकर्ता
**आर-३१,मारी अम्मा नगर डा.ऐबी मार्ग,**
**वरळी, मुंबई - १८**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** --------- उत्तरवादी
**सहायक मनपा आयुक्त, सहायक मनपा आयुक्त यांचे कार्यालय,**
**जी/दक्षिण विभाग, ना.म.जोशी मार्ग,**
**मुंबई १३**

**जन माहिती अधिकारी**
**वसाहत अधिकारी, सहायक मनपा आयुक्त यांचे कार्यालय,**
**जी/दक्षिण विभाग, ना.म.जोशी मार्ग,**
**मुंबई १३**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक : १०.११.२००९
सूनावणीचा दिनांक : ३० जानेवारी, २०१०
अपिलार्थी :उपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित

अर्जदाराने मरीअम्मानगर येथील एसआरए अंतर्गत डीपी रोडवर येणाऱ्या झोपडपट्टी धारकांची यादी तसेच झ ोपडपट्टी पुनर्वसन योजने अंतर्गत ७० टक्के सहभागी झालेल्या झोपडपट्टी धारकांची यादी वगैरे बाबतची माहिती मागितली होती.

जन माहिती अधिकारी यांच्या म्हणण्यानुसार अजुनही पात्रता व अपात्रता यादीस सक्षम अधिकाऱ्यांची मान्यता मिळालेली नाही ती मान्यता मिळताच अर्जदाराला ती यादी देण्यात येईल. यास किती अवधी लागेल असे विचारले असता हायपावर कमिटीने २ महिन्याचा अवधी दिलेला आहे. या अवधीत मान्यता घेऊन अर्जदारास आवश्यक ती माहिती देण्यात यावी असे निर्देश देण्यात आले आहेत.

**आदेश**

**अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः ३०.०१.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/४५१७१/अपील क्रं. ५२८३/०२**

**श्री.किरण जे मकवाना** **---------अपीलकर्ता**
**२-१०९,३ रा माळा,एमएचबी कॉलनी,**
**मागाधाने, बोरीवली (पूर्व),**
**मुंबई - ४०० ०६६**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **--------- उत्तरवादी**
**उपसचिव, सामाजिक न्याय व सांस्कृतिक कार्य, मावक-५,**
**मंत्रालय, मुंबई ३२**

**जन माहिती अधिकारी**
**अवर सचिव, सामाजिक न्याय व सांस्कृतिक कार्य, मावक-५,**
**मंत्रालय, मुंबई ३२**

## - वि वे च न -

अपीलाचा दिनांक : १०.११.२००९
सूनावणीचा दिनांक : ३० जानेवारी, २०१०
अपिलार्थी :उपस्थित
सहायक जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : उपस्थित

अर्जदारास पुढील माहिती पाहिजे होती.

" लुहार,लुवार (LUHAR, LUVAR) जातीला इतर मागासवर्ग अनुक्रमांक ९२ मधील शासनानी दिनांक १.०१.२००१ रोज शासन निर्णय क्रमांक सीबीसी/१०९८/प्र.क्र.१८५/मावक-५ नव्याने समाविष्ट करावयाची तत्सम जात व मुळ जातीचा अनुक्रमांक ९२,लुहार,लुवार इतर मागासवर्ग प्रवग्रातील मूळ जातीचा अनुक्रमांक ९२ लोहार (LOHAR) मध्येज नव्याने समाविष्ट करावयाची तत्सम जात व मूळ जातीचा अनुक्रमांक ९२ लुहार, लुवार ( LUHAR,LUVAR) हा निर्णय शासानाने त्या निशकर्षानुसार राज्याच्या इतर मागासवर्ग प्रवर्गाच्या यादीत सुधारणा करण्यात आले होते ते कारणाची लिखित माहिती मिळणेबाबत.

लोहार,लुहार,लुवार. इतर मागासवर्ग जातीचा अनुक्रमांक ९२ असून शासनानी दिनांक १.०३.२००६ रोज शासन निर्णय क्रमांक सीबीसी/१४/२००५/प्र.क्र.८२/मावक-५ राज्य मागासवर्ग आयोगाने केलेल्या शिफारशींनुसार लोहार (LOHAR ) जातीला इतर मागासवर्ग अनुक्रमांक ९२. वगळण्यात आलेल्या होते. मागासवर्ग आयोगाने लोहार,लुहार,लुवार इतर मागासवर्ग जातीचा अनुक्रमांक ९२ सिफरिश फक्त लोहर जातीला इतर मागासवर्ग अनुक्रमांक ९२ वगळण्यात आले होते. लोहार,लुहार,लुवार जाती जात व मूळ सारखी आहे तरी पण लोहार,लुहार,लुवार जाती फक्त

लोहर जातीला इतर मागासवर्ग अनुक्रमांक९२. मधील वगळण्यात आलेल्या आहे. त्याचे कारणाची लिखित माहिती मिळणेबाबत."

याबाबतीत प्रथम अपिलिय अधिकारी यांनी हा निर्णय घेण्याची कारणमिमांसा त्यांच्या ७ आक्टोबर २००९ रोजीच्या आदेशात दिलेली आहे. अर्जदाराकडे विषयांकित संदर्भातील १ जानेवारी २००१ व १ मार्च २००६ रोजीच्या शासन निर्णयाची प्रत आहे. मात्र १ मार्च २००६ रोजीचा निर्णय ज्या राज्य मागासवर्ग आयोग यांचा अहवाल क्रमांक १३ (राज्य मागासवर्ग आयोग महाराष्ट्र राज्य, अहवाल क्र.१३ लोहार,घिसाडी,घिसाडी लोहार,गाडी लोहार, चितोडी लोहार व अन्य तत्सम जाती समेहाबाबत सादर झालेल्या विविध मागण्यांबाबत महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोग, पुणे यांचा अहवाल.) वर आधारीत आहे या अहवालामध्ये याची सर्व कारणामिमांसा असल्यामुळे अर्जदाराची माहितीची गरज भागू शकेल. अर्जदारास या अहवालाची प्रत शुल्क भरुन देण्याचे निर्देश देण्यात आले.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः ३०.०१.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले तक्रार.**

**मुमाआ २००९/जळगांव/सी.आर अपील क्रं. १३८६/०२**

**श्री.देवमन नारायण आहेरराव** ---------**अपीलकर्ता**
**मु.पो.खांडवारा,ता.नवापूर,**
**जि. नंदुरबार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **--------- उत्तरवादी**
**मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. नंदुरबार**

**जन माहिती अधिकारी**
**उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.प.) जि.प. नंदुरबार**

## - वि वे च न -

अपीलाचा दिनांक : २७.१०.२००९
सूनावणीचा दिनांक : ८.१२.२००९
अपिलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपीलय अधिकारी : अनुपस्थित

अपीलार्थीनी दि.४.०८.२००९ च्या अर्जान्वये सरपंच,ग्रा.प. खांडबारा यांच्या ग्रामसभेच्या ठरावावरील स्वाक्षरीबाबत प्रश्न उपस्थित करुन, स्वाक्षरीच्या सत्यतेबाबत माहितीची मागणी केली आहे. यावर उत्तर अप्राप्त असल्याने त्यांनी दि.१४.०९.२००९ रोजी प्रथम अपील केले. तथापि यावर सुनावणी झाली नाही व माहिती दिली गेली नाही. यास्तव त्यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

व्दितीय अपीलावरील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी सादर केले की अपीलार्थींनी मागितलेली माहिती ग्रा.प. स्तरावरील असल्याने ती पुरविण्याबाबत गट विकास अधिकारी यांना पत्र दिले आहे. गट विकास अधिकारी यांचे कार्यालय जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाच्या अधिपत्त्याखाली येते. अशा परिस्थित गट विकास अधिकारी यांच्या कार्यालयाकडून कार्यवाही झाली किंवा कसे हे बघण्याची जबाबदारी उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.) यांच्या कार्यालयाची आहे तेव्हा असे निदेश देण्यात येतात की गट विकास अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त करुन घेऊन ती अपीलार्थीस सदर आदेशाच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आत माहिती पुरवावी.

गट विकास अधिकारी नवापूर यांच्याकडून ती विहित मुदतीत पुरविली गेलेली नसल्याचे सकृत दर्शनी दिसून येत असल्याने त्यांच्या विरुध्द योग्य ती प्रशासकीय कारवाई करावी व तसा अहवाल आयोगास सादर करावा.

## आदेश

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांक: ३०.०१.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले तक्रार.**

**मुमाआ २००९/जळगांव/सी.आर अपील क्रं. १३८३/०२**

**श्री.देवमन नारायण आहेरराव** **---------अपीलकर्ता**
**मु.पो.खांडवारा,ता.नवापूर,**
**जि. नंदुरबार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **--------- उत्तरवादी**
**तहसिलदार नवापूर,जि.प. नंदुरबार**

**जन माहिती अधिकारी**
**निवडणूक शाखा, तहसील कार्यालय, नवापूर, जि.नंदुरबार**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक : ०६.०४.२००९
सूनावणीचा दिनांक : ८.१२.२००९
अपिलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित

प्रथम अपीलय अधिकारी : उपस्थित

अपीलार्थीनी दि.७.०१.२००९ च्या अर्जाव्दारे माहिती मागितली त्याचा थोडक्यात तपशील खालीलप्रमाणे.

१) नवापूर तालुक्याची लोकसंख्या,दारिद्रय रेषेखालील कुटुंबाची संख्या.

२) रेशन दुकानांची संख्या.

३) खांडबारा गावातील रेशन दुकानदार व रॉकेल विक्रेत्यांची संख्या.

४) कार्यालयात किती कर्मचाऱ्यांवर खाते निहाय चौकशी/शिस्तभंगाची कार्यवाही सुरु आहे.

या व्यतिरिक्त त्यांनी इतरही अनेक मुद्यांवर माहिती मागितली आहे. त्यांच्या अर्जानुषंगाने उत्तर प्राप्त न झाल्याने त्यांनी दि.१६.०२.२००९ रोजी प्रथम अपील केले. यावर निर्णय होऊन त्यांना १५ दिवसांच्या आत विनाशुल्क माहिती उपलब्ध करुन देण्याचे आदेश दि.१३.०३.२००९ रोजी पारित करण्यात आले. तथापि त्यांना माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

अपीलावरील सुनावणीचे वेळी आयोगास सादर करण्यात आले की दि.८.१२.२००९ रोजी माहिती देण्यात आली आहे. अपिलार्थीनी सुध्दा सांगितले की त्यांना माहिती मिळालेली आहे व त्यांची काही तक्रार बाकी नाही. याचा विचार करता खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहेत.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांक: ३०.०१.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले तक्रार.**

**मुमाआ २००९/जळगांव/सी.आर अपील क्रं. १५३८/०२**

**श्री.नामदेव सावळीराम बोरसे ---------अपीलकर्ता**
**व्दाराः आशिष शिवाजी जाधव,**
**इंदिरानगर, नाशिक**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा --------- उत्तरवादी**
**शिक्षणाधिकारी (प्रा.) कार्यालय,जि.प.नाशिक**

**जन माहिती अधिकारी तथा**
**अधिक्षक, शिक्षणाधिकारी (प्रा.) कार्यालय,जि.प.नाशिक**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक : ०७.०५.२००९
सूनावणीचा दिनांक : २१.१२.२००९
अपिलार्थी : यांचे प्रतिनिधी उपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपीलय अधिकारी : उपस्थित

सुनावणीच्या वेळी अपिलार्थीच्या प्रतिनिधीने माहिती मिळाली नसल्याबद्दल व ती मिळणेबाबत विनंती केली त्यावेळी अपिलार्थीने ते दारिद्रय रेषेखालील असल्याबाबतचा पुरावा सादर केला नसल्यामुळे माहिती दिली नसल्याचे जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे निदर्शनास आणले, दारिद्रय रेषेखालील व्यक्तिने ते दारिद्रय रेषेखालील व्यक्ती असल्याबाबतचा पुरावा सादर केल्याशिवाय विनाशुल्क माहिती देता येणार नाही. त्याच प्रमाणे माहिती मागतांना ती अवास्तव विस्तृत स्वरुपाची असू नये .

**आदेश**

**जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास त्यांनी दारिद्रय रेषेखालील असल्याबद्दलचा पुरावा सादर केल्यावर ७ दिवसांचे आत उर्वरित माहिती विनाशुल्क द्यावी. अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः ३०.०१.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेल अपील.**

**मुमाआ २००९/नाशिक/अपील क्रं. १५४१/०२**

**ॲड.श्री. दिलावरखान पठाण ---------अपीलकर्ता**
**चेंबर नं. ११३ बिल्डींग नं.२, जिल्हा न्यायालय परिसर,**
**नाशिक - २.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा --------- उत्तरवादी**
**उपायुक्त, नाशिक पोलीस (श्री.सुदाम त्रंबके), गुन्हे व मुख्यालय, नाशिक**

**जन माहिती अधिकारी तथा**
**सहायक पोलीस आयुक्त,(श्री.सुभाष थोरात,)गुन्हे, नाशिक**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक : १३.०५.२००९
सूनावणीचा दिनांक : २१.१२.२००९
अपिलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी : अनुपस्थित
प्रथम अपीलय अधिकारी : उपस्थित

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी चुकीच्या कारणाने माहिती नाकारण्यात आली असल्याचे नमुद करुन माहिती देण्याचे आदेश देण्याची विनंती केली आहे. मुळ अर्जातील माहिती तपासली असता ती जरतर स्वरुपातील आहे. मात्र अर्जदाराच्या प्रश्नाचे उत्तर हे, त्यांना एखादा पोलीस अधिकारी/कर्मचारी हो अवैध कृत्य करीत आहे किवा त्यात त्याचा सहभाग आहे असे वाटत असेल तर ही बाब त्यांनी संबंधीत अधिकारी / कर्मचारी यांच्या निदर्शनास त्वरित आणावी म्हणजे ते योग्य ती कारवाई करु शकतील, हेच आहे.

**आदेश**
**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांक: ३०.०१.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेल अपील.**

**मुमाआ २००९/अपील क्रं. १४५९/०२**

**श्री. जे.एन.लगड** ---------अपीलकर्ता
**महा.लोक.ग्राह.पंचायत श्रीराज बं.नं.२०,**
**इंदिरानगर नाशिक पी.क्र. ४२२ ००९**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** --------- उत्तरवादी
**अप्पर आयुक्त विभागीय आयुक्त, कार्यालय,औरंगाबाद**

**जन माहिती अधिकारी तथा**
**उपआयुक्त, (पुरवठा विभाग), विभागीय आयुक्त, कार्यालय, औरंगाबाद.**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक : ०४.०६.२००८
सूनावणीचा दिनांक : २१.१२.२००९
अपिलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपीलय अधिकारी : यांचे प्रतिनिधी उपस्थित

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी एकत्रित चर्चा केली. अपिलार्थीस माहिती मिळाली नाही मुळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती तहसिल पैठण व जिल्हा पुरवठा अधिकारी औरंगाबाद यांचेशी संबंधीत असून त्यांचेकडे मुळ अर्ज हस्तांतरीत न केल्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी आता ती माहिती तहसिल कार्यालयाकडून माहिती मिळवून अपिलकर्त्यास द्यावी.

**आदेश**

**जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास १५ दिवसाचे आत विनाशुल्क माहिती द्यावी. अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांक: ३०.०१.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/अपील क्रं. १५४५/०२**

**श्री. पंढरीनाथ बाबूराव बोडके** ---------**अपीलकर्ता**
**मु.मोह,पो.चिंचोली,ता.सिन्नर,**
**जि. नाशिक.,**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** --------- **उत्तरवादी**
**पोलीस उपअधिक्षक, विशेष पोलीस महानिरीक्षक**
**यांचे कार्यालय**

**जन माहिती अधिकारी**
**विशेष पोलीस महानिरीक्षक यांचे कार्यालय नाशिक परिक्षेत्र,**
**दक्षता,नाशिक**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक : १८.०६.२००९
सूनावणीचा दिनांक : २१.१२.२००९
अपिलार्थी : अनुपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपीलय अधिकारी : उपस्थित

अपीलार्थीनी दि.२४.०२.२००९ च्या अर्जान्वये मागितलेल्या माहितीचा थोडक्यात तपशील खालीलप्रमाणे.

१) मुदतबाहय रेकॉर्ड नाश करण्यासंबंधीचा कालावधी बाबतची माहिती.

२) आरोपी रुग्णांना हॉस्पीटलमध्ये उपचाराकरिता दाखल करण्यासंबंधात असलेला कायदा अथवा नियमांच्या छायांकित प्रती. "

याबाबत अपिलार्थींना दि.२.०३.२००९ च्या पत्रान्वये खालीलप्रमाणे कळविण्यात आले.

" मुद्दा क्र.१ ची माहिती गोपनीय असल्याने पुरविता येत नाही. मुद्दा क्र.२ बाबत जिल्हा शल्य चिकित्सक, नाशिक यांच्याकडून माहिती मिळू शकेल. तेव्हा त्यांच्या कार्यालयाशी संपर्क साधावा. "

या उत्तराने समाधान न झाल्याने त्यांनी दि.१.०४.२००९ रोजी प्रथम अपील केले. या अर्जाच्या अनुषंगाने अपिलार्थींना जन माहिती अधिकारी यांनी कळविल्याप्रमाणे दि.१७.०४.२००९ रोजी उत्तर देण्यात आले.

प्रथम अपिलावरील प्राप्त आदेशान समाधान न झाल्याने त्यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

अपीलावरील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आयोगासमोर सादर केले की अपिलार्थींनी मागितलेली माहिती कार्यालयीन पुस्तिकेतील होती व ती गोपनीय असल्याने देण्यात आली नाही. याबाबत आयोगाचे असे मत आहे की अपिलार्थींनी कागदपत्रे नष्ट करण्याबाबतची मर्यादा तसेच रुग्ण आरोपीस दवाखान्यात उपचारार्थ दाखल करण्याबाबतच्या नियमांची मागणी केली आहे. अपिलार्थींनी एखाद्या विशिष्ट प्रकरणाशी संबंधित माहिती मागितलेली नाही. तेव्हा ती देण्यास काही अडचण असण्याचे कारण नाही. तरी आयोगाचे असे निदेश आहेत की अपिलार्थींना कार्यालयात नियमावलीतील त्यांनी मागितलेल्या माहितीशी संबंधित नियमांच्या छायांकित प्रती विनाशुल्क देण्यात याव्यात.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः ३०.०१.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/अपील क्रं. १३९५/०२**

**श्री. शेख अमिन हमीद,** ------ **अपीलकर्ता**
**मुसलमान महोल्ला, शाह झेरॉक्स जवळ,**

**नवापूर, जि.नंदुरबार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **------- उत्तरवादी**
**उप प्रादेशिक परिवहन अधिकारी,**
**उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, जळगांव**

**जन माहिती अधिकारी, तथा**
**सहा. प्रादेशिक परिवहन अधिकारी, आदर्श नगर,**
**जळगांव,जि.जळगांव**

**- वि वे च न -**

अपीलकार श्री. शेख अमिन हमीद, यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०८.०८.२००९ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नवीन प्रशासकीय इमारत, जिल्हाधिकारी कार्यालय,सभागृह धुळे, जि.धुळे परिसर जळगांव येथे दि. ०८.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी तसेच जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपिलार्थी अनुपस्थित होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.०६.०४.२००९ रोजी अर्ज करुन, खालील नमूद केलेली श्री.टी.वी.पाटील,सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी जळगांव यांचेवर शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी याबाबत केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने माहितीची विचारणा केले आहे.

अपिलार्थीने मागितलेली माहिती ही प्रत्यक्ष प्रश्नोत्तर स्वरुपात असल्यामुळे व योग्य नेमकी कोणती माहिती पाहिजे याचा बोध होत नाही. तरी नेमकी माहिती विचारल्यास विभागाच्या अखत्यारीत असलेल्या अभिलेखांच्या छायांकित प्रती देता येतील असे जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १३.०५.२००९ च्या पत्राव्दारे कळविण्यात आले.

अपिलार्थीने माहिती न मिळाल्याने कलम १९ (१) खाली प्रथम अपील दाखल केले असता प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी अपिलकर्ता यांच्या मूळ माहितीच्या अर्जास शासकीय माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर योग्य असल्याने अपील निकाली काढण्यांत येते असल्याचे आदेश पारित करण्यांत आले.

व्दितीय अपीलाच्या सुनावणीच्या वेळी अपीलार्थी स्वतः गैरहजर होते तर जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय प्राधिकारी उपस्थित होते. सुनावणीच्या वेळी उत्तरवादी यांनी असे निदर्शनास आणून दिले की दि.६.०४.२००९ रोजीचा माहितीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांना दिनांक १७.०४.२००९ रोजी प्राप्त झाल्यावर त्यांनी दि.१३.०५.२००९ च्या पत्राने उत्तर दिले आहे. प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी अपिलार्थी श्री.शेख यांना दोन वेळा संधी

देऊनही ते सुनावणीसाठी उपस्थित राहिले नाहीत अपिलार्थी श्री.शेख हे मुख्य सुनावणीच्या वेळी अनुपस्थित असल्याने त्यांना नेकमी कोणती माहिती हवी होती व त्याचे स्वरुप याचा कोणताच शेवटपर्यंत बोध त्यांच्याकडून न झाल्याने संबंधीतांचे तोंडी जबाब व उपलब्ध कागदपत्राचा विचार करता मी पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांक: ३०.०१.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/४५१७२/अपील क्रं. ५२७९/०२**

**श्री. भूषण पांडुरंग माळगावकर** ---------अपीलकर्ता
**प्लॉट नं.१२२, रुम.नं.३०२, मुकेश अपार्टमेंट,**
**नाडकर्णी मार्ग, वडाळा (पूर्व),**
**मुंबई - ४०० ०३७**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** --------- उत्तरवादी
**महाअधिवक्ता, सचिव,महाराष्ट्र ॲडव्होकेटस् वेलफेअर फंड,**
**उच्च न्यायालय,आवार, विस्तार इमारत,**
**उच्च न्यायालय, मुंबई - ३२**

**जन माहिती अधिकारी**
**सचिव,महाराष्ट्र ॲडव्होकेटस् वेलफेअर फंड,**
**उच्च न्यायालय,आवार, विस्तार इमारत,**
**उच्च न्यायालय, मुंबई - ३२**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक : ०९.११.२००९
सूनावणीचा दिनांक : २९.०१.२०१०
अपिलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित

महाराष्ट्र ॲडव्होकेटस् वेलफेअर फंड, कार्यालयाने अजून पर्यंत जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलिय अधिकारी यांची नेमणूक न केल्याने व त्यांना माहिती न मिळाल्यामुळे आयोगाकडे अपील केलेले आहे. सदर फंड हा महाराष्ट्र विधानमंडळाने पारित केलेल्या कायद्यानुसार निर्माण झालेला आहे. यासंबंधातील कायदा महाराष्ट्र ॲडव्होकेटस् वेलफेअर फंड ॲक्ट १९८१ असा आहे. या कायद्याच्या कलम चार नुसार जी ट्रस्टी कमिटी निर्माण करण्यात आलेली आहे त्यावर ॲडव्होकेट जनरल हे पदसिध्द अध्यक्ष विधी व न्याय विभागाचे सचिव हे सुध्दा पदसिध्द सदस्य सेक्रेटरी बार कॉन्सील तसेच अकाउटंट बार कॉन्सील हे सुध्दा पदसिध्द सदस्य आहेत. म्हणजे एकूण नऊ सदस्यांपैकी चार सदस्य हे पदसिध्द आहेत. तसेच या कमिटीवर तीन सदस्य हे राज्य शासनानेच नेमावयाचे आहेत. त्यामुळे नऊ पैकी कमित कमी पाच सदस्य हे शासन नियुक्त आहेत. अधिनीयमाच्या कलम सात नुसार जरी ट्रस्टी कमिटीमधील काही जागा रिक्त असल्यातरी उर्वरीत सदस्य हे जणू काही रिक्तता निर्माण झालेली नाही असे समजून कार्य करु शकतात. तसेच महाराष्ट्र ॲडव्होकेटस् वेलफेअर फंड रेव्हयुल्यूशन १९८३ च्या क्रमांक २० नुसार फंडाच्या निधीचा वार्षिक अहवाल हा राज्य शासनालाच सादर करावयाचा आहे. त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधे दशविलेल्या "जनप्राधिकरणाच्या" व्याख्येत सदरील फंड हा निश्चीतपणे येतो. त्यामुळे एक महिन्याच्या आत जन माहिती अधिकारी व अपिलिय अधिकारी यांची नेमणूक निधीच्या अध्यक्षांनी करावी व अर्जदाराने अधिनीयमाच्या कलम सहा खालील केलेला अर्ज हा जन माहिती अधिकाऱ्यांनी विचारात घ्यावा असे ही निर्देश देण्यात येत आहे.

**आदेश**
**अपील निकाली काढण्यात येत आहे.**
**संबंधीतांनी उपरिनिर्दीष्ट कार्यवाही करावी.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः २९.०१.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/अपील क्रं. १३९३/०२**

**श्री. देवमन नारायन आहेरराव** **------ अपीलकर्ता**
**मु.पो.खांडबारा,ता.नवापूर,**
**जि.नंदुरबार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **------- उत्तरवादी**
**शिक्षणाधिकारी (मा.), जि.प.नंदुरबार, जि.नंदुरबार**

**जन माहिती अधिकारी, तथा**
**उपशिक्षणाधिकारी, जि.प.नंदुरबार, जि.नंदुरबार**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक : ३०.०९.२००९
सूनावणीचा दिनांक : ०८.१२.२००९
अपिलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलिय अधिकारी : उपस्थित

अपीलकार श्री. देवमन नारायन आहेरराव, यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३०.०९.२००९ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर

अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नवीन प्रशासकीय इमारत, जिल्हाधिकारी कार्यालय,सभागृह धुळे, जि.धुळे परिसर जळगांव येथे दि. ०८.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी तसेच जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपिलार्थी सुध्दा उपस्थित होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.१२.०२.२००९ रोजी अर्ज करुन, खालील नमूद केलेला तपशील १) ॲग्रीकल्चर हायस्कुल खांडबारा ता.नवापूर विद्यालयात प्रचलित नियमाप्रमाणे विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो का? २)तुकडी निश्चिती. ३) विद्यार्थ्यांच्या संख्येनुसार तुकडी संख्या व त्यानुसार शिक्षकांची उपलब्धता. ४) इयत्ता ५ वी ते इ.१० वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना शासकीय सवलती दिल्या जातात का? इत्यादि माहिती मागितली होती. जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १२.०२.२००९ च्या अर्जावर दि.२.०५.२००९ रोजी सुनावणी घेऊन दि.६.०५.२००९ च्या पत्राव्दारे अपिलार्थीस मागितलेली माहिती सविस्तर दिली.

अपिलार्थी यांनी दि.११.०८.२००९ रोजी प्रथम अपील दाखल करुन प्रथम अपिलिय प्राधिकारी यांच्याकडे माहिती ३० दिवसांचा कालावधी उलटून गेल्यावर मिळाली अशी तक्रार केली. माहिती पूर्वीच दिली गेल्यामुळे सदर अपिलावर कोणतेचा आदेश पारित झाले नाहीत.

अपिलार्थीने त्याच कारणास्तव व्दितीय अपील दाखल केले सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय प्राधिकारी व अपिलार्थी उपस्थित होते. त्यावेळी झालेल्या चर्चेत अपिलार्थीस योग्य ती माहिती पुरविण्यांत आली आहे. अपिलार्थीने दि.१४.०५.२००९ च्या पत्राव्दारे माहिती मान्य केली आहे.

माहिती उशीरा मिळाली हे अपिलार्थीचे म्हणणे योग्य आहे माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये कार्यालयांत उपलब्ध असणारी माहिती जन माहिती अधिकाऱ्यांनी विहित मुदतीत देण्याची जबाबदारी असेल ती त्यांनी योग्यरित्या पार न पाडल्याबद्दल त्यांना समज देण्यात येत आले.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांक: ३०.०१.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/अपील क्रं. १३९२/०२**

**श्री. देवमन नारायन आहेरराव** ------ **अपीलकर्ता**
**मु.पो.खांडबारा,ता.नवापूर,**
**जि.नंदुरबार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** ------- **उत्तरवादी**
**शिक्षणाधिकारी (मा.), जि.प.नंदुरबार, जि.नंदुरबार**

**जन माहिती अधिकारी, तथा**
**उपशिक्षणाधिकारी, जि.प.नंदुरबार, जि.नंदुरबार**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक : ३०.०९.२००९
सूनावणीचा दिनांक : ०८.१२.२००९
अपिलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलिय अधिकारी : उपस्थित

अपीलकार श्री. देवमन नारायन आहेरराव, यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३०.०९.२००९ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नवीन प्रशासकीय इमारत, जिल्हाधिकारी कार्यालय,सभागृह धुळे, जि.धुळे परिसर जळगांव येथे दि. ०८.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी तसेच जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपिलार्थी सुध्दा उपस्थित होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.१२.०२.२००९ रोजी अर्ज करुन, खालील नमूद केलेल्या माहितीचा तपशील. सन २००६ ते २००७ पासून २००८ ते २००९ या वर्षात नंदुरबार जिल्हयातील जिल्हापरिषद शाळा.

माध्यमिक विद्यालय अनुदानीत/विनाअनुदानीत व खाजगी शाळेतील इयत्ता ४ थी ते इयत्ता १० वी तील प्रवेश घेतलेल्या व पास झालेल्या विद्यार्थ्यांची संख्या इत्यादिबाबत माहिती मागितली होती.

अपीलार्थीस सदर अर्जावर मुदत संपुन गेली तरी माहिती मिळाली नाही त्यामुळे त्यांनी कलम १९ (१) अन्वये प्रथम अपील दाखल केले. त्यास अनुसरुन प्रथम अपिलिय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्य) यांनी त्यांचे पत्र दि.१.१२.२००९ नुसार अपिलार्थीस विनामुल्य सविस्तर माहिती पाठविण्यांत येत आहे असे कळविले.

प्रथम अपिलिय प्राधिकारी यांनी अपिलार्थीस व्दितीय अपील दाखल केल्यानंतर माहिती दिलेली आहे. व्दितीय अपीलाच्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपिलिय प्राधिकारी उपस्थित होते. त्यावेळी असे निदर्शनास आले की अपिलार्थीस व्दितीय अपिलाच्या सुनावणीपूर्वीच दि.१.१२.२००९ रोजी पोष्टाने माहिती पाठविण्यांत आली होती.

अपिलार्थीचे म्हणणे आहे की माहिती मिळाली नाही अपिलार्थीचा अर्ज दि.१२.०२.२००९ रोजीचा आहे व्दितीय सुनावणी दिनांक ८.१२.२००९ रोजी झाली तोपर्यंत माहिती मिळालेली दिसत नाही. अपिलार्थीच्या अर्जास १० महिने उलटून गेले तरी माहिती मिळालेली नाही हे सत्य आहे. माहिती जर सहज उपलब्ध असेलतर ती देण्यास जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय प्राधिकारी हे जबाबदार शासकीय अधिकारी असतांना ते अशी जन कल्याणकारी महिती देण्यास का कुचराई करतात हे समजून येत नाही. माहिती विहित मुदतीत कळविले ही जन माहिती अधिकारी यांची जबाबदारी आहे व ती जन माहिती अधिकारी यांनी वेळेत उपलब्ध करुन दिली की नाही यावर प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी लक्ष ठेवणे आवश्यक आवश्यक असते परंतु या प्रकरणांत दोन्ही जबाबदार अधिकाऱ्यांनी माहिती वेळेत देण्यास टाळाटाळ केलेली दिसून येते तरी त्यांना अशी समज देण्यांत येते की अपिलार्थीस पाठविलेली माहिती मिळाली की नाही याची खात्री करुन घ्यावी व माहिती मिळाली नसल्यास अपिलार्थीस प्रत्यक्ष बोलाऊन ती त्यांना देण्यांत यावी.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांक: ३०.०१.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/अपील क्रं. १३९०/०२**

**श्री. देवमन नारायन आहेरराव** ------ **अपीलकर्ता**
**मु.पो.खांडबारा,ता.नवापूर,**
**जि.नंदुरबार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** ------- **उत्तरवादी**
**गट विकास अधिकारी, पं.स.शिंदखेडा,जि.धुळे**

**जन माहिती अधिकारी, तथा**
**गट विकास अधिकारी,पं.स. कार्यालय,शिंदखेडा,जि.धुळे**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक : १३.०८.२००९
सूनावणीचा दिनांक : ०८.१२.२००९
अपिलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलिय अधिकारी : उपस्थित

अपीलकार श्री. देवमन नारायन आहेरराव, यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १३.०८.२००९ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नवीन प्रशासकीय इमारत, जिल्हाधिकारी कार्यालय,सभागृह धुळे, जि.धुळे परिसर जळगांव येथे दि. ०८.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी तसेच जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपिलार्थी सुध्दा उपस्थित होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.१५.०५.२००९ रोजी अर्ज करुन, मागितलेल्या माहितीचा तपशील. श्री.एकनाथ अंबर अहिरे ग्रामसेवक तावखडा,ता.शिंदखेड,जि.धुळे यांनी नोकरीची सुरुवात केल्यापासून कोणकोणत्या ठिकाणी नियुक्त्या झाल्या तसेच नोकरीचा कार्यकाल व इतर ५ मुद्यांबद्दलची माहिती मागितली होती.

शासकीय माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि.२.०५.२००९ रोजीच्या अर्जास उत्तर दिले नसल्याने अपिलार्थीने दि.२.०७.२००९ रोजी परत अर्ज केला असल्याचे आढळून आले त्यास जन माहिती अधिकारी यांनी दि.७.०७.२००९ च्या पत्राव्दारे पुढीलप्रमाणे उत्तर दिले. श्री.अहिरे ग्रामसेवक यांचे मूळ सेवा पुस्तक गट विकास अधिकारी शिंदखेडा यांचे असून मागणी केलेली माहिती ही गटस्तरावर असल्याने अधिनियम २००५ च्या कलम (६) मधील ३ मधील पोटकलम (२) अन्वये त्यांचा अर्ज गटविकास अधिकारी पंचायत समिती शिंदखेडा यांचेकडे वर्ग करण्यांत येत असून संबंधित

कार्यालयाकडून माहिती प्राप्त करुन घ्यावी. या विरोधात अपिलार्थीने कलम १९ (१) अन्वये प्रथम अपील दाखल केले. परंतु तत्पुर्वी गट विकास अधिकारी पंचायत समिती शिंदखेड यांनी त्यांच्या दि.१७.०८.२००९ पत्राव्दारे काही मुद्यांची माहिती दिली त्याचप्रमाणे मूळ सेवा पुस्तकातील काही त्रुटी पुर्ण करणे आवश्यक असल्याने इतर माहिती देण्यांत आली नाही.

माहिती ३० दिवसांत मिळाली नाही म्हणून अपिलार्थीने व्दितीय अपील दाखल केले त्या सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलिय प्राधिकारी तसेच अपिलार्थी उपस्थित होते. उर्वरीत माहिती दुसऱ्या पंचायत समितीची आहे म्हणून देण्यास वेळ लागला आहे असे जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे आहे. वास्तविक पाहता कायद्यानुसार जी माहिती दुसऱ्या पंचायत समितीने द्यावयाची होती तेवढा अर्जाचा भाग पहिल्या पाच दिवसातच त्या पंचायत समितीच्या जन माहिती अधिकारी यांच्याकडे पाठविणे आवश्यक होते. याची भविष्यकाळासाठी जन माहिती अधिकारी यांनी नोंद घ्यावी. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी आता उर्वरित माहिती स्वतःच उपलब्ध करुन अपिलार्थीस १५ दिवसात विनामुल्य पुरवावी.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांक: ३०.०१.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/अपील क्रं. १३४४/०२**

**श्री. प्रकाश कोंडाजी राशीनकर, ------- अपीलकर्ता**
**" शांताई " रामनगर नवापूर रोड,**
**मु.पो. पिंपळनेर, ता.साक्री,**
**जि.धुळे**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **------- उत्तरवादी**
**तहसिलदार, तहसिल कार्यालय, साक्री,ता.साक्री, जि.धुळे**

**जन माहिती अधिकारी, तथा**
**निवासी नायब तहसिदार, तहसिल कार्यालय, साक्री, ता.साक्री, जि.धुळे**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक : १६.१२.२००८
सूनावणीचा दिनांक : ७.१२.२००९
अपिलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलिय अधिकारी : उपस्थित

अपीलकार श्री. प्रकाश कोंडाजी राशीनकर, यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १६.१२.२००८ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नवीन प्रशासकीय इमारत, जिल्हाधिकारी कार्यालय,सभागृह धुळे, जि.धुळे परिसर जळगांव येथे दि. ०७.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी तसेच जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपिलार्थी सुध्दा उपस्थित होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.०१.०९.२००८ रोजी अर्ज करुन, खालील नमूद माहितीचा तपशील.

१) अभिलेख कक्षात दाखल करण्यांत आलेल्या अ वर्गीय अभिलेखांची एकूण संख्या. २) अभिलेख कक्षातील अ वर्गीय अभिलेख गहाळ झाले किंवा आढळून आले नाही त्यांची सूची. ३) इतर अभिलेख कक्षाशी संबंधीत असलेली माहिती मागितली होती.

अपिलार्थीस जन माहिती अधिकाऱ्याने दि.२०.०९.२००९ च्या पत्राव्दारे माहिती दिली परंतु प्रत्यक्षात माहिती दिल्याचे पत्र नस्तीमध्ये आढळून आलेले नाही.

अपिलार्थीने माहिती न मिळाल्याने प्रथम अपील दाखल केले परंतु त्यावरही प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी आदेश पारित केले नाहीत.

कोणतीच माहिती मिळू न शकल्याने अपिलार्थीने व्यथीत होऊन कलम १९ (३) अन्वये व्दितीय अपिल आयोगाकडे दाखल केले.

व्दितीय अपीलावरील सुनावणीच्या वेळी अपिलार्थी,जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय प्राधिकारी उपस्थित होते.

सुनावणीच्या वेळी निदर्शनास आलेल्या बाबी. १) अपिलार्थीने प्रथम अर्ज दि.१.०९.२००८ रोजी केलेला आहे. त्यावर प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी दि.४.१०.२००८ व दि.३.११.२००८ रोजी प्रथम अपीलावर सुनावणी ठेवली. परंतु प्रत्यक्षात सुनावणीचे आदेश पारित केलेले दिसत नाही. ३) अपिलार्थीना दि.१६.१२.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले

त्यांची सुनावणी दि.८.१२.२००९ रोजी झाली त्यावेळीही अपिलार्थीस माहिती न देता आदेश पारित होणे बाकी आहेत असे जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी सांगितले व तसे वक्तव्य नमूद केले आहे.

अपिलार्थीस अशाप्रकारे १ वर्षापेक्षा अधिक काळ उडवा उडवीची उत्तरे देणे, माहिती न देणे हे जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलार्थी यांचे हे वर्तन अत्यंत अयोग्य आहे. शासकीय पदाचा असा बेजबाबदारपणे वापर केल्या सारखाच आहे. अशा परिस्थितीत माहिती उपलब्ध असून नाकारणे किंवा लपवून ठेवने ही बाब अत्यंत खेदजनक म्हणावी लागेल. तरी एकूण परिस्थितीचा सांगोपांग विचार करता जन माहिती अधिकारी यांचेवर रु.५०००/- ची शास्ती लादण्यांत येत आहे. ती त्यांच्या दि.१ मार्च २०१० रोजी होणाऱ्या पगारातून वसुल करुन शासनाने विहित केलेल्या बजेड हेडमध्ये जमा करावी व तसे केल्याचा अनुपालन अहवाल आयोगास दि.२० मार्च २०१० पूर्वी पाठवावा अपिलिय प्राधिकारी या प्रकरणात प्रथम अपिलिय निर्णय दिलेला नाही त्यांना समज देण्यात येत आहे. तरी यापुढे असे घडणार नाही याची दक्षता घ्यावी.

## आदेश

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

**शास्तीची वसुली करण्याची कार्यवाही प्रथम अपिलिय प्राधिकारी यांनी करावी.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांक: ३०.०१.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/अपील क्रं. १३२७/०२**

**श्री. प्रकाश कोंडाजी राशीनकर,** **------- अपीलकर्ता**
**" शांताई " रामनगर नवापूर रोड,**
**मु.पो. पिंपळनेर, ता.साक्री,**
**जि.धुळे**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **------- उत्तरवादी**
**तहसिलदार, तहसिल कार्यालय, साक्री,ता.साक्री, जि.धुळे**

**जन माहिती अधिकारी, तथा**
**निवासी नायब तहसिदार, तहसिल कार्यालय, साक्री, ता.साक्री, जि.धुळे**

## - वि वे च न -

अपीलाचा दिनांक : १७.०६.२००९
सूनावणीचा दिनांक : ७.१२.२००९
अपिलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलिय अधिकारी : उपस्थित

अपीलकार श्री. प्रकाश कोंडाजी राशीनकर, यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १७.०६.२००९ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नवीन प्रशासकीय इमारत, जिल्हाधिकारी कार्यालय,सभागृह धुळे, जि.धुळे परिसर जळगांव येथे दि. ०७.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी तसेच जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपिलार्थी सुध्दा उपस्थित होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.१६.०३.२००९ रोजी अर्ज करुन, खालील नमूद केलेली मौजे पिंपळनेर येथील निवासी घरे/भुखंड,जिरयती शेती व बागायती शेती यांचे इ.स.१९५१ ते इ.स.१९५६ अखेरच्या ५ वर्षात झालेल्या खरेदी विक्री व्यवहाराची प्रत्येक वर्गवार माहिती मागितली होती.

जन माहिती अधिकारी यांनी सहायक दुय्यम निबंधक वर्ग-२ नंदुरबार यांना दि.१७.०३.२००९ च्या पत्राव्दारे अर्जदारास मागितलेली माहिती पुरवावी असे कळविले व त्याची प्रत अर्जदारास दिली.

सहायक दुय्यम निबंधक,नंदुरबार यांनी अर्जदारास कार्यालयीन अभिलेख तपासले असता सन १९५३ नंतर अर्जदाराच्या नावे कोणताही व्यवहार झाले नाहीत तर सन १९५१ ते १९५२ या वर्षाचे रेकॉर्ड सहायक दुय्यम निबंधक वर्ग-२ धुळे (मुख्यालय) या कार्यालयातून उपलब्ध करुन घ्यावेत.असे दि.१३.०५.२००९ च्या पत्राव्दारे कळविले. त्याचप्रमाणे तहसिलदार साक्री यांनी मौजे पिंपळनेर येथील सन १९५१ ते १९५५ पर्यंतचे फेरफार नोंदी नकला तयार असून त्याच्या प्रती फी भरुन घेऊन जाण्याचे दि.१२.०५.२००९ च्या पत्राव्दारे कळविले होते.

व्दितीय अपीलाच्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपिलीय प्राधिकारी उपस्थित होते. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांचे असे म्हणणे होते की मागितलेली माहिती उपलब्ध असतांना ती त्यांच्या अभिलेख्यात उपलब्ध नाही असे सांगुन जन माहिती अधिकारी यांनी अर्ज दुसऱ्या विभागांत वर्ग केले. तसेच माहिती विहित मुदतीत दिलेली नाही. ३) जन माहिती अधिकारी/प्रथम अपिलिय प्राधिकारी यांनी सुनावणी घेतली पण आदेश पारित केले नाहीत. माहितीही उपलब्ध करुन देत नाहीत प्रस्तुत प्रकरणांत आढळून आलेले अपिलार्थीचे म्हणणे योग्य आहे. प्रत्यक्षात प्रथम अपिलिय प्राधिकारी यांनीही सुनावणी नंतर आदेश पारित झालेले नाहीत हे आयोगाकडील सुनावणीच्या वेळी मान्य केलेले आहे.

मात्र मागितलेला रेकॉर्ड जुना ५०-६० वर्षापुर्वीचा आहे तो जेथून मिळू शकतो तेथेच अर्ज माहिती देण्यासाठी पाठविला आहे. खरेदी विक्री व्यवहाराची तलाठी कार्यालयात होणारी नोंद ही दुय्यम निबंधक यांना जारी केलेल्या इंडेक्स x II गाषवाऱ्यावरुनच होत असते. त्यामुळे जन माहिती अधिकारी साक्री तहसील यांची कृति अयोग्य होती असे म्हणता येणार नाही. मात्र शुल्क कळवितांना त्यांनी झेरॉक्स करण्याचे शुल्क वेगळे व प्रत्येक प्रतिचे रु.२ प्रमाणे शुल्क हे चार्ज केले आहे.प्रत्येक प्रतिचे

रु.२/- प्रमाणे चार्ज केल्यानंतर वेगळयाने झेरॉक्स चे शुल्क घेण्याचे कारण नाही जर प्रत्यक्ष या रकमा भरल्या असतील तर जादा शुल्क परत करावे.

प्रथम अपिलिय अधिकारी यांनी सुनावणी झाल्यावर लगेचच आदेश पारित करावयास हवा. तो न केल्याबद्दल त्यांना समज देण्यात येत आहे.

**आदेश**

**अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः ३०.०१.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/अपील क्रं. १३३२/०२**

**श्री. संतोष महादू बागले** **------ अपीलकर्ता**
**रा.उदय नगर, विद्यावर्धिनी कॉलेजजवळ,**
**साक्री रोड,धुळे,ता.**
**जि.धुळे**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी** **------- उत्तरवादी**
**जिल्हाधिकारी कार्यालय, धुळे,जि.धुळे**

**जन माहिती अधिकारी**
**जिल्हाधिकारी कार्यालय, धुळे,जि.धुळे**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक : १६.०५.२००९
सूनावणीचा दिनांक : ०७.१२.२००९

अपिलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलिय अधिकारी : उपस्थित

अपीलकार श्री. संतोष महादू बागले, यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १६.०५.२००९ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नवीन प्रशासकीय इमारत, जिल्हाधिकारी कार्यालय,सभागृह धुळे, जि.धुळे परिसर जळगांव येथे दि. ०७.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी तसेच जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपिलार्थी सुध्दा उपस्थित होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.३१.०३.२००९ रोजी अर्ज करुन, दि.७.०७.२००८ रोजीचे लेकशाही दिनी टोकन क्रं.५७/२००८ अन्वये दिलेल्या अर्जाबाबतची माहिती मागितली होती.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कोणतीही माहिती दिली नसल्याचे आढळून आले.

अपिलार्थीस माहिती न मिळाल्यामुळे १९ (१) अन्वये प्रथम अपील दाखल केले. त्यावरही प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी सुनावणी घेतली नाही व आदेशही पारित केले नाहीत.

अपिलार्थीने अत्यंत व्यथीत होऊन आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलिय प्राधिकारी उपस्थित होते. सुनावणीच्या वेळी निदर्शनास आलेल्या बाबी :- जिल्हाधिकारी धुळे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम ६(१) प्रमाणे अर्जदाराचा माहिती अर्ज उप विभागीय अधिकारी धुळे, भाग धुळे यांचे कार्यालयाशी संबंधीत असल्याने तथे वर्ग करण्यात आला व त्यांना अर्जदाराचे मागणीप्रमाणे माहिती उपलब्ध करुन द्यावी असे कळविण्यांत आले. त्याप्रमाणे अर्जदारासही कळविण्यांत आले आहे. मौजे विंचूर येथील फेरफार नोंद नं.२६२९ संबंधीची मूळ कागदपत्रे उपलब्ध न झाल्याने महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम १९६६ चे कलम १७ प्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक असल्याचे निर्देश जिल्हाधिकारी कार्यालयाने दिले होते. माहितीच्या अधिकारात माहिती देण्यास विलंब देता येत नसल्यास तसे अर्जदारास स्पष्टपणे कळविणे आवश्यक आहे ही बाब जन माहिती अधिकारी यांनी विचारात घेणे आवश्यक असते. सुनावणीच्या वेळी अर्जदार यांचे मूळ आर.टी.एस दुसरे अपील अपर जिल्हाधिकारी,धुळे यांचेकडे दाखल झालेले आहे. अर्जदाराच्या अर्जासंबंधी संबंधित कर्मचाऱ्यांचे खुलासे घेऊन अहवाल तयार करण्यात आला आहे. त्या अहवालाच्या आधारे पुढील कार्यवाही करण्यात येईल असे उप विभागीय यांनी सांगितले. संबंधित दोषी व्यक्तींवर कठोर शासन व्हावे अशी अर्जदाराची मागणी आहे. उप विभागीय अधिकाऱ्यांचे निवेदन लक्षात घेता अपील निकाली काढण्यात यावे अशी विनंती अर्जदाराने केली आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**
**अर्जदारास १० दिवसात माहिती देण्यात यावी.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांक: ३०.०१.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/अपील क्रं. १३८०/०२**

**श्री. शाम मक्कन पाटील ------ अपीलकर्ता**
**शंकर नगर,प्लॉट नं.२१,शहादा,**
**जि.नंदुरबार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------- उत्तरवादी**
**उप विभागीय अधिकारी,तळोदा भाग,तळोदा,ता.तळोदा,**
**जि.नंदुरबार**

**तहसिलदार, तहसिल कार्यालय, शहादा,ता.शहादा,जि. नंदुरबार**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक : ७.०६.२००६
सूनावणीचा दिनांक : ०८.१२.२००९
अपिलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलिय अधिकारी : उपस्थित

अपीलकार श्री. शाम मक्कन पाटील यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०७.०६.२००९ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नवीन प्रशासकीय इमारत, जिल्हाधिकारी कार्यालय,सभागृह धुळे, जि.धुळे परिसर जळगांव येथे दि. ०८.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी तसेच जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपिलार्थी सुध्दा उपस्थित होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.१४.१२.२००६ रोजी अर्ज करुन, खालील नमूद माहिती मागितली होती.

" १) मौजे हिंगणी ता.शहादा येथील गावठाणातील गट नं.२८ मधील प्लॉट वाटपाची मूळ यांदी. २) प्लॉट वाटपाचा नकाशा. ३) प्लॉट वाटपाबाबतची कबुलायत. ४) इ.स.१९६२ ला शासनाने वरील प्लॉट वाटपाबाबत काढलेले आदेश.५) फेर नोंदी व प्लॉट वाटप करण्यात ग्रामपंचायत हिंगणीला भेटलेली आदेशाची प्रत"

जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार शहादा यांनी अपिलार्थीस मागितलेल्या माहिती पैकी प्लॉट वाटपाच्या मूळ कबुलायती व प्लॉट धारकांची यादी कार्यालयांत उपलब्ध असून योग्य ती फी भरुन त्याच्या प्रती घेऊन जाण्यास दि.१३.१२.२००९ च्या पत्राव्दारे कळविले होते परंतु मागणी केलेला नकाशा व इ.स.१९६२ चा मूळ आदेश कार्यालयाच्या अभिलेख्यात शोध घेतला असता आढळून येत नाही.

उर्वरित माहिती न मिळाल्यामुळे अर्जदाराने विभागीय आयुक्त,जिल्हाधिकारी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे अर्ज केला व त्या अर्जावर तहसिलदार यांनी तेच उत्तर पत्रात नमूद केलेले आहे.

व्दितीय अपिलावर दि.८.१२.२००९ रोजी सुनावणी घेण्यांत आली तेवहा अपिलार्थी,जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय प्राधिकारी उपस्थित होते. त्यावेळी झालेल्या चर्चेत जन माहिती अधिकारी यांनी ४५ वर्षापुर्वीच्या माहितीचा कसून शोध घेतला परंतु माहिती आढळून आली नाही. त्यामुळे हे प्रकरण तहसिलदार यांनी निकाली काढलेले आहे. असे नमूद केले आहे.

अपिलार्थी यांना त्यांनी मागितलेली माहिती कोणत्याही परिस्थितीत प्राप्त करुन घ्यावयाची आहे त्याचा ते अद्याप पाठपुरावा करीत आहेत तर जन माहिती अधिकारी यांनी वारंवार अभिलेख्यांत उपलब्ध असलेली माहिती पुरविलेली आहे. शेवटचा टपाल म्हणून उप विभागीय कार्यालयातही आदेश मिळाल्यापासून १० दिवसाचे आत शोध घ्यावा व माहिती सापडून आल्यास ती देण्यात यावी.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः ३०.०१.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/अपील क्रं. १३१५/०२**

**श्री. बी.जे.पाटील** **------ अपीलकर्ता**
**५ प्रमोद नगर, से-२,देवपूर धुळे,**
**जि.धुळे**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी** **------- उत्तरवादी**
**गट विकास अधिकारी, पंचायत समिती,धुळे,जि.धुळे**

**जन माहिती अधिकारी**
**उप अभियंता, (बांधकाम) पंचायत समिती,धुळे,**
**जि.धुळे**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक : २१.०५.२००९
सूनावणीचा दिनांक : ७.१२.२००९
अपिलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलिय अधिकारी : उपस्थित

अपीलकार श्री. बी.जे.पाटील, यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २१.०५.२००९ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नवीन प्रशासकीय इमारत, जिल्हाधिकारी कार्यालय,सभागृह धुळे, जि.धुळे परिसर जळगांव येथे दि. ०७.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी तसेच जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपिलार्थी सुध्दा उपस्थित होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.१६.०२.२००९ रोजी अर्ज करुन, श्री. बी.जे.पाटील, सेवानिवृत्त पंचायत समिती धुळे यांचे माहे जानेवारी २००५ ते एप्रिल, २००६ च्या मासिक दैनंदिनी तक्त्याची प्रमाणित नकला इत्यादि ४ मुद्यांवर माहिती मागितली होती.

जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती तयार आहे परंतु अपिलार्थीस प्रत्यक्ष दिली नाही असे नमूद केले आहे. अपिलार्थीस माहिती न मिळाल्याने त्यांनी १९ (१) खाली प्रथम अपील दाखल केले. त्यावर प्रथम अपिलिय प्राधिकारी यांनी कोणतीही सुनावणी घेतली नाही अथवा आदश पारित केले नाहीत.

अपिलार्थीने व्यथीत होऊन आयोगाकडे दि.२१.०५.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. सदर सुनावणीच्या वेळी अपिलार्थी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलिय प्राधिकारी उपस्थित होते.

सुनावणीच्या वेळी निदर्शनास आलेली बाबः- अपिलार्थीने ४ अर्ज करुन त्यांना हवी असलेली माहिती मागितली होती परंतु जन माहिती अधिकारी यांनी त्याची दखल घेतली नाही. तसेच प्रथम अपिलिय प्राधिकारी यांनीही सुनावणी घेतली नाही व आदेशही पारित केले नाहीत. फक्त अपिलार्थीचे समाधान व्हावे म्हणून माहिती तयार आहे असा दुरध्वनी केला होता. अशी थातूरमातूर उत्तरे दिलेली दिसतात.

माहिती उपलब्ध आहे परंतु ती अपिलार्थीस देण्यास जन माहिती अधिकारी यांनी जाणून बुजून टाळाटाळ का केली हे समजू शकले नाही. निदान प्रथम अपिलिय प्राधिकारी यांनी या बाबीकडे दुर्लक्ष केले आहे ८/१० महिन्याचा कालावधी उलटून गेला तरी माहिती न देणे हे जन माहिती अधिकारी यांनी नैसर्गिक न्याय तत्वाचे पालन न करता शासकीय कर्तव्यही पार पाडलेले दिसत नाही. अशा बेजाबाबदार पणाच्या वर्तणूकीस तयांना दोषी ठरविण्यात येऊन अपिलार्थीस झालेल्या मानसिक त्रासाचा सांगोपांग करता जन माहिती अधिकारी यांचेवर रु.३०००/- ची शास्ती लादण्यांत येत आहे. ती त्यांच्या दि.१ मार्च २०१० रोजी होणाऱ्या पगारातून वसुल करुन शासनाने विहित केलेल्या बजेटहेडमध्ये जमा करावी व तसे केल्याचा अनुपालन अहवाल आयोगास दि.२० मार्च,२०१० पुर्वी पाठवावा. प्रथम अपिलिय प्राधिकारी यांनाही या प्रकरणांत कामात कुचराई केलेली आहे तेव्हा त्यांनाही समज देण्यात येत आहे.

## आदेश

**अपील मान्य करण्यात येत आहे. सुनावणीच्या वेळी माहिती देण्यात आली आहे.**

**शास्ती वसुलीची जबाबदारी अपिलिय प्राधिकारी यांच्याकडे सोपविण्यात येत असून त्याप्रमाणे त्यांनी कार्यवाही करावी.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः ३०.०१.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/अपील क्रं. १५०८/०२**

**श्री. सु.वि.आव्हाड** **------ अपीलकर्ता**
**चेअरमन जनगौरव सहकारी गृहनिर्माण संस्था,**
**दुसरा मजला, संचेती टॉवर,अशोक स्तंभ,**
**नाशिक**

विरुध्द

**प्रथम अपिलीय अधिकारी** **------- उत्तरवादी**
**मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.ठाणे**

**जन माहिती अधिकारी**
**शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जि.प.ठाणे**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक : १३.०६.२००९
सूनावणीचा दिनांक : २१.१२.२००९
अपिलार्थी : अनुपस्थित
जन माहिती अधिकारी : अनुपस्थित
प्रथम अपिलिय अधिकारी : अनुपस्थित

अपिलार्थीनी दि.४.०७.२००८ च्या माहिती अर्जाव्दारे जनगौरव सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या सभासद श्रीमती सुमित्रादेवी रविन्द्र वेन्दे यांच्या गट विमा कर्जाच्या वसूलीबाबतची माहिती मागितली.

उपरोक्त अर्जाला दि.१७.०७.२००८ रोजी खालीलप्रमाणे उत्तर दिले.

" श्रीमती वेन्दे यांची बदली लेखाधिकारी,वेतन पडताळणी पथक,ठाणे यांच्या कार्यालयात झालेली आहे व त्यांना दि.१३.०८.२००७ रोजी नवीन पदावर रुजू होण्यासाठी कार्यमुक्त केले आहे. त्यांच्या अंतिम वेतन प्रमाण पत्राची छायांकित प्रत सोबत जोडली आहे."

या उत्तराने समाधान न झाल्याने त्यांनी दि.२२.०८.२००८ रोजी प्रथम अपील केले. तथापि यावर निर्णय झाला नाही म्हणून त्यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

व्दितीय अपीलावरील सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व उत्तरवादी अनुपस्थित होते. आयोगाकडे अपीलासोबत दाखल केलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जि.प. ठाणे यांनी अपीलार्थीचा दि.२२.०८.२००८ चा प्रथम अपील अर्ज पुढील कार्यवाहीस्तव लेखाधिकारी,शिक्षण लेख व वेतन पडताळणी पथक, ठाणे यांच्याकडे पाठविला आहे. याचा विचार करता आयोगाचे असे निदेश आहेत की लेखाधिकारी,शिक्षण लेखा व वेतन,ठाणे यांनी अपिलार्थीच्या अर्जाचा विचार करावा व त्यांनी माहिती पुरवावी.

**आदेश**

**१) अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**२) आदेशाची प्रत लेखाधिकारी,शिक्षण लेखा व वेतन पडताळणी पथक,ठाणे यांना उपरोक्त निदेशानुषंगाने कार्यवाहीस्तव द्यावी.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः ३०.०१.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले तक्रार.**

**मुमाआ २००९/जळगांव/सी.आर अपील क्रं. १४०३/०२**

**श्री.देवमन नारायण आहेरराव ---------अपीलकर्ता**
**मु.पो.खांडवारा,ता.नवापूर,**
**जि. नंदुरबार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा --------- उत्तरवादी**
**तहसिलदार, तहसील कार्यालय,नवापूर,ता. नवापूर,जि.नंदुरबार**

**जन माहिती अधिकारी**
**तहसिल कार्यालय, नवापूर,ता.नवापूर,जि. नंदुरबार**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक : ०७.०८.२००९
सूनावणीचा दिनांक : ८.१२.२००९
अपिलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपीलय अधिकारी : उपस्थित

अपीलकार श्री.देवमन नारायण आहेरराव यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०५.०४.२००९ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नवीन प्रशाकीय इमारत, जिल्हाधिकारी कार्यालय, सभागृह, धुळे,जि.धुळे येथे दि.

०८.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी तसेच जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलार्थी सुध्दा उपस्थित होते.

अपीलार्थीनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे ०७.०१.२००९ रोजी अर्ज करुन खालील नमूद माहितीचा तपशील :-

"१) नवापूर तालुक्यातील एकूण लोकसंख्या व कुटुंबे.२) दारिद्रयरेषेखालील कुटुंबे.३) शिधावाटप दुकाने. ४) रॉकेल विक्रेते परवाने. ५) खांडबारा गावातील दुकाने परवाने व तपासणी अहवाल इत्यादि माहिती मागितली होती. "

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती प्रश्नोत्तरांत असल्याने देता येत नाही असे कळविले.

अपिलार्थीने कलम १९ (१) अन्वये माहिती मिळाली नाही म्हणून प्रथम अपील दाखल केले परंतु प्रथम अपिलिय प्राधिकारी यांनी सुनावणी घेतली नाही किंवा आदेश पारित केले नाहीत.

अपिलार्थीने व्यथीत होऊन दिनांक ७.०८.२००९ रोजी व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय प्राधिकारी उपस्थित होते. सुनावणीच्या वेळी समोर आलेल्या बाबी :- १) तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.बी.एम.गावित यांनी अपिलार्थीस कोणतीही माहिती दिली नाही किंवा देण्याचा प्रयत्नही केलेला नाही.२) प्रथम अपिलिय प्राधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली की नाही याचा पाठपुरावा केलेला नाही. ३) अपिलार्थीस तब्बल ११ महिन्यानी अपुर्ण माहिती मिळाली व शिल्लक माहिती देण्याचे मान्य केले.४) सुनावणीच्या आदल्या दिवशी दि.७.१२.२००९ रोजी अपिलार्थीने सर्व माहिती मिळाल्याचे पत्र आयोगाला दिलेले दिसते.

दिनांक १३.०३.२००९ रोजीच्या पत्राव्दारे तहसिलदार नवापूर यांनी जन माहिती अधिकारी (महसूल शाखा),(निवडणूक शाखा) व (पुरवठा शाखा) यांना अपिलार्थीस त्वरित माहिती देण्याचे आदेश दिले होते. त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी महसुल व निवडणूक शाखा यांनी अपिलार्थीस माहिती दिल्याचे दिसते परंतु तत्कालीन जन माहिती अधिकारी (पुरवठा) यांनी ६ महिने उलटुन गेले तरी त्यांनी अपिलार्थीस माहिती दिलेली नाही.

अपिलार्थीस हवी असलेली माहिती ही पुरवठा विभागाशी संबंधित होती तत्कालीन जन माहिती अधिकारी (पुरवठा) तहसिलदार यांनी सांगूनही अपिलार्थीस दिलेली नाही. अधिनियम २००५ नुसार जी माहिती उपलब्ध असेल ती मुदतीत देणे क्रमप्राप्त आहे त्यांची ही बेजबाबदारपणाची वर्तणूक पाहता त्यांच्यावर रु.३०००/- ची शास्ती लादण्यांत येत आहे.ती त्यांच्या दि.१ मार्च २०१० च्या होणाऱ्या पगारांतून वसूल करुन शासनाने विहित केलेल्या बजेट हेडमध्ये जमा करावी व तसे केल्याचा अनुपालन अहवाल आयोगास दि.२०.०३.२०१० पूर्वी पाठवावा.

## आदेश

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

**तहसिलदार नवापूर यांनी उपरिनिर्दीष्ट कार्यवाही स्वत:च्या देखरेखीखाली करावी.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांक: ३०.०१.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/अपील क्रं. १३५४/०२**

**श्री. रविंद्र महादू पाटील ------- अपीलकर्ता**
**रा.८८,भगवती ड्रायव्हर्शन रोड, देवपूर,**
**धुळे - ४२४ ००५**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------- उत्तरवादी**
**विशेष पोलीस महानिरीक्षक,ॲन्टी करप्शन ब्युरो,**
**म.रा.मधू इंडस्ट्रीयल इस्टेट, पांडुरंग बुधकर मार्ग, लोअर परेल, मुंबई ४०० ०१३**

**जन माहिती अधिकारी**
**पोलीस उप अधिक्षक, लाचलुचपत कार्यालय, धुळे,**
**जि.धुळे**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक : ०८.०३.२००७
सूनावणीचा दिनांक : ७.१२.२००९
अपिलार्थी : अनुपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलिय अधिकारी : उपस्थित

अपीलकार श्री. रविंद्र महादू पाटील, यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ८.०३.२००७ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नवीन प्रशासकीय इमारत, जिल्हाधिकारी कार्यालय,सभागृह धुळे, जि.धुळे परिसर जळगांव येथे दि. ०७.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी तसेच जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपिलार्थी अनुपस्थित होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.१४.११.२००६ रोजी त्यांच्या स्वतःच्या घराची दि.२९.०३.२००४ रोजी घेण्यात आलेली झडती कोणाच्या लेखी आदेशान्वये घेण्यात आली त्या आदेशाची छायांकित व साक्षांकित प्रत मिळण्याबाबत अर्ज दाखल केला होता.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने केलेला गुन्हा अद्याप न्यायप्रविष्ट असल्याने व माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम ८ (१) (ज) नुसार अर्जदारास माहिती देता येणार नाही असे दि.४.०१.२००७ च्या गोपनीय पत्राव्दारे कळविले. त्या विरोधात अपीलार्थीने प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलिय प्राधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांनी दिलेला निर्णय योग्य असल्याचे अपिलार्थीस दि.२९.०१.२००७ च्या पत्राव्दारे कळविले.

अपिलार्थीने व्यथीत होऊन व्दितीय अपील दाखल केले. सदर सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलिय प्राधिकारी उपस्थित होते. परंतु अपिलार्थी अनुपस्थित होते.

सुनावणीच्या वेळी असे निदर्शनास आणण्यांत आले की गुन्हयाची तपासणी अंमलदार श्री. ए.बी.पुजारी सहा पो.आयुक्त ॲन्टी करप्शन ब्युरो मुंबई यांनी मा.अप्पर सत्र न्यायाधीश बृहन्मुंबई यांनी दिलेल्या सी.आर.पी.सी कलम ९३ अन्वये वारंटास अनुसरुन सी.आर.पी.सी.कलम १६५ अन्वये ठराव करुन ॲन्टी करप्शन ब्युरो धुळेचे तत्कालीन पोलीस उप अधिक्षक यांना आरोपीच्या घराची झडती घेण्यास कळविले होते. त्यास अनुसरुन घराची झडती घेण्यांत आली होती ही बाब अर्जदाराच्या निदर्शनास आणून दिलेली आहे. सदर प्रकरण सध्या न्यायप्रविष्ट असल्याने त्यावर भाष्य करणे अयोग्य आहे. खटला तपासात निर्माण होण्याची शक्यता नाकारण्यात येत नसल्याने वादी यांनी मागितलेली माहिती ही अधिकाराचे कलम ८ (१) (ज) अन्वये देता येणार नाही हे जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे योग्य आहे त्यास अनुसरुन मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील अमान्य करण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः ३०.०१.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/अपील क्रं. १४०४/०२**

**श्री. पितांबर सुकलाल पेंढारकर** ------ **अपीलकर्ता**
**२,तलाठी कॉलनी, डोंगरगांव रोड, शहादा,**
**ता.शहादा,जि.नंदुरबार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** ------- **उत्तरवादी**
**तहसिलदार, तहसील कार्यालय,शहादा.ता.शहादा,जि.नंदुरबार**

**जन माहिती अधिकारी तथा**
**निवासी नायब तहसीलदार,**
**तहसील कार्यालय, शहादा.ता.शहादा,जि.नंदुरबार**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक : २५.०८.२००९
सूनावणीचा दिनांक : ०८.१२.२००९
अपिलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलिय अधिकारी : उपस्थित

अपीलकार श्री. पितांबर सुकलाल पेंढारकर, यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २५.०८.२००९ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नवीन प्रशासकीय इमारत, जिल्हाधिकारी कार्यालय,सभागृह धुळे, जि.धुळे परिसर जळगांव येथे दि. ०८.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी तसेच जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपिलार्थी सुध्दा उपस्थित होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.३०.०४.२००९ रोजी अर्ज करुन, खालील नमूद माहितीचा तपशील "१) मौजे शहादा महसूल हद्दीतील स.न.७८/१+२ पैकी (१६) २ प्लॉटची फेरफार नोंद. २) तक्रार-४३१४ ची जबाबासह नक्कल प्रत" इत्यादि.

जन माहिती अधिकारी यांनी सदर माहिती तलाठी शहादा येथील कार्यालयात उपलब्ध असल्याने अपीलार्थीचा अर्ज तलाठी शहादा कार्यालयात वर्ग केला व तसे अपिलार्थीस कळविले.

अपिलार्थीने तलाठी कार्यालयांस वारंवार विनंती केली तरी तलाठी शहादा यांनी त्यांना वेळेत माहिती न दिल्याने अखेर त्यांनी प्रथम अपील दाखल केले त्यावर प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनी अर्जदार व शासकीय माहिती अधिकारी यांना त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी दिली. त्यावेळी असे दिसून आले की तलाठी हे माहिती न देण्यास जबाबदार आहे त्यांनी जाणून बुजून वेळकाढू धोरण स्विकारुन अपीलार्थीस माहिती दिलेली नाही त्याबाबत तहसिलदार यांनी तलाठी शहादा यांचे हे वर्तन अत्यंत बेजबाबदार असून गंभीर स्वरुपाचे आहे त्यांनी सदर माहिती अपीलार्थीस त्वरीत विनामुल्य द्यावी असे आदेश दिले तसेच भविष्यात अशा प्रकारे कामचुकारपणा केल्यास दंडाची कार्यवाही केली जाईल असे आदेश दि.२२.०७.२००९ रोजी पारीत केले.

अपीलार्थीने दि.२५.०८.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले त्यावेळी अपीलार्थी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय प्राधिकारी हे हजर होते.

सुनावणीच्या वेळी असे निदर्शनास आले की अपीलार्थीस प्रथम अपीलाच्या सुनावणी नंतरच दि२६.०६.२००९ रोजी माहिती विनामुल्य देण्यांत आली व त्यांनी ती स्विकारली आहे. माहिती विहित कालावधीत मिळाली नाही हे सत्य आहे तरीही जन माहिती अधिकाऱ्यांनी आपली चुक प्रामाणिकपणे मान्य केलेली आहे व माफीही मागितलेली आहे तलाठी शहादा यांनाही तहसीलदार यांनी सक्त ताकीद दिलेली आहे. अपीलार्थीस विलंबाने का हाईना माहिती मिळालेली आहे. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः ३०.०१.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक : मुमाआ /नाशिक/अपील क्रं. ५७७/०२**

**श्री.बाजीराव जागो पाटील,** **---------अपीलकर्ता**
**५,प्रमोद नगर, सेक्टर-२, देवपूर,**
**धुळे**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **--------- उत्तरवादी**
**आयुक्त, महानगरपालिका, नाशिक**

**जन माहिती अधिकारी**
**कार्यकारी अभियंता, नगर रचना विभाग, नाशिक महानगरपालिका,**
**नाशिक**

## - वि वे च न -

अपीलाचा दिनांक : १०.०१.२००९

सूनावणीचा दिनांक : ०७ डिसेंबर, २००९

अपिलार्थी :उपस्थित

जन माहिती अधिकारी : उपस्थित

प्रथम अपिलिय अधिकारी : उपस्थित

अपिलार्थीनी दि.४.१०.२००८ च्या अर्जान्वये स.न.२८७-अ-१ अ मधील भू.क्र.२४ संदर्भात बांधकाम परवानगी प्रकरणाबाबत माहितीची मागणी केली होती. ही माहिती त्यांना न मिळाल्याने त्यांनी दि.२५.११.२००८ रोजी प्रथम अपील केले. तथापि त्यांना माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

व्दितीय अपीलावरील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलिय अधिकारी यांनी सांगितले की दि.३१.१०.२००८ च्या पत्रान्वये अपिलकर्त्यास उत्तर देण्यात आले होते. ते प्रथम अपीलाच्या सुनावणीस हजरहि नव्हते. म.न.पा.कडे उपलब्ध असलेली माहिती ते देण्यास तयार आहेत. याचा विचार करुन असे निदेश देण्यात येतात की कार्यालयाकडे उपलब्ध असलेली माहिती सदर आदेशाच्या दिनांकापासून १० दिवसांच्या आत अपीलार्थीस विनामुल्य पुरविण्यात यावी.

## आदेश

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

( डॉ. सुरेश वि.जोशी )
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांकः ३०.०१.२०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक : मुमाआ /नाशिक/अपील क्रं. १३१८/०२

श्री.गिरीश ओंकार गुजर, ---------अपीलकर्ता
मु.पो.सोनगीर, ता. व जि. धुळे

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा --------- उत्तरवादी
उपसंचालक, सामाजिक वनीकरण विभाग,
धुळे

जन माहिती अधिकारी
लागवड अधिकारी, सामाजिक वनीकरण क्षेत्र,

धुळे

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक : २७.०४.२००९
सूनावणीचा दिनांक : ०७ डिसेंबर, २००९
अपिलार्थी :अनुपस्थित
जन माहिती अधिकारी : अनुपस्थित
प्रथम अपिलिय अधिकारी : अनुपस्थित

अपिलार्थीनी दि.२६.११.२००८ च्या अर्जान्वये खालील माहिती मागितली.

" एप्रिल १९८६, मे १९८६, नोव्हेंबर १९८८,डिसेंबर १९८८ जानेवारी १९८९ ते ऑक्टोबर १९८९ या महिन्याचे कर्मचाऱ्यांचे मासिक वेतन अदा केलेल्या देयकाच्या छायांकित प्रती."

या अर्जाच्या उत्तरात त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दि.२.१२.२००८ रोजी असे कळविले की वेतन देयकाच्या छायांकित प्रतीशी आपला संबंध नाही तरी प्रती मागण्याचे प्रयोजन स्पष्ट करावे. या उत्तराने व्यथित होऊन त्यांनी दि.१६.०१.२००८ रोजी प्रथम अपील केले. प्रथम अपीलावरील निर्णयानुसार जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिलेली नसल्यामुळे ते दंडनीय कार्यवाहीस पात्र आहेत. या निर्णयानंतर अपीलार्थीना माहिती मिळाली नाही यास्तव त्यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

व्दितीय अपीलावरील सुनावणीसाठी अपीलार्थी तसेच उत्तरवादी गैरहजर होते. सुनावणीच्या वेळी आयोगासमोर आलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसते की जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीना माहिती मागण्याचे प्रयोजन काय अशी विचारणा केली आहे. वास्तविक पाहता अधिनियमात अशी विचारणा करण्याचे प्रयोजन नाही. अपीलार्थीच्या प्रथम अपीलावर निर्णय देतांना प्रथम अपीलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिलेली नाही हे मान्य केले आहे तथापि अपीलार्थीना माहिती देण्याबाबत कोणतेही भाष्य केलेले नाही. प्रथम अपिलिय अधिकारी हे जन माहिती अधिकारी पेक्षा वरिष्ठ दर्जाचे अधिकारी आहेत तेव्हा त्यांनी माहिती अर्जात मागितलेली माहिती देण्याबाबत जन माहिती अधिकारी यांना स्पष्ट निदेश द्यावयास हवे होते. याबाबत आयोगाचे निदेश आहेत की अपीलार्थीना सदर आदेशाच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आत कोणतेही शुल्क न आकारता त्यांच्या मागणीनुसार माहिती पुरवावी.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**सुनावणीच्या वेळी गैरहजर राहिल्याबद्दल जन माहिती अधिकारी यांनी त्यांचा खुलासा आयोगाकडे दि.२८ फेब्रुवारी, २०१० पर्यंत सादर करावा.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**

राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक: ३०.०१.२०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक : मुमाआ /नाशिक/अपील क्रं. १३७१/०२

श्री.नरेंद्र बारकु चौधरी ---------अपीलकर्ता
दैनिक राजरंग टाईम्स, बाफना मार्केट तळमजला,
महाराणा प्रताप चौक, मनपा समोर, धुळे,
जि.धुळे

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा --------- उत्तरवादी
कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद लघुसिंचन विभाग,
जळगांव,जि.जळगांव

जन माहिती अधिकारी तथा
उप विभागीय अधिकारी, जिल्हा परिषद लघुसिंचन,
उप विभागीय, ता.चोपडा,
जि.जळगांव

- वि वे च न -

अपीलाचा दिनांक : २६.१२.२००८
सूनावणीचा दिनांक : ०७ डिसेंबर, २००९
अपिलार्थी : उपस्थित

जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलिय अधिकारी : उपस्थित

अपीलकार श्री.नरेंद्र बारकु चौधरी यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २६.१२.२००८ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नवीन प्रशासकीय इमारत, जिल्हाधिकारी कार्यालय,सभागृह धुळे, येथे दि. ०७.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी तसेच जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपिलार्थी सुध्दा उपस्थित होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.०८.०८.२००८ रोजी अर्ज करुन, खालील तपशीलवार माहिती मागितली.

" आपल्या उप विभागातंर्गत दि.१.०४.२००७ ते ३१.०३.२००८ या कालावधीत करण्यांत आलेल्या विकास कामाची माहिती १) कामाचे नांव २) योजनेचे नांव ३) अंदाजपत्रकीय रक्कम ४) मंजूर रक्कम ५) प्रत्यक्ष खर्च झालेली रक्कम ६) कामाची सद्यस्थिती ७) प्रत्यक्ष कामावर देखरेख करणाऱ्या अधिकाऱ्याचे नांव ८) कामाच्या सर्वसाधारण वर्णनाची प्रत. " इत्यादि

जन माहिती अधिकारी यांनी माहिती विस्तृत स्वरुपाची असल्याने गोळा करण्यास वेळ लागेल तसेच कार्यालयांत सदरील खर्च उपलब्ध नाही. माहिती गोळा झाल्यावर व सदरील खर्च उपलब्ध झाल्यावर माहिती त्वरीत देण्यांत येईल असे अपिलार्थीस दि.२५.०८.२००८ च्या पत्राव्दारे कळविले.

जन माहिती अधिकाऱ्यांच्या उत्तराने व्यथीत होऊन अपिलार्थीने दि.३०.०९.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलिय प्राधिकारी यांनी अपीलार्थीस दि.२४.१०.२००८ च्या पत्राव्दारे प्रथम व दि.२४.१०.२००८ व दि.७.११.२००८ दुसऱ्या वेळेस सुनावणीसाठी तेथील कार्यालयांत उपस्थित रहावे असे कळवूनही अपिलार्थी संबंधीत तारखेला उपस्थित राहिलेले नाही. तरीही अपिलिय प्राधिकारी यांनी दि.२९.११.२००८ रोजी तिसरी सुनावणी लावली तरी अपिलार्थी गैरहजर होते. त्यावेळेस जन माहिती अधिकाऱ्याने झालेल्या चर्चेत माहिती विस्तृत स्वरुपाची असून ती प्राप्त झाल्यावर लगेच माहिती देण्यांत येईल. तसेच अर्जदाराने प्रत्यक्ष कार्यालयांत येऊन माहितीचे अवलोकन करावे असे सांगितले.

व्दितीय अपीलाच्या सुनावणीच्या वेळी अपिलाची जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलिय प्राधिकारी उपस्थित होते त्यावेळेस दि.१२.०६.२००९ रोजी विकास कामाची माहिती अपिलार्थीस दिल्याचे नमूद केले आहे.

अपिलार्थीस प्रथम अपिलिय प्राधिकारी यांनी तीन वेळा पत्र पाठवून सुनावणीस हजर रहान्यास सांगितले होते परंतु ते तिन्ही वेळा अनुपस्थित राहिले. त्यांनी हे लक्षात घ्यावयास हवे हाते की शासकीय अधिकाऱ्यांनी माहिती देण्याचे सकारात्मक दृष्टिकोन ठेवलेला असता अपिलार्थीने अपिलिय सुनावणीच्या वेळी उपस्थित राहण्याचा प्रयत्न करावयास हवा. तरीही उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थीस उशीरा का होईना परंतु दिलेली आहे. माहिती अशा स्वरुपाची नाही की जी १५-२० दिवसात तयार करता येणार नाही विलंबाबद्दल जन माहिती अधिकारी यांना समज देण्यात येत आहे.

एखाद्या वेळेस 'सादिल' उपलब्ध नसल्यामुळे फोटो कॉपीजचा खर्च कसा करावयाचा अशी वेळ आल्यास अर्जदारास शुल्क मनी ऑर्डरने किंवा रोखीने देण्याची विनंती करावी. त्या शुल्कातून फोटो कॉपिजचा खर्च भागवावा. काही शुल्क शिल्लक राहिल्यास ते शासनाच्या तिजोरीत जमा करावे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांक: ३०.०१.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांकः- मुमाआ /नाशिक/ सी.आर /अपील क्रं. १३७२/०२**

**श्री.नरेंद्र बारकू चौधरी ---------अपीलकर्ता**
**दैनिक राजरंग टाईम्स, बाफना मार्केट,**
**तळमजला, महाराणा प्रताप चौक, मनपा समोर,**
**धुळे**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा --------- उत्तरवादी**
**कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद लघुसिंचन विभाग,**
**जळगांव,जि.जळगांव**

**जन माहिती अधिकारी**
**जिल्हा परिषद लघुसिंचन विभाग,पंचायत समिती समोर,**
**रावेर, ता.रावेर,जि.जळगांव**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक : ०७.१२.२००८
सूनावणीचा दिनांक : ०७.१२.२००८
अपिलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलिय प्राधिकारी : अनुपस्थित

अपीलकार श्री.नरेंद्र बारकू चौधरी यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०७.१२.२००८ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नवीन प्रशाकीय इमारत, जिल्हाधिकारी कार्यालय, सभागृह, धुळे,येथे दि. ०७.१२.२००९ रोजी सुनावणी

आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित होते. जन माहिती अधिकारी व अपीलार्थी उपस्थित होते.

अपीलार्थींनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे ११.०८.२००८ रोजी अर्ज करुन रावेर व यावल तालुक्यातील सन १ एप्रील, २००७ ते ३१ मार्च २००८ अखेर पर्यंत झालेल्या विकास कामाची माहिती मागितली होती.

अपीलार्थीस दि.२८.०८.२००८ च्या पत्राव्दारे सदर माहितीच्या प्रती देण्यासाठी फी स्वरुपात रु.२६८/- भरणाकरण्यास सांगितले होते.

माहिती न मिळाल्याने अपीलार्थीने दि. ६.१०.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले त्यास अनुसरुन प्रथम अपिलिय प्राधिकारी यांनी दि. ३.११.२००८ व दि.१५.११.२००८ व दि. २९.११.२००९ रोजी सुनावण्या ठेऊनही अपीलार्थी स्वतः सुनावणीच्या वेळी अनुपस्थित राहील त्यावेळेस झालेल्या चर्चेत जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस माहिती न देण्याचे कारण विचारता असे सांगण्यात आले की, अपीलार्थीस माहिती पुरविण्यासाठी अंदाजे रु.२७०/- खर्च लागणार आहे तेवढे अनुदान कार्यालयांत शिल्लक नसल्याचे पत्रही अपीलार्थीस दिले आहे तसेच अनुदानाची मागणीही केलेली आहे. प्रत्यक्षात माहिती न मिळाल्याने अपीलार्थीने व्दितीय अपील दाखल केले.

व्दितीय अपीलाच्या सुनावणीच्या वेळी अपीलार्थी उपस्थित होते व जन माहिती अधिकारी उपस्थित होते तर प्रथम अपीलीय प्राधिकारी गैरहजर होते त्यावेळी झालेल्या साधक बाधक चर्चेत असे ठरले की, अपीलार्थीने प्रत्यक्ष कार्यालयात येऊन हवी असलेल्या माहितीचे अवलोकन करावे व अनुदान प्राप्त झाल्यावर लगेच माहिती देण्याचे निर्देश दिले गेले.

अर्जदारास माहिती देता येत नसल्याचे कारण फोटो कॉपीइंगसाठी अनुदान शिल्लक नाही व त्याची मागणी केली आहे असे जन माहिती अधिकारी यांचे म्हणण्यानुसार दिसते व त्याची कल्पना त्यांनी वेळोवेळी अर्जदारास दिलेली आहे. अपिलिय अधिकाऱ्यांनी सुध्दा अर्जदारास त्यांनी माहितीचे अवलोकन करावे असेहि सुचविले आहे.

एकतर अनुदान शिल्लक नाही म्हणून माहिती देता आली नाही असे म्हणणे कोणत्याहि विभागास लांछनास्पद आहे.

अशी जर परिस्थिती कुठेहि उद्‌भवत असेल तर अपवाद म्हणून जन माहिती अधिकाऱ्यांनी अर्जदारास शुल्क रोखीने वा मनीऑर्डनी देण्याची विनंती करावी. त्यासाठी अर्ज प्राप्त झाल्यावर २५ दिवसात असे पत्र पाठवावे. फोटो कॉपीइंग खाजगी दुकानदाराकडून करुन घ्यावे. मिळालेल्या शुल्क रकमेतून फोटो कॉपिजचा खर्च भागवावा. शुल्काची काही रक्कम शिल्लक राहिल्यास ती शासकीय तिजोरीत जमा करावी पण कोणत्याहि परिस्थितीत अर्जदारास मुदतीत माहिती मिळण्याच्या अधिकारापासून वंचित ठेऊ नये. या केसमध्ये आता माहिती दिली असल्याने पुढील आदेश देण्यात येतो.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**

दिनांक: ३०.०१.२०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांकः- मुमाआ /नाशिक/ सी.आर /अपील क्रं. १३७४/०२

श्री.नरेंद्र बारकू चौधरी ---------अपीलकर्ता
दैनिक राजरंग टाईम्स, बाफना मार्केट,
तळमजला, महाराणा प्रताप चौक, मनपा समोर,
धुळे

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा --------- उत्तरवादी
कार्यकारी अभियंता, सिंचन विभाग, जि.प.जळगांव

जन माहिती अधिकारी
उप विभागीय अधिकारी, सिंचन उप विभाग,
जि.प.जळगांव

- वि वे च न -

अपीलाचा दिनांक : २६.१२.२००८
सूनावणीचा दिनांक : ०७.१२.२००८
अपिलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलिय प्राधिकारी : उपस्थित

अपीलार्थीनी दि. ९.०८.२००८ च्या अर्जान्वये उप विभागांतर्गत १ एप्रिल २००७ ते ३१ मार्च २००८ या कालावधीत केलेल्या कामांच्या संदर्भात खालील माहिती मागितली.

"१) कामाचे नाव.२)योजनेचे नाव. ३) मंजूर रक्कम. ४) कामाची सद्यस्थिती. ५) प्रत्यक्ष कामावर देखरेख करणाऱ्या अधिकाऱ्यांचे नाव. ६) कामाचे वर्णय."

उपरोक्त माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी दि. ३.१०.२००९ रोजी प्रथम अपील केले. परंतु त्यांना माहिती मिळाली नाही. यास्तव त्यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

व्दितीय अपीलावरील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी लेखी निवेदनाव्दारे आयोगास सादर केले की अपीलार्थींना दि.२२.०८.२००८ रोजी माहिती पुरविण्यात आली आहे. सदर प्रकरणी माहिती दिलेली असल्याने अपील निकाली काढण्यात येत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांक: ३०.०१.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांकः- मुमाआ /नाशिक/ सी.आर /अपील क्रं. १४१६/०२**

**श्री.तुळशीराम लक्ष्मण नाईक, ---------अपीलकर्ता**
**मु.नळवे खु., पो.करजकुपे, ता.**
**जि.नंदुरबार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा --------- उत्तरवादी**
**मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,धुळे,जि.धुळे**

**जन माहिती अधिकारी**
**मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, धुळे,जि.धुळे**

**- वि वे च न -**

अपीलकार श्री.तुळशीराम लक्ष्मण नाईक, केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १६.०६.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नवीन प्रशाकीय इमारत, जिल्हाधिकारी कार्यालय, सभागृह, धुळे,येथे दि. ०८.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी तसेच जन माहिती अधिकारी उपस्थित होते. व अपीलार्थी अनुपस्थित होते.

अपीलार्थीनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे २०.०३.२००९ रोजी अर्ज करुन खालील नमूद केलेली माहिती मागितली होती.

भविष्यनिर्वाह निधीचा नवीन खाते क्रमांक मिळण्याबाबत मागणी केली होती. नवीन भविष्यनिर्वाह निधी खाते क्रमांक मिळाला नसल्याने अपीलकाराने दि.३०.०४.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले.

प्रथम अपीलीय अधिकाऱ्यांनी सुनावणी आयोजित केली नाही माहिती दिली नसल्याने अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने विहित मुदतीत अर्ज केला परंतु त्यावर सही केली नाही. अर्जावर अपीलकाराची सही घेऊन भविष्यनिर्वाह निधी नवीन खाते क्रमांक देण्याची कार्यवाही करण्यात आलेली असल्याचे उत्तरवादीने व्दितीय अपीलावरील सुनावणीच्या वेळी आयोगासमोर प्रतिपादन केले. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः ३०.०१.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/जळगांव/सी.आर अपील क्रं. १३२९/०२**

**श्री.प्रकाश कोंडाजी राशिनकर** ---------**अपीलकर्ता**
**शांताई, रामनगर,मु.पो.पिंपळनेर,**
**ता.साक्री,जि.धुळे ४२४ ३०६**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** --------- **उत्तरवादी**
**निवासी उप जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय,**
**धुळे,जि.धुळ**

**जन माहिती अधिकारी**
**जिल्हाधिकारी कार्यालय, (महसूल शाखा) धुळे,जि.धुळे**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक : १७.०६.२००९
सूनावणीचा दिनांक : ७.१२.२००९
अपिलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपीलय अधिकारी : उपस्थित

अपीलकार श्री.प्रकाश कोंडाजी राशिनकर यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २४.०८.२००९ रोजी व्दितीय अपील सादर केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नवीन प्रशाकीय इमारत, जिल्हाधिकारी कार्यालय, सभागृह, धुळे,येथे दि.०७.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी तसेच जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलार्थी सुध्दा उपस्थित होते.

अपीलार्थीनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे २३.०३.२००९ रोजी अर्ज करुन खालील नमूद केलेली माहितीचा तपशील.

"१) सरपंच ग्राम पंचायत पिंपळनेर यांच्या जा.क्र.२५०/९६, दि.२३.०२.१९९६ च्या नोटीस विरुध्द सौ. राशिकर यांनी दि.१.०३.१९९६ रोजी केलेला अर्ज. २) मा.उप विभागीय अधिकारी, धुळे भाग धुळे यांच्या पत्र क्र. गावठण/सावि.४६-२००७ दि.५.०२.२००७ विरोधातील अपीलार्थीचा अर्ज दि.१२.०२.२००७ इत्यादि बाबी."

जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस दिनांक १६.०४.२००९ रोजीच्या पत्राव्दारे माहितीसाठी फी भरण्यास सांगितले परंतु फी भरली नाही तरी दि.१८.०६.२००९ रोजी विनामुल्य माहिती पुरवाली.

अपीलार्थीस विहित मुदतीत माहिती न मिळाल्याने अथवा अपूर्ण व चुकीची माहिती मिळाल्याने प्रथम अपील दाखल करण्यात आले प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनी अपीलार्थीस काही माहिती महसूल विभागाशी निगडीत आहे तरीही ग्रामपंचायत शाखेमधील अथवा महसूल विभागामार्फत आपणास काय माहिती हवी आहे याची समक्ष खात्री करण्यासाठी कार्यालयात दि.११.०६.२००९ रोजी समक्ष हजर रहावे व मागणी केलेली कागदपत्रे उपलब्ध करुन दिली जातील प्रत्यक्षात सुनावणीच्या वेळी प्रथम अपिलिय प्राधिकारी हे कामानिमीत्त नाशिक येथे गेल्याने चिटणीस (महसूल शाखा) यांनी त्यांना माहितीबाबत समजूत घातलेली दिसते.

अपीलार्थीने व्दितीय अपील दाखल केले सुनावणी दि.८.१२.२००९ रोजी होती सुनावणीच्या वेळी निदर्शनास आलेली बाब :- जिल्हाधिकारी धुळे यांनी दि.७.१२.२००९ रोजी आयोगास लिहिले पत्रात अपीलार्थीस १ ते २३ मुद्यांवर माहिती पुरविली असल्याचे नमूद केलेले आहे. अपीलार्थीस त्यांना हवी असलेली माहिती ही विस्तृत प्रकारातील असल्याने ती उपलब्ध करुन देण्यास थोडा जास्त वेळ लागला असला तरी माहिती प्रामाणिकपणे दिली आहे.

श्रीमती राशिकर यांनी साक्री येथील गावठण स.न.६८६/अ मधील भूखंड क्र.३५ च्या वारसदारांनी केलेल्या नाल्याचा प्रवाह अतिक्रमणाबाबतची मूळ तक्रार असून सौ.राशिकर यांनी न्यायालयांत दिवाणी दावा क्र.३२६/२००१ अन्वये दावा दाखल केला आहे सदरचा दावा न्यायप्रविष्ट असल्याने त्यावर कोणतेही भाष्य करण्यांत येणार नाही हे अपीलार्थीस सांगण्यात आलेले नाही ही बाब योग्य आहे.

अपीलार्थीस माहिती उशीरा मिळाली हे जरी खरे असले तरी ती देण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करण्यात आल्याचे दिसून येते.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः ३०.०१.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/नाशिक/सी.आर अपील क्रं. १३१६/०२**

**श्री.बी.जे.पाटील,** **---------अपीलकर्ता**
**५ प्रमादनगर, सेक्टर-२, देवपूर,**
**धुळे ता.जि.धुळे**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **--------- उत्तरवादी**
**जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी धुळे,जि.धुळे**

**जन माहिती अधिकारी तथा**
**तालुका कृषी कार्यालय,शिंदखेडा,ता.शिंदखेडा,**
**जि.धुळे**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक : २९.०५.२००९
सूनावणीचा दिनांक : ७.१२.२००९
अपिलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी : अनुपस्थित
प्रथम अपीलय अधिकारी : उपस्थित

अपीलकार श्री.बी.जे.पाटील यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २१.०५.२००९ रोजी व्दितीय अपील सादर केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नवीन प्रशाकीय इमारत, जिल्हाधिकारी कार्यालय, सभागृह, धुळे,येथे दि.०७.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी उपस्थित होते. जन माहिती अधिकारी अनुपस्थित होते. अपीलार्थी उपस्थित होते.

अपीलार्थीनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे २४.०७.२००८ रोजी अर्ज करुन खालील नमूद केलेली १) श्री.जयराज जा.पाटील यांस ठिबक योजने अंतर्गत अनुदान मंजूर आहे किंवा कसे. २) ठिबक योजना कोणामार्फत राबविली जाते त्या खात्याचा अगर एजन्सीची माहिती. ३) त्यांना फळबागेसाठी दिलेली रक्कम, फळांचा प्रकार, रोपांची संख्या व रोपे जागेवर किती आहेत इत्यादि माहिती मागितली होती.

जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १४.०८.२००८ रोजी अपीलार्थीस माहिती दिल्याचे दिसते परंतु प्रत्यक्षात माहिती अपीलार्थीस मिळाली नाही अशी त्यांची तक्रार आहे त्या विरोधात प्रथम अपील दाखल केले.

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा जिल्हा अधिक्षक यांनी अपीलार्थीस त्यांनी केलेल्या दि. १५.१२.२००६ व ज्या अर्जास अनुसरुन त्यांच्याकडे उपलब्ध असलेली काही माहिती अर्जदारास दिलेली असल्याचे नमूद केले आहे व इतर माहिती वेगवेगळया कार्यालयाशी संबंधीत असल्याचे सांगितले.

अपीलार्थीने आयोगाकडे दि.२५.०५.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. व्दितीय अपीलाच्या सुनावणीच्या वेळी अपीलार्थी व प्रथम अपिलीय प्राधिकारी उपस्थित होते. जन माहिती अधिकारी अनुपस्थित होते. सुनावणीच्या वेळी दिसून आलेल्या बाबी :- सदर माहिती ही त्याच विभागाच्या अखत्यारीत दिसून येत नाही त्यामुळे

त्यामुळे सदर प्रकरणी रोजगार हमी योजना शाख,जिल्हाधिकारी,धुळे तालुका कृषी अधिकारी शिंदखेडा,मंडळ कृषी अधिकारी,दोंडाई यांनी त्याच्या अखत्यारीत उपलब्ध असलेली माहिती ही प्रत्यक्ष पहाणी करुन त्याप्रमाणे माहिती अहवाल दिलेले दिसून येतात. त्या सर्वाचे अहवाल व मागणी केलेली माहिती सहपत्र दिलेली आहे परंतु सुनावण्या घेऊनही प्रत्यक्षात अपिलार्थीस माहिती मिळाली नाही असे त्यांचे म्हणणे आहे.

अर्जदाराचा अर्ज दि.२४.०७.२००८ चा व त्यांना माहिती दि.१४.०८.२००८, ९.०४.२००९ व ७.०९.२००९ रोजी दिली असल्याचे दिसून आले. मुदतीत माहिती देण्याचे दृष्टीने जन माहिती अधिकारी यांनी विशेष प्रयत्न केल्याचे दिसून आले नाही. तसेच सुनावणीच्या दिवशीहि ते अनुपस्थित आहेत. म्हणून त्यांचेवर रु.५०००/- ची शास्ती लादण्यात येत आहे. त्याची वसुली अपिलिय अधिकारी यांनी १ एप्रिल २०१० रोजी होणाऱ्या पगारातून करुन,ती रक्कम शासकिय विहित बजेट हेडमध्ये भरावी व त्याचा अनुपालन अहवाल आयोगास १५ एप्रिल २०१० पूर्वी पाठवावा.

**आदेश**

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**अपिलिय अधिकाऱ्यांनी शास्ती वसुलीबाबत कारवाई करावी.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांक: ३०.०१.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/नाशिक/सी.आर अपील क्रं. ५६३/०२**

**श्री.नानजीभाई पटेल,** **---------अपीलकर्ता**
**न्यू गजाना सॉ मिल, कॉटन जवळ, परोळा रोड,**
**धुळे ता.जि.धुळे**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी** **--------- उत्तरवादी**
**प्रधान मुख्य वन संरक्षक (संरक्षण),**
**महा राज्य नागपूर यांचे कार्यालय, नागपूर**

**जन माहिती अधिकारी**
**प्रधान मुख्य वन संरक्षक (संरक्षण),**

**महा राज्य नागपूर यांचे कार्यालय, नागपूर**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक : १६.०९.२००८
सूनावणीचा दिनांक : ७.१२.२००९
अपिलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी : अनुपस्थित
प्रथम अपीलय अधिकारी : अनुपस्थित

अपीलकार श्री.नानजीभाई पटेल,यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १६.०९.२००८ रोजी व्दितीय अपील सादर केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नवीन प्रशाकीय इमारत, जिल्हाधिकारी कार्यालय, सभागृह, धुळे,येथे दि.०७.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी तसेच जन माहिती अधिकारी अनुपस्थित होते. अपीलार्थी उपस्थित होते.

अपीलार्थीनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे १०.०५.२००९ रोजी अर्ज करुन खालील नमूद केलेली माहिती मागितली.

" श्री.बी.सी.पाल मुख्य वन संरक्षक यांनी त्यांच्या कार्यालयांतील निवृत्तीच्या वेळी मंजूर केलेल्या प्रकरणाबाबत आडव्या मशीनबाबत मंजूर केलेले प्रकरणी सन २०००-०१ आडव्या मशीनच्या मंजूरी प्रकरणांतील नावें गावाची यादी व त्यांच्या निवृत्ती नंतर प्रत्येक प्रकरणाबाबत घेतलेले निर्णय." इत्यादि.

अपीलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी कोणतही माहिती पुरविली नाही किंवा प्रयत्नही केला नाही. अपीलार्थीने या विरोधात प्रथम अपील दाखल केले परंतु त्या अपीलावर सुनावणी घेण्यांत आली नाही व आदेशही पारीत केले नाहीत. अपीलार्थीने व्यथीत होऊन आयोगाकडे प्रथम एक व्दितीय अपील दाखल केले त्याची सुनावणी दि.२५.०५.२००९ रोजी घेण्यात आली परंतु दोन्ही अधिकारी अनुपस्थित होते त्यामुळे अपीलार्थीने परत एकदा व्दितीय अपील दाखल केले.

आयोगाकडे झालेल्या दोन्ही सुनावणीच्या वेळी अपीलार्थी उपस्थित होते परंतु प्रथम अपीलीय प्राधिकारी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित होते.

माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस मूळ अर्जाच्या तारखेपासून ३० दिवसाच्या विहित मुदतीत माहिती मिळावयास हवी होती परंतु जन माहिती अधिकारी यांनी याकडे दुर्लक्ष केले तसेच पत्राची दखली घेतली नाही अर्जदाराने अर्ज करुन वर्ष झाले तरी दोन्ही अधिकाऱ्यांनी अर्जदारास माहिती दिली नाहीच पण त्यांना मनस्ताप व अर्थिक त्रास दिला जन हिताच्या दृष्टिकोन समोर ठेऊन सरकारी अधिकाऱ्यांनी काम करण्याची अपेक्षा असते ती त्यांनी निभावलेली नाही. अर्जदारास दि.२१.०५.२००९ रोजी अपुरी माहिती दिली असे नमूद केलेले दिसते त्या माहितीचा अर्जदारास फारसा उपयोग झालेला दिसत नाही. या सर्व बाबींचा सखोल विचार करता जन

माहिती अधिकारी यांनी कामचुकारपणा केलेला दिसून येतो या कारणास्तव त्यांना शास्ती लावणे क्रमपा्रप्त ठरते अधिनियमाच्या कलम २० (१) नुसार त्यांच्यावर रु. १०,०००/- ची शास्ती लादण्यात येत आहे. सदर रकमेची वसुली त्यांच्या दि. १ मार्च २०१० रोजी होणाऱ्या पगारातून वसुल करुन शासनाने विहित केलेल्या बजेट हेडमध्ये जमा करावी व तसे केल्याचा अनुपालन अहवाल आयोगास दि.१५ मार्च २०१० पर्यंत पाठवावा. प्रथम अपिलिय प्राधिकारी यांनी ही त्यांच्या कामात कामचुकारपणा केलेला आढळून यतो त्यांनीही अपिलार्थीस माहिती देण्याची तसदी घेतलेली नाही यास्तव त्यांच्या या कामचुकारपणाची त्यांच्या गोपनीय अहवालात नोंद घेण्यात यावी.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः ३०.०१.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/नाशिक/सी.आर अपील क्रं. १४२४/०२**

**श्री.गणेश भास्करराव विंचुरकर (देशमुख), ---------अपीलकर्ता**
**मु.पो.ता.शिंदखेडा,**
**जि.धुळे.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी --------- उत्तरवादी**
**ग्रामपंचायत विभाग, पंचायत समिती कार्यालय,**
**शिंदखेडा,ता.शिंदखेडा,जि.धुळे**

**जन माहिती अधिकारी**
**ग्रामसेवक,ग्रामपंचायत कार्यालय, शिंदखेडा,ता.शिंदखेडा,**
**जि.धुळे**

**- वि वे च न -**

अपीलार्थी श्री.गणेश भास्कर विचूरकर,यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०१.०८.२००९ रोजी व्दितीय अपील सादर केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नवीन प्रशाकीय इमारत, जिल्हाधिकारी कार्यालय, सभागृह, धुळे,येथे दि.०८.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी तसेच जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलार्थी उपस्थित होते.

अपीलार्थीनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे ०४.०५.२००९ रोजी अर्ज करुन खालील नमूद केलेली माहिती मागितली.

" सन २००६ ते ३१ मार्च २००९ चा मौजे शिंदखेडा ग्रामपंचायतीसाठी शासनाने कोणकोणत्या योजनेसाठी निधी दिला व त्या निधीतून कोणकोणती कामे करण्यात आली त्या संपूर्ण कामांचे अंदाज पत्र व खर्च किती झाला त्याबाबत सदरचे काम कोणत्या अधिकृत एजन्सीव्दारे करण्यात आली. झालेल्या कामांची माहिती तसेच ग्रामपंचायत मार्फत लाभार्थ्यांना घरकुल योजने अंतर्गत कोणाकोणाला घरे मंजूर झाली त्या लाभार्थ्यांचे संपूर्ण नांव गांव पत्ता व त्यांनी दाखल केलेले संपुर्ण कागदपत्रांची माहिती त्याच प्रमाणे संपूर्ण ग्रामिण योजना अंतर्गत कोणकोणती कामे करण्यांत आली त्या कामांची नावे अंदाज पत्रक हजेरी पुस्तकांची माहिती तसेच सदर कामावरील मजुरांना धान्य कुपन देण्यात आली त्याची माहिती इत्यादि वरील प्रमाणे संपूर्ण माहिती तात्काळ मिळणेसाठी"

मागणीप्रमाणे माहिती मिळाली नसल्याने अपीलकाराने प्रथम अपील दाखल केले. जन माहिती अधिकाऱ्यांनी अपीलकारास माहिती पुरविली नाही. प्रथम अपीलीय अधिकाऱ्यांनी त्यांच्या आदेशात पूर्वीचे ग्रामसेवक श्री.वेताळे यांनी दप्तरच नवीन ग्रामसेवकाच्या सूपूर्त न केल्यामुळे माहिती देता आली नाही व यासाठी श्री.वेताळे यांना जबाबदार धरण्यात येत आहे असे आदेश दिले.

आयोगापुढील सुनावणीच्या दिवसापर्यंतसुध्दा दप्तर मिळालेले नाही. अपीलार्थीनी श्री.वेताळे यांना तुरुंगवास हि झालेला असून त्यांचे विरुध्द भ्रष्टाचाराचे गुन्हे दाखल झाले आहेत असेहि त्यांच्या निवेदनात म्हटले आहे.

मुख्य कार्यकारी जिल्हापरिषद, धुळे यांना असे निर्देश देण्यात येतात की श्री.वेताळे यांचेकडून दप्तर प्राप्त करुन घेण्याची कायदेशीर कार्यवाही एक महिन्याचे आत पूर्ण करावी व विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास सात दिवसात माहिती द्यावी. श्री.वेताळे यांचे विरुध्द मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी कठोर प्रशासकीय कार्यवाही करावी. सदर प्रकरणी मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

**मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हापरिषद, धुळे यांनी व जन माहिती अधिकारी यांनी उपरिनिर्दीष्ट कार्यवाही करावी. या आदेशाची प्रत मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हापरिषद धुळे यांनाहि पाठविण्यात यावी.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः ३०.०१.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/नाशिक/सी.आर अपील क्रं. १४४९/०२**

**श्री.राजेश जोतसिंग गिरासे , ---------अपीलकर्ता**
**मु.पो.वरुळ, ता.शिंदखेडा,**
**जि.धुळे.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा --------- उत्तरवादी**
**शिक्षणाधिकारी (प्राथमिक),जिल्हापरिषद,धुळे,जि.धुळे**

**जन माहिती अधिकारी तथा**
**मुख्याध्यापक,जि.प.शाळा,वरुळ, ता.शिंदखेडा,**
**जि.धुळे**

**- वि वे च न -**

अपीलार्थी श्री.राजेश जोतसिंग गिरासे ,यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २०.०७.२००९ रोजी व्दितीय अपील सादर केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नवीन प्रशाकीय इमारत, जिल्हाधिकारी कार्यालय, सभागृह, धुळे,येथे दि.०८.१२.२००९

रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी तसेच जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलार्थी उपस्थित होते.

अपीलार्थीनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे १७.०२.२००९ रोजी अर्ज करुन खालील नमूद केलेली माहिती मागितली.

" सर्वशिक्षा अभियान अंतर्गत शैक्षणीक वर्ष २००५ ते आज पर्यंत जिल्हा परिषद शाळा वरुळ घुसरे यांना कोणकोणत्या प्रकारच्या योजने अंतर्गत निधी उपलब्ध झालेला आहे. त्याबाबत प्राप्त कागदपत्रांविषयी माहिती पुरवावी.

आपल्या शाळेतील शेरा रजिष्टरवरीती भेटी दिल्या असता अधिकारी (केंद्र प्रमुख) विस्तार अधिकारी अभियंता, उप अभियंता सदरील कागाबाबत शेरे अजिष्टवरती नोंदीची झेरॉक्स प्रत पुरविण्यात यावी.

शाळा मेजर रिपअर्स खाली किती निधी मंजुर झालेला आहे व किती टक्के निधी काढण्यात आलेला आहे. सदरील निधी वरील कामा करीता वापरण्यात आलेला आहे काय नसल्यास कोणत्या खात्यात जमा करण्यात आलेला आहे. बाबत सविस्तर माहिती पुरविण्यात यावी.

सदरील काम कोणास देण्यात आले त्याबाबत वर्क ऑर्डर ची झेरॉक्स प्रत पुरविण्यात यावी व काम कोणत्या तारोर सुरु करण्यात आले आणि कोणत्या तारखेस पूर्ण झाले याबाबत सविस्तर माहिती पुरविण्यात यावी. कामाची मुदत किती ?

बँकेतून कोणकोणत्या तारखेस किती निधी काढण्यात आला त्याबाबत बँकेच्या पासबूकाची झेरॉक्स आणि आजपर्यंत जो व्यवहार (किती) अंतर्गत नोंदविण्यात आलेला आहे त्याची झेरॉक्स प्रत पुरविण्यात यावी. मंजूर रक्कम (अॅडव्हान्व) केव्हा काढला जातो कोढे खर्च केला.

सदरील काम कुठल्या ठेकेदाराकडून केले आहे त्याबाबत ठेकेदाराचे नांव कामाचे स्वरुप आवश्यक असलेले मटेरिअत कोणाकडून किती व कोणत्या कंपनीचे मटेरीअल घेतले आले बिलांची झेरॉक्स व संबंधीत आपल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना वेळोवेळी खुलासा लेखी स्वरुपात करण्यात आला होता काय. याबबात झेरॉक्स व लेखी स्वरुपात माहिती पुरविण्यात यावी."

मागणीप्रमाणे माहिती मिळाली नसल्याने अपीलकाराने दि.६.०४.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकारास दि.१६.०४.२००९ पर्यंत माहिती उपलब्ध करुन द्यावी प्रथम अपीलीय अधिकाऱ्यांनी गटशिक्षणाधिकारी,गट साधन केंद्र,शिंदखेडा यांना दि. १३.०४.२००९ च्या पत्रान्वये कळविले. सदर बाब प्रथम अपीलीय अधिकाऱ्यांनी अपीलकारास अवगत केली त्यानंतरही माहिती मिळाली नसल्याने अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

जिल्हापरिषद शाळा वरुळ येथे करण्यात आलेल्या मेजर रिपेअर कामाबाबत तपशिलवार माहिती अपीलकाराने मागीतली आहे. अपीलकारास माहिती द्यावी असे जिल्हापरिषद शाळा मुख्याध्यापक यांना कळविण्यात

आले होते. मुख्याध्यापकांनी अपीलकारास माहिती दिली नाही असे जन माहिती अधिकाऱ्यांनी व्दितीय अपीलावरील सुनावणीचे वेळी आयोगासमोर प्रतिपादन केले. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिकाऱ्यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ७ दिवसांच्या आत अपीलकारास माहिती पुरवावी. तसेच माहिती देण्यास विलंब लावल्याबद्दल जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक जि.प. मराठी शाळा वरुळ यांचेवर रु.५०००/- ची शास्ती लावण्यात येत आहे ती अपिलिय अधिकारी यांनी १ एप्रिल २०१० रोजी होणाऱ्या पगारातून वसूल करावी व शासनाने विहित केलेल्या बजेट हेडखाली जमा करुन तसा अनुपालन अहवाल आयोगात (मुंबई कार्यालयात) १५ एप्रिल २०१० पर्यंत पाठवावा.

**आदेश**

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

**जन माहिती अधिकारी व अपिलिय अधिकारी यांनी उपरिनिर्दीष्ट कार्यवाही करावी.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः ३०.०१.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/नाशिक/सी.आर अपील क्रं. १४४४/०२**

**श्री.विजयसिंग नथेसिंग राजपूत** ---------**अपीलकर्ता**
**सुकबा निवास,लोकनेते आमदार,**
**कै.ठाणसिंग जिभाऊ चौक,**
**शिंदखेडा,जि.धुळे.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** --------- **उत्तरवादी**
**ग्रामविस्तार अधिकारी,पंचायत समिती,शिंदखेडा,ता.शिंदखेडा,**
**जि.धुळे**

**जन माहिती अधिकारी तथा**
**ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, शिंदखेडा,ता.शिंदखेडा,**
**जि.धुळे**

**- वि वे च न -**

अपीलार्थी श्री.विजयसिंग नथेसिंग राजपूत,यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०९.०७.२००९ रोजी व्दितीय अपील सादर केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नवीन प्रशाकीय इमारत, जिल्हाधिकारी कार्यालय, सभागृह, धुळे,येथे दि.०८.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी तसेच जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलार्थी उपस्थित होते.

अपीलार्थींनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे १२.०३.२००९ रोजी अर्ज करुन खालील नमूद केलेली माहिती मागितली.

" मासिक सभा दि.१.०५.२००८ ची प्रोसिडींग हजर असलेल्या ग्रा.पं.सदस्य सह छायांकित व साक्षांकित नक्कल व डिसेंबर ०८ ते मार्च २००९ मासिक सभा, ग्र.पं.सदस्य हजर असलेले सहित व ग्रामसभा प्रोसिडींग ठरावाच्या छायांकित व साक्षांकित नक्कला त्वरित मिळाव्यात"

जन माहिती अधिकाऱ्यांनी विहित कालावधीत माहिती पुरविली नाही. यामुळे अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिकाऱ्यांकडे दि. ४.०५.२००९ रोजी सुनावणी आयोजित केली. प्रथम अपीलीय अधिकाऱ्यांनी सुनावणी आयोजित करुन दि.

४.०५.२००९ रोजी आदेश पारित केले. अपील मान्य केले. त्यानंतरही जन माहिती अधिकाऱ्यांनी अपीलकारास माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

शिंदखेडा ग्रामपंचायतीशी संबंधीत मासिक सभा दि.१.०५.२००८ ची प्रोसिडींग हजर असलेल्या ग्रामपंचायत सदस्यांसह छायांकित व साक्षांकित नक्कल व डिसेंबर २००८ ते मार्च २००९ मासिक सभा ग्रामपंचायत सदस्य हजर असले सहित ग्रामसभा प्रोसिडींगच्या ठरावाचया छायांकित व साक्षांकित नक्कला मागितल्या होत्या अपीलकाराने मागितलेल्या माहितीचे सर्व दप्तर तत्कालीन ग्रामविकास अधिकारी श्री.जी.के.वेताळे,श्री.ई.यु.अहिरे व श्री.एस.बी.देसळे यांनी हस्तांतर न केल्यामुळे अपीलकारास माहिती देता अपीलकारास माहिती देता आली नाही असे जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपिलिय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (ग्रा.पं.) पंचायत समिती शिंदखेडा यांनी व्दितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी प्रतिपादन केले. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, अपीलकारास जन माहिती अधिकाऱ्यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. म्हणून मुख्य कार्यकारी अधिकारी,जि.प.धुळे यांनी कायद्यानुसार दप्तर मिळवून घेऊन ते ग्रा.पं. अधिकारी यांचेकडे सुपूर्त करण्याची कारवाई १ महिन्यात पूर्ण करावी व त्यानंतर १ आठवडयाचे आत जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास माहिती द्यावी. दप्तर हस्तांतरित न केल्याबद्दल संबंधित दोर्षीविरुध्द विभागीय व फौजदारी कार्यवाही करावी व त्यासंबंधीचा अहवाल २ महिन्याचे आत आयोगास पाठवावा. तसेच जे जे अधिकारी या चौकशीत दोषी आढळतील त्यांचेवर अधिनियमाच्या कलम २० नुसार रु. १०,०००/- ची शास्ती लादण्यात येत आहे.

सदर शास्ती यांच्या मार्च २०१० पासून वेतनातून समान २ हप्त्यात रु.५०००/- प्रमाणे वसूल करुन लेखाशिर्ष क्र.००७, इतर प्रशासनिक सेवा,६०,इतर सेवा,८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७००१६-१) या लेखाशिर्षाखाली शासकीय जिल्हा कोषागारात जमा करावी. चलनाच्या प्रती १५ मे २०१० पर्यंत राज्य माहिती आयोगाकडे (मुंबई कार्यालय) येथे सादर कराव्यात.

## आदेश

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

**या आदेशाची प्रत मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.धुळे यांनाहि त्वरीत कार्यवाहीसाठी देण्यात यावी. संबंधित पर्यवेक्षकिय अधिकाऱ्यांनी व जन माहिती अधिकारी यांनी उपरिनिर्दीष्ट कार्यवाही करावी.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांक: ३०.०१.२०१०**